ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : पानिपतचा संग्राम भाग पहिला

संपादक : नरहर रघुनाथ फाटक
सेतुमाधवराव पगडी

प्रकाशक : मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई

प्रकाशन वर्ष : १९६१

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

# पानिपतचा संग्राम

## भाग पहिला





संपादक :

श्री. नरहर रघुनाथ फाटक

श्री. सेतुमाधवराव पगडी

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
इतिहास संशोधन मंडळ ग्रंथ क्र. २

# पानिपतचा संग्राम

भाग पहिला

संपादक :
श्री. नरहर रघुनाथ फाटक
श्री. सेतुमाधवराव पगडी

इतिहास संशोधन मंडळ
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाकुरद्वार, मुंबई २

प्रकाशक :
श्री. वासुदेव विष्णु भट
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
ठाकुरद्वार, मुंबई २

आवृत्ति पहिली : १९६१



मूल्य रु. ५·००

मुद्रक :
जयराम दिपाजी देसाई
राष्ट्रवैभव प्रेस
गिरगांव मुंबई ४

# प्रस्तावना

ता. १४ जानेवारी १७६१ या दिवशीं पानीपत या गांवाजवळ मराठे आणि रोहिले-अफगाण यांच्यांत जें घनघोर युद्ध झालें त्याला १४ जानेवारी १९६१ रोजीं दोनशे वर्षें होतात म्हणून त्या युद्धाच्या स्मरणार्थ वाङ्मयदृष्ट्या कांहीं करावें, अशी चर्चा महाराष्ट्रांत अनेक प्रकारें १९६० हें वर्ष उगवल्यापासून सुरू होती. तिच्या अनुषंगानें मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळा मार्फत कांहीं काम केलें जावें, असें ठरलें. पानीपतच्या प्रसंगाविषयीं विवेचनपर ग्रंथ लिहिण्यापेक्षां मराठींत व इतर भाषेंतून-प्रामुख्यानें फार्सी व इंग्रजी-भाषांतून जीं साधनें उपलब्ध आहेत तीं एकत्र केल्यास इतिहासाच्या अभ्यासकांना त्यांचा उपयोग अधिक होईल, असें वाटलें. मराठी पत्रें अनेक ग्रंथांतून छापलीं गेलीं आहेत. ते सारे ग्रंथ सामान्य जिज्ञासूला मिळण्याचा संभव कमी, आणि फार्सी साधनें मूळ अथवा भाषांतरित हीं मराठी पत्रांच्या मानानें अत्यंत दुर्लभ, शिवाय ऐतिहासिक मराठी पत्रांतील मजकुराचा बोध जेथें कठिण वाटतो, तेथें मूळ फार्सी साधनांबद्दल बोलायलाच नकों. फार्सी साधनांचीं इंग्रजी भाषांतरें मराठी पत्राप्रमाणेंच विखुरलेलीं आहेत. यामुळें दोन्ही भाषांतील साधनांचा संग्रह साहजीकच उपकारक होईल, अशा जाणीवेनें प्रस्तुत पुस्तकाच्या रचनेला आरंभ केला. त्या रचनेची पूर्तता या पुस्तकानें शक्य तेवढी करण्यांत आली आहे.

प्रस्तुत 'पानीपतचा संग्राम' हें पुस्तक साधनांचें आहे, असें मागें सुचविलेंच आहे. मराठ्यांचे सेनापति सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब पेशवे यांनीं आपला दिल्लीचा मुक्काम १७६० आक्टोबरच्या सुरवातीस सोडला व कुंजपुरा हें रोहिला-अफगाणांचें ठाणें मारण्यासाठीं तिकडे सर्व सैन्यासह मोर्चा वळविला. कुंजपुरा मराठ्यांनीं काबीज केलेलें पाहून अहमदशहा अब्दाली मराठ्यांच्या पिछाडीस यमुना उतरून आल्यामुळें भाऊसाहेबांनीं आपलें सैन्य परत फिरविलें. पानपतापर्यंत आल्यावर समोर अब्दालीची फौज पाहून त्यांनीं पानीपत गांव पाठीशीं घालून आपली छावणी ठोकली. कुंजपुऱ्यावरील हल्ला हें पानीपतच्या रणक्षेत्राचें मूळ असल्यामुळें भाऊसाहेबांनीं दिल्ली सोडल्यापासून पानीपतचा संग्राम व मराठ्यांचा पळ हे प्रसंग संपेपर्यंतचीं निवडक पत्रें कालानुक्रमानें या पुस्तकांत एकत्र दिलेलीं आहेत. तीं अनेक पुस्तकांतून घेतल्याचें वाचकांच्या लक्षांत येईल. मराठी बखरी गाळल्या आहेत. त्यानंतर फार्सी भाषेंतील साधनें जोडलेलीं आहेत. शक्य तोंवर मूळ फार्सीवरून त्या साधनांतील पानीपता-पुरत्या भागाचें मराठींत भाषांतर दिलेलें आहे. या भाषांतराचें श्रेय सर्वस्वीं महाराष्ट्राच्या जिल्हा-गॅझेटियरांचे कार्यकारी संपादक श्री. सेतु माधवराव पगडी यांचें आहे. श्री. सेतु माधवरावांना महाराष्ट्रराज्याच्या दप्तरखान्याचे व प्राचीन वस्तुरक्ष-

णाच्या खात्याचे संचालक डॉ. पु. म. जोशी आणि पंजाबचे राज्यपाल श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ या दोघांनीं फार्सी ग्रंथ मिळवून देण्याच्या कामीं बहुमोल साह्य केलें. श्री. सेतुमाधवराव पगडी हे फार्सी भाषेचे उत्तम पंडित असून आजवर महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनाला नडणारे फार्सी भाषेचें अज्ञान श्री. सेतुमाधवराव महाराष्ट्र–राज्यांत आल्यामुळें बहुतांशीं दूर झालेलें आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाच्या विद्यमानें पानीपताविषयीं साधन ग्रंथ प्रसिद्ध व्हावा, असें ठरल्यानंतर श्री. सेतुमाधवरावांना फार्सी साधनांकरितां विनंती करतांक्षणींं त्यांनीं हें काम जणूं काय आपलेंच अशा उत्साहानें फार्सी साधनें जमविणें, त्यांचें भाषान्तर करणें वगैरे गोष्टी आरंभल्या. जीं साधनें मूळ फार्सी भाषेंत मिळणें अशक्य होतें त्यांच्या इंग्रजी भाषांतरावरून त्यांना मराठी पेहेराव चढविला. इंग्रजी भाषेंतील कांहीं स्वतंत्र पुस्तकांतून व निबंधांतून पानीपतासंबंधीं आढळलेल्या माहितीचा समावेश या पुस्तकांत केलेला आहे. यापुढें फार्सी साधनांची उणीव पानीपत–संग्रामाचा अभ्यास करूं इच्छिणारांना वाटणार नाहीं, अशी भरीव कामगिरी श्री. सेतुमाधवरावांनीं तडीस नेलेली आहे. या कामगिरीनिमित्त मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाचे कार्यकारी तर श्री. सेतुमाधवरावांचे ऋणी आहेतच, परंतु साऱ्या इतिहासप्रेमी महाराष्ट्रीयांनीं सदैव ऋणी रहावे अशी ही त्यांची कामगिरी आहे. त्यांच्याबरोबरच पंजाबचे राज्यपाल श्री. काकासाहेब गाडगीळ आणि डॉ. जोशी यांचेहि आभार मानणें अवश्य आहे.

फार्सी साधनांविषयीं आणखी थोडासा खुलासा केला पाहिजे. मूळ फार्सीवरून आतां प्रथमच काशीराजाच्या बखरीचें मराठी भाषांतर लोकांना सादर होत आहे. या बखरीचें फार्सी मूळ आजवर छापलें गेलें नव्हतें. श्री. सेतुमाधवरावांच्या प्रयत्नानें तें येथील युसुफ इस्माइल कॉलेजच्या प्रकाशन विभागांतर्फे इंग्रजी भाषांतरासहित पहिल्यांदाच प्रकाशांत आलें आहे. शहानामाये अहमदीया, शिवप्रसादकृत–तारीखे फैजबक्ष, तारीखे हुसेनशाही, गुले रहमत, हीं साधनें अद्यापि हस्तलिखिताच्या स्वरूपांत असून त्यांतील पानीपत–संग्रामाची माहिती नव्यानेंच मराठींच्या वाचकापुढें प्रस्तुत पुस्तकाच्याद्वारें येत आहे. राजवाडे खंड ३ मध्यें ‘ होळकराची थैली ’ या नांवाचें एक प्रकरण अपुरें छापलेलें आहे. एका फार्सी ग्रंथांत त्याचा संपूर्ण तर्जुमा आढळला, त्यामुळें तें पूर्ण करतां आलें; हा या पुस्तकाचा आणखी एक विशेष ठरतो. फार्सी साधनांबद्दल त्या त्या साधनाच्या आरंभीं जें टिपण दिलेलें आहे, तें जिज्ञासूंनीं नजरेखालीं घातल्यास त्यावरून अधिक बोध होईल. श्री. सेतुमाधवराव पगडी, श्री. काकासाहेब गाडगीळ व डॉ. जोशी यांचे मागें आभार मानले आहेत. त्यांच्या प्रमाणेंच राष्ट्रवैभव प्रेसचे श्री. जयरामभाऊ देसाई यांच्या विषयीं कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. छपाईचें काम उशीरा सुरू झालें असतां त्यांनीं इतर कामें मागें ठेवून प्रस्तुत

पुस्तक ता. १४ जानेवारी १९६१ रोजीं छापून पुरें केलें. पुस्तक तयार झाल्यानंतर त्याचें प्रकाशन सदर तारखेस महाराष्ट्रराज्याचे शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांनीं केलें, म्हणून त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानतों.

प्रस्तुत पुस्तकावर 'भाग पहिला' असें शब्द आहेत. अजून कित्येक फार्सी साधनें हातीं यावयाचीं आहेत. पुण्याच्या पेशवे-दप्तरांत पानीपताविषयीं आणखी बरेच कागद मिळतील, अशी आशा आहे. दुसरा भाग छापण्याचा योग आल्यास येथें निर्देशिलेली साहित्य-सामग्री जिज्ञासूंच्या हातीं पडेल.

न. र. फाटक
वा. वि. भट

## संदर्भग्रंथ-संक्षेपांचा खुलासा

पुद. पुरंदरे दप्तर

राज. राजवाडे ( मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें )

शिंदे. इ. सा. शिंदेशाहीच्या इतिहासाचीं साधनें

पदे. पेशवेदप्तर

इसं. ऐ. टि. इतिहाससंग्रह–ऐतिहासिक टिपणें.

ऐ. पत्र्य. ऐतिहासिक पत्रव्यवहार.

काइसं. पत्रें, यादी वगैरे काव्येतिहाससंग्रह पत्रें यादी वगैरे.

संक्षेपापुढील पहिला आंकडा ग्रंथाच्या खंड विभागाचा व दुसरा त्यांतील लेखांकाचा आहे.

# पानीपताचें अल्प समालोचन

पानीपत येथें मराठे व रोहिले–दुराणी यांचें रणकंदन ता. १४ जानेवारी १७६१ बुधवार या दिवशीं घडलें तरी त्याचा पाया नजीबखान रोहिल्याच्या उदयानें घालून ठेवला होता. नजीब हा वस्तुतः दिल्लीच्या गाझीउद्दीन वजीराचा नोकर. परंतु या वजीरांत कर्तबगारीचा कोणताच गुण नसल्यामुळें नजीबचें नशीब उघडायला उशीर लागला नाहीं. त्यानें बादशहाच्या खाजगी खर्चासाठीं राखून ठेवलेल्या प्रदेशाचे लचके तोडून स्वतःला धष्टपुष्ट बनविलें. १७५७ सालीं अहमदशहा अबदालीला उघडपणें मदत करून त्याच्या बळावर नजीबखान हा अयोध्येच्या नबाब-वजीरांच्या योग्यतेचा समजला जाऊं लागला. गाझीउद्दीन यानें मराठ्यांशीं मैत्री जोडली होती. अयोध्येचा नबाब शुजाउद्दौला हा देखील मराठ्यांशीं सलोख्यानें वागणारा होता. सूरजमल हा नव्यानें उत्तर भारतीय राजकारणाच्या घडामोडींत सरसावलेला जाट राजा मराठ्यांशीं अटीतटीच्या लढाया होऊनहि मराठ्यांचा शत्रु नव्हता. गाझीउद्दीनाचें शुजा, नजीब या दोघांशीं पटत नव्हतें. पटत असलेंच तर तें एक जाट राजाशीं पटत होतें. नजीबाचें थोड्या फार प्रमाणांत मराठ्यांसकट या सर्वांशींच वाकडें होतें. १७५७ ची मोहीम आटपून अबदाली स्वदेशीं गेल्यावर मराठ्यांनीं जेव्हां अबदालीची पंजाबांतील सत्ता उलथून पाडली व अटकेपर्यंत आपला ध्वज पोंचविला, तेव्हां नजीबाचा कांटा काढण्याच्या कामास मराठ्यांनीं हात घातला. त्याचें पारिपत्य मल्हारराव होळकराच्यानें होणार नाहीं, म्हणून दत्ताजी शिंद्यांची त्या कामावर पेशव्यांनीं नेमणूक केली. दत्ताजींनीं ती कामगिरी सुरू केली, परंतु तिला यश येण्यापूर्वीच पंजाबांत अबदाली घुसला व तेथील मराठ्यांचा अंमल नाहींसा झाला. हें कळल्यावर दत्ताजींनीं नजीबाचा पिच्छा सोडून अफगाण सुलतानाशीं लढण्याची तयारी केली. रोहिले हे हिंदुस्थानांत येऊन राहिलेले अफगाणच असल्यामुळें अबदालीनें त्यांची पाठ राखावी हें सरळच होतें. १७५७ च्या मोहिमेंत अबदालीला मदत करून नजीबानें अबदाली हा संकटप्रसंगीं आपल्या संरक्षणास धावून यावा असा एक प्रकारें हक्कच निर्माण केला होता. दिल्लीच्या बादशाहींत आपला कोणी दणकेदार हस्तक पाहिजे, ही अबदालीची आकांक्षा सफळ करण्याजोगा नजीब हाच एक त्याचा जातभाई होता. १७५९ मध्यें नजीबावर दत्ताजीच्या धडकीचें संकट कोसळलें तेव्हां त्यानें अबदालीचा धांवा केला व त्यास अबदाली पावला.

नजीब हा सुचतील त्या उपायांनीं स्वतःचें नशीब उघडण्याकरितां झटणारा पुरुष होता. आपल्या नशीबाशीं त्यानें मुसलमान सत्तेच्या पुनरुज्जीवनाची गांठ बांधली होती. नजीबाला अशा पुनरुज्जीवनाची जात्या मोठीशीं आंच असेल असें म्हणवत नाहीं. तो तलवारीनें नशीबाचा दरवाजा उघडूं पहाणारांपैकीं एक असल्यानें दिल्लींतील

बादशाहीचा ऱ्हास आणि भारतीय मुसलमान जनतेमध्यें वाढणारा धार्मिक भ्रंश या दोन विपत्तींचा सोपपत्तिक रीत्या अभ्यास करण्याची बौद्धिक पात्रता त्यामध्यें नव्हती, परंतु त्याला या संबंधांत चेतविणारा शहावलीउल्ला नांवाचा एक स्वधर्मोद्धारवादी मुसल्मान तेव्हां आपल्या ध्येयसिद्धीची चळवळ करीत होता. जोंवर जाट, शीख आणि मराठे यांना बादशाहीच्या राजकारणांत चढाओढीनें आपला वरचढपणा गाजविण्याला अवकाश राहील तोंवर खालावलेल्या इस्लामी सत्तेचें डोकें वर निघण्याची आशा नको. बाबरचे वंशज हे जो कोणी बळावेल त्याच्या हातांतलें बाहुलें बनून दिवस काढतात. त्यांच्यांत आपल्या सत्तेची घडी पूर्वीप्रमाणें बसविण्याची शक्ति उरलेली नाहीं. म्हणून बाहेरून कोणी तरी बलाढ्य पुरुषानें दिल्लीच्या सत्तेचीं सूत्रें हातीं घ्यावीं व तसें करण्याला जर कोणी योग्य असेल तर तो एक अबदालीच आहे, याप्रमाणें शहावली उल्लाच्या एकंदर विचारसरणीचा सारांश सांगता येतो. याचा व नजीबखानाचा आपसांत गुरुशिष्यासारखा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. अडी-अडचणीच्या वेळीं नजीब त्याचा सल्ला घेऊन वागत असे. नजीबखानानें मुसलमानांच्या धर्मशिक्षणार्थ स्थापन केलेलें विद्यालय हें शहावलीउल्लाच्या चळवळीचें केंद्र होतें. नजीबखानानें आपल्या पदरीं बाळगलेल्या विद्वानांपैकीं अनेक जण या इस्लामेतर धर्मांच्या समाजाचा उत्कर्ष लवमात्र सहन होत नाहीं, अशा स्वभावाच्या शहावली उल्लाचे दोस्त असण्याचा संभव नाकारतां येण्याजोगा नाहीं. या स्वधर्मोद्धारेच्छु गृहस्थानें अबदालीला १७५६ च्या सुमारास एक पत्र पाठविलें. त्यामध्यें येथील मुसलमानांच्या धार्मिक दुर्दशेचें भयानक चित्र रेखाटून मुसलमानांचें व इस्लाम धर्माचें रक्षण करणारा तुमच्याशिवाय दुसरा कोणी नाहीं असें म्हटलें होतें. अबदालीचें आक्रमण नादिरशहासारखें नसावें, त्यानें मुसल्मानांचा नाश करून जाट, मराठे शिल्लक ठेवले, तसा प्रकार अबदालीच्या हातून घडूं नये, अशीहि सूचना त्या पत्रांत शहावलीउल्लानें दिलेली होती. या इसमाचें दिल्लीस किती मोठें प्रस्थ होतें याची कल्पना, बादशहा अहमदशहा (१७४८-१७५४) व त्याची आई खुदसिया बेगम ही दोघे त्याच्या बरोबर पुष्कळदां भोजन करीत असत या गोष्टीवरून करतां येईल. १७५९ मध्यें अबदालीला नजीबखानानें बोलावलें हें तर खरेंच पण त्या पाचारणामागें शहावली उल्लाचा आग्रह होता; किंबहुना पानीपतावर जिचा शेवट झाला त्या मोहीमेचा सूत्रधार शहावली उल्लाच समजावा लागतो, असें एका मुसलमान संशोधकाचें मत प्रसिद्ध झालेलें आहे. ( A Social History of Islamic India : Mohammad Yasin )

शहावलीउल्ला, नजीबखान यांच्या कटाला तत्कालीन भारतीय राजकारणांत इतिहासानें महत्त्व दिलें नसलें तरी दिल्लीची जुनी बादशाही नष्ट करून तिच्या जागीं एखादी परस्थ इस्लामी शक्ति येऊन बसावी, अशा निश्चित विचारांचीं माणसें तेव्हां या देशांत होतीं, हा या सदर कटाचा निष्कर्ष स्पष्ट आहे. नजीबाच्या पाचारणानें व

शहावलीउल्लाच्या चिथावणीनें अब्दाली १७५७ सालीं हिंदुस्थानांत चौथ्या वेळ आला. पूर्वी तीनदां आला असतां त्याला जें यश लाभलें नाहीं, तें या चौथ्या स्वारींत लाभलें. त्यानें दिल्ली काबीज करून बादशाही कुटुंबाचें आणि तेथील जनतेचे अनन्वित हाल केले. दिल्लीहून त्याची धाड मथुरेवर गेली. मथुरेस त्यानें हिंदूची कत्तल उडविली, देवळें पाडलीं. नंतर तो स्वदेशीं गेला व जातांना त्यानें सारा पंजाब आपल्या राज्यास जोडला. नजीबाचेंहि महत्त्व या धामधुमींत खूप वाढलें. १७५८ मध्यें अब्दालीची पंजाबांतील सत्ता नाहींशी करून जेव्हां मराठे नजीबखानाच्या पाठीस लागले तेव्हां पुन्हा अब्दाली हिंदुस्थानांत आला, असा उल्लेख सुरवातीस केलाच आहे. नजीबाला सोडून दत्ताजी अब्दालीशी लढण्याकरितां गेला आणि ता. १० जानेवारी १७६० रोजीं यमुनेच्या काठीं झालेल्या झटापटींत मृत्युमुखीं पडला. ही बातमी पेशवे मंडळीला कळली तेव्हां ही मंडळी उदगीर येथें निजामावर मिळालेल्या विजयाच्या आनंदोत्साहांत होती. दत्ताजीच्य बातमीनें पेशव्यांना उत्तरेच्या मोहीमेची तयारी करणें भाग होते. तशी तयारी करून सदाशिवराव भाऊसाहेब ता. १५ मार्च पासून उत्तरेच्या मार्गास लागले आणि दिल्लीचा पल्ला त्यांनीं साडेचार महिन्यांनीं गांठला. आगस्टच्या पहिल्याच दिवशीं दिल्ली शहर किल्ल्यासकट ताब्यांत घेऊन भाऊसाहेबांनीं तेथें आपल्या सैन्याचा तळ ठोकला. यमुना नदीला पूर आलेला होता, म्हणून अब्दालीची व भाऊसाहेबांची गांठ पडणें अशक्य होते. दोन्हीकडून तोफांचे गोळे एकमेकावर फेकले जात असत. ते शिबिरापर्यंत जाऊन नुकसान करीतच असा नियम नव्हता. सप्टेंबर अखेरीस पावसाळ्याचा जोर हटला आणि भाऊसाहेबांनीं कुंजपुरा हें रोहिल्यांचें ठाणें मारण्याच्या निश्चयानें दिल्लीहून मुक्काम हालविला. दिल्लीच्या तख्तावर विश्वासरावाला बसविण्याचा त्यांचा उद्देश होता, असा आरोप क्वचित् उचारला गेला आहे. परंतु त्या आरोपाचा पुरावा भाऊसाहेबांनीं दक्षिण सोडल्यापासून केलेल्या उपलब्ध लेखी व्यवहारांत कुठेंहि दृष्टीस पडत नाहीं. उलट त्यांनीं दिल्लीहून पाटण्यास पळून गेलेल्या अली गोहर नांवाच्या शहाजाद्यास बादशहा असें जाहीर करून त्याचा दिल्लीस असलेला मुलगा जवानखान याला युवराज पदीं बसविलें. ( १० ऑक्टो. ) त्यासाठीं दरबार, नजराणे, शिक्के वगैरे नव्या अधिकाराच्या प्राप्तीचे विधिहि पार पाडले. याप्रमाणें भाऊसाहेबांनीं वरील आरोपाचा पायाच खणून टाकला. अलीगोहरला बादशाहा करावे, ही कल्पना भाऊसाहेबांच्या अंतरंगांत दिल्लीस पोचण्यापूर्वीपासूनच घोळत होती. शुजाउद्दौल्याला आपल्याकडे वळविण्याच्या विचारविनिमयांत या कल्पनेची वाच्यता झालेली आहे.

१७६० आक्टोबरच्या १७ तारखेस भाऊसाहेबांनीं कुंजपुरा पादाक्रान्त केला व त्यांचा पुढें जाण्याचा बेत अब्दाली यमुना उतरून मराठा सैन्याच्या पिछाडीस आल्यामुळें फिसकटला. भाऊसाहेब आपलें सैन्य मागें फिरवून पानपतास अब्दालीच्या

सैन्यासमोर येऊन टाकले. नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारीचे चौदा दिवस याप्रमाणें पानीपतास मराठ्यांचा तळ अडीच महिने पडलेला होता. या काळांतील उभय पक्षाची हालहवाल बारकाईनें तपासून पाहाण्यासारखी आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील मराठी व फार्सी साधनें एकमेकाशीं ताडून डोळ्याखालीं घातल्यास नोव्हेंबर महिन्यांत अब्दालीची स्थिति स्पृहणीय नव्हती, असा भाऊसाहेबांच्या छावणींतून कित्येकांनीं आपल्या महाराष्ट्रांतील आप्तेष्टांना पाठविलेल्या पत्रांचा स्पष्ट इत्यर्थ पहायला सांपडतो. हीं पत्रें पानीपतास हजर असलेल्या सामान्य महाराष्ट्रीयांची असून तेथील हालचाली वा घडामोडी पहाणारांनीं लिहिलेलीं आहेत. एखादा विशेष प्रसंग होऊन गेल्यावर पंध्रवड्याच्या आंत हीं पत्रें लिहिलेलीं असून तीं खाजगी नात्याचीं आहेत. यामुळें अतिशयोक्ति किंवा आत्मश्लाधा उपयोगांत आणण्याची गरज नव्हती, केवळ आपल्या नातलगास वस्तुस्थिति कळावी एवढाच त्या पत्रांमागें हेतु होता. यामुळें त्यांतील माहितीच्या विश्वसनीयतेबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं. मुसलमानांनीं किंवा हिंदूंनीं फार्सी भाषेंत रचलेल्या पानीपताविषयींच्या बखरी लेखकांचा काळस्थळसंबंध घ्यानांत घेतां दूरच्या आहेत, याबद्दल स्वतंत्र विवेचनाची आवश्यकता नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत त्या त्या बखरींचा परिचय करून देणारीं जीं टिप्पणें बखरींतील मजकुराच्या आरंभीं जोडलेलीं आहेत तीं बखरकारांच्या काळस्थळाचें दूरत्व पटविण्याला पुरेशीं आहेत. 'मीराते अहमदी' ही एक बखर पानीपताच्या युद्धानंतर आठ महिन्यांनीं लिहिलेली अर्थात १७६१ सालांतील आहे पण लेखक गुजराथमध्यें व माहिती ऐकीव हे तिचे विश्वसनीयतेच्या दृष्टीनें महत्त्वाचे दोष आहेत. 'खजानाये आमिरा' चा लेखनकाल १७६३, पण लेखक औरंगाबादेस व माहितीचा आधार भाऊसाहेबांनीं शुजाकडे पाठविलेला वकील भवानीशंकर, हा तर्कानें जाणावा लागतो. नजीबखानाच्या चरित्राचा कर्ता नूरुद्दीन यानें नजीबाची जीवनकथा १७७१ मध्यें लिहिली. याचा व नजीबाचा दिल्लींतील राजकारणानिमित्त पुष्कळदां जवळून संबंध आला व त्यायोगानें नजीबाविषयीं त्याला जें ज्ञान झालें असेल तेंच नूरुद्दीनाचें मुख्य भांडवल समजावें लागतें. नजीबाचें चरित्र लिहिते वेळीं पानीपतप्रसंगाला १० वर्षें लोटलेलीं आहेत, म्हणजे त्याला साहजीकच आठवणीवर विसंबणें भाग पडलें असल्यास नवल वाटायला नको. त्याच्या आठवणी अप्रत्यक्ष स्वरूपाच्या आहेत. 'शहानामाये अहमदिया' हें तर सांगून सवरून काव्य आहे व त्याचा कर्ता निजामुद्दीन हा पानपतावर हजर नव्हता. यावरून त्याच्या काव्यांतील हकीकत विश्वसनीयतेच्या सीमेबाहेरच थोड्या अंतरावर ठेवली पाहिजे. १७७६ मध्यें शिवप्रसाद या हिंदूनें 'तारीखे फैजबक्ष' या बखरीची रचना केली. या इसमानें पानीपताचा संग्राम पाहिला होता. 'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी' या न्यायानें शिवप्रसाद हा हिंदु असूनहि त्याला मराठ्यांबद्दल सहानुभूति

नव्हती, हें 'तारीखे फैजबक्ष'ची सुरवात पहातांच ध्यानांत येऊं शकते. परंतु संग्राम पाहिलेला म्हणून त्याच्या बखरीची उपेक्षा करतां येत नाहीं. काशिराजाची बखर ही १७८० मध्यें लिहिली जाऊन इंग्रजी भाषेच्या द्वारें तिचा इतिहासजिज्ञासूंना फार लवकर परिचय घडला. शुजाबरोबर काशिराजानें पानीपतचा प्रसंग पाहिला होता. त्यानंतर १९ वर्षांनीं आपल्या त्या प्रसंगाच्या आठवणी लिहून काढतांना त्यानें मधूनमधून आपल्या माहितीचे आधार सांगितले आहेत. पानीपतानंतर लोकांत पसरलेल्या गप्पांनाहि त्यानें स्वतःच्या लेखनांत थारा दिलेला आहे. भाऊसाहेब, जनकोजी प्रभृतींच्या मृत्यूबद्दल काशिराजाच्या आठवणीवर विश्वास ठेवण्याला हरकत नाहीं. शाम्लू हा पानीपतच्या संग्रामांत असूनहि त्यानें संग्रामाचा वृत्तांत थोडक्यांत आटोपला आहे. परंतु युद्धांत हजर म्हणून त्याला किंमत आहे. फार्सी साधनांच्या तारतम्याला एवढीं उदाहरणें पुरेशीं आहेत.

पानीपत येथें छावणी रोवल्यापासून मराठ्यांचे दाणावैरणीसंबंधांतील हाल सारखे वाढत गेले व शेवटीं वाढत्या उपासमारीपेक्षां लढाईचा सोक्षमोक्ष पुरवला, अशा भावनेनें ता. १४ जानेवारी १७६१ रोजीं लढाई सुरू केली आणि लढाईच्या बरोबरच मराठ्यांचाहि शेवट झाला; हा बहुतेक सर्व फार्सी साधनांच्या लेखकांचा ग्रह आढळतो. अब्दालीच्या सैन्यांत दाणा वैरणीची चंगळ होती असें हे लेखक म्हणत नाहींत. अब्दाली देखील मराठ्यांच्या समोर आल्यावर दाणावैरणीच्या टंचाईनें कांहीं काळ ग्रासलेला होता, परंतु ही टंचाई त्याला लवकर नाहींशी करतां आली आणि मराठे या टंचाईच्या जबरदस्त पेंचांत सांपडले असें फार्सी साधनें भासवितात. मराठींतील पत्रें अब्दालीची नोव्हेंबर अखेर पर्यंत पराक्रमाच्या व दाणावैरणीच्या बाबतींत मराठ्यांची स्थिति निरुत्साह उत्पन्न करणारी नव्हती, असें दाखविणारीं आहेत. मराठे त्यांच्या गोटांतून जनावरें आणीत होते व तीं सोडविण्याची अफगाण-रोहिल्यांत हिंमत नव्हती. एकदोन फार्सी साधनांतून या प्रकाराबद्दल अशी मखलाशी दृष्टीस पडते कीं, अब्दालीनें आपला गोट दुसरीकडे हालवितांना बरींच जनावरें गोटाच्या पहिल्याजागीं सोडून दिलीं होतीं, तीं मराठयांनीं पळविलीं. पण फार्सीच्या एका लेखकानें हीं जनावरें नेणाऱ्या मराठ्यांच्या तुकडीवर दबा धरून बसलेल्या अफगाणांनीं अचानक हल्ला करून ती सारीच्या सारी तुकडी परलोकीं पाठविलीं असें म्हटलें आहे. फार्सी बखरींतून हजारोंच्या संख्येनें मराठे मारले, अशा थाटाचीं वर्णनें सर्वत्र पसरलेलीं आहेत. त्या संख्येची गोळाबेरीज केल्यास ता. १४ जानेवारीच्या लढाईत मराठ्यांचें सैन्य अगदीं थोडें शिल्लक असावें, असें समजण्याची पाळी ओढवते. मराठी पत्रांतून फार्सींतल्या मजकुरासारखी भयानक अतिशयोक्ति तर मुळींच नाहीं. मात्र त्यांतून प्रगटणारी वस्तुस्थिति फार्सीच्या अगदीं उलट स्वरूपाची आहे. 'त्याच्यानें इकडे तिकडे जाववत नाहीं,

कांहीं करवत नाहीं. पावणेदोन कोस दीड कोसाची तफावत आहे. पेंढारी, लुंगारे, राऊत वगैरे नित्य उंटें, घोडीं, तट्टें, बैल आघाडी पिछाडीवरी जाऊन गोटापासून घेऊन येतात. त्याचे कोणी पाठीवरहि निघत नाहीं. याप्रमाणें आहे." (पान ९) असें भाऊसाहेबांनीं गोविंदपंत बुंदेल्यास ता. ४ नोव्हेंबरला लिहिलें; ता. १४ नोव्हेंबरच्या पुरंदऱ्याच्या पत्रांत अशीच हकीकत आहे. (पान १३) या माहितीची आवृत्ति ता. २७ नोव्हेंबरच्या पत्रांत वाचकांना दिसेल (पान १६-१७) ता. २८ नोव्हेंबरच्या पत्रांत नाना फडणविसानें 'दररोज सेपनास तटें, घोडीं, उंटें, हत्ती आपले लष्कराचे लोक व पेंढारी मारून आणीत आहे. चहूंकडून पेंचात आणिलें आहे.' वरील मजकुराला दुजोरा दिलेला आहे. (हें पत्र सांगलीस प्रसिद्ध झालेल्या 'नाना फडणीस यांचे शब्दांत पानीपतचा रणसंग्राम' या पुस्तकांत छापलेलें आहे.)

फार्सी बखरी असें दर्शवितात कीं, मराठ्यांनीं अबदालीच्या सैन्यावर चालून जावें आणि मार खाऊन परतावें, असा क्रम चालू होता. मराठी पत्रें फार्सी बखरींच्या उलट सांगतात कीं, अबदलीचे लोक मराठ्यावर धावून जात असत व माणसें गमावून आपली वस्ती गांठीत. एकदां अबदालीचा दिवाण शहावलीखान मराठ्यांच्या छावणीनजीक म्हणे विहिरीची पाहाणी करीत होता. त्याच्या सोबतीस माणसें थोडीं आहेत, असें लक्षांत येऊन मराठे सैनिक हजारोंच्या संख्येनें त्यावर चालून गेले. शहावलीची दुर्दशा उडाली होती, पण त्याला आणीबाणीच्या वेळीं कुमक येऊन पोचल्यानें तो वाचला, अशी एक कथा दोन तीन फार्सी बखरींतून घातलेली आहे. या कथेला मराठी पत्रें दुजोरा देत नाहींत. उलट दोन वेळां रोहिल्यांनीं मराठ्यांना झडपण्याचा यत्न केला; मराठयांनीं त्यांना सडकून झोडपले; एकदां अबदालीच्या गोटापर्यंत मराठयांनीं पाटलाग केला व रात्र पडली नसती तर त्याच वेळीं त्यांनीं शत्रूचा गोट उधळून लावला असता, याप्रमाणें मराठीं पत्रांतून माहिती आलेली आहे. मराठयाकडील तोफांचे गोळे आपल्या वस्तीपर्यंत जातात म्हणून अबदालीनें आपली छावणी तोफांच्या माऱ्याबाहेर नेली, अशी खुद्द भाऊसाहेबांची साक्ष आहे. ता. ४ जानेवारीच्या जनकोजी शिंद्याच्या पत्रांत (पान २३) 'दोन वेळा अबदालीसी व आम्हासी जुझ जाले. पांच सात हजार रोहिले जिवेंच मारिले. तीन हजार पर्यंत जखमी केले. तीन चारसे निशाणे आणिले. हत्ती चार आले' यांतल्या एका झुंजांत स्वतः भाऊसाहेब जनकोजींच्या कुमकेस गेल्याचें इचलकरंजीकरांकडील 'निवडक पत्रें व यादी' (लेखक व संपादक—वासुदेव वामन खरे) या पुस्तकाच्या ले. ४७ मध्यें नमूद आहे. जनकोजीच्या प्रस्तुत पत्रांत विजयाचा आशावाद भरलेला वाचकांना दिसेल. हा आशावाद अबदालीच्या लष्कराचे हल्ले, त्याला मोठी मनुष्यहानि सोसायला लावून, परतविल्याच्या पराक्रमानें उत्पन्न केलेला होता, याचें भान ठेवणें बरें.

भाऊसाहेबांच्या व इतरांच्या पत्रांतून रसदेबद्दल ( पैका व दाणा वैरण ) जें गाऱ्हाणें वारंवार गाइलेलें आढळतें, तें खरें असल्याबद्दल वाद नसला तरी त्याची छाननी केल्यास भाऊसाहेबांनीं दिल्ली, कुंजपुरा, व पानीपत या तिन्ही ठिकाणीं निरनिराळे उपाय योजून एकंदर रसदेच्या निम्म्याइतका पुरवठा केला, याबद्दल संशय राहात नाहीं. त्यांच्या मागणीप्रमाणें त्यांना दरमहा सहा लाखाची किमान गरज होती. दहा महिन्यांच्या मोहिमेंत एकूण साठ लाख मिळायला हवे होते. ते त्यांना व्यवस्थितपणें कधींच मिळाले नाहींत. भाऊसाहेबांनीं ही गरज अन्य उपायांनीं वेळोवेळीं थोडी फार भागविली. दिल्लीस असतांना गोविंदपंत बुंदेल्याकडून तगाद्यामागून तगादे चालू असतां एकदां तीन लाखापर्यंत रोकड पोंचली. दिल्लीस बादशाही दिवाणखान्यांतील चांदीचें छत गाळून नऊ लाख रुपयांची रक्कम भाऊसाहेबांनीं उभी केली. कुंजपुऱ्यास त्यांना रोकड जडजवाहीर, धान्य अशी विविध स्वरूपाची भरपूर लूट मिळाल्याचीं पत्रें आहेत. रोकडीबद्दल निरनिराळ्या पत्रांमध्यें मतैक्य नसल्यानें निश्चित आंकडा सांगतां येत नाहीं. पण बऱ्याच लाखांची रोकड हातीं पडली असली पाहिजे, एवढें अनुमान करणें शक्य आहे. पानीपतास भाऊसाहेबांनीं जवळचीं सोन्याचीं भांडीं आटवून त्याच्या मोहरा सैन्यांत वाटल्या. दरमहा इब्राहिमखान गार्द्याच्या पदरीं त्याच्या शिपाईप्याद्यांचा तनखा ओढाताणींतच टाकला जात होता, अशा अर्थाच्या मजकुराचें एक वाक्य नाना फडणिसाच्या एका पत्रांत आहे. चांदीचें छत किंवा सोन्याची भांडीं आटविण्याचा प्रसंग रसदेच्या तुटवड्याचा द्योतक तर खराच, पण भाऊसाहेब या प्रसंगाला धैर्यानें तोंड देऊन सैनिकांना कसें संभाळीत होते, याचाहि प्रत्यय या वर्णनांतून व्यक्त होतो. बळवंतराव मेहेंदळे यांनीं 'एक भाऊसाहेबांची हिंमत व लोकांवर उत्तम दृष्टि आहे. येणें करून फत्तेच आहे.' हा अभिप्राय 'खर्चाची निकड फारच आहे. रसदेचा पैसा अद्यापि एक न आला! आम्हांसारिख्यांनीं वस्तां मोडून खादल्या.' या दैन्याच्या वार्तेला जोडून लिहावी ( पान १६ ) यावरून भाऊसाहेबांच्या स्वभावगुणांचा परिचय घडतो. 'श्रीमंत भाऊसारखा अवसानाचा सरदार दुसरा कोणी नसेल.' असें आणखी एकानें म्हटलें आहे. ( पान १७ ) 'श्रीमंताचे दैवतर्तूद थोर. (दैव जसें थोर तशीच योजकताहि थोर ) या पुरुषासारिखा दुसरा कोणी नाहीं.' याप्रमाणें नाना फडणिसानें भाऊसाहेबांची स्तुति गाइली आहे. या उताऱ्यांचा इत्यर्थ एवढाच कीं भाऊसाहेब अत्यंत विपत्तीच्या कल्लोळांतहि पर्वतासारखे स्थिर होते व आपल्या अविचलित वर्तनानें सैन्याचा युद्धोत्साह गारठूं देत नव्हते. एरवी 'ते ( गिल्चे रोहिले ) म्हणत होते की मराठ्यांसी आमची गांठ पडतांच ( मराठे ) पडतील, ते महिना गाठ पडली व जुजेहि जाहाली, परंतु त्याचाच रेच मोडला याप्रा। जाहाले" ( पान १७ ) 'श्रीमंताचा प्रताप थोर आहे. आपले फौजेनें कांहीं त्याची ( अबदालीची ) सलाबत ( धास्ती ) खादली नाहीं. सर्व फौज सेर आहे......अद्याप

त्यांची कांहीं सलाबत बसली नाहीं !' ( नाना फडणीस ) अशीं वाक्यें लिहिण्याची प्रवृत्ति कुणालाच झाली नसती. भाऊसाहेबांची थोरवी येथ निवेदन करण्याचा हेतु त्यांच्या फौजेंत रसदेबद्दल चाललेल्या हाकाटीचा गहिरा रंग फिका करण्याचा नसून तशा गडद अंधकारांतहि निष्कंप तेवणाऱ्या भाऊसाहेबांच्या वीरोचित असामान्य धैर्यशालित्वाकडे वाचकांचें लक्ष वेधून घेण्याचा आहे.

भाऊसाहेबांनीं मराठ्यांचा परंपरागत गनिमी कावा सोडला व तोफखान्याची ( मोगल पद्धतीची ) मैदानी लढाई पत्करली आणि त्यामुळें विजय दवडला, असा एक दोष दाखविला जात असतो. लढाईचे डावपेच हे जेथें लढायचे तेथील जमीनीच्या स्वरूपावर अवलंबून असतात. डोंगराळ दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशांतील गनीमी कावा मदानाच्या सपाट प्रदेशांत यशस्वी होत नाहीं; शिवाय तोफखान्याचा उपयोग लष्करी कारभारांत वाढवून त्याचा प्रभाव युरोपांतील इंग्रज फ्रेंचांनीं दक्षिण हिंदुस्थानांत पटविला होता व तसा अनुभव उदगीरच्या लढाईंत भाऊसाहेबांनीं प्रत्यक्ष घेतलेला होता. डोंगराळ भूभागांतील अफगाण हेसुद्धां गनिमी काव्यामध्यें तरबेज होते. या गोष्टी विचारांत घेतल्यास तोफखान्यानिमित्त भाऊसाहेबांच्या माथीं लादला जाणारा दोष अनाठायीं ठरतो. पानीपत येथील अडवणुकींत मराठे दोन महिने टिकाव धरून राहिले, याचें कारण तोफखान्याशिवाय दुसरें नव्हते. मराठ्यांच्या तोफखान्याची अफगाण–रोहिल्यांना जबर दहशत वाटत होती, याचा पुरावा मराठी पत्रांतून व फार्सी बखरींतून दृष्टीस पडतो. तोफखाना बाजूला सारून गनीमी काव्यानें लढण्याबद्दल शुजानें भाऊसाहेबांना एकवेळ सल्ला दिल्याची काशिराजाच्या बखरींतील माहिती मराठ्यांच्या तोफखान्याचें अफगाण-रोहिल्यांना वाटणारें भय सुचविणारी आहे. मराठ्यांचा तोफखाना एकदां पुढें सरतांच त्याच्या पल्ल्याबाहेर अब्दाली मागें हटला, असें भाऊसाहेबांनीं एका पत्रांत लिहिलें आहे तर तोफखान्यामुळें मराठयांच्या छावणींत पाखरेंसुद्धां जाऊं शकत नव्हतीं मग माणसांबद्दल बोलायलाच नको अशा अर्थाचा मजकूर शिवप्रसादाच्या बखरींत आहे. मराठयाकडील तोफखान्याच्या भयानक आगीचें वर्णन अनेक फार्सी बखरींतून एकवाक्यतेनें आलेलें पाहिलें म्हणजे तोफखान्यामुळें लढाईचा डाव मराठयांच्या अंगावर उलटला, हा अभिप्राय यथार्थ वाटत नाहीं.

वैरणीच्या अभावीं मराठ्यांचीं घोडीं थकलीं, मेलीं वगैरे वस्तुस्थितीचें अर्वाचीन इतिहासलेखकांनीं दाखविलेले परिणाम पारखणें अवश्य आहे. जीं घोडीं अथवा इतर जनावरें मेलीं त्यांची चर्चा नको. परंतु जीं घोडीं जीवंत होतीं, तीं साफ निकामी होण्याइतकीं थकलीं होतीं, असा तर्क करणें कठिण आहे. 'आम्ही घोड्याच्या आधारानें लढणारे लोक, घोडीं गेल्यानें स्वतःच्या पायावर उभा राहून आम्ही शत्रूशीं योग्य प्रकारें लढूं शकलों नाहीं.' अशा अर्थाचीं वाक्यें शिवप्रसादानें रणांगणावर पडलेल्या जखमी मराठा सैनिकांच्या तोंडीं घातलीं आहेत. परंतु मराठे घोडेस्वारांना

लढाईंत पराक्रम गाजवितां आला नाहीं, असें एकहि फार्सी बखरकार म्हणत नाहीं. भाऊसाहेबांचे हुजुरातीचें पथक हें घोडेस्वारांचेंच होतें. त्याच्या पथकानें शहावलीखानाबरोबर असलेलें सुमारें वीस हजार सैन्य-पायदळ व स्वार–' जलौघाप्रमाणें ......गिळून टाकलें ' असें काशीराज सांगतो ( पान ९७ ). मराठा घोडदळाविषयीं ज्या मताचा येथें थोडासा परामर्श केला, त्याची अधिक शहानिशा करण्याला सखोजी जाधवरावाचें पत्र उपयोगी पडणारें आहे. त्यानें पळाच्या हकीकतींत घोडीं थकल्यामुळें त्यांना सोडून देणें भाग पडलें, असा मजकूर लिहिला आहे. परंतु त्यांनें घोड्यावरून बरीच मजल मारलीं हें ध्यानांत घेतल्यास घोडीं कितीशी खंगलीं होतीं याचा अंदाज करतां येतो. फार्सी बखरकारांनीं शेळ्यामेंढ्या बऱ्या असें म्हणण्याजोगी मराठ्यांच्या घोड्यांची अवस्था होती, असें मोठ्या डौलानें सांगितलें आहे. गिल्चे–रोहिले यांचा पराभव झाला असता तर त्यांचीं घोडीं सुद्धां अशाच अवस्थेंत मराठ्यांच्या हातीं पडलीं असतीं. मराठ्यांचा पराभव झाला म्हणून त्यांच्यासंबंधांत मनसोक्त लिहिण्याची संधी फार्सी बखरकारांनी वाया जाऊं दिली नाहीं, एवढेंच फार्सी अत्युक्तीचें तात्पर्य आहे.

अफगाणाचें देह धिप्पाड, त्यांचे घोडेहि तसेच; अफगाणांच्या अंगावर लोकरीचा जाड किंवा कातड्यांच्या पोषाख; शिवाय त्यांच्या नेत्यांनीं अंगावर चिलखतें चढविलेलीं; मराठे व त्यांचे घोडे खुजे; अंगभर पोषाख नाहीं; अफगाण भाजलेलें मांस खाणारे, मराठे बहुत करून शाकाहारी; हा फरक जमेस धरून अर्वाचीन इतिहासकारांनीं मराठ्यांच्या पराजयाची मीमांसा केलेली आहे. मराठ्यांचा रणांगणावरील पराक्रमाचें फार्सी बखरींतून व अबदालीच्या पत्रांतून आलेलें वर्णन या मीमांसेचें निरर्थकत्व सिद्ध करणारें आहे. एखाद्याचा पराजय झाल्यावर त्याविषयीं कांहींहि बोलले तर तें खपूं शकतें, या स्वभावदोषाला इतिहास लेखकांनीं–त्यांत पुनः महाराष्ट्रीय लेखकांनीं–बळी पडावे, हें मात्र एक आश्चर्य आहे. रणांगणांत जसे मराठे पडले, तसे गिल्चे व रोहिलेसुद्धां हजारोंच्या संख्येनें पडले. दोन फार्सी बखरकारांपैकी एकजण मराठ्यांच्या पराक्रमानें अफगाणांना पहिल्या धडाक्यांत पळायला लावलें व त्यांचा नेता घोड्याखालीं उतरून तोंडांत माती टाकीत बसला होता, असें कथन करतो ( काशीराज पान ९८ ) तर दुसरा ( शाम्लू ) अबदालीनें लढाईत हरणार, अशी आपल्या सैन्याची स्थिति पाहून पळण्याची तयारी केली होती, असें सांगतो. (पान १२०) मराठे अफगाणांसमोर हलके ठरले नाहींत, किंबहुना भारीच होते, याचा पुरावा काशिराज–शाम्लूच्या वरील वृत्तान्तामध्यें आहे. अफगाणांच्या पोलादाचा तिखटपणा चाखलेले शिंदे-होळकरांचे लोक कांहीं केल्या अफगाणांकडे आपलें तोंडच वळवीनात, अशी अफगाणांची बढाई गाणारे जदुनाथ सरकार कुंजपुऱ्याची लढाई विसरतात; ता. २२

नोव्हेंबरची व ७ डिसेंबराची, या दोन्ही लढाया डोळ्याआड ढकलतात. ता. २२ नोव्हेंबरच्या लढाईत प्रतिपक्षाला मार देणारे सैनिक शिंद्यांचेच होते.

अफगाणांची शिस्त व मराठयांची बेशिस्त यांतील तारतम्य जदुनाथ सरकारासारखे इतिहासलेखक तिखटमीठ लावून मोठया हातचलाखीनें दाखवितात. १७६१ ची लढाई वर्णीत असतां जदुनाथांनीं १७५७ च्या अफगाण स्वारींतील अफगाणांच्या शिस्तीसंबंधाचे एका लेखकाचे अनुभव सादर केलेले आहेत. त्या स्वारींत अफगाण सैनिकांनीं कित्येकदां शिस्त मोडून केलेली लुटालूट जदुनाथांच्या पुस्तकांत पाहिल्यावर त्यांच्या शिस्तीची बढाई सपशेल खोटी असल्याबद्दल शंका रहात नाहीं. १७६१ मध्यें अफगाणांचें वर्तन शिस्तीला हरताळ फासणारे असल्याचे अनेक दाखले जदुनाथांच्या पुस्तकांतूनच देतां येतील. एक दाखला शुजाविरुद्ध अफगाणांनीं दंगा केल्याचा आहे, मराठयांच्या छावणीवर हल्ला करायचा नाहीं, अशी अब्दालीची सक्त ताकीद असतांना ता. २२ नोव्हेंबरला रोहिले मराठयांवर चालून आले हें एकच त्यांच्या बेशिस्त वागणुकीचें उदाहरण तूर्त पुरेसें होईल. तसें मराठयांनीं शिस्त मोडल्याचें एकहि उदाहरण नाहीं. याच संदर्भात मराठे एका विचारानें भारलेल्या जुटीचे नव्हते असा एक आरोप उच्चारण्याचा प्रघात आहे. जूट नसती तर पानीपताच्या रणक्षेत्रावर मराठयांचे सैनिक व बहुतेक सर्व नामांकित नेते ठार झाल्याची स्थिति अनुभवास आली नसती. लढल्याखेरीज मैदान सोडून जाणारा एक मल्हारराव होळकरच दिसतो. दमाजी गायकवाड, विठ्ठलशिवदेव वगैरे कांहींजण लढाईतून वांचले, पण ते लढले नाहींत, असें मानण्याला पुरावा नाहीं. या संदर्भात अबदालीच्या सरदारांकडे पहावे, तर त्याच्या एक दोन सरदारांनी त्याला लढाईपूर्वीच सोडल्याचें व स्वदेशीं जाऊन बंड उभे केल्याचें पहायला सांपडते. मराठयांकडील सारे सरदार पेशव्यांचे अंकित होते, यामुळें पेशव्यांच्या मनोगता–विरुद्ध वागणें त्यांना शक्य नव्हते व तसें कोणी वागल्याचा पुरावा नाहीं. येऊन जाऊन गोविंदपंत बुंदेल्याबद्दल आक्षेप घेतां येईल, पण धारातीर्थात पडून त्यानें आपल्या वागणुकीचा कलंक (असल्यास) धुऊन टाकला आहे. उलट अबदालीकडील नजीब, ह्याचे दुसरे रोहिले साथीदार आणि शुजा हे लोक जसे स्वतंत्र पण मराठयांच्या द्वेषानें व स्वधर्माच्या अभिमानानें अब्दालीच्या नेतृत्वाचे जोखड वाहण्यास आपखुषीनें सिद्ध झाले तसे मराठयांच्या बाजूस कोणीच नव्हते.

पानीपतच्या लढाईंत मराठे हरले, त्यांचें अतिशय नुकसान झालें, या शोचनीय परिणामाच्या आधारें लढाईतून पळालेल्या लोकांनी व अर्वाचीन इतिहासकारांनीं भाऊसाहेबाला, पर्यायानें पेशव्यांच्या महत्त्वाकांक्षेला नांवें ठेवण्याचा प्रघात स्वीकारलेला आहे. हा प्रघात निर्माण करणारांत नाना फडणिसासकट लढाईतून वांचलेल्या

अनेकजणांचा निर्देश करतां येतो. भाऊसाहेबांची बाजू मांडण्याला कोणीच शिल्लक नाहीं, या स्थितीचा फायदा या सर्वांना तेव्हां मिळाला व अजूनहि तसा फायदा इतिहासलेखक घेत आहेत. पेशव्यांना उत्तरेकडे अफगाण सरहद्दीपर्यंत आपलें साम्राज्य स्थापण्याची महत्त्वाकांक्षा होती, ती पानीपतावरील पराभवानें कोसळून पडली व कायमची धुळीस मिळाली, अशी जदुनाथांची मीमांसा आहे. जदुनाथांची थोड्याशा फेरफारानें नक्कल वठविणारे आणखी कांहीं लेखक आहेत. मराठयांना उत्तरेस आपलें वर्चस्व स्थापण्याची महत्त्वाकांक्षा होती, असें गृहीत करण्याला भाऊसाहेबांचीं पत्रें अनुकूल नाहींत. मोगल बादशाहीच्या रक्षणाचें अंगीकृत कर्तव्य पार पाडण्याचा उद्देश व्यक्त करणारीं भाऊसाहेबांचीं पत्रें आहेत. राजवाडे खंड १ मधील लेखांक १६७, १७३, १७९, १८७ यामधून 'आम्हांस तर चकतेयाची पातशाही राखणें. अबदालीशी सलूख करणें नाहीं.' 'तैमूरियाची पातशाही; याचा बंदोबस्त कळेल तसा आम्ही राजश्री पंतप्रधान यांच्या इतफाकानें करूं तुम्ही या गोष्टींत न पडावें?' 'चकत्याची पातशाही कायम करावी, हेंच आम्हांस व त्यास योग्य आहे.' अशीं भाऊसाहेबांचीं वाक्यें आहेत. १८५२ मध्यें बादशहानें मराठयांशीं बरोबरीच्या नात्याचा जो तह केला तो बादशाहीच्या संरक्षणासाठींच होता. बादशाही राजकारणाचे सूत्रधार होण्याची आकांक्षा पुष्कळ मुसलमानांत होती पण त्यांच्या आपसांतील चुरशीनें बादशाहीची इमारत अधिकाधिक पोखरली जात होती. जवळच्या मुसलमान सरदारांवर आणि हिंदु राजेरजवाड्यावर बादशहाचा लवमात्र विश्वास नसल्यामुळें त्यानें दक्षिणेकडील दूरच्या पेशव्यावर आपल्या बचावाची भिस्त टाकली. बादशाही रक्षणाच्या जबाबदारीची अटकेपर्यंत आपली सत्ता स्थिर करणें ही खरी पूर्तता होती. तिच्याकडे मराठ्यांनीं दुर्लक्ष केलें नाहीं. त्या जबाबदारीकरितांच १७५७ सालीं अबदालीनें पंजाबांत बसविलेला अंमल मराठ्यांनीं उखडून टाकला. नजीबच्या मदतीसाठीं १७५९ मध्यें अबदाली फिरून हिंदुस्थानांत घुसला, तेव्हां त्याचा समाचार घेणें हें त्या जबाबदारीमुळें मराठयांना क्रमप्राप्तच होतें. मराठयांना अबदालीच्या सामन्यांत जय मिळाला नाहीं, म्हणून मराठयांच्या जबाबदारीला अनुचित महत्त्वाकांक्षा समजून त्यांच्या नालस्तीस प्रवृत्त होणें, हें पूर्वग्रहदोषाचें लक्षण ठरतें. मराठयांना साम्राज्याची आकांक्षा होती, असें मानलें तरी त्यांत चूक कसली? परक्यांचें असलेलें पूर्वीचें वर्चस्व नामशेष करून हिंदुस्थानांत नव्यानें वर्चस्व स्थापूं इच्छिणारांना अडवून धरणें हा भारतीय या नात्यानें मराठयांचा एक प्रकारें जन्मसिद्ध हक्कच होता. त्या हक्काची सनद बादशहाच्या तहानें त्यांना मिळाली.

अबदालीची नड (मोडीत ज व न हीं अक्षरें पुष्कळदां सारखींच दिसतात म्हणून मूळचें पत्र वाचतांना ज ऐवजीं न वाचला गेला असेल. नड ऐवजीं जड म्हणजे मूळ असा शब्द असणें संभवते) 'अबदालीची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें अयोग्य,–

असें एक अत्यंत महत्त्वाचें व राजकीय मर्मज्ञतेचें वाक्य भाऊसाहेबांच्या एका पत्रांत आहे. (राज० १–१६७) व त्याला ‘ अबदालीचें पारिपत्य होणें हें आदि आहे ’ अशी पुरवणी जोडली आहे. अबदालीचें मूळ हिंदुस्थानाच्या बादशाहींत रुजूं देणें अयोग्य हें वाक्य लहान आहे, पण त्याचा अर्थ मराठ्यांच्या अखिल भारतीय दृष्टीची विशालता उघडकीस आणणारा आहे. त्या वाक्याच्या अनुरोधानें बादशाहीच्या रक्षणाची भाषा भाऊसाहेबांच्या इतर पत्रांतून पुनः पुनः पहायला सांपडते. अबदालीच्या आधीं नादिरशहाची धाड दिल्लीवर कोसळली, ( १७३९ ) तेव्हां दिल्लीस नवी बादशाही अस्तित्वांत आल्यानें साऱ्या देशावर ओढवणाऱ्या संकटाची जाणीव होऊन बाजीरावानें नादिरशहाची हकालपट्टी सर्व भारतीयांनीं केली पाहिजे, असा विचार प्रगट केला. दिल्लीची मोगल बादशाही हिंदुस्थानांत दोनशे वर्षें नांदल्यानें तिचा परकेपणा नाहींसा झाला होता. ती मोडकळीस आली असली तरी तिच्या विषयींचा आदर सगळ्या भारतीयांमध्यें वसत होता. त्या आदराचा फायदा घेऊन आपापलें घोडें पुढें दामटण्यासाठीं उत्तर भारतामध्यें अनेकजण झटत होते. मराठ्यांना तर एका बादशहानें आत्मरक्षणाचें वचन घेऊन दिल्लीच्या केंद्रीय राजकारणाचा पुढाकार दिलेला होता. दिल्लीस नव्या परक्यानें येऊन क्रान्ति करूं नये, अशी खबरदारी बाळगण्याचें कर्तव्य मराठ्यांना टाळणें शक्य नव्हतें. नजीबखान रोहिल्यानें अबदालीला बोलावून जो समूळ क्रान्तीचा डाव मांडला होता, त्याच्या मुळाशीं आपसांतील भांडणें होतीं. नजीब व अबदाली एकच ‘ नजीबखान तो अबदालीच आहे......नजीबखान तो मूळच आहे. ’ हें पक्कें ध्यानांत ठेवून शुजाला आपलें हृद्गत कळवितांना भाऊसाहेबांनीं आपसांतील तंटेबखेडे आपणच समजूतदारपणानें मिटवावे, त्यासाठीं परक्याच्या मधस्थीची जरूर नाहीं, किंबहुना ती धोक्याची; तिच्यायोगानें तंटा मिटण्याऐवजीं घात होण्याचा संभव अधिक, अशा अर्थाची भाषा उपयोगांत आणली आहे व त्या भाषेमागील दृष्टि आजच्या स्वराज्यांतसुद्धां उपयोगी पडणारी आहे. पानीपताच्या प्रसंगामागील मराठ्यांच्या राजकीय धोरणाचें हें तात्पर्य भारतीयांनीं कधींहि विसरूं नये.

न. र. फाटक

# अनुक्रमणिका

## मराठी साधनें



## फार्सी साधनें

# पानीपतचा संग्राम

## कुंजपुरा

**पुद.१ ले. ३८९** ॥ श्री ॥ शके १६८१ भाद्र. शु. ७,१६ सप्टृ. १७६०

चि. रा. धोंडो मल्हार यासी सदाशिव चिमणाजी आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष तुमचे पत्र आले ते पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कळले यैसेच निरंतर साकल्य पत्री लिहीत जाणे इकडील वर्तमान तरी फौज सरदार सुद्धा दिल्लीस आलो किल्ला घेऊन आत सरकारचा बदोबस्त केला सुज्यातदौल व नजिबखान वगैरे रोहिलेसुद्धा आबदाली यमुने पलीकडे येऊन मुकाम करून राहिले आहेत नदीस पाणी फार सुज्यातदौला व नजीबखान यांचे विचारे सलुखाचा पैगाम लागला त्याचे मते सरंदेची हद्द अबदालीची करून द्यावी पातशाही बदोबस्त आपले हवाला करावा वजिरी बक्षिगिरी सुज्यातदौले मागतात. बक्षिगिरी नजीबखान मागतो. नदीमुळें उभयता सैन्याचा मोकाबला होत नाहीं तो पैगामहि आहे आमचे मते अटकची हद्द पातशाही बदोबस्त सर्वांखे पूर्वत प्रमाणे राखून चालवावे याप्रमाणे सलूखाचे करावे त्यात काही आमचे जाहलिया शिवाय तह होत नाहीं बोलता चालता होईल ते पाहो केवळ आमच्याच चित्तानरूप घडणे अगर त्याचे चित्तानरूप होणे हे कसे होईल यास्तव जसे बनेल तसे करावे लागेल होईल ते लेहून पाठवू नदी पायाब्र जाहालिया ल्ढाई प्राप्त होईल सरदार दोघेहि बहूत साफ आहे सर्व पेच पोटाचा बाहेरील कजियामुळे न मिले कर्ज सावकारी बंद दोनी फौजाब्रा परतु सरदाराची फौज मोडली यामुले त्याची सलाबत आहे. यंदाचे येणे व बाहेरील मसलत भारीच आहे सर्व आशीर्वादे करून परिणामास जाईल. ल्ढाई न पडता सर्व प्रेत्न आब्ररू राहून होतील ते करू सेवटी नेटाने सर्व येकत्र जम्हून ल्ढाई करू ईश्वर बरेच करील आपले वर्तमान शरिराचे वगैरे लिहिणे तीर्थरुपाचे शरीर उत्तम जाले म्हणजे सर्व मनसबे उत्तम येविंशी वर्तमान लिहीत जाणे छ ६ सफर बहूत काय लिहिणे हे आशीर्वाद.

**राज.१ ले. २५५** ॥ श्री ॥ ७ आक्टोबर १७६०

चिरंजीव राजश्री गंगाधर यासिः गोविंद बल्लाळ आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. विशेष तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें लिहिलें वर्तमान साद्यंत कळलें. त्यास चिरंजीव सौ॥ लक्ष्मी प्रसूत झाली. कन्या झाली. फार उत्तम झालें. आम्ही बिठुराहून कूच करून रीप नदीवर आलों. गुलोलीचे मामलियाकरितां एक दोन मुकाम करून फडशा करून दरमजलीनीं उमरगडीं येऊन आतां गुंता नाहीं. वरकड भेटीनंतर सविस्तर बोलोन. अब्दालीकडील दोन हजार फौज लुटविली, कुंजपुरेयाजवळ. कुंजपुरा घेरिला आहे. बहुधा घेतला असेल. आम्ही सत्वरच येऊन गुलोलीवाले यानें सन १८१६ पैसा न दिल्हा. गडी बांधोन राहिला. जर याजला सोडून आलों तर तसेंच राहील. तूर्त ऐवज कांहीं हातीं येणार म्हणून मुकाम केला. सत्वरच फडशा होईल. मोहनसिंग गुलोलीवाला दमला. रमईपुरीं गेला. त्याचे मातबर भले माणूस येऊन भेटून गेले. उदईक सर्व येतील. फडशा करून मी येतों. मित्ती भादो व॥ १४. हे आशीर्वाद.

**शिंदे इ. सा. ३ ले. २३३** ११ आक्टुबर १७६०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

लालाजीबावा स्वामीचे सेवेसी.

सेवक चिंतोकृष्ण [वळे] कृतानेक सा। नमस्कार विनंती उपर. येथील कुशल ता॥ छ १ रोवल मु॥ नजीक सोनपत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेले पांहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. ( मधील मजकूर हुंडीच्या देवघेवीचा आहे ) यथील वर्तमान तर दिलीहून कूच जाल. कुंजपुऱ्यास जातात. अलीगोहर पातशाह केला. अबदाली वगैरे सर्व यमुनापारच आहेत. जुंज जाल्यावर सर्व गोष्टी होतील. कळले पाहिजे. विशेष काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

**राज.१ ले. २५७** ॥ श्री ॥ ११ आक्टोबर १७६०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥ यांस॥

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मी पत्रें पाठविलीं तीं पावलीं. बुधेल्यांकडे राजश्री गणेश संभाजी याणीं कजिया आरंभिला आहे त्यांस चहूंकडे पेंच नसावे. तजविजीनें बुंधेले हाताखालीं रहावे, याचा विचार म॥ निलेस लिहावा, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास ह्माच म॥ गणेश संभाजी यांस लिहिला आहे. त्याणीं कजिया केला नसेल, व हल्लींहि कजिया न करणें. त्यांस समजावून सांगोन फौजसुद्धां हुजूर घेऊन येणें. ह्मणोन लिहून

पत्रें रवाना केलीं आहेत. याप्रमाणें करितील. पारच्या जमीदारांना कजिया मानवला आहे. शेंपन्नास ठाणें रोहिल्यांचें घेतलें ह्मणोन लिहिलें तरी उत्तम आहे. या उपरिहि वारंवार पारचें राजकारण ठीक राखून लेहून अतिशय बखेडा करीत ऐसें करणें. तिकडील सूत्र पक्कें चांगलें तऱ्हेनें हाती राखणें. गंगाकिनारा आज्ञेप्रमाणें जातों ह्मणोन लिहिलें, तरी बहुत दिवस तुह्मांस ( लिहा ) वयाचें समाप्त केलें. सीमा झाली. तुह्मी थोर माणूस वारंवार काय म्हणावें. करून दाखवाल या उपर तें खरें. रा॥ छ १ रा॥ लावल. बहुत काय लिहिणें. हें विनंति.

**राज.१ लें. २५८** ॥ श्री ॥ १४ आक्टोबर १७६०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि :

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्हांस तिकडे मोठ्या कामास जावयाविषयी वारंवार लिहिलें. परंतु अद्याप राजश्री गोपाळराव गणेश व तुह्मीं गेला नाहीं. कोठें किरकोळ जमीदारांची गढी गांव घेत बसला आहां हें ठीक नाहीं. या उपरि लौकर तिकडे जाऊन पेशजी लिहिल्याप्रमाणें गडबड करून धुंद उडवणें. या गोष्टीस हयगय एकंदर न करणें. आम्हीं यमुनेचे पाणी फार याकरितां दिल्लीवरी बसोन उपयोग नाहीं. यास्तव कुंजपुऱ्यास जाऊन अबदुल समदखान याचें पारपत्य करावें, याअर्थें दरकुच जात आहों. चिरंजीव राजश्री नाना, आपाजी जाधवराव यास दिल्लीस पाठविलें. त्यांनीं छ ३० सफरीं अलीगोहर याचे नांवचे गजशिक्के केले. शहरांत द्वाही फिरविली. त्याचे पुत्रास बाहेर काढून वलीहद केलें. सर्व अल्मास खुशाली जाहली. लोकांनीं नजरा केल्या. शिक्के चाल्ते जाहले. मोठा समारंभ केला. तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें असे. आह्मी कुंजपुऱ्याकडे गेलों. इकडे अबदालीचें कुच होऊन ऑलियावरी उत्तमच जाहलें दिल्लीकडील मुलूख मागें मोकळा राहिला. इकडेच ल्ढाई पडेल. कदाचित् ते इकडे न येतां तिकडे तुमचें रोखें जाहले तरी बरेंच आहे. आह्मीं पाठीवरी यमुना उतरून अंतरवेदींतोन येऊन पारपत्य करूं. कुंजपुरेवाला ठेहरत नाहीं. डावाडोल होऊन दमवायाच्या मुद्यावरी आहे. ठहरला तरी मोर्चे लावून यथास्थितच पारपत्य करूं. तुह्मीं तिकडे सत्वर जाऊन पोहोंचणें. केवळ छोट्यामोठ्या करमास गुंतोन न राहणें. ऐवज लौकर येऊन पावे ऐसा रवाना करणें. दिरंग न लावणें. तुह्मीं पेशजी लिहिलेप्रमाणें गनीमी मेहनत करून रोहिले सुज्यादौला यांचे प्रांतांत धामधूम होई असें करणें. किरकोळ गढियांचे कामास न गुंतणें. अबदाली आह्मांकडेच येईल. तिकडे आला तरी पाणी आहे तो आहे. चार रोजांत कुंजपुरियांचें पारपत्य करून सारंगपुराकडे उतरून नजीबखानाचे विल्हे लावून पुढें अबदालीचे पाठीवर येऊं. रवाना छ ४ रा॥ लावल.

बहूत काय लिहिणें. अलीगोहरचा शिक्का दिल्लींत पडला, त्याची चिठी पाठविली आहे. त्याप्रमाणें लिहून पातशहाची जरब मोडून याचे नांवें करणें हे विनंती.

पेद.२१ ले. १९२ श्री २०–१०–६०

तीर्थस्वरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेसी

आपल्ये बालकृष्णाने चरनावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता।। छ १० रबिलोवलपावेतो मु।। कुंजपुरा वर्तमान येथास्थित आसे. विशेष. वडिलाकडील बहुत दिवस आसीरवादपत्र पाठऊन सेवकाचा साभाल करीत असिले पाहिजे. वडिली आसीरवादपत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहालें. यैसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषवीत आसिले पाहिजे. हिकडील वर्तमान तरी आबदल समदखान व कुतुबशाहा यैसे दोघेजन मारिले. झुज जाहाले. आपलेहि लोक जखमी पाचसातसे जाहाले आहेत. कुंजपुरा लुटून फस्त केला. पैकाही सापडला आहे. पुढी गिलज्याचेहि पारपत्य करावयासी उमेदवार जाहाले आहेत. तोहि लुटून घेतील. काही चिता नाहीं. श्रीमंताचे पुन्य समर्थ आहे. समंधखानाचीहि फौज दाहा हजारपावेतो होती परंतु येकदाच हला केला. त्याची फऊज दाहा हजार कापून काढिली. घोडेही च्यार पाच हजार आली. निदानप्रमाणें वर्तमान जाहाले आहे. पैका कोणाकडील वसूल जाहाला नाही याउपरी लोकास पैका देतीलसे दिसते. देतील तेव्हा आमच्या हातास येई. आपणास कलावे म्हणऊन लिहिले आहे. माहादाजी बारवकर यास देवआज्ञा जाहाली. आपणास कळावे म्हणून लिहिले आहे हे विज्ञापना.

सेवेसी गंगाधर बाबाजी जोशाचे कृतानेक सं।। नमस्कार विज्ञापना. आपण कृपा करून स्मरण करून पत्र पा।। ते पावले. नित्य नित्य हमेशा पत्रे शेवेसी लिहित असतो. पावत नाही त्यास अन्याय काये ? वरचेवर सांभाळ करावया आपण वडीलच आहेत. आश्रा दुसरा कोणाचा ? असो. वरकड वर्तमान राजश्री बालकृष्णपंती लि।। आहे. कलेल. कुंजपुऱ्यास समनखान वगैरे मारले. द्रव्यहि दाहापावेतो सापडले. मोजदाद चारपावेतो जाली. हे विज्ञापना.

पेद.२१ ले. १९३ श्री २०–१०–१७६०

तीर्थस्वरूप राजश्री नाना व तथा राजश्री आणा वडिलांचे सेवेसी

आपल्ये बाळकृष्णाने च्यरनावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार. विनंती. येथील क्षेम ता। छ १० रबिलोवल पावेतो मु।। कुंजपुरा वर्तमान येथास्थित आसे विशेष. वडिलाकडून बहुत दिवस आसीर्वाद पत्र येऊन वर्तमान कलत नवते. त्यास हाली छ १९ मोहरमचे पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले. येसेच निरंतर आसीर्वाद

पत्र पाठऊन सेवकाचा सांभाल करीत आसिले पाहिजे. हिकडील वर्तमान तरी लोकाकडील येवज आद्यप येक पैसा वसूल जाहाला नाही. फोजेस रोजमुरा तीन महिने मिलत नाही याप्रमाणे लोकांची हलाकी. याप्रमाणे हलाकी जाहाली आहे येथे कुंजपुरे-यावर आज चार रोज आलो. त्यापासून दाणा लुटीचा मिलो लागला. त्याउपरी समंधखान येथे दाहा हजार फउजेनिसी होता तो युध्य करून लुटिला. त्याचे सीर कापून भाल्यावर लाऊन लस्करात फिरविले व कुतुबशा त्याचा सरदार होता तोही त्याप्रमाणेच मारिला. त्याची लूट लोकास सापडली व घोडीही दोन चार हजार पावेतो होती तितकीही लोकाणी आणिली. आपल्याकडील लोक जखमी फार जाहाले. परंतु ठार कोणी मातबर जाहाला नाही. खंडेराव दरेकर व हैबतराव जाधव भुईजकर या दोघाजनास गोलीची जखम जाली आहे. पेकाही दाहा पंधरा पावेतो सापडला. लोकाणी पाच लक्षेपर्यंत हल्याचे दिवसी लुटिला. आता पेका सापडला आहे. याउपरी लोकास काही दिल्हे तरी आमच्या हातास येईल. माझी खर्चाविसी बहुत हलाकी आहे. दाणा महर्ग बहुत जाहाला. रुपयाचे दीड पायेली दाणा जाला आहे. दोनशे रुपये घो(ड्या)स व मानसास आजपावेतो लागले. गिलज्याची लडाई पुढे होनारच आहे. याप्रमाणे वर्तमान आहे. आपणास कलावे म्हणून लिहिले आहे. घरी कोकणात खर्चाविसी हलाकी जाहाली आसेल ती ईश्वर जाणतच आसेल. हिकडे आलो परंतु येक पेशाची मिलखत दिस(त) नाही. कर्जदार ( व्हावे ) येसे दिसते. वडिलास कलावे म्हणून लिहिले आहे हे विज्ञापना. राजश्री बालकृष्णपंत दाजीस व केसोपंत दाजीस साष्टांग नमस्कार सांगणे. लोभ करीत जाणे हे विनंती.

वेदमूर्ति राजश्री बापुभटजीस साष्टांग नमस्कार सांगणे. राजश्री माहादाजीपंत दाजी जोसी यासी साष्टांग नमस्कार सांगणे. लोभ करीत आसिले पाहिजे.

**पेद.२१ ले. १९४** (श्री) २०-१०-१७६०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
अंतोबा नाईक थथे स्वामीचे सेवेसी

सेवक विसाजी बलाल पाटणकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ आस्विन सुध ऐकादसी मु॥ कुंजपुरा जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नव्हते. त्यांस आमच्या जासुदासमागमे पत्रे अधिक मासची पाठविली तीं पावली. लि॥ वर्तमान कलले. परम संतोष जाहला. घरचे वर्तमान सविस्तर लिहिले नाही. त्यास श्रावणमासी तीर्थस्वरूप दादा आले असतील, त्यांस सविस्तर वर्तमान पुसोन आपण लेहून पाठवावे. माहागांवी गाय घेऊन दिल्ही म्हणोन लिहिलें, उत्तम केले. जे लागेल ते दत जावे. आबाल कोणे

गोष्टीची होऊ न द्यावी. आपण वडील आहेत, काही न्युनता पडो देणार नाहीं. आम्हाविसी काही चिंता न करावी. हा कालपरियंत सुखरूप आहे. ईश्वर कृपेंकरून पुढे जेष्ठ आखाडमासी घरास येऊं. आमचे घरची माणसें श्रमी बहुत होत असतील. तीन वर्सें घरास गेलो नाही. परभारेच निघोन दुसाला छावणींस आलो. लग्न जाहल्यावरी घरास जावे हा बेत होता, परंतु ऋणानुबंधे जाण न जाहले. जे समयी ह्याचा व आपला ऋणानुबंध असेल ते दिवसी भेट होईल. वरकड राजकी वर्तमान तरी, आबदली यमुनेपल्कडे आहे. आपल्या फौजा आल्याड आहेत. यमुनेस उतार जाहल्यावरी काय होणे ते होऊन येईल. मु॥ मजकुरावरीहून कुरुक्षेत्र सोळा कोस आहे. एका दोहो सेजी येथून कूच करून कुरुक्षेत्रास जाऊन. येथे तीर्थविध करून, पुनरपि दिलीस जाणार. येथे आबदाली आहे. परम संकटाचे दिवस आले आहेत. ईश्वर काय करील ते न कले. बरे असो. XXXX असेल तर, माहागावी पाठऊन XXXXXXX पत्र लेहून पाठवावे. बहुत का XXXXX .

**राज.१ ले. २५९**

हित असतां अद्याप न गेलां हें काय ! याउपरि लौकर जाऊन पेशजीं लिहिल्या अन्वयें सर्व कामें यथास्थित करणें. याउपरि दिरंगावरी न घालणें. ऐवजाची तर्तूद केली आहे. निसूर बसलों नाहीं. वरिच्चेवरी ऐवज रवाना करीन. याच पत्राचे पाठोपाठ ऐवज येऊन पावेल. विलंब लागत नाहीं. ह्मणोन भरंवशानें लिहिलें तें कळलें. ऐशास पत्र तों येऊन पावलें. ऐवज पाठोपाठ यावयाचा तो कधीं येऊन पावेल हें मात्र कळत नाही. येथें खर्चाची निकड आहे. हें वारंवार लिहीत असतां तपशील मात्र लिहितां. ऐवज येत नाहीं. हें कामाचें नसे. याउपरि दिरंग न लावितां ग्वाल्हेर, आगरे, मथुरेवरून ऐवज दिल्लीस येई तें करणें. विलंब न लावणें. जाट बल्मगडास आहेत. तिकडून रसदेचा वगैरे पेंच पडावयाचा नाहीं. त्याची फौज पुत्र हुजूर येणार. तें येथें राहून पलिकडे पायबंद द्यावा. तिकडून तुह्मीं फौज सुद्धां शहावरी असावें. इकडे यमुनेचें पाणी हलके होतांच अब्दालीचें पारपत्य यथास्थित करावें, असा डौल आहे. त्याजकडून तहाचें राजकारण अद्याप आहे. परंतु मळमळीत आहे. ठीक नाहीं. येथील मर्जीनरूप जाहल्याशिवाय तह होणार नाहीं. प्रस्तुत आह्मी दिल्लीहून कुच करून दोनमजली ल्लेन्यास कुंजपुऱ्याचे सुमारें आलों. पुढें जाऊं. अलीगोहर याचे पुत्र बाहेर काढून वलीहद्दी करावी, हा निश्चय होऊन शुक्रवारचा मुहूर्त करार केला आहे. होईल ते मागाहून लिहिलें जाईल. ऐवज लौकर पाठविणें. सारीं कामें लिहिल्याप्रमाणें यथास्थित करणें. अलीगोहरचे पुत्रास वलीआहद शुक्रवारीं केलें. गजशिक्का अलीगोहरचा केला. आपले तालुकियांतहि शाहा आलमाचा गजशिक्का चालवणें. महिनाभर फौजा उतराया जोगें पाणी होत नाहीं.

कुंजपुरियास समदखान आहे. आम्ही कुच करून. [ हें पत्र असेंच अर्धेमुर्धे सांपडलें. ह्या पत्राचा पहिला व तिसरा बंद नाहीं. ] त्याचें पारपत्य करितों. अबदाली तिकडे आला तर उत्तम. न आलिया फिरोन येऊं. तुम्ही लिहिलेप्रमाणें शह देणें. जाट आपलाच आहे वसवास नाहीं. ऐवज सत्वर खबरदारीनें दिल्लीस सत्वर पोहोंचेसा करणें. पुढें सोईनें घेऊन जाऊं. ऐवजाविषयीं आम्ही लिहा—

**राज.६ ले. ४०५** श्री २४ आक्टोबर १७६०

शके १६८२ आश्विन शु. १४

चिरंजीव राजश्री बजू व गोविंद, बापू यांसी त्रिंबक सदाशिव आशिर्वाद उपरि

येथील कुशल ता।। आश्विन शु।। चतोर्दशी गुरुवार मुक्काम कुंजपुरा यमुना दक्षिण तीर यथास्थित असे. विशेष दिल्लीचा बंदोबस्त करून श्रीमंत कुंजपुरास आले. अबदालीकडील दहा हजार फौज, समेदखान, कुतबखान होते. याजवर हल्ला करून जुंज झाले. मोडले. गोट लुटला. तसेच हल्ला करून गांव घेतला. लोकांस लूट पुर्ती घोडा उंटें वगैरे मिळाले. श्रीमतांस पांच सांत लाख रुपये मिळाले. दाणादुणा लष्करास मिळाला. आपल्याकडील सर्व ब्राह्मण मराठे मंडळी खुशाल आहे. तुम्ही जुंजाच्या खबरी भलत्या ऐकाल, घाबरे व्हाल, मातोश्री चिंता करतील, यास्तव लिहिलें आहे. सांगणें..........

**राज.१ ले. २६०** ।। श्री ।। २५ आक्टोबर १७६०

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष तुम्हांस दोनचार पत्रें पाठविलीं कीं तुम्ही व गोपाळराव गणेश एकत्र होऊन जलदीनें सुजातदौलाचे मुल्कांत हंगामा करणें व रसद न चाले तें करणें. शेंपन्नास राऊत प्यादे येतील जातील, त्यांस लुटून मारून टाकीत जाणें. असें लिहीतच गेलों परंतु तुम्ही गड घेत बसलां हें काय? तरी याउपरि पत्रदर्शनीं सुजातदौलाचे मुल्कांत हंगामा करणें व अलीकडील रसद वगैरे मारीत जाणें. नेहमीं मुल्कांत फिरावें. कोठें रसद मारावी. कोठें गांव लुटावा. वाट मारावी. माणसें मारून टाकावीं. दहशत बसवावी. हेंच नित्य करावें. मुल्क अंतरवेदींतील व गंगापारचा लुटीत जावा. वाटेचे गांव व रस्ते असतील त्यांस दहशत पडोन बेचिराख होय तें करावें. वारंवार लिहिणें तें लिहिलें; परंतु तुमचेकडून त्यास उपसर्ग करावा हें होत नाहीं. पायबंद बसत नाहीं. तरी याउपरि या गोष्टीस उशीर न लावणें. वरचेवरी वर्तमान लिहित जाणें. जाणिजे. छ १५ रबिलावल सु।। इहिदे सितैन मया व अलफ. हे विनंति.

कुंजपुरा व पांच सात हजार फौज, पांचसा हजार प्यादा लुटला. यामुळें अब्दालीचे लस्करांत दहशत पडली. कितेक लोक उठून जातात. अब्दाली कुच करून बागपतेवर चार कोस कांहीं फौजहि उतरूं लागली. लौकरच त्याचे पारपत्य होईल. तुम्हीं तिकडून गनीमी तऱ्हेनें उगळा लावावा. अब्दाली अलीकडे आला. तुम्हीं पुढें येऊन वाटा त्याच्या माराव्या. कांहींच होऊन येत नाहीं. उत्तम नाहीं. सत्वर लिहिलेप्रमाणें करणें. हे विनंति.

---

## पानीपत

**राज.१ ले. २६१** श्री. १ नोव्हेंबर १७६०

राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥ः

विनंति उपरि. अब्दाली यमुना बागपताजवळ उतरला आणि गणोरास आला. खासा स्वारी कुंजपुरीयाहून पाणिपतास आली. त्याजवर तीन दिवस गणोरास होते. तेथून भालकियास आले. तेथून दोन अडीच कोस आजी आले. फार आवळून चालतात. कही लांबवू देत नाहीं. चाळीस कोस, पन्नास कोस धावतात तें नाहीं ! अंतर थोडकें आहे. त्याचे आमचे बातमीची गोळागोळी होती. याप्रमाणें तीन दिवस होतें. दाणा दोन अडीच शेर गिलज्याचे लष्करांत आहे. हिंमत फार आहे. तरी यास गिळणार. त्यास, लढाई लौकरीच होऊन येईल. परंतु तुम्हीं जलदीनें यमुनेपलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून यास रसच न पोहचे, फौजेस शह पडे, ऐसें करावें. आतां गिलज्याचा पेंच तिकडे नाहीं. तुमच्यापाशीं सिही या पेंचामुळें लागणार नाहीं. यास्तव लांब लांब मजलीनें येणें. सुज्याअतदौलाचे मुलकांतहि जमीदारांजवळून धुंद करवणें. या कामास दिरंग न लावणें. हें काम मागेंच करावें ऐसें होतें. याउपरि तपशील न लावणें. जाणिजे. छ. २२ रविलोवल बुंधेले वगैरे त्यास पत्रें पाठवणें. त्याचीहि खबर लिहिणें. जाणिजे. छ मजकूर. दोनचार हजार फौज सडी निवडून बागपतेजवळ यमुना पारून यावें. रसद मारावी. गडमुक्तेश्वर, शामळी, वगैरे नजीबखानाचे प्रांत जाळावे. अब्दालीस मागें रसद बंद होऊन मुलुकाचा बोभाट होय असें जरूर करणें. वारंवार लिहिलें जाऊन अजून तुम्ही उमरगडींच आहां हें अपूर्व आहे ! आतांहि लिहिलेप्रमाणें न आलें तरी मर्दुमीचें काम होत नाहींसेंच जालें ! ईरे धरून तडकून येऊन काम करणें. र॥ छ २२ र॥ लावल हे विनंति.

**राज.१ ले. २६२** ॥ श्री ॥ ३ नोव्हेंबर १७६०

श्रीमंत राजश्री पंत स्वामीचे सेवेसीः विनंति सेवक करद्वय जोडून साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना स्वामींची आज्ञा घेऊन जसवंतनगरापाशीं आलों तों राजश्री लक्ष्मणपंत यांजकडून लस्करचें वर्तमानाचें पत्र आलें तेंच बजिन्नस सेवेसी पाठविलें आहे. त्याजवरून विदित होईल. मऱ्हाटी फौज शेर आली. याउपरि अब्दालीचें पारपत्य सत्वरच होईलसें दिसतें. मी आज रातोरात सकुराबादेस आज्ञेप्रमाणें जातों. तेथून सविस्तर वर्तमान सेवेसी लिहीन. कृपा करावी. हे विज्ञापना. पे॥ मित्ती कार्तीक सुध ७ शनवार मु॥ इटावें.

**राज.१ ले. २६४** । श्री ॥ ४ नोव्हेंबर १७६०

राजश्रियाविराजित राजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. येथील खर्चाचे ओढीकरितां ऐवजाविशीं तुम्हांस वारंवार फारच लिहीत गेलों. परंतु ह्या गोष्टी तुमच्या चित्तांत किमपि न येतां चालढकलीवरी या कालपर्यंत नेलें. धातुपोषणार्थ मात्र लिहितां कीं मजला ऐवजाचे तर्तुदीशिवाय दुसरा अर्थ नाहीं, तर्तुद केली. करतों, एका दो दिवशीं रवानगीहि करितों, येतों, कार्यावरी आज्ञेप्रमाणें जातों. ऐशा गोष्टी रिकाम्या लिहितां. मात्र निदर्शनास यांतील एकहि येत नाहीं. यामुळें तुमच्या कर्तृत्वाची तारीफ वाटते! ते कोठपर्यंत लिहावी? लिहितां लिहितां भागलों! हें तुमच्या कर्तृत्वास उत्तम नाहीं. याउपरि पत्र पावतांच रसदेचा व बाकीचा ऐवज मातबर भरणा करून अविलंबें रवाना करणें. दिरंग एकंदर न लावणें. कदाचित् अबदाली यमुनेच्या दक्षिणतीरीं आल्यामुळें मार्ग सुद्धां नाहीं, ऐवज कसा रवाना करावा, हें निमित्य ठेवाल. आणि हा तपशील लिहावा तरी असें न करणें. अबदालीची आमची गांठ पाणीपताजवळ पडली आहे. तोफखान्याचा आराबा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्यानें इकडे तिकडे जावत नाहीं व कांहीं करवत नाहीं. पावणेदोन कोस दीड कोसाची तफावत आहे. पेंढारी व लुंगारे राऊत वगैरे नित्य उंटें, घोडीं, तट्टें, बैल आघाडी पिछाडीवरी जाऊन गोटापासून घेऊन येतात. त्याचे कोणी पाठीवरहि निघत नाहीं. याप्रमाणें आहे. तुम्हीं या गोष्टी भयाच्या कोण्हेविशीं चित्तांत न आणितां सत्वर ऐवज दिल्लीस रवाना करणें. तेथें आलियावरी आम्ही हरतर्तुदेनें घेऊन येऊं. विलंब न लावणें. जलद् जलद् ऐवज दिल्लीस येऊन पोहोंचे तें करणें. तुम्हींहि पत्र पावतांच अंतरवेदींतून पठपठगंजावरी यांच्या पछाडीस येऊन पोहोंचणें. सावकास याल तरी ठीक नाहीं. लांब लांब मजलीनें येणें. रसद त्याजकडे जावयाची आढळेल ते लुटणें, दबाव पाडणें, म्हणजे चहूंकडून घाबरा होईल. हेहि युक्त तुम्हांस

बहुत वेळ लिहिली. परंतु तुम्ही येत नाहीं. सारीच डोळेझांक करितां. परंतु असा समय चाकरी करून दाखवावयाचा पुढें कदापि येणें नाहीं. या हंगामीं जो आपले शक्तीपेक्षां चाकरी आधीक करून दाखवील त्याचें रूप आहे. हें दूरदेशी ध्यानांत आणून सर्व गोष्टी लिहिल्याप्रमाणें करणें. ऐवज पाठवणें. तुम्ही येणें. लहान सहान गळ्यामुळें गुंतोन मोठ्या कामाच्या उपयोगांतून जाल असें करून न घेणें. तुम्हीं दरमजल बागपतचे सुमारें अंतरवेदींतून येऊन रसद मारणें. नजीबखानाचा मुल्क जाऊन लुटून फस्त करणें. ऐवज रसदेचा पांच सातशें राऊत देऊन आगरियावरून जलदीनें दिल्लीस येऊन पोहोंचेसा करणें. जाटाच्यानें अटकाव होत नाहीं. वेडेंवाकडें तो करणार नाहीं. मातबर एकदाच द्यावा. त्यांत दोन तीन लाख एकेकदां उटें चांगले राऊत देऊन रवाना करावे. दिल्लीस पावलियावर जसें दिसेल तसें पुढें आणून घेऊं. दोन चार हजार चांगली निवडक फौज लांब लांब मजली करून लिहिलेप्रमाणें रोहिलियांच्या मुलुकांत दंगा व रसद बंद करणें. कांहींच न झालें तरी परिछिन्न तुम्हांवर शब्द येईल. वारंवार लिहिलियाची, आपले अबरूची इरे धरून काम बजावून आणणें. या दिवसांत तुम्ही येऊन लिहिलेप्रमाणें पावलां असतां तर किती काम होतें ! अजून तरी करून दाखवणें. गंगापार जमीदारांकडून दंगा करवणें. गोपाळराव गणेश फौजसुद्धां गंगापार उतरून जमीदार सामील करून सुजादौला रोहिले यांचा अंमल उठवावा. याप्रमाणें करणें. मसलत मोठी. या दिवसांत ज्यास जें लिहावें त्याप्रमाणें होऊन न येई मग तुम्ही आमचे कामाचे काय ? याउपरि आज्ञेची व चाकरी करून दाखवावयाची सीमा झाली ! लिहिलेप्रमाणें सत्वर करणें. रवाना छ २५ र॥ विल बहुत काय लिहिणें. हे विनंति

**राज.१ ले. २६५**          ॥ श्री ॥          **५ नोव्हेंबर १७६०**

चिरंजीव राजश्री दिवाकर जोशी यासि प्रती कृष्ण जोशी आशिर्वाद उपरि येथील कुशल तागाईत आश्विन वद्य १३ बुधवारपर्यंत मु॥ फणीपत येथें सुखरूप असो. विशेष. वर्तमान तरी श्रीमंतांहीं महाष्टमीस समधखान व कुतुबशहा मारून, दहा हजार सेना लुटून, कुंजपुरा घेऊन लुटिला. गढी खणून जमीनीबरोबर केली. लोक आभर जाहले. श्रीमंतास भूमीगत सात लक्ष रुपये सांपडले. तेथून कूच करून कुरुक्षेत्रास चालिले होते. इतकियांत अबदाली बागपतापाशीं यमुनापायाब उतरून सोनपथास आला. हें वर्तमान श्रीमंतीं ऐकतांच माघारे फिरोन यवनाचें सन्मुख दरमजल फणिपथास आले. यवन येथून दोन कोसावरी राहिला आहे. नित्य थोडेंथोडें युद्ध होत आहे. श्रीमंतांहीं चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय जाहलें आहे. पुढें येववत नाहीं. आमचे सैनिक यवनाचे समक्ष उभे राहून, नित्य शेंपन्नास यवन मारून उंट, व घोडीं आणितात. दोन हत्ती पेंढारी यांनीं काल आणिंले. यवनाच्या सैन्यांत रसद बंद जाहली. यामुळें पीठ ००३ व चणे ००४ तूप ००॥ याप्रमाणें

महर्ग जाहलें आहे. आमचें सैन्यांत गहूं ८।६ व चणे ८।२ व तूप ८८२।। याप्रमाणें सवंगाई आहे. आणखी दोनचार दिवसांत यवन चालोन तोफावरी येईल तरी क्षणमात्र बुडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. वरकड सर्व प्रकारें करून शुभचिन्हें होतात व स्वप्नें उत्तम श्रीमंतांस होतात. याजवरून सर्व सैन्यास उत्साह आहे, कीं अबदाली व नजीबखान व सुज्यातदौला आठ चौ दिवसांत क्षयास जातील ऐसें दिसतें. अबदाली शाहानशाहा ह्मणवीत होता. त्यानें युद्धें बहुत केलीं आहेत, परंतु तो दो कोसांवरी येऊन आठ दिवस बसोन कांहीं पराक्रम होत नाहीं. याजमुळें आमची फौज बहुत शेर आहे. अबदालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं; युद्ध करावें तरी परिणाम नाहीं; उगेंच बसावें तरी भक्षावयास नाहीं. याप्रमाणें विचारांत पडला आहे. मागाहून युद्ध जाहल्यावरी सविस्तर होईल तें लिहूं. बहुत काय लिहिणें. हे आशिर्वाद.

**शिंदे इ. सा.३ ले. २३४** ८ नवंबर १७६०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

लालबा [ गुलगुले ] स्वामीचे से।।

सेवक च्िंतो कृष्ण [ वळे ] कृतानेक सा। नमस्कार विनंती उपर. येथील कुशल छ. २९ रोवल मु।। पाणीपत जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. ( येथून पुढें कांहीं ओळी पैशाच्या देवघेवीच्या आहेत ) येथील वर्तमानाचे विसी लिहिले तर शाहजहा पातशाह कैद करून अलीगोहर पातशाह नवा केला. त्याच्या पुत्रास छ ३० सफरी ( १० अक्टूबर १७६० ) वलीआहादी दिल्ही. तेथून कूच करून कुंजपुऱ्यावर गेलो. अबदुलसमधखान मोमिनखान गिलज्याकडील व कुतुबशहा नजीक [ ब ] खानाचा यैसे जमावसुधा राहिले होते. कदक खाणून भिंताडे घालून मजबुतीनें राहिले होते. त्याजवर छ ७ र।। वली ( १७–१०–१७६० ) हला केली. चढे घोडे त्यास लुटले. तत्क्षणीच कुंजपुऱ्यावर हला करून किला घेतला. मोमिनखान गोलीने लढाईत कामास आला. अबदुलसमधखान व कुतुबशाह यासी धरून सिरच्छेद केला. निजाबतखान कुंजपुरेकर कबिल्यासुधा कैद केला. पांचसहा हजार माणूस मारले व सासात हजार माणूस जखमी केले. वरकड मुखीं तृण धरून तुम्हारी गौ यैसे म्हणोन निघोन गेले. दाहा हजार घोडे पांचसहा हती उंटे डेरेदांडे वगैरे वस्तभाव आणिली. सरकारचा हती जवाहिरगज पूर्वी गेला होता तो यजमानाकडे आला. वीस हजार माणूस हत्यारबंद होते. ईश्वरे फते केली. अबदाली रोहिले यासी लढाई होत असे. त्यासी श्रीमंतासी कोसाचा तफावत आहे. नित्यानी गोलागोली तोफाचा मार होत आसे. श्रीभगवंत कृपेकरून धर्माची स्थापना करून शत्रुचा नाश करून श्रीमंतास यश देईल. चिंता नाहीं. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

**शिंदे. इ. सा. ३ ले. ३९१** श्रीशंकर संवत १८१७ कार्तिक शुद्ध १
८ नवंबर १७६०

चिरंजीव राजश्री लालाजी यांसि प्रति नारो विठल आशिर्वाद उपर. यथील क्षेम ताा कातिक सुध १ प्रातपदा मुाा पानपत सुखरूप आसो विशेष. तुम्ही पत्रे दोनतीन पाठविली ती पावली. त्याचे उतरे मागा पाठविली ती पावलीच असतील. (येथून पुढें थोडा मजकूर खासगी स्वरूपाचा आहे) मोगलाचा प्रकार तर यका कोशाचे अंतराने दोनी फौजात राहिल्या आहेत. मधे येक कोश मैदान राहिले आहे. आपली फौज पानपतगांव पाठीशी देऊन मधे बुलगे पुढे तोफखाना देहून फौज उतरली आहे मोगल [अबदाली] रोज यहून तोफा आणून कटकट करितो. आजी इाा बुधवार षष्ठी ताा आजी सनवार प्रतिपदापावेतो युद्ध होतच आहे. पुढा काय होईल ते पाहावे. उभयतो पक्षभारी फौजा आहेत. श्री करील ते होईल. तूर्त तोफाच मुख्य होत आहेत. निकड होईल ते दिवशी श्री करील ते होईल. गोस्टी संकटाच्या आहेत. कासिदास दोनच्यार रोज राहा म्हणत होतो परंतु सोबतीकरिता निघोन आला. मागाहून होईल वर्तमान ते लिहोन पाठउ परंतु तुम्ही आणखी कासिदाची जोडी वरचेवर पाठवणे खबर लेहून पाठउन देउ. बहुत काय लिहिणे लोभ कीजे. राजश्री नारोबास आशिर्वाद चिरंजीवास लिाा वरून कळेल. संकटाचे आहे. श्री निवारण करील. चिता न कीजे. हे विनंती

**शिंदे. इ. सा.३ ले. ३९२** ॥ श्री ॥ सवंत १८१७ कार्तिक शुद्ध २
९ नवंबर १७६०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
लालाजी स्वामीचे सेवेसी

(खासगी मजकूर आहे) वरकड यथील वर्तमान सर्व सेना कुली दिलीवर होती. त्यास बातमी आली जे सरहद्देकडे अबदुल समदखान व कुतुबशाहा व मोमिनखान गिलज्याकडील फौज दाहापंधरा हजार अमल करीत होते ते आवघे मिळोन अंतरवेदीत जावया गिलज्याकडे आले. ते कुंजपुऱ्याजवळ आहेत आण कुंजपुरेवाला निजाबतखान रोहिला याचाही आसस्करा होता. याबद्दल वतमान यैकतच तथून दिलीस आली-गोराचा पुत्र स्थापून प्रतिनिधित्व त्याकडे आण पातशाह गजसिका अलीगोराच्या नांवे ठहराउन तो बाहिर बंगालास आहे या करिता यैसे करून कूच केले. ते पंनास कोस पांचवे दिवशी कुंजपुऱ्यास पोहचलो तेच क्षणी भोवती फौज राहिली होती ते तुडउन कुंजपुराही घेतला. तिघे सरदार गिलज्याकडील धरून मारिले. निजावतखान कुंजपुरेवाला त्याला कबिलासुधा धरिला. जखीम लागल्या. द्रव्यही कांही त्याणे दाविले. सुखी प्राणी आणि

जखमाही लागिल्या होत्या. त्यामुळे तो मेला. वरकड बंदीस आहे. आम्ही कुंजपुऱ्यावरी लांबलो मागा गिलज्या व नजीबखान रोहिला व सुजातदौला यैसे यमुने आलीकडे सोनपथाच्या सुमारे उतरले. हे वर्तमान कुंजपुऱ्यावरी असता यैकिले. मग तेथून कूच केले ते पाणिपथावरी माघारे दोन मजली येऊन मुकाम केला. गांव पाठीसी देउ [ न ] तोफखाना व गारदी वगैरे पुंढा रचून झुंझाची तरतूद येथेच केली. तो गिलज्या यथून सोनपत दक्षणेस वीस कोस तिथे होता. तो चौ रोजी यथे दीडा कोसावर येउन राहिला आहे. रोजबरोज आपली फौज तयार पुढा होती. त्याची फौज तयार होउन पुढा होती. इकडील तिकडील गोळे सुटतात. साईकाली माघारे सरोन स्वस्त राहतात. यैसे दाहा अकरा रोज दीपवली प्रतिपदा साईकालपर्यंत यैसेच होत आले आहे. पुढा जे होणे ते श्री इच्छा प्रमाण. बहुत काय लिहिणे कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

**पुद.१ ले. ३९१** ॥ श्री ॥ श. १६८२ कार्तिक शु. ६.
इ. स. १४ नोव्हें. १७६०

चिरंजीव राजश्री बजू व गोविंदे बापू यांसि त्रीबक सदाशीव कृतानेक आशीर्वाद उपरी येथील कुशल ता छ ४ रबिलाखर पावेतो मो का पाणिपत येथे सुखरूप असो विशेष तुम्ही पाच साहा पत्रे पाठविलीं ती पावोन लिहिले वर्तमान कलोन बहूत संतोष जाहला याउपरी घरास वर्तमान वरिचेवरी तपसीलवार बारीक मोठे कचें पकें वर्तमान लिहीत जाणें इकडील वर्तमान तरी श्रीमंत दिलीहून कुंजपुऱ्यास दरमजल जाऊन अबदुल समंद खान व कुतुब शाहा बारा हजार फौजसुधा अब्दालींच्या साहित्यास होते त्याजवरी चंढे घोड्यानसी हला करून मारून लुटून पस्त केले तीन चार हजार गिलजी कापून काढिला त्याच लगटाने कुंजपुराहि फते जाहला नज्यावत खान कबिलासुधा धरला आबदूल समंदखान व कुतुबशाहा दोघे मारून टाकिले तेथील बंदोबस्त केला तों आबदाली सुज्याउदौला नजिबखान रोहिले सुधा येमुना उतरून आलीकडे आला हे वर्तमान ऐकोन तेथून आबदालीवरी फिरोन दर मजल येऊन पाणिपता जवळ गाठून सड्या फौजा करून मागे बुनगें गावाच्या आश्रयास व पुढे तोफाचा आरबा देऊन मजबुदीनें आहों अबदालीस अंतर कोसा दिढा कोसाचें आहे नित्य त्यांची घोडी उंटे बैलें आपले लोक पाडून आणितात लढाया होतात परंतु त्याच्यानें चालून येवत नाहीं महागाई त्याचे लस्करांत रुपयाचे सेर पीठ जाहालें तेहि मिलत नाही त्याणें चालून यावे ही वाट पाहातों आल्या नंतर एकदाच लगटाने मारून बुडवावा ऐसे आहे परंतु तो पनास साठा कोसाच्या दौडी करणार असा अबदाली त्याच्याने कोसावरून पुढे येवना असें जाहालें आहे श्रीमंताचे पुण्य समर्थ आहे लौकरी मोगलाचे पारपत्य येथास्थित होईल पुढे होईल ते लिहिलें जाईल तुम्ही सर्व वरिचेवरी लिहीत जाणें राजगोपाल आबदुलाचें हवाली करणें आपली मंडली तीर्थरुप आन्या भाऊ दाजीबा

बलवंतराऊ समस्त सुखरूप आहेत खडोजीबावा गंगाजीबाबा चिमाजीबावा व आणखी सर्व खुशाल आहेत हे आसीर्वाद

पै।। छ १५ जमखर पल्सीकराच्या जासुदाजवल आले

**पेद.२७ ले. २५९** १४–११–१७६०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अंताजीपंत सिधये स्वामीचे सेवेसी

पोष्य बापूजी वामन साठे कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी, येथील क्षेम ता। छ ५ रा खर पावतो मुकाम पाणिपत श्रीमंताच्या लस्करात रा। संभाजी कदम याच्या पथकात यथास्थित असो विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी ऐसे न करावे. हरघडी पत्र पाठवून सांभाल करीत जावे. इकडील वर्तमान तरी अबदालीची याची गाठ पडली. लढाईस आज पंधरा दिवस प्रारंभ जाहाला. त्याजकडील तोफा व आपणाकडील गोलागोली होत असते. दररोज घोडे पाच च्यार जाया होतात. माणूस आजपर्यंत पाच सात पर्यंत जाया जाहाली. मातबर कोणी जाहाले नाहींत. ईश्वरे आजपर्यंत खैर केली आहे. आबदालीची फौज चालीस हजार पर्यंत आहे. आपली उभयेता सरदार मिलोन साठ हजारपर्यंत आहे. सिवाय गोविंदपंत व मामलतदार वगैरे आले नाहींत. पत्रें गेली आहेत. शह भारीच आहे. ईश्वर निवारण करील तेव्हा खरे. श्रीमंताचे पुण्यप्रतापेकरून सर्व येथास्थित होईल. आमची फौज उत्तरेकडे, रोख दक्षणेकडे, आबदालीची फौज दक्षिणेकडे रोख उत्तरेकडे आम्हावर, येणे प्रा। फौजा आहेत. शह भारीच आहे. रा। विनायकपंत वगैरे मंडळी सर्व सुखरूप आहेत. रा। बाबूराव ग्वालरीस आले म्हणोन वर्तमान बाजारी आहे. आम्हांस आद्यापि पत्र आले नाहीं. आबदालीच्या गडबडीमुले वाटा बंद जाहल्या आहेत. कलावे आमचे घरचे व आपले सविस्तर वर्तमान लिहून आलिया जासुदासमागमे लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

**राज.१ ले. २६८** ॥ श्री ॥ १५ नोव्हेंबर १७६०

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो।। यांसिः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. सरकारांत दारूचें प्रयोजन आहे, तरी तुह्मांकडून दारू चारखंडी पांचखंडी असेल ते ताबडतोब रवाना करून दिल्लीस येऊन पोहोंचे ते गोष्ट करणें. या कामास दिरंग एकंदर न लावणें. जलदीने रवाना करणें. × जाणिजे छ ६ रबिलाखर सु।। इहिदे सितैन मया व अलफ. बहूत काय लिंहणें येथें काम मोठें आहे. वीस खंडी दारू, पांच खंडी शिसें तयार करणें. त्यांत तयार जें असेल तें पत्रदर्शनीं

रवाना करणें कीं दिल्लीस लौकर येऊन पोहोंचेशी करणें. फौज सुद्धां लौकर येणें. ऐवज रवाना करणें. हें लिहिलेंप्रमाणें एकहि काम होऊन न आलें. फार दिवस खावंदानें लहानाचें थोर केलें, वाढविलें, त्याचें सार्थक केलें! अजून तरी सावध होऊन लिहिलेप्रमाणें येऊन पोहोंचणें. दारू, शिसें व ऐवज दिल्लीस सत्वर पावेसा करणें. दारू फारच लौकर आली पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

**पेद.२१ ले. १९५** श्री १५–११–१७६०

चिरंजीव राजश्री राघोपंत यासी

नारो गंगाधर आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ ६ रबिलाखर मु॥ दाड वर्तमान येथास्थित असे विशेष. माहादजी जासूद याजबरोबर तुम्ही पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कलो आले. दोला वाणी याजबरोबरचा मजकूर लि। तो सविस्तर कलला. त्यास माहादू व दुसरा जासूद असे दोघेजण त्याजकडे पाठविले आहेत–त्याजला घेऊन पुण्यास जा म्हणोन सांगितले आहे. तेथे आल्यावर त्याचा प्रकार जसा करावयाचा तसा करावा अथवा लस्करात आला तर मनात आणीतच आहो. वरकड वर्तमान तर हिदुस्थानातून कागद आले. समदखान सरहिंदवाला वगैरे दोनच्यार येकून दाहा–पंधरा हजार फौजसुधा कुंजपुन्यास येऊन जमा जाहले होते. त्याजवर श्रीमंत राजश्री भाऊसाहेब लागले. लडाई जाली. समदखान व आणखी येक दोघे सरदार मारले गेले. दोघेजण धरिले गेले आहेत. कुंजपुन्याचे ठाणे फते जाहाले. त्याठिकाणी काही द्रव्यहि हस्तगत जाले असे वर्तमान आहे. राजश्री नारो शंकर: व जयनगरच्या वकीलाची पत्रे आली.

**इसं. पे. टि. भाग १** ता. २३ नोव्हेंबर १७६०

राजश्रिया विराजित रा. रा. बाबूराव बाबा, स्वामींचे सेवेसीः—

पो॥ बळवंतराव गणपत साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल स्वकीय जाणून लिहीत गेलें पाहिजे. विशेषः– बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर लिहीत जावें. इकडून पत्रें पांच सात पाठविलीं, परंतु उत्तर येतच नाहीं. तर ऐसें नसावें. आम्हाविसीं नेम केला असेल तर मोडावा. इकडील वर्तमान तर, आश्विन शुद्ध प्रतिपदेस अल्लीगोहर याचे लेकास वलीहद दिल्लींत करून बसविलें. गजशिक्का अल्ली गोहराचा करून, दिल्लीचा बंदोबस्त करून, नारोशंकर यांस तेथें ठेविलें; आणि कुंजपुन्यास अबदुल समधखान वगैरे पांच सात हजार फौज आहे, त्याजवर जाण्यास पाणपतपावेतो येऊन पोहोंचले; व लोकांस तफावत आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं. नदीस पाणी, आठ चार दिवस उतरावयास पाहिजेत. गिलच्यांची फौज दिल्लीजवळ

पलीकडे ये काठींच आहे. कूच करून पलीकडले तीरानें येणार होते. प्रस्तुत लष्करांत खर्चाची निकड फारच आहे. रसदेचा पैसा अद्यापि एक न आला ! तीही महिन्यांत फौजेस दोन रोजमरे पावले. आम्हां सारिख्यांनीं वस्तां मोडून खादल्या. सर्वही पेंच ईश्वरइच्छेनें श्रीमंतांचे प्रतापें वारतील. एक भाऊसाहेबांची हिंमत व लोकांवर उत्तम दृष्टि आहे. येणेंकरून फत्तेच आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे ही विनंती.

**पेद. भाग २१ ले. १९७** श्रीराम २७-११-१७६०

तीर्थरूप राजश्री नाना स्वामी वडिलांचे

सेवेसी

अपत्यें लक्ष्मणाने व कृष्णाने कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल छ १८ रा।। खर मु।। पानिप (त) वडिलांचे कृपे यथास्थित जाणून स्वकुशल-लेखन करीत असिले पाहिजे विशेष. वडिली निबाजी व विठोजी जासुदांसमागमें पत्रें पाठविलीं होतीं ती दिली आलीकडे जासूद लुटले गेले पत्रें गेली. जासूद आलें. कुशलतेचे वर्तमान जबानी जासुदानी सांगितलें. त्याआलीकडे सरकारच्या कासिदासमागमें वडिलांचे पुण्याचे मुकामचें पत्र आलें ते ह्यांच मुकामी पावले. लिहिले वर्तमान कलले. इकडील वर्तमान तर श्रीमंत दिलीहून उभयता सरदारसुधा निघालें. दिलीस रा।। नारो शंकर ठेवलें. अलीगोहराचा लेक वलीहद केला. आणि दरमजल कुंजपुऱ्यांस आलें. दुसरे दिवसी प्रातःकाली हला केली. तेथे कुतुबशा अबदुल समदखान वगैरे वीस हजार स्वार प्यादा गिलज्यांकडील होता. किंचित हत्यार धरिलें. उपरांतिक मोडिलें. तमाम लुटलें. सरदार सारे मारले गेले. त्याच हल्याने ठाणे कुंजपुराहि सर जाहाला. आतील नजाबतखान कुटुंबसहवर्तमान धरला गेला. त्याची चीजवस्त काही लुटली गेली. काही हस्तगत जाहाली. काही भूमिगत द्रव्य त्याचें व वरील मिलून साहा साडे साहा लक्ष नख्त दोन लक्षांचा गला हातांस लागला. नज्याबतखान गोली लागली होती. मेला वरकड कैदेत आहेत. तेथून पुढे कुरुक्षेत्रावरून सरहिंदेकडे जाऊन तो प्रांत काबीज करून तिकडील जमीदार सीख जाट सामील करून फौज तवाना करावी. हा मनसवा करून पुढे येक मजल चालिले तों गिलज्यास कुजपुऱ्याचे वर्तमान कल (ले), तोंच दिली आलीकडे बागपतच्या घाटांस ते येऊन आलीकडे उतरावयास लागले. काही नावा काही दाडग्या उतारा (ने) तडका उतारावयास लागले. हे वर्तमान येताच श्रीमंत माघारे फिरले. मजल दरमजल मुकाम मजकुरास आलें. तो तेहि सारे उतरून आलीकडे पाच कोस आले. दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं येथे आलें. त्यांची श्रीमंतांची दोहो कोसांची तफावत आहे. तेहि तोफखाना पसरून उतरलें आहेत. श्रीमंतहि गाव पाठीशी देऊन पुढे तोफखाना देऊन (बसले) लें. नित्य त्यांच्या आमच्या फौजेसी जुजे होतात. आजपावेतो कहीवालियानी व जुजात मिलून हजार बाराशें घोडी तीन

च्यारसे उंट व च्यार हती त्यांकडील आली. महिना त्याचे याचे गाठी पडून जाहालें, छ १३ मिनहूस (२२।११।६०) ते सरदारांकडे उजवी बाजूस चालून आलें. हेहि बाहीर निघालें. जूझ मातबर जाहालें. त्यास मोडून गोटांत घातलें. तीन च्यारसें मारलें. पाच सातशे जखमी जाहाले. सेदीडसे घोडें आलें. आपलें तीस चालीस ठार सें दीडसें जखमी या प्रा जाहालें. संध्याकाल जाहाला, नाहीं तर तेच दिवसी पारपत्य उत्तम होतें. त्याणी गोट सोडून पल काढिला होता. परंतु संध्याकालामुळें फौजा फिरल्या. परंतु ते म्हणत होते की मराठ्यासी आमची गाठ पडताच पडतील, ते महिना गाठ पडली व जुजेहि जाहाली, परंतु त्याचाच रेच मोडला याप्रा जाहालें. पुढेंहि जे होईल तें लिहूं. हिकडील राजेरजवाडे दुल्ग, दोहीकडे यत नाहीत. आमच्या फौजेस येक मात्र वोड. पैका तूर्त नाही. वरकड उत्तमच आहे. श्रीमंत भाऊसारखा अवसानाचा सरदार दुसरा कोणी नसेल. गिलज्याचें पारिपत्य सत्वरीच करतील. आम्ही मंडलीसहवर्तमान कुशल असों. कुंजपुऱ्यापैकीं दोन घोडें आम्हाकडे आलें. चिरंजीव नारायेणराव मंडलीसह सुखी आहेत. राजश्री त्रिंबकपंत नाना कुशल आहेत. पत्रें येतात. घनबादादांची पत्रे येतात. कुशल आहेत. वडिली तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहुत काय लिहिणे ? कृष्ण जोसी संगमेश्वरकर मोर्च्यांत मुदबखाजवल बसलें होतें. गोला लागून मृत्यु पावलें. मस्तकी लागला. मोठे वाईट जाहालें. मोठा माणूस गेला. कलावें कृपा कीजे हे विज्ञप्ति.

चिरंजीव राजश्री सदोबास आसीर्वाद. सर्व वडिलास लिहिल्यावरून कलेल. तिकडील संविस्तर वर्तमान लिहून पाठवणे हे आसीर्वाद.

पेद. २१ ले. १९८ श्री १-१२-१७६०

पै॥ छ २४ रबिलाखर मुकाम नागतळे

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
महादाजीपंत दाजी स्वामीचे सेवेसी

पोष्य लक्ष्मण नारायण साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत छ २२ रबिलाखर मुकाम करमेले सुखरूप असों विशेष. येथें छ २० रबिलाखरीं आलों. आणखी येथें येक दोन मुकाम आहेत. उपरांत कोणीकडे जातील तें पाहावें. दिलीकडील मजकूर तरी कुंजपुऱ्याहून पत्रें आश्विन सुद्ध त्रयोदशीचीं आली. कुंजपुरा छ ७ रबिलौवलीं ( १७-१०-१७६० ) घेतला, मोर्चे लाविले होते; दुसरें दिवशीं हल्ला करून घेतला. दाहा हजार फौज त्यांची लुटून पस्त केली. लूट फार जाहाली. आपणांकडील शें दोनशें माणूस सरदारासुद्धां ठार जालें व हजारपावेतों जखमी जालें. मातबर कोणी पडिला नाहीं. दादु माहात आढळाचा मात्र पडला. तीन च्यार लाख रुपये सांपडले, आणखी सांपडतील; खणत्या लावल्या आहेत. गहूं दाहा हजार खंडी सांपडला. रोजमरा गल्याचा

देऊं लागले. समनखान व कुतुबशाहा या दोघांस धरून आणून डोकी कापून भाल्यास लाऊन फिरविलीं. मोठीं फत्ते जाली. काल जयनगराहुन वकीलाचीं पत्रें बाविसा रोजाचीं आलीं. त्यांत मजकूर दिलीचे खालीं वीस कोसावर पठाण उतरला. याप्रमाणें वकिली वर्तमान आहे. पुण्याहून राजश्री गणेशपंत पेठ्ये यांणीं पत्रें पाठविली तीं आपणांकडे पाठविलीं आहेत, त्यांजवरून सविस्तर कलेल. लोभ कीजें हें विनंती.

**शिंदे.इ.सा.३ ले. ३९३** श्री संवत १८१७ कार्तिक वद्य १३

५ दिसंबर १७६०

श्रियासह चिरंजीव राजश्री लालाजीस व राजश्री नारोबास प्रति नारो विठल आशिर्वाद उपरी. ता २६ राखर मुा पाणपत जाणून स्वकीय लिा विशेष. तुमची दोनतीन पत्रे आली. त्याचे उतरे पाठविली असतील. आलीकडे वर्तमान तर इा ताा छ मजकूर पावेतो दीड मास मोगलाचे आमचे युद्ध होत आहे. हाली छ २२ रोजी जवळ कोशावर डेरे होते तेथून माघारे कूच करून पांच सहा कोशावर गेले. तथून स्वारी यती. इतका प्रकार आहे तुम्हास कळावे म्हणून लिा आसे. त्याचा जोरा आम्हावर नाही माघारा सरला. बहुत काय लिहिणे.

**पेद. २ ले. १३४** ६-१२-६०

श्रीगजानन

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

गोपाळराव गणेश स्वामी गोसांवी यांसी,

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें विशेष. तुम्ही छ १३ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिले वर्तमान सविस्तर कळलें. आज्ञेप्रमाणें आपले फौज सुधा पार उतरतों, सरकार काम यथास्थित करून लिहितों, जमीदार आदीकरून सिधच आहेत म्हणून लिहिले ते कळलें. यैसेयासी उत्तम आहे. सत्वर पार उतरोन सारे जमीदार हातीं घेऊन लिहिल्याप्रमाणें कार्य करून दाखविल्याने तुमचे चाकरीचा मजुरा आहे. नाहींतर बोलावें फार, होऊन कांहींच न ये, असें जाहल्यानें आहे विचार तो कल्तच आहे. तरी जपून सर्व येथास्थित सत्वर बज्याऊन दाखवणे. तुमची फौज राजश्री गोविंद बलालाबरोबर होती, ती तुम्हाकडे येईलच, व राजश्री गणेश संभाजी याजलाहि तुम्हाकडे यावें अगर फौज पाठऊन कुमक करणे म्हणोन पत्र पाठविलें आहे. त्याकडे पाठऊन फौज आणवणे. तुम्ही याउपरी येकंदर दिरंग न लावणे. इकडे आबदालीचाहि आवभाव कलोन गेला. येक दोन लडायाहि सरदारांकडील किरकोळ फौजेसी जाहल्या. त्याचा मोड करून

गोटांत सारून घात ( त ) ले. याउपरी त्याचा दम चालून येऊन लढाई करावयाचा राहिला नाहीं. सरकारच्या मोर्च्यास त्यांच्या मोरच्यास बाणाबाणाची तफावत होती. ते सरकारच्या मोर्च्यापुढे जेजालेच्या गोलीवर धमधमा बांधून त्यावरी तोफा ठेऊन मार दिल्हा. तो त्याच्या डेऱ्या पावेतों लस्करांत लागू होऊन माणसें घोडीं मरूं लागली. त्या भयानें त्याणी तेथून कूच करून दोन कोस मागें सरून गेले. आपले मोरचे देखील उठऊन नेले, हे त्याची हिमत आहे. लौकरीच पुर्ते पारपत्य येथास्थित होईल. दिवसेंदिवस कम हिमती होत चालले. सत्वरीच चांगलें पारपत्य होईल. तुम्ही लिहिल्या गोष्टी करून दाखवाल, तेव्हांच फौज ठेविल्याचें, पैका खर्च केल्याचे, व उमदगी मनात आणून लांबलांब लिहितां व बोलत होतां त्याचें सार्थक आहे. ही संध फिरून येणार नाहीं. सर्व हातीं घ्यावें. त्याचा अमल उठऊन आपला अमल करावा, हे खबर पाठवणे. जाणिजे. छ १९ रा खर पार जमीदारानी दंगा केला होता. त्या दिवसांत आपली फौज न गेली. आतां जमीदार सुजातदौलाचे मातुश्रीने बेणीबाहादराने समजावले. असो जमीदारांस हालमानी पाहिजेच. तुम्ही पार जाऊन दमाने जमीदार हाती घेऊन आपण तूट सोसून जमीदार न दुखावितां कार्य करणे. सर्व सामील होतील. ज्यास पत्रें पाहिजेत ते लिहिणे. पाठऊन देऊं. मोगलाची फौजहि सुभ्यांत जमीदार तुम्हासी बिघडले तरी पेच पडेल. सारा बंदोबस्त जालियावर बारिक बंदोबस्त होईल. तूर्त सर्वांस सुखलगाम रजावंदी उमेदवार करून भारी जमाव करणे. सामील होतील त्यांवर कारकुनी तूर्त न काढणे. जागीर मनसबाविसी उमेदवार करणे. दिलीपर्यंत डांक बसवणे. आजुरा पडेल तो खर्च करणे. प्रतापगडवाले व बलवंतसिंग वगैरे सर्व हातीं घेणे. कासीमधें अमल होऊन जमीदारांमुळें उठला तसे न करणे. आपण उपास करून त्यास रजावंद करून मोठे काम करून दाखवणें. मेहनतीनेच सर्व थोर जाहले. ईस्वरे थोर यश दिल्हें तरी थोरपणहि होईल. सत्वर जाऊन काम करणे. रा छ २७ राखर हे विनंति. गंगापारचे रोहिले यांचे मुल्कांतहि दंगा जमीदारांपासून होई हे जरूर करणे. जमीदार उमेदवार करावे तेव्हां सर्व होईल हे विनंती.

**राज.३ ले. २१०** २१ दिसंबर १७६०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूराव कोनेर स्वामी गोसावी यासीः— पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. चिरंजीव राजश्री भाऊसाहेबाचें पत्र छ ५ रबिलाखर पानिपतच्या मुक्कामीचें आलें कीं, आपली व अबदालीची सन्निधता जाली. दो कोसांची तफावत राहिली आहे. रोज लहान लहान झुंजें होतात. ऐशियास, फौज मातब्बर, समीपता जाली असतां खबर न यावयास कारण काय ? युद्ध जाहालें किंवा सलूख जाहाला, काय मजकूर जाहाला ? अलीकडे वर्तमान तहकीक आलें असिलें तर पत्रदर्शनीं

लिहिणें. राजश्री नारो शंकर यांस पत्र पाठविलें असे. तें दिलीस रवाना करून उत्तर पाठवणें. खासा स्वारी हिंदुस्थानास येते. राक्षसभुवनावर मुक्काम आहे. दरमजल हिंदुस्थानास येतों. चिरंजीव राजश्री दादा निजामअलीस आणावयास गेले आहेत. दिल्लीकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. जाणिजे. छ १२ जमादिलावल बहुत काय लिहिणें. हे विनंति.

## गोविंदपंताच्या मृत्यूची बातमी

**राज० १ ले. २७२** ॥ श्री ॥ २३ डिसेंबर १७६०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर गोविंदस्वामी गोसावी यासिः पोष्य सदाशिव चिमणाजी—विनति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. गोविंद बल्लाळ दिल्लीकडे फौजसुद्धां आले. गाजुद्दीनगरानजीक त्यांचा व गिलज्याचे फौजेचा मोकाबला होऊन गोविंदपंतांच्या फौजेनें शिकस्त खाऊन पळाली. मशारनिल्हे झुंजांत राहिले म्हणोन वर्तमान येथें आले. बाळाजी गोविंद फौजेसमागमें गेले. ते व सारी फौज कोठें एके जागा होईल तें लिहिले आलियानंतर कळेल ते एके जागा होऊन दिल्लीस येतील. त्यास गोविंदपंत राहिले हें वर्तमान तिकडे कळल्यानंतर मामल्यांत जमीनदार वगैरे फिसाद करतील. तर तुम्ही सावधपणें राहून, शिबंदी अधिक उणी लागली तर ठेवून, कोठें फिसाद न होतां, पूर्ववत्प्रमाणें बंदोबस्त राहे तें करणें. मशारनिल्हेचे पदरीं मातबर शिवराम गोविंद वगैरे आहेत, त्यांचें समाधान राखोन सर्वा गोष्टींचा बंदोबस्त करणें. मोगलाकडील कोणी दहा पांच हजार फौज घेऊन येऊन तीकडील अमल करितो असें नाहीं. परंतु इकडील गोविंदपंताच्या वर्तमानानें तीकडील जमीदार चार आहेत ते तूर्त डोई उचलतील, दंगा करितील, ठाण्यास दगा करितील. यास्तव मजबुदीनें राहून ठाणियांत जे जे आहेत, त्याचा पुस्तपन्हा वरचेवर करून ठाणीं मजबूद रहात तें करणें. कदाचित् वसुलास जमीदारांनीं चार दिवस खलेल केलिया पुढें सर्व नीट केलें जाईल. परंतु ठाण्यास दगा जालियानें वाईट. यास्तव ठाणीं सर्व फार हिमतीनें राखणें. तुम्ही तिकडे आहां. गोविंदपंतांनीं मातबर शिवराम गोविंदासारखे पदरीं बाळगले आहेत. त्यास हिमत धरून अशा समयांत गेली गोष्ट सुधारून दाखवावी. झाले गोष्टीचा खेद न करावा. ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. तुम्ही आपलें सर्व प्रकारें समाधान असों देणें. बंदोबस्त उत्तम प्रकारें करणें. इकडील फौज शिकस्त खाऊन तिकडे गेलियानें फार वाईट दिसतें. यास्तव त्यास तिकडे जाणें उत्तम नाहीं. त्याणीं जमा होऊन मागती दिल्लीस यावें. याप्रमाणें येथून त्यांस लिहिलें आहे. तुम्ही त्यास याप्रमाणें लिहून ते दिल्लीसच येत तें करणें. त्यामागें तुम्ही सर्वांनीं हिमत धरावी. मामल्यांत बंदोबस्त

उत्तम ठाणींठुणीं मजबूद असावी, यांतच सरकारचेंहि काम व तुमचेंहि स्वरूप आहे. तुम्ही मामलियांत आहां. सर्वांचा दिलासा करून बंदोबस्त करणें, घाबरे झालिया जमीदारच वाखा करतील. दिलांत चिंता न करणें. आम्ही आहों. सर्व नीट करूं. ठाणीं जतन राखणें. मुल्काचा बंदोबस्त करणें. जाणिजे. छ १४ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

**इसं.ऐ. टि. भाग ३ पान ५५.** ता. २४ डिसेंबर १७६०

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक रामाजी अनंत साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत चंद्र १५ जमादिलावल मुकाम पानिपत स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेषः— बहुत दिवस स्वामीकडून पत्र येऊन सांभाळ होत नाहीं तेणेंकरून चित्त सापेक्षित आहे. तरी सदैव कृपापत्र पाठवून सांभाळ करीत असलें पाहिजे. इकडील वर्तमान तरी, आज दोन मास मोंगलासी लढाई होत आहे. दोन लढाया उत्तम जाहाल्या; ते समयीं मोंगलांचा मोड जाहला. श्रीमंतांची फत्ते जाहली. एक बळवंतराव गणपत स्वामींच्यावरी खर्चले एवढी गोष्ट ईश्वरें वाईट केली. त्यांचे स्त्रीने आपलें सार्थक केलें. राजश्री गोविंद बल्लाळ यांस अंतर्वेदींतून नजीबखानाच्या मुलकांत रसद बंद करावयानिमित्य बोलाविलें होतें. ते येऊन मेरटेस पावले. रसद बंद कांहींसी केली. हें वर्तमान गिलज्यास कळतांच पांच सात हजार फौज यमुना उतरोन पाठविली. ते फौज गाजदीनगराजवळ; गोविंद-पंतांजवळ पावली. कांहींसें युद्ध जाहालें, तेव्हां सोसेनासें पाहिलें; मग निघाले. गोविंद-पंताचा पुत्र व पाराजीपंत वगैरे दिल्लीस येऊन दाखल जाहाले. गोविंदपंतांची ठिकाण अद्याप लागलें नाहीं. पळाले कीं कामास आले. हें ठीक नाहीं. ठीक खबर आलियावरी लेहून पाठवूं. श्रीमंत राजश्री नाना सहकुटुंब सुखरूप आहेत. शरीर फार बारीक आहे. आपणांस वरचेवर त्यांचीं पत्रें येतच असतात. आम्ही ल्याहावेसें काय आहे? बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति.

**ऐ. पत्र्य. लेख ९७** ॥ श्री ॥ मार्गशीर्ष वा. ७ शके १६८२

ता. २८–१२–१७६०

चिरंजीव राजमान्य राजश्री मोरोबादादा यांप्रति बाळाजी जनार्दन आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागाईत छ. १९ जमादिलावल पावेतो मुक्काम पाणिपत येथें सुखरूप असो विशेष. बहुत दिवस जाहले, आपणाबद्दल पत्र येऊन कांहींच वर्तमान कळत नाहीं; तरी निरंतर पत्रीं संतोषवीत जावें. इकडील मजकूरः पूर्वी कुंजपुऱ्यास लढाई जाहली; अबदुल समदखान वगैरे मारले. त्याजवर अबदालीची गांठ पडली, कृष्ण जोशी संगमेश्वरकर यांस गोळा लागून देवआज्ञा झाली, इतकें वर्तमान तपशीलवार

लेहून पाठविलें होतें त्यावरून साकल्य कळलेंच असेल. त्या अलीकडील मजकूर तरीं यांणीं तोपखान्याचा अरबा पसरून खंदक खणून पाणिपत गांव आपल्या पाठीशीं घालून सड्या फौजा तोफांचे मागे उभ्या या प्रमाणें बंदोबस्तानें राहिले आहेत. बुणगे गावाचे पुढें फौजेचें मागें ठेविले आहेत. त्यापाशींहीं चाळीस पन्नास तोफ चांगली आहे. साठ हजारापर्यंत फौज आहे. एके दिवशीं सरदाराकडील बाजुकडे त्यांची फौज वाढून आली. त्याची यांची लढाई चांगली झाली. शिंद्याकडील लोकांनीं त्याना गोटांत नेऊन घातलें. सहाशें पावेतों माणूस जखमी व ठार त्याजकडील जाहालें. यांजकडीलही दोन अडीचशेंपर्यंत ठार व जखमी झाले. अस्तमान झालें, यास्तव लढाई राहिलीं. त्यानंतर पंधरा दिवशीं छ २८ रविलाखरीं श्रीमंताकडील मोर्चांवर चालून चार पांच हजार आले. वरकड फौज त्यांची पाठीमागेंच उभी होती. त्यांची यांची लढाई होऊ लागली. लढाईस आरंभ होतांच अस्तमान झाले. ते दिवशी बळवंतराव गणपत यांस छातींत गोळी लागली. तसेंच घोड्याखालीं पडले. तों त्याजकडील माणसें धावली. त्यांतील एकानें तोंडावर तरवारीचा वार केला. दुसऱ्यानें गळा कापून ते शीर नेऊं लागलें तों पांचसात राऊत धावून सोडविलें. गळा अर्धा कापला होता, तसेंच आणून दहन केलें. समागमें स्त्री अग्निप्रवेश केली. त्या दिवशीं त्याजकडील दीड हजार माणूस ठार आपल्या आराब्यापुढें पडलें होतें. त्यांचेपुढें किती होते हें कळलेंच नाहीं. औशीची तीन घटका रात्र पावतों लढाई झाली. आपल्याकडील दिडशें पावेतो ठार व पांचशें सातशें पावतों जखमी झाले. ही लढाई फार चांगली झाली होती; परंतु बळवंतराव यांचा प्रकार असा झाला त्यामुळें ते सर झाले. त्यावर गोविंद बल्लाळ यांस पूर्वीपासून पत्रें जात होती कीं, अंतर वेदींत उतरून अबदालिची रस्ता बंद करणें. या वरून ते दरमजल दिल्लीच्या सुमारें आलें. तेथील नारो शंकर यांचीही कांहीं फौज मदतीस घेतली व पुढें रस्त मारावी तों अब्दालीनें दहा हजार फौज निवडक पाठवून दगा केला. कोणी लढले कोणी पळालें. गोविंद बल्लाळ यांचे शीर कापून श्रीमंताकडे आणून दिले, मग दहन झालें. गोविंदपंताकडील वगैरे तीन चारशें फौज ठार झाली. गोविंद पंतांचे चिरंजीव बाळाजी गोविंद समागमे होते, ते पळून नारो शंकर यांजजवळ दिल्लीस आले. कोणी कोणी पळालेले लोक येत. या प्रमाणें झालें. मोठें दगेबाज याज-करतांच अरबा पसरून खंदक खणून मोंगलाई रीतीनें राहिलें आहेत. दोन महिने यांची त्यांची लढाई होते; अद्यापि लढावें हाच निश्चय उभयतां पक्षी झाला आहे. ईश्वर काय परिणाम लावील तो खरा. मनसबा भारी पडला आहे; पैसा नाहीं, महागाई फार; यामुळें लष्कर गलबललें आहे. याप्रमाणें वर्तमान आहें. आपले बुणग्यांत गोळे जातात. त्याचीं बहुत पत्रें मीं पाठविलीं, परंतु आपणांस एकही लिहावयास अनुकूल न पडले! बरें असो. बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हे आशीर्वाद. हें वर्तमान तीर्थस्वरूप रा॥ बाबांस लिहून पाठवावें हे आशीर्वाद. पेटाफुलभरी येथील फडनविशी महादजीपंत कुंटे

यांस दिल्ही आहे. त्यांस त्यांचे वेतन उत्तम प्रकारें होय अशी विनंती श्रीमंतास करून घ्यावें. मी आपणांस लिहावें असें नाहीं. असामी आपले घरचा, परंतु महादजीपंत यांची पत्रें येतात त्यावरून लिहिले आहे. हे आशीर्वाद.

**शिंदे इ.सा.१ ले. २२२** ॥ श्री ॥ संवत् १८१७ मार्गशीर्ष वद्य १३
शिक्का ४ जनवरी १७६१

राजश्री लालाजी बलाल कमाविसदार प्रा॥ कोटे गोसावी यांसी,

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ जनकोजी सिंदे रामराम सुभा इहिदे सितेन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. कोटेकराचे व प॥ पाटण येथील वर्तमान लिहिले ते सविस्तर कळले. त्यास सेत्रुचे पारपत्य जाल्यानंतर कोटेकर वगैरे रजवाडे सर्व पादाक्रांत होतील. चिंता न कीजे. प॥ पाटण येथील वर्तमान लिहिले. त्यास गारागेरवा ह्याच परगण्यावरी पडल्या असा अर्थ नाही. ज्याप्रमाणें वरकड परगण्याची वाढ होईल त्याजप्रमाणें ह्या परगण्याचीही केली जाईल. इकडील वर्तमानाविसी लिहिलें. त्यास दोन वेला अबदालीसी व आम्हासी जुझ जाले. पांच सात हजार रोहिले जिवेंच मारिले. तीन हजार पर्येत जखमी केले. तीन च्यारसे निशाणे आणिले. हती चार आले. छ. २१ मारे जमादिलौवली ( ३० दिसंबर १७६० ) मोगल कूच करून दिलीच्या मार्गावरी आमच्या समोर राहिला आहे. तुम्हास कळावे यास्तव लिहिले आहे. जाणिजे छ २६ माहे जमादिलौवल. सारांश गोष्ट की तोटा नफा तुमचा तुम्ही सांभाळावा. करारा प्रा॥ रुपये सरकारांत द्यावे हेच उत्तम आहे. बहुत काय लिहिणे हे विनंती. ( मोर्तब सुद )

पैवस्ता पौष सुध द्वितीया छ १६ जमादिलाखर [ ८ जनवरी १७६१ ]

**राज.६ ले. ४०६** ॥ श्री ॥ शके १६८२ माघ शु. १.
१९ जाने. १७६१

श्रियासह राजश्री सुभानबा यासी—

सखोजी जाधवराव आशीर्वाद उपरि. येथील वर्तमान ताा माघ शुद्ध १ मुक्काम कुंभेर यथास्थित असे विशेष. पाणिपतावरी अडीच महिने मोर्चेबंदी करून राहिलों होतों. गिलजाचा आमचा दो कोसांचा तफावत होता. सड्या फौजा पुढें, मागें बुणगें, याप्रमाणें मोर्चे बांधून, तोफा पसरुन राहिलों होतां. एक लढाई कार्तिक शुद्ध १५ स जाली. व दुसरी लढाई आमावाशेस जाली. दोही लढायांत दोही कडील फौजा कायेमच होत्या. गिलजा आमच्या लष्कराभोवता फिरोन रस्त बंद केली. वैरण जाळली, यामुळें लष्करांत काळ पडला. दोन अडीच शेर दाणे जाले. लोकांस अन्न न मिळे, ऐसा प्रसंग जाला. घोडीं तो बहुत लोकांची मेलींच होतीं. राहिलीं तींहि पोटामुळें तुटलीं होतीं.

निदान प्रसंग जाणोन, पौष शुद्ध अष्टमी बुधवारीं हल्ला केली. पुढें फौजा त्यापुढें तोफखाना, बुणगे पाठीवर समागमें घेऊन, निघोन मोगलावर चालोन जाऊन, जुंज उत्तम प्रकारें केलें. अडीच तीन प्रहरपर्यंत युद्ध चांगलेंच जालें. राजश्री विश्वासराव यांस गोळी लागोन ठार जाले. इभ्रामखान गारदी यांस गोळ्या लागोन ठार जाले. वरकडही कितेक मातबर लोक कामास आले. आपले फौजेनें शिकस्त खादली. ज्यास जिकडे सोय पडली तिकडे निघाले. कोणी कोणास मिळाले नाहीं. राजश्री मल्हारबावा हजार दोन हजार फौजेनशी निघाले. रा नारो शंकर दिल्लींत होते. त्याजपाशीं पांच सात हजार होती. तितक्यानशी निघोन सौभाग्यवती पार्वतीबाई दोन चारशें स्वारानशी निघाली होती. त्याची राजश्री मलारबाची गांठ वाटेस पडली. त्याजला ते संभाळून घेऊन चमेलीपार भदावरच्या मुलकांत गेले. वरकड फौज बाळोच्याच्या मुल्कांतून ज्यास जिकडे वाट फुटली तिकडून निघाली. वाटेनें गांव मातबर गांवोगांव रावतांचा भरणा. जाबीगार फार. दोन दिवस रात्रं दिवस गवारांचे जुंज पुरवलें. घोडी थकोन राहिलीं. कोणाचें घोडें निभावलें नाहीं. तमाम फौजा पाय उतारा जाली. आमचीही घोडीं तमाम थकलीं. आम्ही मागाहून डोल्यांत व गाड्यांत बसून हळुहळू कुंभेरीस आलों. तेथून भरतपुरास जात होतो तो ठाकूर सूरजमल्ल यांनीं सामोरे येऊन भेटले. फिरोन ते व आम्ही समागमें कुंभेरी आलों. तेथून रा मल्हारजी बाबाकडे पत्रें लिहून पाठविली आहेत. त्याचे प्रतिउत्तराची मार्गप्रतीक्षा करीत असो. दो चौ रोजांनीं त्यांचें उत्तर आलें म्हणजे येथून स्वार होऊन आपल्या परगण्यांत सिपरी व कुलारसास जाऊं. तेथून सविस्तर वर्तमान तुम्हांस लिहून पाठवूं. सिपरी येथून चौ रोजाची वाट आहे. लौकरीच जाऊं. सौ॥ पार्वतीबाई व रा मल्हारजी होळकर जिवानिशी मात्र गेली. रा भाऊसाहेब कोणीकडे गेले त्याचे अद्याप ठिकाण नाहीं. रा जनकोजी शिंदे यांचेही ठिकाण नाहीं. वरकड सरदार, कोणी पुढें गेले, कोणी अद्याप मागेंच आहेत. सारांश आपले फौजेचा विध्वंस जाला तो लिहितां पुरवत नाहीं. ईश्वरी सत्तेनें होणार तें जालें. सिपरीस गेलियावर सर्व सरंजाम नवा केला पाहिजे. ईश्वरी कृपेनें होऊन येईल. तुम्ही कोणेविशीं काळजी न करणें. तुम्ही आपले ठाईं सावध राहणें. आपलें वर्तमान लिहून पाठविणें. ब. का. लि. आशी.

पुद.३ ले. २०९ शके १६८२ पौष व. ९
इ. स. १७६१ जानेवारी

नाना पुरंदरे यानी आपल्या मातुश्रीस पत्र लिहिले असे.

तीर्थरूप मातुश्री आवई वडिलाचे शेवेसी—

आपत्य नानाने चेरणावरी मस्तक ठेऊन सिर सा॥ नमस्कार विनंती येथील वर्तमान ता॥ पौश वद्य ९ ( २९ जानेवारी १७६१ ) मु॥ भिंड चमेल दक्षिणातीर

येथे ग्वालेरी पंधरा कोसपर्यंत वडिलाचे आसीर्वादे करून सुखरूप आसो विशेष पाणिपती होतो तेथे सविस्तर जासुदाबरोबर लेहून पाठविले ते कासीद पावले आसतील त्यास पौश शुा ८ आष्टमीस श्रीमतानी गिलज्याचे फौजेसी जाऊन युध्ये मोठे मातबर केले त्यास श्रीमंताचे फौजेने सिकस्त खादली तोफखाना बुनगे हाती घोडे बाजार गिलज्याने लुटिला वीस पचवीस हजार माणूस गिलज्याने धरून नेले फौजा चहूकडे पळाल्या आम्ही व मल्हारबा होल्कर येकीकडे निघालो भाऊसाहेब येकीकडे गेले चौघे चहूकडे गेले श्रीमंत राजश्री विस्वासराव गोली लगोन ठार पडिले गिलज्याने मुडदा नेला वरकड मोठे मोठे लोक राहिले बाजी हरी त्याचा पुत्र दादा व बालाजीपंत त्याचा जावाई हे राहिले आताजी माणकेस्वर राहिले आमची वस्तभाव घोडी उटे सर्व गेली, सखोबा बाल्या कृष्णा महादेव दोघे आचार्ये कोनेरी ब्राह्मण व आबाजी दादाजी व जिवाजीपंत वाघोल्कर सर्व राहिले मारले गेले किंवा पळ येत आहे त्यात आहेत हे कलत नाही पाहावे खिजमतगार भोई खासबरदार सर्व राहिले कुणबिणी राहिल्या याप्रो सर्व लस्करचे जाहाले बाकी राहिली नाही कोणापासी येक ताब्या राहिला नाही तीन चार उपोशणे सर्वास जाली दाडगियानी लस्करचे लोक फार लुटिले गगोबा बलवतरायाचे लेक आपा राहिले होते परतु पलोन आले जिवानसी सुखरूप आहेत मैरालभाऊ खंडोबा आन्या आबा व गगाजीबावा व चिमाजीबावा आले सुखे आहेत वरकड रामचंद्र जगथाप आबा व जानराव दुर्गोजीचा रामजी हे सर्व राहिले खोरकर बालाहि राहिले मोठा आनर्थ जाहाला आपले आसीर्वादे व मार्तडाचे आसीर्वादे जिवानसी येथपर्येत आलो पुढे आपले पाय द्रिष्टीस पडतीस तो सुदीन आहे सखा राहिला होता तो आला वरकड कोणीयेक नाही आता मल्हारबा व आम्ही येका जागा आहो सरकारची फौज दाहा हजार आम्हाबरोबर आहे सौ पार्वतीबाई राहिली होती परतु येक खिजमतगार व पिराजी राउत याणी पाठीस बाधून पलउन आम्हापासी आणिली मोठी विपत्य जाली प्रस्तुत येथे आहेत. बहिणाबाई व तिची सून नाना फडणीस ऐसी तिथे राहिली काये गत जाली असेल ती आसो वरकड कितेकाच्या बायका धरून नेल्या व मारल्या याप्रो गत जाली तुम्ही तिकडे खबरदार रात्रदिवस राहाणे तिकडे मोगलाने दंगा केला तरी सावध राहाणे पुरधरचे घर झाडून सारऊन ठेवणे काही गला पाठवावा रात्रंदिवस खबरदार राहणे वर्तमान वरचेवर लेहून पाठवावे भाऊसाहेबाचा थाग जयेनगराकडे लागला आहे कासीद खबरीस पाठविला आहेत ईस्वरक्रेपेने येतील जनकोजी सिंदे याचा थाग ठीक नाहीं लस्कर फार बुडाले बाकी राहिली नाहीं आम्ही ग्वालेरीजवळ फौजसुधा राहिलो श्रीमत राजश्री नानासाहेब फौजसुधा इकडे येतील मग आज्ञा मागोन वडिलाचे दर्शनास येऊ जिवेकरून खुशाल आहो वरकड गेले ईश्वर देता समर्थ आहे माणिक घोडा व सर्व गेली जरदी मोहनीमात्र मजखाले राहिली आहे वरकड दोन चार तटे राहिली आहेत सर्व घोड्या घोडे गेले

खड्डु जाधव राहिला हरी सिवराम गोविंद सिवराम याचे भाऊ राहिले बाजी भिवराव याचे नातू नारायेणराव राहिला–आपाजी जाधव व समशेर बाहादर दाडग्यानी लुटले पायेउतारा येत आहेत येतील तेव्हा खरे कळले पा हे विज्ञापना आता आपल्या मुल्कात आलो चिता नाही सरकारचे सारे हाती गेले आमचा नागसुदर गेला कलले पा हे विज्ञापना.

पुद-१ ले. ३९७ श्री श. १६८२ माघ शु. ९
इ. १३ फेब्रुवारी १७६१

तीर्थरूप मातुश्री आबई वडिलाचे शेवेसी

आपत्यें नानानें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येतील वर्तमान ताा माघ शुध नवमी मुाा ग्वालेर वडिलाचे आसीर्वादे करून सुखरूप आसो विशेष कितेका प्रकारचे लोक जुजाचे वर्तमान वडिलास सांगतील त्यास न ऐकावे जुज जाहले श्रीमंताची फौज निघाली बुनगे हती घोडे सर्व लस्करचे गेले श्रीमंताचे गेले तोफखाना गेला चौघडे चौघे गेले आम्ही मल्हारजी व सौा पार्वतीबाई भाऊसाहेबाची बायको ऐसी दाहा हजार फौजेनसी चमेल उतरून ग्वालेरीस अलो येथें आहों पहिले पत्र एक कासिदा बाो पाठविले ते पावले असेल त्यास आपली माणसे पलून लुटली वाटेने वस्त्रविरहत आम्हापासी आली सखोबा सुभाना सुर्वा जानू खिजामत गा(र) राणू सिंदा खिजमतगार इतके पाठीमागून येतात ऐकतो येतील तेव्हां लेहून पाठऊ वरकड खिजमतगार व घोडके बारगीर खंडू जाधव हवालदार व माहादेव वलणकर कृष्ण + + वेकू आच्यारी कोनरी कुसी बटीक व बहिरा हिरीचा ही सर्व येऊन पोहचली घोडी उंटे आगदी गेली मोहनी व शाहाजादी व तुरकी व करडी व दोन तटे व देवपुजी इतकी मात्र घोडी वाचली वरकड गेली या प्राो सर्व कटकाची गत जाहाली श्रीमंताचे काही राहिले नाही सर्व गेले आसो होणारास इलाज नाहीं ईश्वरी कृपेने सर्व आनकूल होईल बाला खोरकरहि आला घोडी विकत घेऊन दिल्ही चिरगूट पाघरुण दिल्हे आम्हापासीच आहे हातास बरछीची जखम होती बरा जाहला चिंता नाहीं मातुश्री गंगा मावसीस सागावे सुपेकर बापाहि आले आम्हापासी आहे सुप्यास केसो भिवराव याजला सागून पाठवावे आन्याभाऊ दाजीबा आबा बाजी नारायेण जगोबा हेहि सुखरूप आहेत बाजी काकाचा लेक गोविद मागून येत आहे आसी खबर आहे येईल परंतु वाटेने जो पल येतो त्यास अंन मिल्त नाहीं उघडी येतात आसे हाल जाहले आहेत येतील बाजी हरि सुभेदार व त्याचा पुत्र दादा व जावाई बालोबा गोपाळ रामाचे पुतणे तिघेहि नाहीत थाक लागलियावर लेहून पाठऊ बलवंतरावचा लेक आपा आम्हापासी आला आहे मातुश्री बाईस सागणे चिमाजी गागाजी खडोजी व जानोजी व पराणजी व आबा मानाजी देशमुखाचा हे आले रामचंद्र जगनाथ मागून येत आहे आम्ही ग्वाल्हेरीस आल्यावर

राहुट्या डेरे उंटे घोडी पालखी घेतली भाडेकुडे घेतले सर्व मिलाले चिंता कालजी न करणे याउपरी वडिलाचे दर्शन पाय पाहावे ही इछा आहे मार्तंड भैरव पूर्ण करील तो सुदीन आहे संतु कापशा मागून येत आहे लस्करचे मोठे हाल जाहलें बरे काये करावे गोविद बापूस आम्हाकडे पाठवणे हे विज्ञापना.

चिरंजी बजू व बापू यासी आशीर्वाद बापू तुम्ही लोटमाल घोडी चागदेवी आहे ती व गिरजा घेऊन येणे सिराजा बजूला बसायासी टेवणे हे असिर्वाद जानोजी बंगाल्यास आसीर्वाद हे पत्र दाखविणे हे विनंति

राघो निबाजी व चिरंजीव माणकोबा व खडोळा चितोबा यासी नमस्कार व आसीर्वाद

सेवेसी जगनाथ रघुनाथ नमस्कार सर्व मंडळीस नमस्कार दया निरतर करीत जावी हे विनंति

पो छ १५ सावान ईहिदे

**राज०६ ले० ४०९** श्री शके १६८२ फाल्गुन शुद्ध ४
२० फेब्रु. १७६१

पौ छ १६ रमजान चैत्र वद्य ३ सह
चतोर्थी बा। कासीद जोडी धनसिंग
प्रीतिराज याजबा। आली. अजुर्दार रामचंद्र
सामराज यांजकील कासीद ते प्रांतीचे

श्रियासह चिरंजीव राजश्री सुभानबा यास सखोजी जाधवराव कृतानेक आशोर्वाद उपरि येथील कुशल ता। फाल्गुण शुद्ध ४ चतुर्थी मुकाम ग्वालियेर यथास्थित असे. विशेष. आम्हाकडील वर्तमान तरीः पूर्वी तुम्हांस भरतपुराहून पत्र पाठविलें आहे. का। पाणिपतावरीं अबदालीसी व आपल्या फौजांसी मुकाबला अडीच तीन महिने पडला होता. पौश शुध अष्टमीस श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांणीं आपल्या फौजानिसी अबदालीवरी चालोन घेतले. बुनगे पाटींवरी घेऊन, पुढें तोफखाना देऊन, मजबुदीनें चालोन गेले. गिलज्या गनीम भारी आणि कटा. तथापि आपले फौजांनीं बरीच शर्त केली. निदान आपल्या फौजांनीं सिकस्त खादली. मोड जाला. ज्यास जिकडे सोय फावली त्या मार्गें तो निघाला. बहुत लोक आपले फौजचे मारले गेले. ज्यास सोय फावली ते निघाले. आपले लस्करचे पन्नास हजार घोडे गिलज्यांनीं व गांववाले गंवारांनीं घेतली. ऐसी कधींही जाली नव्हती. अतैव, ईस्वरी क्षोभ, हें खरें. देशींही दुःश्चिन्हें जाली होती, ती तुम्हास ठाउकींच होतीं. व इकडेही तारा थोर पडला. व भूमिकंप दोनदां जाला, त्याचा फलादेश जाला. श्रीमंत राजश्री भाऊ-

साहेब व जनकोजी सिंदे हेहि कुण्हीकडे गेले त्याचे काहीं ठिकाण (रा विश्वासराव श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे पुत्र ठार जाले गोळी लागोन) नाहीं. त्यांची काय गत आहे नकळे. वरकड लोक पाय उतारा, आंगावरी पांघरूण नाहीं ऐसें, विपत्तीनें आले. रा नारो शंकर व बाळोजी पलांडे दिल्लींत होते. दोन चार हजार फौज होती. ते पुढील पुढें निघाली. मागोन राजश्री मल्हारजी होळकर आले. हे लडाईतून अगोधरीच निघाले होते. यांजवळी प्रस्तुत आठ दाहा हजार फौज आहे. आमचीं घोडीं अवघीं दिल्लीच्या वरले सुमारे राहिलीं. तेव्हां कठीण प्रसंग येऊन पडला! मग डोल्या करून, रात बिरात करून, श्रीपांडुरंगाच्या प्रतापें व वडीलांच्या पुण्यें करून कुंभेर भरतपुरास आलों. तेथें सुरजमल्ल जाट यांनीं फार संगोपन केलें. पंधरावीस रोज तेथें राहिलों. सुरजमल्ल यांनीं आम्हाजवळी येऊन खबर घ्यावी. बहुतच त्याणीं आदर केला कीं, मी तुमचे घरचा, तुमचा चाकर, हें राज्य तुमचें. ऐसें प्रकारें हात जोडून बोलावें! ऐसें प्रकारचे थोर माणूस! त्यांणीं आपले राउत व मातबर सरदार देऊन लष्करास ग्वालेरीस पोहोंचविले. आमचे खासा पथकांतील अवघे पागा सिलेदार मिळोन (१००) शंभरेक राऊत आले. वरकड पाय उतारे आले. कुण्ही मागाहून येतात. माणसाचे हाल मोठे जाले! हत्ती, घोडे, पालख्या, डेरे, कुलसरंजाम अवघे लस्कराचा गेला. तेथें आम्ही आपले निवडून काय ल्याहावें? सारांश श्री कृपेनें व वडिलांचे पुण्यें करून जिवानिसी शाबूत आलों! राजश्री मल्हारजी होळकर व आम्ही येके जागां आहों. मुल्कांतील तमाम जमीदार बदलले आहेत. दुंदी जाली आहे. श्रीमंत राजश्री पंत प्रधान सिरोंजेवरी आले. आम्हांस पत्रें आलीं कीं, तुम्ही व राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री नाना पुरंदरे ऐसें मिळोन गोहदवाल्याचा बंदोबस्त करणें. त्यावरून मागती राजश्री मल्हारजी बावा व नाना पुरंदरे, आम्ही ऐसे कूच करून गोहदेकडे शह देऊन राहिलों आहों. अबदालीकडूनही सल्याचें राजकारण मागती आलें आहे. पाहावें. जें होईल ते वर्तमान मागाहून लेहून पाठऊन. पूर्वीही सल्याचें राजकारण हमेशा येतच होतें. राजश्री मल्हारजी होळकर आदिकरून अवघ्यांचें मतें होतें कीं सला करावा. परंतु राजश्री भाऊ कोण्हाचेंही ऐकेनात. मोठे दुराभिमानास प्रवर्तले. गिलज्या गनीम भारी. त्याणें रस्त बंद केली. घासलकडी बंद केली. आपल्या लष्करांत माहागाई जाली. रुपयाचा शेर अन दोन शेर. माणसें घोडीं खायाविण उठलीं. तेव्हां श्रीमंतांनीं दुराभिमानेंकरून गिलज्यावरी चालोन घेतलें. त्याचा हा प्रकार जाला. तो पत्रीं कोठवरी ल्याहावा? ईश्वरास ऐसेच करणें होतें! आम्हांविसीं कांहीं चिंता न करणें आम्ही सुखरूप आहों. आम्हीच सलामत असल्यानें सर्व गोष्टी मिळतील. चिंता नाहीं. या वर्तनामुळें कदाचित् देशांत दक्षणचा मोगल उपद्राप करील. तरी तुम्हीं आपले ठिकाणीं सावध राहाणें. वर्तमान कोण्हास प्रगट न करितां वाडीची सावधानी करणें. तुम्हांस इशारत मात्र लिहिली आहे वरकड वर्तमान होईल तें मागाहून लेहून पाठऊन बहुत काय लिहिणें? हे आसीवार्द.

**राज. ६ ले. ४०७** श्रीरामनाम शके १६८२ माघ वद्य २

२१ फेब्रु. १७६१

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना यासीः प्रति अनुपगीर जय सदाशिव उपरि येथील क्षेम जाणून आपलें क्षेम छ १५ रजब पा। कुशल वृत्त लेखन करून चित्त प्रमोदवीत गेले पाहिजे. विशेष बहुत दिवस जाहाले, आपणाकडून पत्रार्थ अवगत होत न होत. तेणे करून फार चिंतावस्थ निर्माण जाहलें. तितक्यांत रा। गणेश वेदांतीचा पत्रावरून साकल्यें कळों आलें. युद्धप्रसंगीं, छ ६ जमादिलाखर, पुशे शुद्ध ८ बुधवारी माहायौवनासी झुंजांत रणमंडळांतून श्रीमंत रायासी दुरानीं घेऊन आले. त्या समागमें रा। बापू हिंगणे होते. ते दुसरे दिवशीं तृतीय प्रहरी नबाब सुजात दौलाकडे वर्तमान आलें. त्यासी नबाब सुजात दौला समाचार ऐकोन रायांचे लोथ आपणाजवळ आणविले. तेव्हां आम्हांसी आज्ञा केले कीं येथासांग याचें सार्थक करणें. रजा दिले. तेव्हां आपले डेन्यासी घेऊन आलों. रा। गणेश वेदांती, रा। गणेश शेंकर उज्जनकर, रा। कासीराज वकील, वेणीप्रसाद या समागमें गेलों. इतक्यांत महायौवनाचे नशेकची येऊन लोथ परतोन नेलें. दुसरे दिवशीं महाप्रयत्न करावा लागलिया उपरांत माहायौवनाचे शैन्यांतच होते. तिसरे दिवशीं सुक्रवारीं वर्तमान ऐकलें कीं, रणभूमींत स्वामीकार्यनिमित्य थोर थोर सरदार कार्येसी आले आहे. म्हणोन वर्तमान ऐकिलें. ह्यासी नबाब साहेबासी सांगून रणभूमिका शोध केलों. त्यामध्यें एका शेरीरासी मस्तक न होते. ते शेरीरासी पाहोन, कोणाचें आहे म्हणोन शोध केला. त्या शेरीराखालीं सात मोती सांपडले. त्याचें चिन्हे उजवे पायावर केश नव्हते. दुसरे कटारीचे जखम कमरेसी होते. ते पाहोन, सरकारचे खिजमतगार रविवारीं येथ आले होते, त्यांचे नांवें बलराम, वाघोजी नाईक, रा। गणेश वेदांती, वरकड आपले कारकून मंडळी जे आले होते, सर्वोनीं पाहिलें. तेव्हां संताजी वाघ याणीं उभयतांसी हस्तीवर घालून आणिलें. मग चंदनादिक विधी करविलें. मग अस्थी ब्राह्मणद्वारेंकडून रा। गणेश वेदांतीनें भागीरथीसी पाठविलें. या उपरि आपणांशीं संदेह निर्माण जाहलें असलें तर आला जाठाकडे कांहीं फौजा गेल्या आहेत त्याची बातमी आणून वकिलाचे पत्रावरून विदित केला पाहिजे. विशेष.

से॥सी गणेश शेंकर उज्जनकर सा। नमस्कार विनंति उपरिः यथील वर्तमान सविस्तर पत्रीं लिहिलें आहे, त्याजवरून विदित होईल. बहुत काय लिहिणें ? हे विनति.

**इसं. ऐ. टि. भाग १ पान २०–२१** ता. २१ फेब्रुवारी १७६१

श्रीमंत राजश्री बाबूराव फडणीस स्वामींचे सेवेसीः—

सेवक जिवाजी नाईक येवलेकर मुक्काम उज्जनी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत माघ वद्य २ रविवार मुक्काम उज्जनीं येथें आपले

आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तरः—श्रीमंत थोरले भाऊसाहेब व श्रीमंत राजश्रीं जनकोजी शिंदे हे दोघे मात्र व कांहीं फौज थोडीशी घेऊन जे समयीं लढाई जाहाली, ते समयीं झुंज मातबर जाहाले. गिलच्याकडील माणूस मारले गेले चाळीस हजार, व गिलच्याकडील सरदार दोन मातबर पडले. सावकारी खबर तों ऐशी आहे कीं, मुख्य गिलच्याचा लेक उंबरशाहा, मलकाजमानीचा जांवई, तो झुंजांत ठार जाहाला. तोफेचे लढाईंत गोळा लागला तो खराखुरा मारला गेला. दुसरें नजीबखान तोही मारला म्हणतात; परंतु त्याचीं खबर ठींक नाहीं. कोणी म्हणतो मारला गेला; कोणी म्हणतो नाहीं. परंतु नजीबखान यास जखम भारीं आहे. एक भुज उडोन गेली, हेंच तों खरें. वरकड आणखी सरदार मेले, ते कोणी वळखत नाहीं. नांवाच सरदार दोनच. सुजातदौल्लाही जिवंत आहे. जे समयीं लढाई जाहाली, ते समयीं लढाई जांली. ते समयीं यांनीं तो त्यांचा मोड कछाच होता. परंतु थोरले भाऊसाहेब हत्तीवरून उतरले ते समयीं आपल्याकडील सरदार यांनीं मागें पाहिलें. तों सरदार दिसेना ! आणखी यांनीं गिलच्यांकडील फौज कांहीं रुसून आली होती, ते दोन तीन हजार ठेविली. जे समयीं इश्राम गाडदी यांजकडील पडला, ते समयीं गिलच्यांकडील जे चाकर ठेविले होंते, ते त्यांनीं माघारा पळोंन बुणग्यांत आले. बुणग्यास भास पडला कीं, गिलच्यांच जय जाहाला. यामुळें बुणगे लुटलें गेलें. आणखी, श्रीमंत, जे समयीं विश्वासराव दिसेनात म्हणोन हत्तीवरून उतरले, इतकाच फेर पडला. त्यामुळें यांनीं मोड खाल्ली. नाहीं तर फत्ते जाहाली होती. आतां सर्व सरदार तों कायम आहेत. श्रीमंत विश्वासराव कोठें दिसत नाहींत. व भाऊसाहेब थोरले व राजश्री जनकोजी शिंदे हे जेथें लढाई जाली, तेथून विसा कोसांवर एक जमीनदार याची गढी तेथें होते. मग जमीनदार मिळोन आला. जाट याच्या मुलखांत गेलेत. तिकडून मथुरेस, जेथें मल्हारजी होळकर व राजश्री विठ्ठल शिवदेव व नारो शंकर, व जे मोडले व सर्व एका जागा झाले. परंतु श्रीमंत भाऊ थोरले व श्रीमंत जनकोजी शिंदे ये जागां आहेत, हे कायम आहेत. त्यांचीं कांहीं हातचीं पत्रें तों आलीं नाहींत ! परंतु सरदार कायम आहेत. पुढें मथुरेस फौजेंत एका जागां होणार. उपर श्रीमंत राजश्री रामाजी भाऊ तों रेवाडीमध्यें उज्जनेचा मोड आला त्याजला भेटलेत. पायीं चालत आलेत. गळ्यांत कफनी, हातीं स्मरणी, ऐसे सुखरूप आलेत. मथुरेस सुखरूप फौजेंत गेलेत. चिंता नाहीं. त्यास श्रीमंत नानासाहेब सुरंजेस दर मजल गेलेत कळावें. आतां आम्ही लष्करांत जोड्या दोन पाठविल्यात. आलियावर जें वर्तमान येईल तें लवकरच लेहून पाठवून देऊं. कृपा लोभ असो दीजे हे विज्ञानपना. मिति माहे वद्य २ शनवार. याजपाशीं पत्र देणें, लष्करांत रवाना करूं.

सेवक पदरचा आहे.

**पेद.२ ले. १४८** २४–२–१७६१

श्रीसांब शिव प्रांा

श्रीमंत रा पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

पो काशीराज शिवदेव दिा नवाब शुजाउदवला कृतानेक संा नमस्कार विज्ञापना यैसीजे: येथील कुशल जाणून स्वामीहीं निजानंदवेभवलेखनास आज्ञा करित असले पाहिजे विशेष. येथील प्रसंग आपले सैन्यांचा व गिलज्यांचा मुकाबिला होता. कालचक्रानुसार विपरीतार्थ निदर्शनास आला तो परस्परें सौ विनंती जाली असेल. येजमानांचा आपला स्नेह अविछिन आक्रित्रीम आहे तोच आहे. अगतिकत्वें येणें जालें. यथाशक्य सोरस्यास मनोदये होता, परंतु भगवतसत्ता येसीच होती. त्यास उपाये काये. जुंज मोडलियां माहायेवनेछा विपरीतभावे होती. त्यास आम्ही ब्राह्मण व आपले सेवक असतां असा अर्थ व्हावा हे अनुचित जाणून येजमानांस बोध करून महतायासें श्रीमंत भाऊसौ व श्रीमंत रावसौबांची शवें रणांगणीहून आणून ब्राह्मणमंडळीचे सहित चंदनादि उपचारें संस्कार केला हेहि त्याचेंच पुण्यसहाये जालें कीं यैसा योग जाला असतां संस्कार येथाविधि जाला. जे शर्तमर्दीची ते केली का नसे आपले आंश होते. येजमानांस या प्रसंगामुळें बहूत खेदावह जाले. स्वामीराजांसहि परम दुखावह होईल. परंतु भगवत इच्छेस उपाये काये. स्वामी सर्वज्ञ आहेत. विज्ञापना करावी यैसा अर्थ नाहीं. सेवकास दासवर्गांत जाणून सदैव आज्ञापत्रीं सनाथ करित जावें. बहूत काये लिहिणें. कृपा निरंतर आसो दीजे हे विज्ञापना. माघ कृष्ण १२ मुा दिली.

**राज० ६ ले. ४०८** श्रीसांबशिव शके १६८२ माघ वद्य १२

३ मार्च १७६१

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबकराव नाना स्वामीचे सेवेसी:—

पो काशीराजशिव कृतानेक सां नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम माघ बहुल १२ जाणून स्वकीयलेखनीं हर्षवीत जावें. विशेष. बहुता दिवसांत कृपा करून पत्र पाठविलें तें पाऊन लेखनाभिप्राय कळला. आनंद जाला. येथील वर्तमान तो आपणास क्लतच आहे. श्रीमंत भाऊसाहेब व श्रीमंत रावजीचें साहित्य केलें म्हणून लिहिलें. त्यास, त्यांहीं तो उभय लोक साधन केलें. खेरीज, पुण्य कीं ऐसा योग जाला असतां चंदनादि संस्कार ब्राह्मणहस्तें जाला! आम्ही असतां न होय तर कोणे कार्यास यावें? आणिक सेवा न घडली. ईश्वरें हाच वाटा आम्हांस नेमिला होता! भगवत् इच्छेस उपाय काय? ग्रहस्त मंडळीचे साहित्यास लिहिलें. त्यास, आपणाकडील रा सखोपंत

व खंडोपंत वगैरे होते व आणीकही ग्रहस्त मंडळी पांच चार शत व पांच सात हजार मनुष्यें आपले सैन्याचीं होतीं. नवाबसाास उत्तम प्रकारें विनंती करून जें साहित्य व आपलें दास्य ते करून फतुदाबादेपुढें जटवाड्याकडे मार्गस्त केलें. सुखरूप सेवेसी पावलियां सविस्तर सांगतील. नवाबखानास या प्रसंगामुळें बहुत खेदावह जालें. परंतु उपाय काय ? भगवत्सत्ता खरी. श्रीमंताचा व नवाबसाहेबांचा स्नेह अविछिन्न अकृत्रिम आहे तोच आहे. या कलेवरास पोष्यवर्गात जाणून सदैव कृपापत्रीं सांभाळ करीत जावा. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ असो दिजे. हे विनंति.

**पुद.१ ले. ४१७** श्री श. १६८२ फाल्गून वाा १०
३१ मार्च १७६१

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री हरीपंत तात्या स्वामीचे शेवेसी.

पो बालाजी जनार्दन साा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ २३ साबान पावेतों मुाा नजीक शिरोंदे येथे असों विशेष तुम्ही पत्र छ ११ रजबचें बेदरच्या मुकामचे पाठविलें ते पावलें लिहिलेत कीं हिदुस्थान प्रांतीचे वर्तमान श्रवण करून दुख जाहालें तें गजानन जाणें परंतु श्रीमंत राजश्री भाऊसाहेब मंडलीसहवर्तमान आहेत म्हणून अईकिलें याजवरून संतोष जाहला तर याचें तपशीलवार वर्तमान लिहून पाठवावें म्हणुन लिहिलें त्यास पूर्वी गुज्ररत अजुरदार जोडी करून लिहून सविस्तर वर्तमान पाठविलें आहे परंतु दूरचा पंथ पत्र पावेल न पावेल याजकरतां लिहिलें असे पौष शुद्ध अष्टमीस श्रीमंताची व आबदालीची ल्ढाई जाली प्रहरभर लडले मग पल सुटला श्रीमंत विश्वासराव यांस गोली लागून देवआज्ञा जाली मोठे मोठे सरदार सर्व पलाले खासा भाऊ मात्र पनास रावतानशी लडत होते तावत्काल मी समीप होतों पुढें गर्दी जाली ज्याला जिकडे ईश्वरें वाट दिल्ही तिकडे तो गेला त्यापासून भाऊचें ठिकाण नाही तो हा काल पावेतों नाही व मातुश्रीचेंही ठिकाण नाही शोधास माणसें पाठविली आहेत ईश्वरी इच्छा प्रमाण प्रारब्धी असलियास चरण दृष्टीस पडतील वरकड आपले मंडली पो **पत्र दाखवू नये** (जाड टायपाचा मजकूर नानांनी तिरक्या टाकानें बारीक लिहिला आहे.)

| आले जखमा बऱ्या जाहाल्या | आले नाही |
| --- | --- |
| (१) पुराणीक तीन जखमा तीन | (१) बापुजीपंत येक जखम हातावर आहे पाठीमागून येतात ही खबर लागली मग माणसें शोधास पाठविली येतील चिंता नाही. |
| (२) गोविदभट उपाध्ये | |
| (१) कृष्णभट | |
| (१) आपाजीपत गोंधलेकर | |

(१) गगाधर बावाजी जखमा (?)
(१) धोंडोपंत लेले
(१) खंडोपंत नवे उमेदवार
(१) रामचद्र नातू दिलीहू(तू)न

———

(१) पांडुरगपंत बेडेकर

(१) हरीपंत केल्कर
(१) बाजीपंत जोशी
(१) बाळाजीपंत आठवले कारकून
(१) रामचंद्रपंत आगाशे
(१) कासीपंत नवे उमेदवार
(१) बालकृष्णपंत दि॥ नारोपंत पाल्ये
(१) नारोपंत दिवेकर
(१) श्रीधरपंत घाणेकर

———

९

या खेरीज ब्राम्हण जन व मराठी माणसें कितेक आली कितेक नाही. रामाजीपत भाऊ व लक्षुमण बलाल व हरी शिवराम नारायण राव बापुजी गंगाधर नाईक ओंकार भवानी शंकर बाबाजी व बाजी हरी पितापुत्र व बगाजीपंत पारसनीस मल्हारपंत मुजमदार व कृष्णाजी अनंत बिनी(वाले?) याचे पुत्र व जनकोजी शिंदे सोनजी भापकर तुकोजी शिंदे मानाजी पायगुडे येसवंतराव पवार अंताजी माणकेश्वर इतकियांचे ठिकाण नाही पनास हजार माणुस मारले गेले घोडी उटे नगारे निशाणें दप्तर कुल दौलत बुडाली पनास साठ हजार फौज पो पाच सा हजार घोडी निभावली बाकी घोडी गेली पाय उतारा लोक लंगोट्या लावून आले भक्षावयास नाही पधरा पधरा उपवास ते हकीकत ल्ढाईची वगैरे लिहितां पुरवत नाही कदाचित भेट जाली तर कलेल स्त्रीची गांठ सत्वरच पडली वीरशिगराव बारावकर याणी सभाळून आणिली फार केली श्रीमत पार्वतीबाई यासही खिजमतगाराने साभाळून आणिली मोठा वाखा जाहला याप्रो हे वर्तमान आहे श्रीमंत भाऊचे वर्तमान तर मी सुरजलमल जाटा (कडी)ल कुंभेरीस पंचवीस दिवस होतो तेथे नजीबखान सुज्यातदौला यांचे वकील तेथें आले होते त्यांची माझी भेटी जाली श्नेहसंपादन केले तदनंतर त्यानी सर्व (यु)द्धाचें प्रकार सांगितले त्यांत भाऊचें वर्तमान खुणामुद्रा (ग्या?) नशी विपरीत सांगितले वरकड वकिलांची कोठून पत्रें येतात त्यांत लिहितात की भिकानेराकडे आहेत कोणी अला जाटाकडे आहेत असें लिहितात ईश्वरी इच्छा प्रमाण तात्या असी गत का (क) धीही जाली नाही व पुढेंही होणार नाही शिकस्तीचे वर्तमान आईकतांच दिलींत नारो शंकर वगैरे सात आठ हजार फौज किल्यांत दोन महिन्याचा सरंजाम खजाना सात आठ लक्ष रुपये वगैरे टाकुन पलाले तेही दिलीहुन लुच्यानी काही लुटलें काही अले असे जाहाले मल्हारजी होल्कर बाबूजी नाईक सदाशिव रामचंद्र वगैरे नवी फौज ग्वालेरीस राहिली पार्वतीबाई धाकटे नाना वगैरे आम्ही दरमजल थोरले श्रीमंताकडे येत आहो गोपाळराव भोसले वगैरे येथे ठेविले

याणी च्यार दिवस राहून घेतले पुढें येऊ अतःपर चाकरी करणे नाही टोक्यास राहाणे हाच कृतसकल्प आहे पत्राचे उतर पाठविणे सविस्तर पूर्वील पत्रावरून कलेल बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे ही विनंती अब्दाली दिलीस फौजसहवर्तमान आहे परंतु आपले देशास जाणार हे वर्तमान फार दाट आहे डेरही जाले श्रीमंत माघोरे फिरले ही गोष्ट फार वाईट जाली बरे आपल्यास चाकरी करणे नाही मग मनसबा कशास पाहिजे हे विंनती.

* * *

## नाना फडणीसाच्या ' आत्मवृत्तां 'तील पानीपत

**काइसं· पत्रें, यादी वगैरे ले. १९२** श्रीकृष्णप्रसन्न १७६१ जुलै नंतर

पुढें उत्तरेकडील यवन शत्रुत्वें करून यमुना पैलतीरीं पाऊण लक्ष सेनेसहवर्तमान येऊन उतरला. परंतु यमुना भरपूर चालली तेणें करून उभयपक्षीं स्तब्धताच जाहाली. पुढें कुंजपुरा श्रीमंतांनीं शौर्येंकरून घेतला. मीही युद्धांत होतों. ईश्वरें रक्षिलें. तो इत्कियांत यवन अलीकडे आला. श्रीमंत सैन्यासहवर्तमान त्याचे समोर गेले. गांठ पडली, तेव्हां मी तर लहान श्रीमंताचे बुद्धीस महानबुद्धी [ ? ]. परंतु भावी अर्थ तेणेंकरून विपर्यास पडला. आप्त होते बळवंतराव मातुल व नाना पुरंदरे वगैरे ते अनाप्त झाले. जे अनाप्त शहानवाजखानी, भवानीशंकर वगैरे ते आप्त जाहले. त्यांचे वाक्याचे ठायीं विश्वास, तेणेंकरून आपली रीत युद्धाची सोडून यवनाची रीत धरिली. परस्परें युद्ध होत असे. गोळे प्रत्यहीं शत्रूचे राहुटीवरून जात. मातोश्री व स्त्री भयभीत होत. कीं कसें होईल ? ते ते समयीं मातोश्रीस विनंती करीत गेलों, कीं मी विनंती करितों. एक ईश्वरीं लक्ष असावें. त्यांत मातुल युद्धांत होते ते पडले. तेच दिवशीं सर्व सैन्य नाशास पावावें. परंतु रात्र जाहली यामुळें राहिलें. त्या दोन महिन्यांत मनुष्यें, पशु बहुत मेले. अन्नाची महर्गता. दुर्गंधी एकेच ठिकाणीं. असे श्रम पाहिले. पुढें मातुळाची स्त्री समागमें गेली. मातोश्रीस श्रम फार जाहले. होणार आवश्यक होतें. यदर्थीं संदेह धरूंच नये. हा माझा निश्चय. पुढें थोरलें युद्ध उदयीक होणार तो पूर्व दिवशीं संकेत कीं, पराजय आपला जाहला तरी शत्रूचे हातीं श्रीमंताचें कुटुंब व आपलें लागूं नये. आपणच नाश करवावा. आपण तर वांचत नाहीं असा सिद्धान्त करून श्रीमंतांनीं याची ही योजना केली. दुसरे दिवशीं तयार होऊन प्रातःकालचे दोन घटिका दिवसास युद्धास गोळागोळीचा प्रारंभ जाहला. श्रीमंत अति बुद्धिवान्, धैर्यवान्, शूर कृतकर्मे गर्व मात्र विशिष्ट, परंतु तर्तूद फारच सैन्याची वगैरे केली. शेवटीं निशाणा-जवळील तर्तूद एकीकडे जाऊन शत्रूची मुख्य स्थानींच गांठ पडली. मी श्रीमंतासन्निध ईश्वरस्मरण किंचित् करून असें. तो विश्वासराव यांस गोळी लागली, पडले. ते हत्तीवर श्रीमंतांनीं घालून उभेच राहिले. तों पठाण पायउतारा आंत येऊन मिसळले. तोडातोडी

होऊं लागली आणि डावे बाजूचे मातब्बर सरदार, चौघड्याचे धनी देखील, पूर्वीच पळाले. उजवे बाजूचेही होळकर शिंदे निघोन निशाण निघालें. दोन तीन शत पायदळ होतें. श्रीमंत दिसेनातसे जहाले. तेव्हां ईश्वरें बुद्धी दिली. माघारे फिरलों. पूर्वी बापूजीपंतीं बोध केला, माघारे फिरावें. त्यांस उत्तर केलें कीं, अशा समयीं श्रीमंतास सोडणें ठीक नाहीं. परतु पुढें याप्रमाणें जहालें. लक्ष सैन्य त्यांत मोठेमोठे सरदार असतां एकही ह्यासमयीं श्रीमंतांस आप्त न जहाला. बहुत दिवस अन्न भक्षिलें, कृपा पुत्रवत् केली. तितकें चांगला काळ होता तेव्हां केशास ढका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा. परंतु ईश्वर घटित विपरीत काळ त्यांत सोबती कोण होतो ! सर्व सुखाचे सोबती. भोजन आदरें करून करावें. वस्त्रें, जवाहीर, जागिरा द्याव्या. निदानी इतकें असून ज्यांचें देहाचें ठिकाण कोणास ठाऊक नाहीं. सर्व वाताहत जहाले. मी सायंकाळचे दोन घटका दिवसास घोड्यावर पाणिपतांत आलों त्या देशाचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथें परमेश्वरें वाट दाखवावयापुरते रामजीपंत उभे होते. सांगुं लागले घोडे वस्त्रें टाकून द्यावीं. त्यावरून सर्व टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र जहाल्यावर चाललों. तों एका कोसांत तीन चार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनी झाडा घेतला. दरखेपेस समागमेंचे दहावीस तोडून टाकीत. त्यांत मी राहिलों, हे ईश्वराची सत्ता.

## होळकराची थैली

[ राजवाडे खंड तिसरा पान १८१ यावर 'होळकराची थैली' हा मजकूर छापला आहे. त्या पानावरील तळ टीपेंत नमूद आहे कीं

"येथें विसाव्या पानापासून पुढील सर्व हकीकत छापली आहे. शेवटली एक दोन पृष्ठें गहाळ झालीं असून, उपसंहाराच्या कांहीं ओळी शाबूत आहेत. पुढें जर पहिलीं एकोणीस पानें सांपडलीं तर तीहि छापूं."

सुदैवानें वरील 'होळकराची थैली' याचा संपूर्ण फारसी अनुवाद उपलब्ध झाला आहे. लक्ष्मी नारायण शफ़ीफ़ औरंगाबादी हा विद्वान साहित्यिक आणि इतिहासकार ( इ. स. १७५० ते १८१४ ) हा औरंगाबाद येथें होऊन गेला. त्यानें इतिहासावर तीन आणि उर्दू व फार्सी कवि आणि त्यांचें निवडक काव्य यावर दोन ग्रंथ फार्सी भाषेंत लिहिले आहेत. निजाम घराण्याच्या इतिहासावर त्याचा मासिरे आसफी हा ग्रंथ असून तो अद्याप हस्तलिखिताच्या अवस्थेंत आहे. कलकत्त्याच्या एशियाटिक सोसायटींतून तो ग्रंथ मागविला. त्यांत पान ६०८ वर तो म्हणतो,

"मल्हारराव होळकर या युद्धांतून सुरक्षित बाहेर पडला. त्यानें या युद्धाची तपशीलवार हकीकत देणारे एक पत्र माळव्याहून बाळाजीरावाला पाठविलें होतें. तो मजकूर १० जमादिलावर ११८० हिज्री रोजीं ( तेरा नोव्हेंबर सतराशे सहासष्ट )

माझ्या हातीं पडला. पत्र उद्बोधक आहे. म्हणून त्याचा मी फारसी अनुवाद देत आहे. "

राजवाडे खंडांत न आलेला तेवढा मजकूर फारसी वरून मराठींत अनुवाद करून खालीं दिला आहे. बाकीचा फार्सी मजकूर मूळ मराठीशीं पूर्णपणें जुळतो याची खात्री करून घेतली आहे. ]

## होळकराचें नानासाहेबांस पत्र

दंडवत विनंति उपरी. तिकडील कुशल कळवीत असाव इकडील परिस्थिति अत्यंत शोचनीय आहे. पण परमेश्वरी इच्छेला जें येतें तसेंच घडतें. त्याला इलाज नाहीं. लहान शोकसागरांतून मी बाहेर निघून आलो आहे. विज्ञापना कीं

आज्ञेप्रमाणें गंगा आणि अटकेपर्यंत दौलतीच्या शत्रूचा बीमोड केला. मन्सूरअली-खानाचा मुलगा (शुजाउद्दौला) मल्किाजमानी, गाजिउद्दीनखान बहादुर आणि बादशहा आलमगीर यांच्या प्रकरणांत गुंतलो होतो. तो आपल्याकडून आज्ञा झाली कीं अंतर्वेदी सोडून इकडे यावे. इकडे बखेडा उपस्थित झाला. रोहिल्यांची पन्नास हजार फौज उभी राहिली. आणि ती इकडील सैन्याला मिळाली. स्वतः यांनीं एक लाख पन्नास हजार फौज उभी करून दिल्लीवर चाल करून आले. ही भयंकर बातमी आली. डेरेदाखल होऊन आम्ही आणि राजेश्री जयाप्पा पन्नास हजार फौजेनिशी तयार होऊन वाट पाहात राहिलों. म्हणजे जेथें जेथें गडबड माजेल तिकडे लक्ष देतां येईल. आणि मराठी फौज मोहिमेंत गुंतवता येईल. नंतर आम्ही यमुना ओलांडली आणि पन्नास कोस पुढें जाऊन लढाई केली. पण त्यांची फौज भारी आहे असें दिसून आलें म्हणून आम्हीं चाळीस कोस मागें आलों. आणि मदतीसाठीं जाट आणि रजपूत यांना पत्रें लिहिलीं. शत्रूच्या सैन्यांत आणि आमच्यांत आतां तीन चार दिवसांच्या मजलांचें अंतर राहिले होतें म्हणून आम्ही तेथें मुक्काम करून राहिलों. इतक्यांत अवचित पाऊस पडावा त्याप्रमाणें शत्रूनें मजला मारीत आमच्या जवळ येऊन छापा घातला. अनेक लोक मारले गेले. फौजेची बहुत नासाडी झाली. राजेश्री जयाप्पा पांच हजार स्वारानिशीं आघाडीला होते. ते आणि इतर सरदार मारले गेले. बरेच लोक कैद झाले. मी आपल्या परीनें बरेच प्रयत्न केले. दुसऱ्या दिवशी फौज गोळा करून मी लढाई केली. आमची फौज लहान आणि शत्रूची फौज मोठी. तरी पण अफगाण (रोहिले) पळून गेले. मग मी तेथून निघून दिल्लीस आलों. शत्रू पण दिल्लीच्या जवळ आला. तेथें त्यांचा प्रतिकार करणें आवाक्याबाहेर जाणून मी दिल्लीहून निघून आलो. रजपूत आणि जाट यांचा ओढा त्यांच्याकडे (शत्रू) असल्याचे दिसून आलें. शत्रूचें बळ वाढत होते. देश उध्वस्त झाला होता.

त्या प्रांतांतील राजे रजवाड्यांनीं शत्रूला निरोप धाडला कीं मराठ्यांची फौज दक्षिणेंतून येईल. त्यांच्याशीं तहाची बोलणीं करावी हे बरें. दिल्लींत तुमचा अंमल राहू नये. असा निरोप आम्हालाहि आला मग त्यांनीं ( शत्रूनें ) दिल्लीचा बंदोबस्त केला आणि यमुना ओलांडली.

त्यानंतरची हकीकत म्हणजे स्वामींनीं निजामअलीखानाशी युद्ध केलें. त्यानंतर भाऊसाहेब, विश्वासराव यांना त्यांच्याबरोबर इब्राहीमखान गार्दीला देऊन लष्कर इकडे रवाना केलें. हें सैन्य ग्वाल्हेरच्या सरहद्दीवर पोहोंचलें. हा सेवक त्वरा करून सैन्यांत रुजू झाला. इकडील राजेरजवाड्यांनीं फौज पाहून खंडण्या दाखल केल्या आणि सेवकत्व पत्करलें. या भूमीवर आतां प्रबळ लष्कर जमलें. तेथून हें सैन्य दिल्लीस पोहोंचलें. तेथें शत्रुपक्षांतील दहा हजार अफगाण होते. त्यांची कत्तल करून आम्ही दिल्लीचा ताबा घेतला. श्रीमंत राजेश्री विश्वासराव यांना बादशाही तक्तावर बसविण्यांत आलें. आणि सर्वांनीं त्यांची आज्ञा मानावी असें बजावण्यांत आलें.

कांहीं विरोधकांनीं शुजाउद्दौला आणि अब्दाली यांना लिहिलें कीं बादशाहीवर ब्राह्मणांची स्थापना होणें बरें नव्हे. हिंदूंचे राज्य झालें तर मुसल्मानांचा काय परिणाम होणार हें दिसतच आहे. या प्रमाणें पत्रें लिहून क्षोभयुक्त पत्रें लिहून पाठविली तीं उघडकीस आलीं.

सैन्यांत एकलक्ष पन्नास हजार स्वार, चाळीस हजार गार्दी ( इब्राहीम खानाच्या हाताखाली ) व चवदाशे तोफा होत्या. हें सैन्य दिल्लीहून बाहेर पडलें. यमुनेला भयंकर पूर होता. नदी पार होण्याची योजना करतां आली नाहीं. उभय पक्षांना हीच अडचण होती. मग तोफा वगैरे घेऊन हें सैन्य कुंजपुऱ्यावर चाल करून गेलें. कुंजपुरा फत्ते करून तेथील अफगाणांची कत्तल केली. दोन्हीं सैन्यांच्या आपसांत चकमकी सुरू झाल्या. अशा रीतीनें दीड महिना लोटला. मग त्यांना ( शत्रूला ) दिसून आलें कीं मराठ्यांची फौज जंगी आणि प्रबळ आहे. तेव्हां त्यांनीं निरोप पाठविला कीं यमुनेच्या पलीकडचा मुलुख तुमचा आणि अलीकडचा आमचा असा करार झाल्यास उत्तम आहे. यावर आमच्याकडे सरदारांत सल्लामसलत झाली. तोपर्यंत यमुनेचा पूर कमी झाला होता. भाऊसाहेब आणि विश्वासराव हे म्हणाले कीं परमेश्वर कृपेनें आमच्या फौजेचा दबदबा आणि तेज हीं शत्रूला दिसलीं आहेत. आपण त्यांचें म्हणणें कबूल करू. हें वर्ष या प्रांतांत काढूं. त्यांच्या फौजेची कांहीं दिवसांनीं उपासमार होईल. मग त्यांना लढणें कठीण होईल. याचा जो शेवट होईल त्याचे परिणाम पुष्कळ दिवस राहतील. यावेळी हिंदुस्थानांत काय किंवा दक्षिणेंत काय आमचा मुकाबला करील असा कोण आहे. फक्त हेच लोक ( अफगाण ) आहेत. म्हणून वर योजलेल्या मसलतीपेक्षां आणखी काय पाहिजे. मग सरदारांनीं शुजाउद्दौला

आणि अब्दाली यांना सांगून पाठविलें कीं तुमचें म्हणणे मंजूर नाहीं. तुम्हाला लढण्याची हिंमत नाहीं. अशा परिस्थितींत तुम्ही तीन कोटि रुपये देऊन परत जावे. म्हणजे आम्ही कबूल करू.

हें ऐकून त्यांना ( अफगाणांना ) त्वेष आला. आणि त्यांनीं लढण्याचें ठरविलें. त्याच दिवशीं त्यांनीं नदी ओलांडली. तोफखानाहि नदीपार केला. नदीपार करण्यांत त्यांची दोन हजार माणसें कामास आलीं. त्यांच्यापाशीं तोफखाना लहान होता. उभय पक्षाचे सैन्य दोन लाख पन्नास हजार होते. त्यावर नजर ठरत नव्हती. सैन्यांत भाऊसाहेब, विश्वासराव, दमाजी गायकवाड, दत्ताजी शिंदे ( जनकोजी पाहिजे ), गोविंद पंडित बुंदेले, बळवंतराव, घाटगे, शिर्के, महाडीक, साळुंके, खंडागळे, काळे, पांढरे, सुळे, धुमाळे, कदम, माने वगैरे सरदार होते. त्यांच्या-बरोबर चाळीस हजार निवडक स्वार होते. आम्ही सैन्यांतून निघून बाजार बुणगे मागे सोडून परमेश्वराचे नांव घेऊन शत्रूवर तुटून पडलो. चाळीस हजार तल्वारींची खणाखणी चालू झाली. ती पूर्ण एक प्रहर चालू होती. त्यावेळच्या प्रसंगाचें वर्णन काय करावे. प्रत्येकजण निर्धारानें लढत होता. एकानेहि पाठ फिरविली नाहीं. आमच्या सैन्यानें विचार केला कीं पुढें होऊन शुजाउद्दौला आणि अब्दालीचे इतर सरदार असतील तेथें जाऊन पोहोंचावे. तोच बळवंतराव हे गोळी लागून पडले. त्यामुळें आमच्या फौजेंत खळबळ उडाली. आणि पुढें कूच करून जाणें जमलें नाहीं. मृतांना आणि जखमी लोकांना मैदानांतून काढून छावणींत आणण्यांत आले. दुसऱ्या दिवशींहि युद्ध झालें. नंतर रोज दोन दोनदां चकमकी होऊ लागल्या. पुराणांतील गोष्टी प्रमाणें घडत होते. चकमकीनंतर उभय पक्षांतील छावणींत लोकांची येजा चालू राहात असे. अशा प्रकारे दीड महिने गुजरले. उभय दलांतून बावीस हजार माणसें ठार झालीं. बळवंतरावांच्या मृत्यूनें भाऊसाहेब शोकग्रस्त होते. आमच्या फौजेंतील लोक पूर्वीप्रमाणें निर्धारानें लढेनात. कुचराई करू लागले. पण चकमकींना प्रारंभ नेहमी आमच्याकडून होई. याचा परिणाम शत्रु सैन्यावर होई. भाऊसाहेबांनीं दरबार भरवून सरदारांना सांगितलें कीं लढाईत कसूर होऊं नये आणि अधैर्य दाखवूं नये.

इब्राहीमखान गार्दीनें या प्रसंगी म्हटलें की एक महिना झाला, लढाया होत आहेत पण कामगिरी होत नाहीं. हें काम माझ्याकडे सोंपविण्यांत यावें. भाऊंनीं हें कबूल केलें. कुरुक्षेत्रावर कौरव पांडव लढले होते. आतां तेथें आपण लढाई द्यावी असें ठरविलें. कुरुक्षेत्रावर रणखांब उभा करण्यांत आला. अफगाणांना सांगण्यांत आले कीं तेथें तुम्ही लढण्यास येणें.

मराठे आपल्या भोंवती तोफा वगैरे ठेवून बंदोबस्तांत राहिले. अब्दालीनें पहिलें की मराठ्यांचा तोफखाना जबरदस्त आहे. त्यांच्या समोर टिकणें कठीण आहे. त्यानें

चहूबाजूनें रसद बंद करण्यास सुरवात केली. रोज सुमारें दहाहजार तोफखान्यापर्यंत येत आणि अनेकांना मारीत. इब्राहीमखान गार्दी आणि त्याच्या तोफखान्याच्या लोकांनीं त्यांचीं चार पांच हजार माणसें मारून काढली. पांचसहाशें गार्दी मारले गेलें. गार्द्यांनीं मर्दुमकी चांगलीच गाजविली. पण या सैन्याची स्थिति दिवसेंदिवस अशी होत चालली कीं शक्ति राहिली नाहीं. शेवटीं असें ठरलें कीं निवडक सैन्य बाहेर काढून लढाई करावी. नाहींतर अब्रू धुळींत मिळेल. इब्राहीमखान गार्दीला असें वाटलें कीं यांचा पराजय झाला तर हे लोक पळून जातील आणि माझ्या गार्दी दळाचा सर्वनाश ओढवेल. त्यानें भाऊसाहेबांना सांगितलें कीं आपण सैन्य बाहेर काढून लढाई करूं नये. आपण ऐकिले नाहींत तर माझा तोफखाना आपल्यावर रोखण्यांत येईल. हें पाहून भाऊसाहेब आपल्या जागींच राहिलें. आपसांतील मतभेदाची बातमी शत्रूलाहि कळली. त्यांनीं लढाईची तयारी केली हें पाहून इब्राहीमखानानें भाऊंना आश्वासन दिलें कीं आपण काळजी करूं नये. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवावा. असें म्हणून त्यानें कुराणावर हात ठेवून शपथ घेतली. भाऊसाहेबांनींहि बेलभंडार उचलून इब्राहीमखानाला आश्वासन दिलें. त्यावेळेपासून भाऊसाहेब इब्राहीमखानाचाच सल्ला मानूं लागले. तो म्हणेल त्याप्रमाणें वागणूक होऊं लागली.

दुसरे दिवशीं अबदाली दीड लाख सैन्य आणि दीडशे सरदार घेऊन मैदानांत येऊन ठेपला. इब्राहीमखानापाशीं चवदाशे तोफा तीन हजार जेजालेवाले आणि तीस हजार गार्दी होते. तितकेच बाण टाकणारे होते. अब्दालीची फौज येताच इब्राहीमखानानें तोफांची सरबत्ती केली. मोठ्या तोफांतून एकोणीसशे सत्तर गोळे शत्रूवर टाकण्यांत आले. अब्दालीचे पन्नास सरदार आणि बावीस हजार स्वार मारले गेले. बाकीचे पळून गेले. शुजाउद्दौल्याला गोळ्याच्या जखमा लागल्या. भाऊसाहेब इब्राहीमखानाजवळ आले. आणि त्याची प्रशंसा केली. त्यानें सांगितलें. कीं शत्रूचा धीर सुटला आहे. आपण असेच पुढें चाल करून जाऊं. भाऊसाहेबांनीं हें कबूल केलें. शहाजणे वाजविण्याची आज्ञा केली. आणि शत्रुसैन्याजवळ ते सर्व पोहोंचले. हें पाहून अब्दालीचें सैन्य तीन कोस मागे हटलें. त्यांनीं टाकून दिलेल्या जागेवरच मराठी सैन्यानें तळ दिला. विश्वासरावाची तोफखान्यावरील मुख्य म्हणून नेमणूक करण्यांत आली. इब्राहीमखान आणि विश्वासराव हे घोड्यावर स्वार झाले. सैन्यांत धीर आला. ठिकठिकाणीं बंदोबस्त करण्यांत आला. पण परमेश्वरी इच्छा वेगळी होती. कुंजपुऱ्याला पाठीशी घेऊन आम्ही राहिलो. लढाईचा प्रसंग घडला. कोठूनहि आधार मिळाला नाहीं.

[ येथून ‘ होळकराची थैली ’ राजवाडे खंड तिसरा पान १८१ च्या खालील मजकूर सुरू होतो.

" पठाण यांणीं दुसरे दिवशीं सावर घेऊन, कुंजपुरा घेऊन आमचे फौजे भोवती घेरा दिल्हा "

या नंतर पान १९१ ओळ तेवीस वर लिहिलें आहे कीं " या पुढें किती पानें गेलीं आहेत नकळे "

फारसी अनुवाद पाहतां दीड पानें गहाळ झालीं असावीत. तो मजकूर पुढें दिला आहे. ]

" त्यांनीं निकर केली आणि आमच्या लष्करांत दाखल झाले. इकडून जेजले बाण इत्यादींच्या चालविण्यांत कसुर झाली नाहीं. विश्वासरावांनी चिलखतधारी अशा पांच हजार स्वारांनिशी मर्दुमीची शर्थ केली. ते स्वतः सारखे तीर चाल्वीत होते. इतक्यांत एक बाण त्यांना लागला आणि ते मृत्यु पावले. हें पाहून सैन्यांत भयंकर हलकल्लोळ झाला. सैन्याचे पाय डळमळले. भाऊसाहेब म्हणूं लागले कीं नानासाहेबांनीं विश्वासरावाला माझ्या हवाली केलें होतें. मी त्यांना काय तोंड दाखवूं आणि त्यांना काय उत्तर देऊं. आतां हें जीवन आम्हाला संकट वाटतें. आणि नकोसें झालें आहे. आतां विश्वासरावांच्या पायावर पाय ठेवून मृत्यु गांठावा हेंच बरें. मग त्यांनीं आम्हाला त्वरेनें निरोप पाठविला कीं आमच्या कुटुंबाला युद्धभूमींतून सत्वर घेऊन जावे. मग भाऊसाहेब हत्तीवरून खाली उतरले आणि बसवंत नांवाच्या घोडीवर स्वार झाले. नंतर त्यांनीं शत्रूवर चाल केली. आपणहि लढावे आणि रणांगणांत जीव द्यावा हेंच आम्हाला इमानीपणाचें वाटलें पण भाऊसाहेबांनीं दिलेली आज्ञा आठवली. तिचें पालन करणेंच श्रेयस्कर होय असें आम्हीं जाणिले. निरुपाय होऊन भाऊसाहेबांचें कुटुंब बरोबर घेऊन आम्ही लष्करांतून निघालों. आणि सतत मजला मारीत कांहीं दिवसांनीं ग्वाल्हेरीस पोहोंचलो. जे घडलें तें घडलें. परमेश्वरी इच्छेस उपाय नाहीं. "

[ येथें फारसी मजकूर संपला. राजवाडेखंडांत पान १९१ वर जीं शेवटचीं " राव व भाऊसाहेब याणीं आपला पुण्यप्रताप " वगैरे चार पांच वाक्यें दिलीं आहेत तीं फारसी मजकुरांत नाहींत. ]

## अहमदशहा अबदालीचें पत्र

[ पाटण्याचे सय्यद हसन अस्करी यांच्या प्रयत्नानें अहमदशहा अबदाली आणि जयपुरचा राजा सवाई माधवसिंह यांच्यांतील पत्रव्यवहार उपलब्ध झाला आहे. इ. स. १९४५ च्या इंडियन हिस्ट्री कांग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनीं दुराणीरजपूत वाटाघाटी या विषयावर निबंध वाचला. तो अधिवेशनाच्या इतिवृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. पानीपतचें युद्ध झाल्यानंतर लवकरच अहमदशहानें सवाई माधवसिंह यास पत्र पाठवून युद्धाची हकीकत कळविली आहे. पत्राचा इंग्रजी अनुवाद सय्यद हसन यांनीं

दिला आहे. त्याचाच मराठी अनुवाद खालीं दिला आहे. सर जदुनाथ सरकार यांनीहि त्या पत्राचा इंग्रजी अनुवाद माडर्न रिव्ह्यूच्या मे १९४६ च्या अंकांत प्रसिद्ध केला आहे.]

पानीपतची हकीकत देतांना अबदाली लिहितो “ पावसाळा होता. आणि नदीला पूर आला होता. यामुळें नदी ओलांडून पानीपत आणि कर्नालला पोहचणें कठीण होते. शत्रूंनीं कुंजपुरा येथें अब्दुस्समदखान आणि इतर सरदारांवर या पूर्वीच हल्ला केला होता. यामुळें आमचे विजयी सैन्य शत्रूंचा समाचार घेण्यासाठीं शहादऱ्यांतून बाहेर पडलें. आम्ही यमुना ओलांडली आणि कूच करीत खरोंड्याला पोहोंचलो. तेथें शत्रूंनीं आपलें ठाणें बसविलें होतें. आमच्या सैन्यानें तें सहज काबीज केलें आणि शत्रू पक्षांतील सर्वांची कतल केली. तेथून आमचें सैन्य पानीपतला पोहोंचलें. दक्षिण्यांनीं त्या ठिकाणीं मजबूत छावणी कायम केली होती. जवळ जवळ रोज त्यांच्यांत आणि आमच्या गाजी सैन्यांत चकमकी होऊं लागल्या. गाजीउद्दीन नगरच्या बाहेर गोविंद पंडित आपल्या सात हजार सैन्यासहित मारला गेला. नंतर आम्ही चहूकडून शत्रूचा कोंडमारा केला. आम्ही त्यांचा रोज पराजय करीत होतो. त्यांच्या छावण्यावर आगीचा वर्षाव करीत होतो आणि कित्येकांना यमलोकीं पाठवीत होतो. आणि त्याचा तपशील तुम्हाला कळलाच असेल.

अखेरीस, बुधवार रोजी तोफखाना, घोडदळ आणि पायदळ यांनीं युक्त असलेलें काफरांचें सैन्य छावणींतून बाहेर पडलें. गाजींना मारण्याचा त्यांनीं निर्धार केला होता. त्यांनीं अत्यंत निकरानें आमच्या सैन्यावर पुन्हां पुन्हां हल्ले केले. माझ्या दूतांनीं मला ही बातमी सांगितली. गेले दोन तीन महिने आमची आणि शत्रूची सैन्यें समोरासमोर छावणी करून उभी होतीं. या काळांत शत्रूचीं सैन्यें रोज आपल्या छावणींतून बाहेर पडत आणि आमच्यावर हल्ला करीत. आमच्यांत प्रखर युद्धें होत. आणि स्वतःची अनेक माणसें मृत्युमुखीं पडल्यावर शत्रू पराजित होऊन आपल्या छावणींत परत जात असे. असें आतांपर्यंत घडत आल्यामुळें आजहि तसाच प्रकार असावा असें मला वाटलें.

पण त्यांच्या हल्ल्याची बातमी कळतांच, त्यांचा मोड करण्याकरितां मी घोड्यावर स्वार झालो आणि मैदानांत पोहोंचलो. तेथें पोहोंचून मी परिस्थितीचें निरीक्षण केलें. मला खात्री पटली कीं आमचा प्रबळ शत्रू दोन लाख स्वार आणि पायदळ, जंगीं तोफखाना आणि तीरंदाज यांचें सैन्य घेऊन चाल करून येत होता. त्यांच्या रांगा एका मागे एक अशा सहा कोसापर्यंत पसरल्या होत्या. पुढे चाल करून, बंदुकी आणि बाणांनीं हल्ला करण्यास ते अगदी उतावीळ झाले होते. तें पाहून मी पण आपल्या सैन्याची युद्धरचना केली. सैन्याच्या मी उजवी आणि डावी अशा दोन फळ्या केल्या आणि रांगामागे रांगा उभ्या केल्या. मग मी आपल्या पायदळ

बंदूकधाऱ्यांना सरकारी तोफखान्याबरोबर राहून हल्ला करण्यास आज्ञा केली. माझा वजीर शहावलीखान यानें आपलें दळ घेऊन माझ्या तोफखान्याच्या पाठीशीं ठाण मांडून उभें राहावें असा मी त्याला हुकूम केला. वजीर तोफखान्यापाशीं येऊन दाखल होताच युद्धाच्या ज्वाळा भडकल्या. रणभेरी आणि रणशिंगें यांच्या ध्वनीनें वीरांच्या अंगांत स्फुरण संचरलें. हां हां म्हणतां सिंहासारखे शूर वीर आणि शक्तिशाली शिपाई विजेप्रमाणें एकमेकावर तुटून पडले. त्यांनीं गाजविलेलें शौर्य यापूर्वी कधींच दृष्टीस पडलें नाहीं. रुस्तुम आणि इस्फिंदारसारख्या वीरांनीं हें युद्ध पाहिलें असते तर त्यांनीं आश्चर्यानें आपलीं बोटें चावलीं असतीं. शत्रूंनीं इतकें शौर्य दाखविलें आणि लढण्याची इतकी शर्थ केली कीं इतरांकडून होणें अशक्य होय. उभयपक्षांतील वीरांचे हात रक्तबंबाळ झाले.

युद्धाची सुरवात तोफा आणि जंबूरकांनीं झाली पण लवकरच तीं शस्त्रें मागें पडून तल्वारी आणि तीर यांचा मारा सुरू झाला. तीं पण मागे पडून शूरवीर बरछया, खंजिरी आणि सुरे यांचा उपयोग करू लागले. पुढे पुढे तर उभय पक्षांतील वीरांनीं हातांनीं शत्रूला धरून मारण्याची पराकाष्ठा केली. शूर आणि क्रूर शत्रूनें ( मराठ्यांनीं ) शौर्यानें लढण्यांत कोणतीच कसूर केली नाहीं.

पण परमेश्वराची कृपा माझ्यावर असल्यामुळें, एकाएकी विजयसूचक वारे माझ्या दिशेनें वाहू लागले. परमेश्वराच्या इच्छेनें दक्षिण्यांचा दणदणीत पराजय झाला. नानाचा मुलगा विश्वासराव, आणि भाऊ हे वजीराच्या दळासमोर लढत होते. ते मारले गेले. त्यांच्या बरोबर कित्येक सरदार मृत्युमुखीं पडले. इब्राहीमखान गार्दी आणि त्याचा भाऊ हे जखमी अवस्थेंत पाडाव झाले. बापू पंडित ( हिंगणे ) हाहि कैदी झाला. शत्रूचे चाळीस ते पन्नास हजार स्वार आणि शिपाई आमच्या तल्वारींना बळी पडले. उरलेल्यांनीं पळ काढला. त्यांच्या पाठलागावर मी आपली पथकें पाठविलीं. त्यांत शत्रूचीं पंधरा ते वीस हजार माणसें मारली गेलीं. मल्हारराव आणि जनकोजी यांचें काय झालें तें कळलें नाहीं. शत्रूचा तोफखाना, हत्ती, घोडे आणि इतर सगळी मालमत्ता आमच्या हातीं सांपडली आहे. जवळ जवळ सगळें हिंदुस्थान माझ्या ताब्यांत आलें आहे. आणि परमेश्वरानें मला दिलेल्या राज्याच्या शत्रूंना आपल्या कर्मांची चांगलीच शिक्षा झाली आहे. परमेश्वरकृपेनें माझ्या हितचिंतकांच्या आशा फलद्रूप होऊ लागल्या अहित. माझ्या राज्याचे एकनिष्ठ स्नेही यांनीं माझ्या कृपेचा लाभ घेण्याची आतां वेळ आली आहे. तुम्ही एकनिष्ठ आहात हें वृत्त माझ्या वजीरानें मला अनेकदां कळविलें आहे. तुम्ही आतां माझ्याकडे लवकर आलें पाहिजे. या देशाची व्यवस्था करण्याचें मी ठरविलें आहे. त्या हेतूनें मी राजेरजवाडे आणि अमीर उमराव यांना पाचारण केलें आहे.

तुम्ही पण आलें पाहिजे. परमेश्वर करील तर तुम्ही पूर्वीपेक्षांहि अधिक मानसन्मान आणि वैभव पावाल. ”

## पानीपत नंतर अहमदशाहानें काढलेला विजयाचा जाहीरनामा

[ अठराव्या शतकांत हैद्राबाद येथें गिरिधारीलाल नांवाचा इतिहासकार होऊन गेला. त्यानें इ. स. १७७१ मधें तारीखे ज़फ़रा या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत निजाम घराण्याचा इतिहास देण्यांत आला आहे. हा ग्रंथ इ. स. १९२७ मध्यें मुद्रित झाला आहे.

या ग्रंथाच्या १४३ आणि १४४ या पानांवर गिरिधारीलालनें पानीपत नंतरचा अबदालीच्या विजयाचा जाहीरनामा दिला आहे. खजानाये आमिराचा लेखक गुलाम अली आजाद बिलग्रामी ( इ. स. १७०४ ते १७८६ ) यानें इ. स. १७६३ मधें खजानाये आमिरांत पानिपतचा वृत्तांत दिला आहे त्यांत सदर जाहीरनाम्याची वाक्यें जशींच्या तशीं आढळतात. जाहीरनाम्याचा मराठी अनुवाद खालीं दिला आहे. ]

शहादुराणी अब्दाली याच्या वजीराचा शिक्का असलेला फत्तेनामा—शहाजहानाबाद राजधानी आणि राज्याच्या तमाम भागांतील जनतेनें सम्राटांच्या न्यायाचें आणि कृपेचें उमेदवार होऊन जाणावे कीं यापूर्वी कुटिल असा गोविंद बुंदेला हा विजयी सैन्याच्या तलवारीच्या आघातानें नर्कोला गेला. कोपाला बळी पडलेला भाऊ याचे सगळे उपाय बंद पडले. त्याचे पाय डगमगले, आणि शक्तीचा लगाम त्याच्या हातांतून सुटला. कोल्ह्याप्रमाणें तो अरुंद अशा बिळांत घुसला. आणि हजार उपायांनीं तो आपली स्वतःची काळजी घेऊं लागला. या अवधींत रुस्तुमचें धैर्य असलेले, आणि अजगराची चिकाटी असलेले शूर वीर, यांनीं शिकारी, सावज आपण होऊन टप्प्यांत येईपर्यंत त्याच्यांवर नजर ठेवितात त्याप्रमाणें काफरांना घेरून त्या जनावरांचें अन्नपाणी बंद केलें. फुटक्या कपाळांच्या त्या लोकांची संख्या कुत्रीं आणि डुकरें यांपेक्षाहि अधिक होती. त्यांच्या सैन्यांत धान्याचा भयंकर दुष्काळ पडला. निरुपाय होऊन त्यांनीं मृत्यूवर आपलें लक्ष ठेविलें. आणि पतंगानें दिव्यावर जाऊन पडावें किंवा पांखरानें रात्रीच्या अंधारांत आपल्याला अग्नींत लोटावे त्या प्रमाणें बुधवार सहा जमादिसानी हिज्री ११७४ रोजी, भयंकर आग असणाऱ्या तोफा आणि तोफखाना आपल्या समोर घेऊन ते आपल्या छावणी बाहेर पडले. आणि मुंगी आणि टोळ यासारखे असंख्य असलेले ते, विजयी सैन्यासमोर उभे ठाकले. विजयी सैन्याचे जवानमर्द वीर यांच्या समोर दर्यांतील मगरी किंवा वडवानल कांहींच नव्हत. परमेश्वरावर निष्ठा आणि इस्लामचे· वैभव वाढविण्याची इच्छा यांनीं

ते प्रेरित झाले. शत्रूला आपल्या छावणीच्या बाहेर येण्यापुरता त्यांनीं अवधि दिला. नंतर त्यांनीं परमेश्वरावर भार टाकून आणि हातांत तल्वारी घेऊन काफरांवर हल्ला केला. आणि डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोच त्यांनीं शत्रूरूपी धान्याची रास जाळून फस्त केली. त्यांचा पुढारी सैतानाच्या वृत्तीचा जो विश्वासराव याचें डोकें कापून त्यांनीं तें चेंडूप्रमाणें फिरविलें. आणि त्या अधर्मी कुत्र्याचा नायब, फुटक्या नशिबाचा भाऊ हा गाजींच्या घोड्यांच्या टांचाखालीं सांपडून त्यांच्या डोळ्यासमोरून नाहींसा झाला. (मफ़्क़ुदुल ऐन दिलावरान शुद) आणि तो काळा साप मल्हार शूरवीरांच्या तल्वारीचे भक्ष्य बनून, काळे तोंड करून पळून गेला. जनको हा मृत्यूच्या पाशांत सांपडून बादशाही छावणींतील कुत्र्या कावळ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडला. असंख्य सरदार नर्कांत जाऊन पडले. बावीस हजार देखणे गुलाम आणि नाजुक कमरेच्या दक्षिणी दासी विजयी सैन्याच्या हातीं पडल्या. तीं सैन्यांत वाटून टाकण्यांत आलीं. अगणित संपत्ती हस्तगत झाली. जड, जवाहीर, रोकड, पन्नास हजार घोडे, तोफखाना, दोन लाख बैल, कांहीं हजार उंट, पांचशें प्रचंड हत्ती हीं सर्व विजयी सैन्याच्या हातीं पडलीं.

हा विजय अत्यंत महत्त्वाचा होय असें सर्व इस्लामला वाटलें. परमेश्वराचे आभार मानून या फत्तेनाम्याच्या प्रती चहूंकडे पाठविण्यांत येत आहेत. वास्तविक पाहतां या विजयानें बादशाहाचें तेज आणि वैभव ही वाढलीं आणि शत्रूंचीं तोंडें काळीं झालीं आहेत, आणि त्यांचा शेवट वाईट होत आहे.

## मिराते अहमदी

[अली महंमदखान हा मोगल काळांत गुजरात प्रांताचा दिवाण होता. इ. स. १७६१ च्या शेवटीं त्यानें फारसी भाषेंत गुजरातचा इतिहास लिहिला. या ग्रंथाचें नांव मिराते अहमदी असें असून मूळ फारसी ग्रंथ गायकवाड ओरिएन्टल सेरीज मध्यें इ. स. १९२७ सालीं प्रसिद्ध करण्यांत आला आहे. या ग्रंथाच्या शेवटीं अली अहंमदखानानें पानीपताची हकीकत लिहून ठेविली आहे. ही माहिती आपण पानीपताहून पळून आलेल्या लोकांकडून गोळा केली आहे असें तो म्हणतो. अली महंमद खानानें बऱ्याच बाजार गप्पा आपल्या हकीकतींत दिल्या आहेत. अहमदशहाचा पराजय होत होता. पण ऐन वेळीं शुजाउद्दौला व नजीबखान यांनीं बाजू सांवरली असें तो म्हणतो. याला कांहीं आधार नाहीं. पण पानीपतानंतर अवघ्या एक वर्षाच्या आंत लिहिली गेली म्हणून ही हकीकत वाचून पाहण्यासारखी आहे. यांतील कांहीं भागाचा अनुवाद श्री यदुनाथ सरकार यांनीं केला असून तो सरदेसाई गौरव ग्रंथांत प्रसिद्ध झाला आहे. पण समग्र प्रकरणाचा मूळ फारसीवरून केलेला अनुवाद खालीं देण्यांत येत आहे. बाजूचे आंकडे मूळ ग्रंथाच्या पानाचे आहेत.]

(५८५) " यापूर्वी लिहिण्यांत आलें आहे कीं मिर्जा संगीला शहाजहान या नांवानें गादीवर बसविण्यांत आलें. याचा सूड घेण्याकरितां अहमदशहा अब्दाली हिंदुस्थानांत आला. त्याला अडविण्याकरितां गाजिउद्दीनानें जनकोजी शिंद्याची मदत घेतली. जनकोजी हा कांहीं महिन्यापासून नजीबद्दौल्याशी लढण्यांत गुंतला होता. अब्दाली सरहिंदपर्यंत येऊन पोहोंचला अशी बातमी कळली तेव्हां मसलतीनें नजीबद्दौल्लयाबरोबर तह करण्यांत आला. मग गाजिउद्दीनानें मराठ्यांची फौज घेऊन अब्दालीचा प्रतिकार करण्याकरितां यमुनेवर तळ दिला. शुजा-उद्दौला अयोध्येला परत गेला. नजीबद्दौल्याचें अहमदशहाबरोबर संधान होतें. होतें. शुजाउद्दौल्याचा नोकर अलीबेगखान याच्याबरोबर तीन हजार स्वार होते. नजीबद्दौलानें आपलें सैन्य बरोबर घेतलें. तो आणि अलीबेगखान हे आपल्या पथकासहित अहमदशहाला मिळण्यास निघाले. ११७३ हिज्री जमादिलावलच्या नऊ तारखेस ते अहमदशहाला मिळाले. त्यांना नदीचे घाट आणि रस्ते माहीत होते. ते यमुना ओलांडून गेले. गाजिउद्दीनानें शत्रुसैन्याची तयारी आणि लढाई पाहिली. तो दिल्लीस आला. आणि त्यानें शहराचा बंदोबस्त केला. अहमदशहाचें सैन्य पाठलाग करीत आले. दक्षिण्याची फौज शहर पाठीशी घेऊन उभी होती. एक रात्र आणि एक दिवस त्यांनीं तोफाबंदुकांची मारगिरीं केली. पण युद्धाचा शेवट संकटपूर्ण झाला. जयाप्पाचा भाऊ आणि जनकोजीचा चुलता दत्ताजी हा युद्धांत मारला गेला. जनकोजी जखमी झाला. त्यांच्या सैन्याचे पाय उखडले. त्यांची पळापळ झाली आणि त्यांची सामग्री गारत होऊन अब्दालीच्या फौजेच्या हाती सांपडली. गाजिउद्दीनाचा सगळा भर मराठ्यांच्या बळावर होता. त्यांची शोचनीय दशा पाहून तो हादरला. दक्षिणी सैन्य रेवाडीच्या बाजूनें पळालें. गाजिउद्दीनानें यापूर्वीच भरतपुराकडे आपलीं मुलें माणसें पाठविलीं होतीं. आतां तोहि सूरजमलच्या आश्रयाला गेला.

दिल्ली शहरांत अहमदशहा अब्दालीनें बंदोबस्त केला. सारे शहर अफगाण शिपायांच्या तावडींत सांपडलें. दोन दिवसपर्यंत कत्तल आणि लूटमार हीं चालूं होतीं. या धुमाकुळांत जे वाचले ते अक्षरशः भरडले गेले. अहमदशहा कांहीं दिवस दिल्लींत राहिला. नंतर त्यानें शहर बंदोबस्त आणि लालकिल्लयाचें रक्षण याकरितां याकूब अलीखान याची नेमणूक केली. हें झाल्यावर त्यानें नजीबखानाच्या सल्लयानें आग्र्याकडे मोर्चा वळविला. तेथील जमीनदारांकडून खंडणी गोळा करणें आणि जाटांचा बीमोड करणें हे त्याचे उद्देश होते.

(५८६) तो जयनगर जवळ पोहोंचला. जाटांची ठाणीं उठवून लावण्यांत आलीं. मग अब्दाली आणि जाट यांच्यांत खंडणीसंबंधीं बोलणीं होऊं लागलीं. या सुमारास मल्हारराव होळकर आपल्या सैन्यासहित त्या भागांत पोहोंचला. त्याच्यांत

आणि अब्दालीच्या सैन्यांत विशेष अंतर नव्हतें. पण जनकोजीच्या दुर्दशेनें मराठी फौजेनें धास्ती घेतली होती. मल्हाररावनें तेथून कूच केलें. त्यानें दिल्लीपाशीं यमुना ओलांडली. नजीबखान हाच अहमदशहाला बोलाविण्यास कारण आहे. म्हणून त्याचा मुलुख उध्वस्त करण्यासाठीं त्यानें चाल केली. मल्हाररावानें सिकंदरा लुटून फस्त केलें. तेथें त्याला विपुल संपत्ति मिळाली. ही बातमी अहमदशहाला कळली. त्यानें नजीबखानाचा सल्ला घेतला व रात्रंदिवस दौड करून आणि सत्तर कोस पार करून तो दिल्लीस पोहोंचला. तेथून त्यानें यमुना ओलांडली. मल्हाररावाबरोबर चकमकी झडल्या. मल्हारराव अब्दालीच्या फौजेसमोर टिकणें शक्य नव्हते. त्यानें नजीबखानाच्या मुलुखावर मोहीम काढण्याचा बेत बदलून तडक यमुना ओलांडली. अब्दालीच्या सैन्यानें दोन दिवस विश्रांति घेतली. नंतर मराठ्यांचा पाठलाग करावा हा विचार होता तोच यमुनेला पूर आला. नदीपार करणें अब्दालीच्या फौजेला अशक्य झालें. नावा जमविणें आणि नदीवर पूल टाकणें इत्यादि प्रयत्न करण्यांत आले पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. याचवेळीं जनकोजी शिंदे, गाजिउद्दीन आणि सूरजमल हे मल्हाररावाला येऊन मिळाले. कांहीं दिवस गाजिउद्दीनानें मल्हारराव होळकराच्या सल्ल्यानें आणि सूरजमलच्या संमतीनें, स्वतःची वजीरी, बादशाहीचा बंदोबस्त, आणि दक्षिण्याबरोबर तडजोड या विषयासंबंधीं नजीबखानाच्या मार्फतीनें तहाची बोलणीं चालू केलीं. पण ती यशस्वी झालीं नाहींत. मग गाजिउद्दीन भरतपुराला परतला. या सुमारास बाळाजीरावाचा चुलतभाऊ व कुलमुखत्यार सदाशिव पंडित उर्फ भाऊ हा वरील बातम्या ऐकून युद्धाच्या द्वारें अहमदशहा अब्दालीला मोडून काढण्याच्या उद्देशानें प्रचंड सैन्य घेऊन निघाला. त्याच्याबरोबर जंगी तोफखाना होता.

(५८७) भाऊबरोबर बाळाजीरावाचा मुलगा विश्वासराव, भाऊ समशेरबहादुर, सरदार दमाजी गायकवाड आणि इतर सरदार होते. सैन्य अगणित होतें. तो पुण्याहून हिंदुस्थानाच्या रोखानें निघाला अशी बातमी आली. शुजाउद्दौला अहमदशहाला जाऊन मिळाला. गाजिउद्दीनानें भाऊच्या येण्याचें वर्तमान ऐकलें. आपलें नशीब आतां जोरावर आहे असें समजून तो भाऊला येऊन भेटला. कौल करार झाल्यानंतर त्यानें सूरजमलला आणून त्याची व भाऊची गांठ घालून दिली. मग त्या सर्वांची मसलत ठरली कीं यमुनेचा पूर ओसरत नाहीं. अहमदशहा कांहीं एकाएकीं यमुना पार करू शकत नाहीं. तर आपण कूच करून दिल्ली हस्तगत करावी; घाट आणि उताराच्या वाटा रोखून धराव्या आणि नावा साऱ्या जप्त करून ठिकठिकाणीं मजबूत चौकी पाहारे ठेवावे. शहराचें रक्षण करू शकेल इतकें सैन्य दिल्लीचा किल्लेदार याकूब अलीखान याजपाशीं नव्हते. म्हणून त्यानें किल्ल्याची तेवढी मजबूती करून तो लढविण्यास सुरवात केली. गाजिउद्दीन आणि सूरजमल जाट यांनीं मराठ्यांची

मदत घेतली. आणि किल्ल्याभोंवती जागजागीं मोर्चे बांधून किल्ल्यावर गोळ्यांचा वर्षाव केला. याकूब अलीखानानें शक्य तितक्या निर्धारानें किल्ला लढविला. अहमदशहा अब्दाली नदीच्या पलीकडे होता. तो नदीच्या कांठावर सैन्य घेऊन आला. नदीला पूर, नावा मराठ्यांच्या ताब्यांत, नदीचे उतार त्यांच्या बंदोबस्तांत; यामुळें अहमदशहाचा उपाय चालेना. मग त्यानें नदीच्या कांठावर तोफा आणून मराठ्यांच्यावर गोळे टाकले. याकूब अलीखान निराश झाला. त्याला दारूगोळा आणि इतर युद्ध सामग्री याचा तुटवटा भासू लागला. शेवटी पोक्त विचार करून त्यानें गाजिउद्दीन आणि सूरजमल यांच्या द्वारे कौल करार करून घेऊन किल्ला सोडून दिला. किल्ल्यावर सूरजमल्लाचा बंदोबस्त झाला.

सदाशिवराव भाऊला आतां गर्व झाला. त्याच्या डोक्यांत भलभलते विचार घोळू लागले. त्यानें लाल किल्ल्याचें निरीक्षण केलें. नंतर त्यानें किल्ल्यावरील जाटांचा अंमल काढून टाकला आणि ठिकठिकाणीं आपलीं माणसें नेमलीं. यानंतर विश्वासराव, दमाजी गायकवाड, आणि इतर सरदार यांना घेऊन तो लाल किल्ल्यांत आला. त्याच्या विनंतीवरून शहाजहान ( दुसरा ) बादशहा बाहेर येऊन सिंहासनावर बसला.

(५८८) भाऊनें बादशहाला नजर गुजरानली आणि नंतर त्याचा निरोप घेतला. बादशहा महालांत गेला. नंतर भाऊनें राजवाडे, बागबगीचे इत्यादि पाहिलीं. त्यानें कांहीं महत्त्वाच्या खोल्या उघडून पहिल्या. एका सोन्याच्या पीठावर धार्मिक महत्त्वाच्या वस्तु ठेविल्या होत्या. तें पीठ भाऊनें ताब्यांत घेतलें. नंतर किल्ल्याचा बंदोबस्त आपल्या विश्वासू माणसांवर सोपवून तो आपल्या छावणीकडे गेला. गाजिउद्दीन आणि जाट यांनीं सांगून पाठविलें कीं आपल्याला फक्त किल्ला पाहावयाचा होता. किल्ल्याचें रक्षण हे माझें काम आहे. तुमचीं माणसें किल्ल्यातून बाहेर काढा पाहू. पण भाऊला आपल्या सैन्याचा आणि पराक्रमाचा भारी गर्व झाला होता. त्यानें ही गोष्ट कबूल केली नाही. मोघम उत्तरें देऊन गोष्ट टाळली. भाऊनें दिवाणे खासचे चांदीचे छत काढून टंकसाळ्यांत नाणी पाडण्याकरितां चांदी पाठविली. त्याची किंमत दहा लाख रुपये भरली. मराठ्यांनीं अमीर उमरावांची घरें धुवून नेलीं. पुरलेलें खजिने सांपडतील या कल्पनेनें त्यांनीं अनेक घरें खणून काढलीं. घरांतील तुळया आणि लाकडी सामान हीं मराठी सैन्यानें उपयोगांत आणलीं. गाजिउद्दीन आणि सूरजमल यांच्यापाशीं दहा बारा हजार सैन्य होतें. ही परिस्थिति पाहून त्या दोघांची तडफड झाली. पण वरील पेक्षां जास्त सैन्य त्यांच्याजवळ नव्हतें. त्यांना हाकलून लावावे या उद्देशानें भाऊनें पंधरा हजार स्वारांना त्यांच्या गोटाभोवतीं नेमलें. मल्हाररावाला भाऊचा उद्देश कळला. भाऊला मनाई करणें त्याला शक्य नव्हतें. त्यानें सूरजमल्लाला इशारा दिला. सूरजमल्लाला आपण संकटांत सांपडलो असें वाटलें. त्यानें दक्षिण्यांच्या हेतूची खबर शुजाउद्दौल्यास दिली. शुजाउद्दौल्यानें युक्ति केली ती ही

कीं आपलें सैन्य नदी पार करणार असा पुकारा करून त्यानें नदीच्या कांठावरून तोफा सोडण्यास सुरवात केली.

(५८९) इकडे मराठ्यांनीं प्रतिकार सुरू केला. दोन्ही तीरावरून तोफांची गोळागोळी सुरू झाली. धुरानें वातावरण भरून गेलें या संधीचा फायदा घेऊन सूरजमल आणि गाजिउद्दीन हे तेथून निघून वल्लभगडला गेले. शुजाउद्दौल्यानें त्यांचे समाधान करून त्यांना दिलासा दिला. अहमदशहाकडून खिलतीचीं वस्त्रें आणि रकम त्यांच्याकडे पाठविण्यांत आलीं. गाजिउद्दीन हा आपल्या मुलांमाणसांबरोबर भरतपुर येथें राहिला. सदाशिवराव भाऊनें पाहिलें कीं आपली युक्ति फसली. त्यानें सूरजमलकडे भेटीदाखल हत्ती, वस्त्रें वगैरे पाठविलीं आणि त्याला लिहिलें कीं आमच्यापासून वेगळे होणें आणि आपल्या दोघांचा शत्रू जो अहमदशहा त्याला जाऊन मिळणें हें उचित नव्हतें. आतां निदान तुम्ही वाटा रोखून धरून शत्रूच्या लष्करांत रसद पोहोंचणार नाहीं अशी व्यवस्था करावी. सूरजमल कांहीं दिवस वल्लभगडांत राहिला. नंतर शुजाउद्दौल्याच्या सूचनेनें तो भरतपुरकडे रवाना झाला. त्यानें दोन्ही पक्षांना मदत करण्याचें टाळले.

या सुमारास बातमी आली कीं अहमदशहाच्या आज्ञेनें गक्कर जमातीचे सहा हजार अफगाण सिरहिंदला आले आहेत. अब्दुस्समदखान हा सिरहिंदचा फौजदार होता. कुतुबखानाकडे कर्नालच्या आसपासचा टापू होता. त्यांनीं कोंडा घाटापाशी यमुना ओलांडली आणि ते पानीपतला पोहोंचले. भाऊनें सखदेव पाटील यास पांच सहा हजार सैन्यानिशी त्या भागाचा बंदोबस्त ठेवण्यास नेमले होते. त्याच्यानें शत्रूचा प्रतिकार होईना. त्यानें वरील हालचालीची बातमी भाऊला लिहून कळविली.

भाऊनें पाहिलें कीं नदीला पूर आहे. शत्रू नदी ओलांडणार नाहीं याची त्याला खात्री वाटली. त्यानें दिल्लीच्या व्यवस्थेसाठीं नारोशंकरपाशीं तीन चार हजारांचें सैन्य ठेविलें. आणि सैन्य तोफखाना वगैरे बरोबर घेऊन त्यानें तीन रबिलाबल रोजीं दिल्लीहून कूच केलें. शहाआलम बादशहा या वेळीं अजीमाबाद पाटण्याकडे होता. त्याचें आणि गाजिउद्दीनाचें वांकडें होतें. आलमगीर ( दुसरा ) चा अंत झाल्याची त्याला खबर कळली. हें ऐकून त्यानें आपण बादशहा झाल्याचें जाहीर केलें.

(५९०) त्याचा मुलगा मिर्जा जवान बख्त हा दिल्लीस होता. जीनत महाल, म्हणजे जवानबख्त याची आई, हिनें प्रसंग ओळखून आपला कारभारी सैफुद्दीनखान यास सदाशिवराव भाऊकडे पाठविले. त्याच्या विनंतीला यश आलें. शहा आलम हा बादशहा म्हणून जाहीर करण्यांत आलें. त्याचा मुलगा जवान बख्त याला बादशहाचा युवराज नेमण्यांत आलें. शहाजहान ( दुसरा ) याला बादशाहीवरून काढण्यांत आलें. शहा आलमच्या नांवानें नाणीं पाडण्यांत आलीं आणि खुतबा

पढण्यांत आला. जवानबख्त हा युवराज म्हणून गादीवर बसला. शुक्रवार, सफर महिन्याच्या सुरवातीला मराठा सैन्याच्याबरोबर जवानबख्त हा मिरवणुकीनें जुम्मामशिदींत प्रार्थना पढण्यास गेला.

सदाशिवरावभाऊनें कूच करीत असतां वाटेंतूनच मल्हारराव होळकर आणि जनकोजी शिंदे यांना पुढे रवाना केले होते. तोफखाना आणि इतर लष्कर घेऊन तो त्यांच्या मागोमाग निघाला. ही बातमी लागतांच अब्दुस्समदखान कुंजपुऱ्याकडे वळला. कुंजपुरा हें मजबूत स्थळ होतें. तें नजीबखानाचें असून तेथें त्याचा भाऊ नजाबतखान हा फौजबंद होऊन राहात होता. अब्दुस्समदखानाच्या मागोमाग मल्हारराव आणि जनकोजी पोहोंचले. नजाबतखान किल्ल्याच्या बाहेर येऊन अब्दुस्समदखानास मिळाला. उभय पक्षांत युद्धाची धुमश्चकी सुरू झाली. मल्हाररावानें याची बातमी सदाशिवराव भाऊस दिली. तो आपल्या तोफखान्यासहित पाठोपाठ जाऊन पोहोंचला. आणि त्यानें तोफांचा मारा चालू केला. दक्षिण्यांची फौज असंख्य होती. त्या मानानें अब्दुस्समदखानापाशीं सैन्य कमी होतें. आतां लढण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें पाहून तो कुंजपुऱ्याच्या गढींत आश्रय घेण्याकरितां वळला.

(५९१) गढी लढवावी आणि अहमदशहाच्या कुमकेची वाट पाहावी असें त्यानें ठरविलें. अब्दुस्समदखानाचें सैन्य डळमळूं लागलें आहे, असें पाहून त्यांनीं निकराचा हल्ला केला. आणि शत्रुसैन्याला किल्ल्याचे दरवाजे बंद करण्याचीहि फुरसद दिली नाहीं. मोठ्या लढाईनंतर अब्दुस्समदखान, कुतुबखान, नजाबतखान आणि त्याची मुलें बाळें, आणि सतरा नामांकित सरदार कैद झाले. नजाबतखानाला कैदेंत राहणें पटलें नाहीं. त्यानें आत्महत्या केली. सदाशिवरावाच्या आज्ञेनें अब्दुस्समदखान आणि कुतुबखान यांचा वध करण्यांत आला. कुंजपुऱ्यांतील शिबंदी गारत करण्यांत आली. आणि गांव उध्वस्त करण्यांत आलें. लुटींमधें दक्षिण्यांना वीस हत्ती आणि तीन हजार घोडे मिळाले. याशिवाय लूट मिळाली ती वेगळीच. नजाबतखानाच्या मुलांना आणि इतर माणसांचा छळ करून घरें खणून काढून गुप्त खजिने शोधण्यांत आले. असें ऐकण्यांत आलें कीं जवळ जवळ एक कोटि रुपयाची संपत्ति, आणि युद्धोपयोगी सामान मराठ्यांच्या हातीं सांपडलें.

नजीबखान हा अहमदशहापाशीं बरपतगंज येथें होता. त्याला ही बातमी कळताच त्यानें तेथून कूच केलें. अहमदशहाहि त्याच्या पाठोपाट निघाला. पहिल्या दिवशीं त्यानें पंचवीस कोसाची मजल मारली. चवदा तारखेस त्यांना बागपत आणि कंगन्याच्या मध्यें नदीला उतार सांपडला. तेथेंहि नदी पार करणें सोपें नव्हतें. पण त्यांनीं यमुना ओलांडली. नदी पार होत असतां अनेक माणसें बुडून मेलीं. दिल्ली जवळील राजघाटावरच दीडशें माणसांचीं प्रेतें आणि बरींच गुरें ढोरें हीं काढण्यांत आलीं. असाच प्रकार इतर घाटावरहि घडला.

सारांश यमुना ओलांडल्यावर अहमदशहानें सोनपत पाठीशीं घेतलें. आणि यमुनेपासून सात कोसावर संभळक्याजवळ त्यानें मराठ्यांशीं लढण्याच्या उद्देशानें छावणी कायम केली.

(५९२) सदाशिवरावानें वरील बातमी ऐकताच कुंजपुऱ्याहून कूच केलें. आणि पानीपत पाठीशीं घेऊन अब्दालीच्या समोर सहासात कोसावर त्यानें आपली छावणी कायम केली. त्यानें एक मोठा आणि रुंद खंदक खणला. आणि ठिकठिकाणीं तोफा चढविल्या. त्या सांखळ्यांनीं बांधलेल्या होत्या.

रविलावलच्या तेवीस तारखेस चकमक झडली. उभय पक्षांतील कांहीं माणसें मारलीं गेलीं आणि कांहीं जखमी झालीं. याचा शेवट कसा होईल या कल्पनेनें शुजाउद्दौला चिंतित झाला. त्यानें तडजोड घडून यावी म्हणून प्रयत्न सुरू केले. यांत त्यानें मल्हारराव होळकराला मध्यस्थ केलें. शुजाउद्दौल्यानें पुन्हां पुन्हां प्रयत्न केले. पण सदाशिवरावाला आपल्या सैन्याचा आणि यशाचा गर्व चढला होता. त्यानें तडजोडीचीं बोलणीं फेटाळून लाविलीं. कुंजपुरा घेतल्यामुळें सदाशिवरावाला गर्वाची सपाटून धुंदी चढली होती. तडजोडीची याचना म्हणजे प्रतिपक्षाचें बळ कमी असलें पाहिजे असें तो समजला.

भाऊनें नदीच्या पलीकडे आपली कांहीं फौज ठेविली. नजीबखानाच्या मुलुखांतून अहमदशहाला येणारी रसद व युद्धोपयोगी सामान मारून काढण्याचें काम या सैन्याला देण्यांत आलें होतें. दिल्लीच्या वाटेवर भाऊनें दुसरें सैन्य ठेवून दिलें. म्हणजे तिकडून एक कपर्दिकहि अहमदशहाला पोहोंचूं नये अशी योजना होती.

(५९३) अहमदशहाचें सगळें सैन्य नदीपार झालें. नंतर त्यानें संभल्का हें गांव सोडून कूच केलें. आणि यमुनेपासून दोन कोसावर छावणी केली. आणि सैन्याभोंवतीं खंदक खणून तोफा व्यवस्थित चढविल्या.

दक्षिण्यांनीं रसदेच्या वाटा बंद केल्या होत्या. त्यामुळें इस्लामच्या लष्करांत महर्गता झाली. आट्याचा भाव रुपायाला दीड शेरावर आला. या सुमारास बातमी आली कीं वंजारी लोकांचा एक तांडा धान्य घेऊन बहादुरगडाकडून येत असून तो मराठ्यांच्या छावणीकडे जात आहे. अहमदशहानें त्याच्यावर हल्ला करण्याची आज्ञा केली. खूप मारामारी झाली. नंतर वीस हजार बैल धान्यानें लादलेले अहमदशहाच्या लष्करांत आणण्यांत आले. नजीबद्दौल्याच्या मुलांनेंहि सहारणपुरच्या बाजूनें बरीच रसद आणली. आतां पूर्वीची टंचाई जाऊन त्याच्या जागी आबादानी झाली.

एकोणीस रबिउस्सानी रोजीं उभय दळांत चांगलीच लढाई झाली. त्यांत अहमदशहाच्या दळाचा विजय झाला. पंचवीस तारखेस दक्षिण्यांनीं जमावानें हल्ला

केला. रात्रीचा एक प्रहर जाईपर्यंत उभय दळें निकरानें लढत होतीं. जखमी लोकांचीं संख्या सोडून दिली तर मैदानावरून मुसलमान आणि काफर यांचीं पांच हजार तीनशे चौऱ्याहत्तर प्रेतें हलविण्यांत आलीं. एक तंबू नव्हता कीं जेथें मृताचा शोक आणि जखमी माणसांचें विव्हळणें ऐकू येत नव्हते. (नंतर) कांहीं दिवसापर्यंत दक्षिण्यांना लढण्याची हिंमत राहिली नाहीं. मराठ्यांच्यापाशीं बादशाही तोफखाना होता. याशिवाय कुंजपुरा येथें त्यांना जेजाले, बाण इत्यादि युद्धसामग्री अगणित सांपडली होती. त्यांनीं आपल्या छावणीचा बंदोबस्त कडेकोट ठेविला होता. छावणींत घुसण्याची इस्लामच्या लष्कराला हिंमत झाली नाहीं. तिकडे मराठ्यांना इस्लाम-धर्मीयांचा धाक बसला होता. ('मराठ्यांच्यापाशीं' पासूनचीं वरील वाक्यें मूळ फारसींत आहेत. आपल्या इंग्रजी अनुवादांत जदुनाथांनीं तीं गाळलीं आहेत) यामुळें तोफांची गोळा गोळी होई. आणि मधून मधून करावली (अघाडी) च्या चकमकी होत. त्यांत ज्यांचे मरण ओढवलेले असे ते मृत्युमुखीं पडत.

या सुमारास अहमदशहाला बातमी कळली कीं भाऊच्या आज्ञेनें नारोशंकरानें दोन हजार मराठ्यांची फौज चिमणाजी पंडित याच्या नेतृत्वाखालीं पाठविली आहे. या सैन्यानें दुआबांतील रसद बंद करण्याचें काम पत्करलें होतें. गाजिउद्दीननगर पासून दोन कोसावर सराई लालखान येथें या सैन्याचा तळ होता. गोविंद पंडित हा इटावा आणि आसपासचा मोकासदार होता. तो दहा हजार सैन्य घेऊन मीरठ प्रांतांत आला. तो भाग नजीबखानाचा होता. तिकडून रसदेचा पुरवठा होत होता. तो बंद करावा असा गोविंदपंताचा उद्देश होता. त्याप्रमाणें त्यानें हालचाल केली.

(५९४) अहमदशहानें जहानखानाला पांच हजार अशा तडफदार सैन्यासहित गोविंदपंताचा बीमोड करण्याकरितां रवाना केलें. जहानखान हा तडक चिमणाजीवर घसरला. चिमणाजीचें सैन्य गारत झालें. चिमणाजी हजार संकटांतून निसटून मोठ्या कष्टानें दिल्लीस पोहोंचला. त्या नंतर जहानखानानें तितक्याच तडफेनें गोविंदपंतावर चाल करून त्याला त्याच्या सैन्यासहित पूर्णपणें गारत कलें. गोविंद-पंताचें शिर कापून घेण्यांत आलें. नंतर जहानखानाचे सैन्य परत अहमदशहास येऊन मिळालें. कुंजपुऱ्याला मराठ्यांनीं कत्तल केली होती. त्याचा सूड म्हणून नजीबखानानें गोविंदपंताचें शिर जरीच्या वस्त्रांत लपेटून मल्हारराव होळकराकडे पाठविलें.

अब्दाली आणि मराठे यांच्या संघर्षाची बातमी बाळाजीराव पेशव्याला लागली. तो यापूर्वी सावधगिरीकरतां म्हणून पुण्याहून बुऱ्हाणपुरास येऊन राहिला होता. मराठ्यांच्या सैन्यास पाठिंबा देण्यास म्हणून तो दहाबारा हजार सैन्यासहित हंडियापाशीं नर्मदा पार झाला. तेथून तो उज्जैन येथें येऊन बसला. मराठ्यांच्या बातमीकडे त्याचे सारखे कान लागले होते. यमुनेच्या पलीकडून

अहमदशहाला येणारी रसद अडविणें दक्षिण्यांना शक्य होईना. त्या प्रयत्नांत त्यांचे कांहीं सरदार मारले गेले. इस्लामियांच्या समशेररूपी विजेनें त्यांचे डोळे दिपून गेले. मैदानांत उभें राहून लढणें त्यांना शक्य झालें नाहीं. पण त्यांनीं खंदक खणून आग ओकणाऱ्या तोफा डागल्या होत्या त्यामुळें प्रतिपक्षाला त्यांच्या छावणीवर हल्ला करणेंहि शक्य होईना. ( या परिच्छेदांतील वरील सर्व वाक्यें जदुनाथांनीं गाळली आहेत ) म्हणून अहमदशहानें सैन्याला दिल्लीच्या वाटेवर ठेवले. तिकडून मराठ्यांना रसद आणि खजिना येत असे. तें एकदम बंद झालें. त्यामुळें शत्रूंच्या सैन्यांत तात्रडतोब दुष्काळ पडला. शिवाय, हिंवाळ्यांत त्या प्रदेशांत पाऊस पडतो तसा पाऊस पडला. चारा आणि दाणा यावांचून असंख्य गुरें ढोरें हैराण झालीं होती. त्यांच्यांत अगदीं त्राण न राहिल्यामुळें तीं यमलोकांत चरण्यास गेलीं. कांहीं माणसांची जीवननौका त्या भयंकर रक्तसमुद्रांतून सुरक्षित किनाऱ्याला लागली होतीं. त्यांच्या सांगण्यावरून समजलें कीं साठ हजार घोडीं मरण पावलीं. याशिवाय असंख्य जनावरें आणि माणसें मेलीं. अहमदशहाच्या सैन्याचीं पथकें दिल्लीपासून बारा कोसावर नरेला येथें आलीं. नारोशंकरानें शहराचे दरवाजे बंद केले. आणि पांच हजार स्वार व दहा हजार पायदळ शहराच्या तटबंदी भोंवती उभें केलें.

(५९५) चार महिनेपर्यंत उभय सैन्यें एकमेकाच्या समोर ठाण मांडून मारामारी करीत होतीं. शत्रू कांहीं आतां हा लढा शेवटास नेणार नाहीं असें अहमदशहास वाटलें. त्यानें आपलें सैन्य दिल्लीच्या दिशेनें हलविण्यास सुरवात केली कदाचित यामुळें शत्रू खंदकाबाहेर येऊन लढाई देईल असें त्याला वाटलें. म्हणजे जे काय घडायचें ते घडेल. मराठ्यांच्या सैन्यांत रसदेचा इतका तुटवडा पडला कीं रुपायाला एक शेराचे धान्य कष्टानें मिळे. ( येथपर्यंतची वरची सगळी वाक्यें जदुनाथांनीं गाळलीं आहेत ). लहान थोरांची स्थिति अगदी हलाकीची झाली. जमादिउस्सानी महिन्याच्या सहा तारखेस बुधवारच्या आदल्या रात्रीं मराठे सरदार सदाशिवराव भाऊकडे गेले. त्यांनीं सांगितलें कीं दाण्यापाण्या वांचून जनावरांत चालण्याफिरण्याची शक्ति राहिली नाहीं. आणि तीच स्थिति माणसांची झाली आहे. यापेक्षां लढून मरणें बरें. सारी रात्र मसलत चालली होती. शेवटीं असें ठरलें कीं तेथून कूच करून दिल्ली गांठावी. तेथें रसद आणि खजिना याची सोय होईल. मग शहर पाठीशीं घेऊन शत्रूशीं युद्ध करावें. रात्रींच्या शेवटच्या प्रहरी सैन्याची तयारी करण्यांत आली. तोफा ओढणारे बैल बरेच निकामी झाले होते. छावणींतील बाजारांतून जे दुकानदारांचे बैल जेथें जेथें सांपडले तेथून आणून शक्य तितक्या तोफा बरोबर घेण्यांत आल्या. अघाडी, पिछाडी, उजवी फळी आणि डावी फळी अशा प्रकारें सैन्याची रचना करण्यांत आली. आणि खंजीरधारी तुर्कानें ( सूर्यानें ), हिंदूंचा ( कृष्ण वर्णीय, म्हणजे तिमिर ) नाश करण्याकरितां सोनेरी टोप चढवून पदार्पण केलें,

म्हणजे पहाट झाली त्यावेळीं मराठ्यांच्या सैन्यानें कूच केलें. अहमदशहाला ही बातमी लागतांच युद्धासाठीं तो स्वार झाला. दक्षिण्यांनीं बाजार बुणगे लवाजमा यांच्या सुरक्षित रवानगीसाठीं तोफखाना समोर ठेविला. आणि तोफा, बाण, बंदुकी इत्यादींची सरबत्ती करीत त्यांचीं अघाडीचीं पथकें लढूं लागलीं. इस्लामच्या वीरांनीं काफरांचा डाव ओळखला. एका तर्फेनें शुजाउद्दौला व नजीबुद्दौला हे आपल्या सैन्यासहित आणि दुसऱ्या तर्फेनें अहमदशहा आणि तैमूरशहा हे आपल्या किजलबाश आणि अफगाण सैन्यासहित निकरानें तुटून पडले.

(५९६) इस्लामच्या अनुयायांनीं जिहादचा पण केला होता. यांत हत झालो तर आपण शहीद या पदवीस पात्र होऊ या निर्धारानें अल्लाचे नांव घेणारे निकरानें तुटून पडले. त्यामुळे पृथ्वी हादरून गेली. मराठ्यांचें सैन्य इस्लामियांच्या तिप्पट होते. पण विजय म्हणजे परमेश्वराची देणगी होय. तेंच यावेळी प्रत्ययास आलें. मराठ्यांनीं पण शौर्याची शर्थ केली. आणि भारी पराक्रम गाजविला. अहमदशहाचा पराजय होण्याची वेळ आली होती. पण शुजाउद्दौला व नजीबुद्दौला हे मारामारी करीत सैन्याच्या मध्यांत पोहोंचले आणि अनेक सरदार शिपायांना त्यांनीं मारून काढले. या हाणामारींत बाळाजीरावाचा मुलगा विश्वासराव हा हत्तीवर स्वार होता. तो बंदुकीची गोळी लागून मरण पावला. भाऊला ही बातमी कळतांच व्यथित होऊन तो हत्तीवरून खालीं उतरला आणि घोड्यावर स्वार झाला. तो आणि जनकोजी हे खरी स्थिति काय आहे तें पाहाण्याकरितां त्या ठिकाणीं आले. हें पाहून मराठ्यांच्या सैन्यांत गोंधळ निर्माण झाला. आणि त्यांचीं शिस्त मोडली. प्रतिपक्षी त्यांच्यावर वाघासारखे तुटून पडले. मराठ्यांचें उरलेलें सैन्य पळू लागलें. हजारोंचें रक्त जमिनीवर सांडलें.

(५९७) जिकडे तिकडे प्रेताच्या राशी दिसू लागल्या. बाजार बुणग्याचे लोक प्राण वांचवून खंदकांत आश्रयाला आलें. शिपायांनी वाट फुटेल तिकडे रस्ता धरला. आणि सर्वांच्या प्रत्ययास आलें कीं—

कविता—युद्धांत जय नशिबानें मिळत असतो, असंख्य सैन्य अगर खजिना यानें नव्हे. इस्लामचे गाजी हे पाठलाग करू लागले. दक्षिण्यांनीं अंगावरचीं वस्त्रें आणि अलंकार हीं टाकून दिली आणि सैरावैरा पळण्यास सुरवात केली. विश्वासू माणसांच्या सांगण्यावरून कळलें कीं युद्धभूमीपासून बारा कोसापर्यंत चहूंकडे प्रेतेंच प्रेतें दिसत होतीं.

(५९८) सुभानल्ला. मराठ्यांची संख्या, त्यांचा पराक्रम आणि त्यांच्या नशिबाची चढती कमान पाहतां कुणाला कल्पनाहि असणें अशक्यच होतें कीं दैवाच्या एका आघातानें त्यांचा नाश घडून येईल. चढ आहे तेथें पड आहेच. सारांश शूर गाजींनीं कत्तली केल्यानंतर संपत्तीची लूट केली. घोडे आणि उंट यांवर संपत्ती लादलेली अशा

रांगाच्या रांगा त्यांनीं धरल्या. समशेरी, बंदुकी, तर त्यांनीं अपार अशा मिळविल्या. सोनें, मोती, दागदागिने, हीं अगणित त्यांच्या हातीं आलीं. सातशे हत्ती, पंचवीस हजार घोडे, तितकेच बैल आणि उंट तेहि संपत्तीनें लादलेले अहमदशहा, शुजाउद्दौला आणि नजीबुद्दौला यांच्यापाशीं दाखल करण्यांत आले. इतरांनीं लुटून नेलेली संपत्ति वेगळीच. एकंदरींत संपत्ति कांहीं कोटींची भरेल. जवळ जवळ वीस हजार माणसें लहान थोर अशीं कैद झालीं. दक्षिणी लोकांची पद्धत म्हणजे घरीं आणि प्रवासांत ते बायका पोरांना बरोबर बाळगतात. त्यांच्या बायकांना घोड्यावर स्वारी करण्याचा अभ्यास असतो. सुमारे बारा हजार स्त्रिया, हलक्या आणि चांगल्या कुळाच्या (येथें जदुनाथांनीं हलक्या हा शब्द अनुवादांत दिलेला नाहीं.) अशा शत्रूच्या ताब्यांत आल्या. असें म्हणतात कीं (हे शब्द जदुनाथांनीं गाळले आहेत.) सातशे बायका पालखींतून फिरणाऱ्या होत्या.

सारांश अहमदशहानें परमेश्वराचे आभार मानले. शुजाउद्दौल्यानें उत्कृष्ट कामगिरी बजावली होती. अहमदशहानें त्याची प्रशंसा केली. नंतर तो आपल्या छावणीकडे परतला. विश्वासरावाचें प्रेत हत्तीवर होतें. तें हातीं लागलें. अहमदशहाच्या परवानगीनें सुजाउद्दौल्यानें त्याचें दहन करविलें. समशेर बहादुर जखमी होऊन मोठ्या कष्टानें भरतगडला पोहोंचला आणि तेथें मरण पावला.

(५९९) या लढाईला आतांपर्यंत आठ महिने झाले आहेत. अद्यापपर्यंत सदाशिवराव भाऊ आणि जनकोजी शिंदे हे जिवंत आहेत का मेले आहेत याचा छडा लागला नाहीं. दर कांहीं दिवसांनीं खबर उडे कीं ते जोग्याच्या वेषांत अमक्या तमक्या ठिकाणीं आहेत. आणि ही बातमी ऐकून लोक खुश होत. युद्धांतून सुमारें तीन हजार माणसें पळून रातोरात प्रवास करीत दुसऱ्या दिवशीं दिल्लीस पोहोंचलीं. लोकांनीं त्यांना नागविलें. नारोशंकर दिल्लींत होता. त्यानें सगळी हकीकत ऐकून दिल्लींतून आपल्या सहकाऱ्यासहित पळ काढला. आणि आग्रा गांठलें. वाटेंत त्याला दमाजी गायकवाड आणि मल्हारराव होळकर भेटले. आग्र्यास आपला पाठलाग होईल या भीतीनें त्यांनीं चंबळा पार केली. आणि ग्वाल्हेर येथें पळांतील लोकांची व्यवस्था लावण्याकरितां वाट पाहात राहिले. अनेक लोक रस्ते भटकून खेड्यापाड्यांतून शिरले त्यांना खेडुतांनी नागविले. दागदागिन्याच्या लोभानें त्यांनीं अनेकांना मारले. अनेक जण झाडाचा पाला अगर जंगली फळें खाऊन पोटाची भूक शमवीत. त्यापैकीं कांहीं ग्वाल्हेरीस पोहोंचले व कांहीं वाट फुटेल त्या मार्गानें दक्षिणेस रवाना झाले. युद्धांत त्यांना पीडा झाली नाहीं ती या आसपासच्या भटकण्यांत त्यांच्या वांट्याला आली. घोड्यासहित क्वचितच कोणी निसटला असेल. अफगाणांच्या हातीं जे कैद झाले त्यापैकीं बहुसंख्य मारले गेले.

(६००) अनेकांना गुलाम करण्यांत आले. आतां आपण बाटलों, या समजुतीनें त्या गुलामांनीं आपल्या शेंड्या उपटून टाकल्या. शेवटीं शुजाउद्दौल्याच्या शिफारसीनें बायकांना ठेवून घेण्यांत आले आणि माणसांची कत्तल थांबवून त्यांना वाटखर्चाकरितां प्रत्येकी एक रुपया देऊन घालवून देण्यांत आले. मराठे अस्तित्वांत आल्यापासून आजपर्यंत त्यांची इतकी दुर्दशा कधींच झाली नव्हती ही वस्तुस्थिति होय. अतिशयोक्ति नव्हे. त्यांची गनिमी काव्यानें लढण्याची पद्धत असे. शिस्तीनें आणि तोफखाना घेऊन ते लढत नसत—त्यांनीं आपली पद्धत सोडून दिली म्हणून त्यांची जी दुर्दशा झाली, ती कोणी अद्यापपर्यंत पाहिली नसेल.

(६०१) वरील बातमी दक्षिणेंत पसरली. शोक नाहीं असें एक घर राहिलें नाहीं. प्रत्येक जण शोकानें होरपळून गेला. सारं जग म्हणजे शोकागार बनलें.

ग़म् सोख्त दरून यगान यगान रा
मातम कदा शुद जहान जहान रा

# खजानाये आमिरा

[ गुलाम अली आजाद बिलग्रामी याचा जन्म उत्तर प्रदेशांत बिलग्राम येथें इ. स. १७०४ मध्यें झाला. इ. स. १७४० मधें तो औरंगाबाद येथें स्थायिक झाला. तेथेंच इ. स. १७८६ त त्याचा मृत्यु झाला. आपल्या खजानाये आमिरा या ग्रथांत त्यानें अहमदशाहा अबदालीची हकीकत (पान ९७ ते १०९) दिली आहे. ग्रंथाचा लेखनकाल इ. स. १७६३ असल्यामुळें पानीपतच्या युद्धानंतर एकदोन वर्षांत लिहिलेली हकीकत म्हणून या ग्रंथाचें महत्त्व आहे. प्रत्यक्ष युद्धाचें वर्णन थोडें आहे. सदाशिवराव भाऊनें शुजाउद्दौल्याकडे आपला वकील भवानीशंकर पाठविला होता. तो बिलग्रामीचा शिष्य होय. त्याचा आणि बिलग्रामीचा पत्रव्यवहार होता असें ग्रंथावरून वाटतें. युद्धाची हकीकत भवानीशंकरकडून बिलग्रामीला मिळाली असण्याचा संभव आहे.

या नंतरच्या काळांत जे फारसी ग्रंथ लिहिले गेले त्यांतून बिलग्रामीच्या या वरील ग्रंथाचा उपयोग करून घेण्यांत आला आहे असें दिसतें. उदाहरणार्थ अली इब्राहीमचा तारीखे इब्राहीम अलीखान हा ग्रंथ इ. स. १७७६ मधें लिहिला गेला. त्याच्या कांहीं भागाचा अनुवाद इलियट आणि डौसनच्या ग्रंथाच्या आठव्या भागांत देण्यांत आला आहे. त्यांतील बराचसा मजकूर बिलग्रामीच्या ग्रंथांतून जशाचा तसा उतरून घेण्यांत आलेला दिसतो.

बिलग्रामीचा हा ग्रंथ फारसींतून असून तो प्रकाशित झाला आहे. त्यांतील आवश्यक भागाचा अनुवाद खालीं दिला आहे. ]

अहमदशहा अब्दालीनें सहाव्या खेपेस हिंदुस्थानवर स्वारी केली. त्याची दोन कारणें होतीं. मराठ्यांनीं अफगाणांना पंजाबांतून हांकलून लाविलें हें एक. दुसरें कारण म्हणजे हिंदुस्थानांतील ( उत्तर भारत ) राजेरजवाडे मराठ्यांच्या आक्रमणामुळें जेरीस आले होत. दत्ताजी शिंद्यानें नजीबखानाला मेटाकुटीस आणिलें होतें. नजीबखान आणि इतर रोहिल्यांनीं सर्वसाधारणपणें इस्लामकरितां आणि प्रामुख्यानें स्वतःच्या रक्षणाकरितां, आणि राजेरजवाड्यांनीं स्वतःच्या राज्यांचें रक्षण करण्याकरितां अहमदशहा अब्दालीला हिंदुस्थानांत येण्याचें आमंत्रण दिलें. वरील कारणावरून अब्दाली पंजाबांत उतरला. मराठ्यांनीं पंजाबांतून माघार घेतली. त्यावेळीं दत्ताजी आणि शुजाउद्दौल्यांत तहाची बोलणीं चाललीं होतीं. अजून तह पक्का झाला नव्हता तोंच दुराणीच्या येण्याची बातमी पसरली. अहमदशहा सिरहिंदपर्यंत पोहोंचला तो सादुल्लाखान रोहिला, नजीबखान, अहमदखान बंगश, हाफिज रहमतखान, व दूंदेखान हे सरदार अहमदशहाला जाऊन मिळाले. यानंतरच्या लढाईत दत्ताजी मारला गेला. अब्दालीनें पावसाळा आलेला पाहून सिकंद्रा यथ छावणी केली.

दत्ताजीच्या वधाची बातमी दक्षिणेंत पोहोंचल्यावर सदाशिवराव भाऊ जंगी फौज आणि तोफखाना घेऊन निघाला. आग्र्याजवळ मल्हारराव होळकराच्या मार्फतीनें सूरजमल जाट भाऊसाहेबांना येऊन भेटला. भाऊ सूरजमलला एक कोस सामोरा गेला. इमादुल्मुल्क हा पण सूरजमलच्या मार्फतीनें भाऊला येऊन मिळाला. तेथें असें ठरलें कीं यमुनेला पूर आल्यामुळें नदी ओलांडून अब्दालीची गांठ घेणें अशक्य आहे. सबब दिल्ली हस्तगत केल्यास बरें. असें ठरवून सर्वांनीं दिल्लीकडे कूच केलें. मराठ्यांच्या तोफांच्या माऱ्यानें लालकिल्ल्यांतील इमारतींची नासधूस झाली. दिल्लीचा अफगाण सुभेदार याकूब अलीखान हा अब्दालीचा वजीर शहावलीखान याचा भाऊ होता. त्यानें मराठ्यांबरोबर तहाचीं बोलणी लाविलीं आणि किल्ला मराठ्यांच्या हातीं देऊन तो अब्दालीकडे निघून गेला. भाऊनें नारोशंकराला किल्लेदारी दिली.

भाऊचा एक ब्राह्मण मुत्सद्दी माझा ( ग्रंथकर्त्याचा ) शिष्य होता. तो मला उत्तर हिंदुस्थानच्या हकीकती सतत लिहून पाठवीत असे. त्यानें मला लिहिलें कीं "मी भाऊंच्या आज्ञेवरून शिष्टाईनिमित्त शुजाउद्दौल्याकडे गेलो. शुजाउद्दौलानें सांगितलें कीं बऱ्याच काळापासून दक्षिणचे ब्राह्मण आणि मराठे यांनीं उत्तर भारतांत आपला अंमल प्रस्थापित केला आहे. सध्यां जी गडबड आहे ती केवळ त्यांच्या विश्वासघातकी वर्तनांतून उद्भवली आहे. रघुनाथराव, दत्ताजी, होळकर, अंताजी वगैरेंच्या वर्तनानें इकडील लोक जिकिरीला येऊन त्यांनीं अहमदशहा अब्दालीला बोलाविलें आहे. मला पत्र लिहिणारा ब्राह्मण शुजाउद्दौल्याच्या मार्फतीनें अहमदशहाच्या छावणींत अनेक वेळा गेला. तहाची बोलणीं चालू होतीं पण तीं तडीस गेली नाहींत.

वी यशस्वी न होण्याचीं कारणें त्यानें आपल्या पत्रांत दिलीं तीं म्हणजे मराठे सरदारांचा मूर्खपणा ( कजफ़हम ) निर्धाराचा अभाव ( दून हिंमत ), संयमाचा अभाव ( जूद रंज ) हीं होत. त्यांची वागणूक पाहून सूरजमल जाट याला कळून आलें कीं या जमातीचें नशीब धड नाहीं. त्यानें दिल्ली सोडून वल्लभगडाची वाट धरली. भाऊच्या हातांत दक्षिण आणि उत्तर भारत होते. पण त्याचा मनाचा कोतेपणा असा कीं त्यानें दीवानेखासचे चांदीचें छत काढलें आणि तें गाळून त्यांचीं नाणीं पाडलीं. निजामुद्दीनच्या दर्ग्यांतील, आणि महंमदशहा बादशहाच्या समाधीवरील सोन्याचांदीचीं उपकरणी, समया, इत्यादि काढून घेऊन वापरांत आणिलीं. सारांश भाऊनें पाहिलें कीं दिल्लींत रसदेची टंचाई होत आहे. तेव्हां पावसाळ्याच्या शेवटीं दिल्लीच्या बाहेर पडून आसपासचा प्रदेश उध्वस्त करण्याचें ठरविलें. दिल्ली सोडण्याच्या पूर्वीं त्यानें मुहीयुसुन्नतला तक्तावरून काढून शहाआलमचा मुलगा जवानबख्त याला गादीवर बसविलें आणि शुजाउद्दौल्याला त्याच्या गैरहजेरींत वजीर बनविलें. हेतु हा कीं या कारणानें शुजाउद्दौला आणि अहमदशहांत वैमनस्य निर्माण व्हावें. नंतर तो फौज घेऊन शेखूपुऱ्याकडे रवाना झाला. तेथें अब्दुस्समदखान अबदाली, कुतुबखान रोहिला, आणि नजाबतखान राहात होते. ते अहमदशहाला रसद पाठवीत. अब्दुस्समद हा सिरहिंदला फौजदार असतां मराठ्यांच्या हाती सांपडला होता. तेथून सुटून तो शेखूपुरा ( कुंजपुरा ) येथें येऊन राहिला होता. भाऊनें कुंजपुऱ्याला वेढा घातला. तोफांच्या द्वारें किल्ला सर करणें अवघड नसल्यामुळें अल्पावधींत कुंजपुरा मराठ्यांच्या हातीं आला. भाऊनें अब्दुस्समदखान आणि कुतुबखान यांस परलोकीं पाठविलें आणि कुंजपुरा लुटून अक्षरशः धुवून काढला.

अहमदशहाला ही बातमी समजताच त्याचा क्रोधानें भडका उडाला. यमुनेचें पाणी अद्याप ओसरलें नव्हते तरी त्यानें सैन्याला नदीपार होण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें सैन्य नदीपार झाले. कांहीं लोक वाहून गेले. भाऊ कुंजपुऱ्याहून निघून सिरहिंद लुटण्याकरितां निघाला होता. अहमदशहाचें सैन्य निर्भयपणें यमुना उतरलेलें पाहून भाऊचें धैर्य खचलें. सिरहिंद लुटण्याचा विचार त्यानें सोडून दिला आणि मागें वळून दोन टप्प्यांत त्यानें पानीपत गांठलें आणि तेथें छावणी केली. या वेळीं भाऊपाशीं चाळीस हजार अनुभवी आणि कडवे स्वार होते. याशिवाय युरोपियन पद्धतीनें तयार केलेला तोफखाना होता. इतकें असूनहि भाऊनें पाहिलें कीं खुल्या मैदानांत दुराणीबरोबर युद्ध केलें तर जय मिळणें अशक्य आहे. निरुपाय होऊन त्यानें पानीपत गांवाच्या उत्तर दिशेला छावणी केली. आणि तेथें सैन्याभोंवती तोफा चढवून युद्धाच्या तयारींत राहिला. छावणी भोंवती तोफा काय, त्यानें जणू अग्नीचीं भिंत उभी केली. नंतर उभय पक्षाच्या रोज चकमकी होऊ लागल्या. तोफ, रहकला, बाण, बंदूक, आणि समशेर या शस्त्रांच्या मारानें उभय पक्षांतील अनेक लोक मृत्यु-

मुखीं पडूं लागले. दुराणींचा सर्वत्र जय होत होता. त्यांनीं मराठ्यांची रसद चहूंकडून बंद केली. फक्त लाहोरच्या दिशेकडून आलसिंग ( पटियाला ) हा रसद पुरवीत असे. संधि साधून दुराणींनीं तो मार्ग पण बंद केला.

अहमदशहानें पाहिलें कीं अडचणींत असूनहि मराठ्यांची फौज छावणीच्या बाहेर पडत नाहीं. निरुपाय होऊन त्यानें अठावीस रबिलाखर रोजीं त्यांच्यावर हल्ला केला. जहानखान, शहापसंदखान आणि नजीबखान हे अघाडीला होते. त्यांच्या मागें शुजाउद्दौला, अहमदखान बंगष, हाफिजरहमतखान, दूंदेखान आणि फैजुल्लाखान हे होते. त्यांच्या मागें अहमदशहा आणि शहावलीखान हे होते. मराठ्यांची फौज छावणीच्या बाहेर एका बाणाच्या टप्प्यावर येऊन उभी राहिली. सकाळपासून सूर्यास्ताला दोन घटिका राहीपर्यंत लढाई झाली. नजीबखानाचे दहा हजार रोहिले हे मराठयांवर गोळीबार करून त्यांच्या छावणींत घुसले. सदाशिवरावभाऊचा मेहुणा बळवंतराव हा गोळी लागून घोड्याखालीं आला आणि गतप्राण झाला. रोहिल्यांनीं शत्रूचा निकाल त्याच दिवशीं केला असता पण दिवस मावळून अंधार पडला. शत्रू आणि मित्र ओळखूं येईना. नाइलाज होऊन रोहिले मराठ्यांच्या छावणीतून कापाकापी करीत बाहेर पडले.

इटाव्याचा मोकासदार गोविंद पंडित हा दहा हजार स्वार, मुबलक खजिना आणि रसद घेऊन शहादऱ्यापाशीं आला. अंतर्वेदींतील नजीबखानाचा मुलुख उध्वस्त करून कुंजपुऱ्यापाशीं यमुना ओलांडून मराठ्यांना जाऊन मिळावें अशा उद्देशानें तो जलालाबादेपर्यंत पोहोंचला. जलालाबाद हें दिल्लीहून बारा कोसावर आहे. अहमदशहाला ही बातमी कळतांच त्यानें अताईखान दुराणी आणि अब्दुलस्समदखानाचा मुलगा यांस पांच हजार स्वार देऊन गोविंद पंडितावर पाठविलें. अताईखान हा बागपतापाशीं यमुना पार झाला आणि लांब लांब मजला मारीत तो शाहदऱ्यापाशीं पोहोंचला. नारोशंकराचा सरदार तेथें होता तो मारला गेला. तेथून निघून ते गाजीउद्दीन नगराला पोहोंचले. तेथील मराठ्यांना त्यांनीं मारलें. आणि त्याच दिवशीं म्हणजे शवाल महिन्याच्या नऊ तारखेस ते जलालाबाद येथें पोहोंचले. तेथें त्यांनीं गोविंद पंडित आणि त्याचे सहकारी यांना ठार मारले. आणि गोविंद पंडिताचें शीर कापून तें अहमदशहाकडे आणलें. मराठ्यांची बरीच संपत्ति त्यांच्या हातीं लागली.

मराठ्यांच्या छावणींत रसदेची टंचाई झाली. उपासामुळें लोक रोज मरूं लागले. शेवटीं मराठ्यांनीं ठरविलें कीं छावणींत कुजून आणि उपासमारीनें मरण्यापेक्षां बाहेर पडून लढाई द्यावी. आमच्या नशिबांत मग तक्त असो किंवा तख्ता ( फाशीची फळी ), सहा जमादिलाखर बुधवारी त्यानीं सैन्य तयार केलें. तोफखाना समोर ठेवून ते छावणीच्या बाहेर पडले. सावज आपल्या हल्ल्यांत येईपर्यंत शिकारी थांबतो त्याप्रमाणें

इस्लामचे वीर मराठे छावणींतून एक दोन टप्पे पुढें येईपर्यंत थांबले. आणि मग त्यांनीं मराठ्यांच्या सैन्यावर भयंकर हल्ला केला. त्यांनीं शत्रूच्या रांगा उध्वस्त करून टाकल्या आणि असंख्य लोकांना ठार मारलें. विश्वासराव ऐन तारुण्याच्या भरांत होता तो गोळी लागून ठार झाला. मग भाऊ आणि नंतर जनकोजी आणि इतर सरदार मारले गेले. नंतर इब्राहीमखान हा निमरोळ ( यानें आपण परमेश्वर असल्याचा दावा मांडला होता ) पेक्षांहि दुष्ट होता. तो पाडाव झाला. त्याला कांहीं दिवस कैदेंत ठेवून ठार मारण्यांत आलें. अल्लाहो अकबर, रणक्षेत्र म्हणजे मृतांच्या रक्तानें लालफुलांच्या उपवनासारखें दिसू लागलें. बावीस हजार दक्षिणी माणसें इस्लामच्या मर्दांमधें वांटलीं गेलीं. मराठ्यांची अलोट संपत्ति गाजींच्या हातीं लागलीं. त्यांत पन्नास हजार घोडे दोन लाख बैल, कांहीं हजार उंट आणि पांचशे हत्ती होते.

रणांतून जे पळाले त्यांना आसपासच्या खेड्यापाड्यांतील लोकांनीं सर्वस्वीं नागविले आणि कित्येकांना ठार मारलें. शमशेर बहादुर हा वाटेंतच जखमांनीं विकल होऊन मरण पावला. शत्रूंतील उत्तम सरदारांपैकीं दोघे तिघे सोडून कोणी वांचलें नाहीं. निसटलेल्यांपैकीं मल्हारराव होळकर होता. अत्यंत कष्टानें तो माळव्याला परतला आणि तेथून पुण्यास आला. या प्रचंड पराभवानें धक्का बसून बाळाजी युद्धानंतर पांच महिने तेरा दिवसांनीं मरण पावला.

[ गुलाम अली आजाद बिलग्रामीचा हा ग्रंथ इ. स. १७६३ मध्यें म्हणजे युद्धानंतर दोनच वर्षांनीं लिहिला गेला आणि शुजाउद्दौल्याबरोबर बोलणीं करणारा मराठ्यांचा वकील भवानीशंकर याचा ग्रंथकर्त्याशीं त्याच काळांत सतत पत्रव्यवहार चालू होता हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. ]

## नजीबखानाच्या चरित्रांतील ‘ पानीपत ’

[ नजीबखानाचें चरित्र लिहिणारा सय्यद नूरुद्दीन हसन हा दिल्लीचा वजीर गाजीउद्दीन इमादुल्मुल्क याच्या पदरीं होता. कामाच्या निमित्तानें त्याचा नजीबखानाशीं अनेकदा संबंध आला. जाट, इमादुल्मुल्क आणि मल्हारराव होळकर यांनीं दिल्लीला वेढा घालून नजीबखानाशीं झगडा केला त्यावेळीं नजीबखानाशीं तहाची बोलणीं करण्याकरितां नूरुद्दीन हा इमादुल्मुल्क तर्फे नजीबखानाकडे गेला होता (१७६४). पुढें हाच नूरुद्दीन पुण्याचा इंग्रज रेसिडेंट म्यालेट याचा मुन्शी म्हणून काम करीत होता.

नूरुद्दीननें नजीबखानाचें चरित्र इ. स. १७७१ मधें म्हणजे नजीबखानाच्या मृत्यूनंतर अवघ्या एकाच वर्षानें लिहिलें. नजीबखानाशीं त्याचा निकटचा संबंध आला असल्यामुळें या चरित्राला विशेष महत्त्व आलें आहे. चरित्राचा इंग्रजी अनुवाद सर

जदुनाथ सरकार यांनीं केला असून त्यांतील पानीपत संबंधीचा मजकूर खालीं दिला आहे. ]

पावसाळा संपला तो मराठ्यांच्या कुचेच्या बातम्या जोरांत पसरूं लागल्या. नजीबखानानें शुजाउद्दौल्याला लखनौहून बोलावून घेतलें आणि त्याची आणि अहमदशहाची गांठ घालून दिली. सदाशिवराव भाऊच्या नेतृत्वाखालीं मराठ्यांची फौज मथुरेला आल्यावर सूरजमल जाट आणि वजीर इमादुल्मुल्क हे भरतपुराहून येऊन भाऊस भेटले. अहमदशहा तर्फे त्याच्या वजीराचा भाऊ याकूत अलीखान हा दिल्लीला किल्लेदार होता. त्याच्याबरोबर तीनशे शिपाई, तोफखान्याचा अधिकारी आणि जरबवाशी आणि तीनशे हिंदुस्थानी पायदळ होतें. भाऊनें मथुरेहून मल्हारराव होळकर, जनकोजी, बळवंतराव, इमादुल्मुल्क आणि सूरजमल जाट यांना दिल्लीकडे पाठविलें. त्यांनीं येऊन दिल्लीच्या किल्ल्याला वेढा घातला. त्या आधीं त्यांनीं शहर ताब्यांत घेतलें.

तीन दिवसांनीं म्हणजे ११७३ हिज्रीच्या जिल्हज महिन्याच्या अकरा तारखेस भाऊ दिल्लीस येऊन पोहोंचला (२४ जुलै १७६०). किल्ला घेण्यांत दिरंगाई केल्याबद्दल त्यानें सरदारांची कानउघाडणी केली. तेरा दिवसांनीं त्यानें तडजोडीनें किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. किल्ल्यांतील दीवाणेखासचें चांदीचे छत काढून त्यानें त्याचीं चौदा लाखाचीं नाणीं पाडलीं. तेथें दिल्लींत तो कांहीं दिवस थांबला. अहमदशहानेंहि कोइल (अलीगड) हून कूच केलें आणि दिल्लीहून दोन कोसावर यमुनेच्या पलीकडे शहादरा येथें त्यानें मुक्काम केला. दिल्ली मराठ्यांच्या ताब्यांत, याचा त्याला मनस्वी खेद झाला. दोन कोसावरून हें सर्व तो पाहात होता, पण यमुनेला बेफाम पूर आल्यामुळें त्याला नदी ओलांडता येईना. भाऊनें शहराभोंवती बंदोबस्त केला. दुराणी नदी ओलांडूं शकत नाहीं हें पाहून भाऊनें सिरहिंदच्या दिशेनें जाऊन तिकडचा प्रांत आपल्या ताब्यांत आणण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तो दिल्लीहून निघून साठ कोसावर असलेल्या कुंजपुऱ्यास पोहोंचला. कुंजपुऱ्याचा सरदार नजाबतखान यानें लढाईची तयारी केली. अहमदशहाचा सरदार समदखान हा लाखी जंगलांत भटकत होता. तो पांचशे माणसें घेऊन त्याला येऊन मिळाला. त्याचप्रमाणें रोहिला सरदार कुतुबशहा कुंजपुऱ्यास आला. नजाबतखानानें त्या दोघांना किल्ल्यांत येण्यास सांगितलें. पण तें त्यांनीं कबूल केलें नाहीं. तुम्ही किल्ल्यांत तयारीनें रहा. आम्ही बाहेर राहून लढा देतो. आम्हाला पेंच पडल्यास आम्ही किल्ल्यांत येऊं असें त्यांनीं सांगितलें. असें करणें योग्य नव्हे. किल्ल्यांत सगळे एकत्र येऊन आपण दोन महिने किल्ला लढवूं म्हणजे अहमदशहा आपल्या साहाय्यार्थ येईल असें नजाबतखानानें सांगितलें पण संमदखानाला आपल्या शक्तीचा गर्व होता. तो किल्ल्याबाहेरच तळ देऊन राहिला.

भाऊ आपल्या सगळ्या सैन्यासहित कुंजपुऱ्यावर चाल करून आला. त्याचें एक लाख सैन्य होतें. सोबत मोठा तोफखाना होता. इब्राहीमखानाच्या हाताखालीं बारा हजार गार्दी होते. त्यांना आघाडीवर ठेवून भाऊनें किल्ल्यावर हल्ला चढविला. समंदखान आणि इतर सरदारांपाशीं दोन हजाराचें सुद्धां सैन्य नव्हतें. तरी त्यांनीं पुढें होऊन युद्धाला सुरवात केली. इब्राहीमखानानें तोफांचा मारा सुरू केला. रोहिले सरदारांनीं मराठ्यांविरुद्ध घोड्यांवरून चाल केली. पण तोफांच्या मारामुळें त्यांना मराठ्यांपर्यंत पोहोंचतां येईना. सगळ्या सैन्यासहित भाऊनें हल्ला केला. समंदखान मारला गेला. त्याचें सैन्य किल्ल्याच्या वेशीकडे पळत सुटलें. वेशीपाशीं ते आले तो नजाबतखानानें किल्ल्याचे दरवाजे बंद केले. मग समंदखान आणि कुतुबशहाच्या माणसांनीं नजाबतखानाला म्हटलें, “ तुम्ही अहमदशहाच्या माणसांना आंत येऊं देत नाहीं. खात्रीनें तुम्ही मराठ्यांशीं मिळाला आहात. पण हरकत नाहीं. अहमदशहा जिवंत आहे. उद्यां तो तुमच्या कृत्याचा जाब मागितल्याशिवाय राहाणार नाहीं ” असें बोलून आणि गोंधळ करून त्यांनीं वेशीचे दरवाजे उघडण्यास लाविले. तोपर्यंत मराठे तेथें पोहोंचले होते. त्यांनी दरवाजांतून तडक किल्ल्यांत प्रवेश केला. त्यांनीं किल्ला पूर्णपणें लुटला आणि नजाबतखान आणि त्याच्या दोन्हीं मुलांना हालहाल करून ठार मारलें. कुतुबशहा पाडाव झाला होता. त्याचा, दोन दिवसांनीं शिरच्छेद करण्यांत आला. नजाबतखानाचा एक मुलगा दिलेरखान हा जिवंत राहिला. मराठ्यांनीं किल्ला खणून काढला. तेथें त्यांना पुष्कळ संपत्ति सांपडली. उंट, घोडे, धान्य, आणि तोफा इत्यादि सामग्री त्यांनीं हस्तगत केली. मराठ्यांनीं किल्ल्यांतील लोकांना फार छळलें आणि मोठा विजयोत्सव केला.

अहमदशहाला ही बातमी कळली. त्याला अतिशय क्रोध आला. अफगाण सरदारांना बोलावून त्यानें म्हटलें “ अफगाणांची अशी दुर्दशा, आणि तीहि मी जीवंत असतांना व्हावी हें मी कधीहि सहन करणार नाहीं. नदीचा उतार कोठें सांपडतो का पहा म्हणजे आपल्याला चटकन नदी ओलांडता येईल. त्याप्रमाणें लोकांनीं उतार शोधले पण ते कुठेंच सांपडले नाहींत. अहमदशहा आपलें सैन्य घेऊन नदीच्या कांठाकांठानें कूच करीत बागपत येथें आला. बागपत हें दिल्लीपासून चवदा कोसावर आहे. भाऊला ही बातमी कळली पण नदीला पूर असल्यामुळें त्याला त्याची काळजी वाटली नाहीं. तरी सिरहिंदच्या रोखानें पुढें जाण्याचा त्यानें आपला बेत टाकून दिला. दिल्लीपासून वीस कोसावर सोनपत येथें शत्रू नदीपार होण्याची शक्यता आहे हें ओळखून भाऊनें तेथें रात्रंदिवस पहारा देण्याकरितां एक हजार स्वार ठेवून दिले. अहमदशहानें चार पांच दिवस वाट पाहिली. नंतर एके दिवशीं तो सैन्यासहित नदीकिनाऱ्यापर्यंत आला. त्यानें रोहिले सरदार आणि शुजाउद्दौला यांना बोलावून म्हटलें, “ तुम्ही हिंदुस्थानाचे सरदार आहात तुम्हाला नदीवर उतार सांपडून नये हें

आश्चर्य आहे. आतां मी उतार शोधून काढतो पहा. " मग ते सगळे म्हणू लागले, " आम्ही स्वार्थप्रेरित आहोत. पण आमचे रक्षण करण्याच्या निस्स्वार्थ बुद्धीनें आपण आला आहात. आम्हाला कांहीं सुचत नाहीं. " अहमदशहानें म्हटलें, " आतां ही गोष्ट मानवी उपायाच्या बाहेर गेली आहे. आतां परमेश्वरावर भार टाका आणि येथूनच नदींत घोडे घाला. " आणि अहमदशहानें फातिहा ( प्रार्थना ) पढून आपला घोडा नदीच्या कांठावर आणला. त्याचवेळी जारचीनें ( घोषण करणारा ) ओरडून सांगितलें कीं सैन्यानें नदींत घुसावें. त्याप्रमाणें सैन्य सुरक्षितपणें नदीपार झालें. कांहीं ठिकाणी घोड्यांना पोहावें लागलें तर कांहीं ठिकाणीं त्यांचे पाय नदीच्या तळाला लागले. नदीच्या दुसऱ्या कांठाला सैन्य लागलें तेथें इतका चिखल होता कीं माणसें काय जनावरें काय कुणालाच पुढें सरकता येईना. मग अहमदशहानें ठरविलें कीं झाडाच्या फांद्या आणून चिखलावर पसराव्या. कांठावर झाऊ नांवाच्या झाडांचें जंगल होतें. या झाडांना पानें नव्हतीं आणि त्याच्या फांद्याहि लहान लहान होत्या. मुख्य वजीर घोड्यावरून उतरला आणि त्यानें स्वतः झाडाची फांदी तोडली. अहमदशहाच्या जमातींतील आठ हजार माणसांपैकीं प्रत्येकानें फांद्या तोडून चिखलांत पसरविल्या. नंतर सर्व सैन्यानें याच प्रकारें दोन गज उंचीचा रस्ता एका घटकेंत तयार केला. या रस्त्यावरून सारें सैन्य पार करून गेलें. तोफा हत्तींच्या कमरेला बांधून नदीपार करण्यांत आल्या. सैन्यांतील फक्त दहा पंधरा माणसें पाण्यांत जाया झालीं.

नदीपार झाल्यावर कांठावरील मराठ्यांचें टेहेळणी पथक कोठें आहे असें अहमदशहानें नजीबखानास विचारलें. त्याजकडून कळलें कीं मराठे तेथून सहा कोसावर आहेत. अहमदशहानें शहापसंदखानाला आज्ञा केली कीं त्यानें मराठ्यांवर तुटून पडावे आणि त्यांपैकीं एकालाही पळून जाऊं देऊं नये. शहापसंदखानानें आपल्याबरोबर चार हजार माणसें घेतलीं. वाट दाखविण्यास नजीबखानाचीं माणसें बरोबर होतीं. दोन घटकांत तो मराठी पथकापाशीं पोहोंचला. त्यांनीं लढण्याची तयारी केली. पण अफगाणांचें सैन्य चाल करून येत आहे हें पाहून त्यांची हिंमत खचली. आणि ते मुख्य छावणीकडे वळले. शहापसंदखानानें जवळ येऊन त्यांच्यावर बंदुकींचा मारा केला. थोडा वेळ गोळीबार केल्यानंतर त्यानें चहूबाजूनें त्यांच्यावर तलवार चालविली, आणि सर्वांची कत्तल केली. त्यांचीं डोकीं कापून सहा घटकांच्या अवधींत तो अहमद-शहाच्या छावणींत परत आला.

दुसऱ्या दिवशीं अफगाणांनीं कूच केलें. आणि तिसऱ्या दिवशीं ते पानीपतला पोहोंचले. भाऊनें पण कूच करून पानीपत गांठले आणि गांवानजीक त्यानें आपला तळ ठोकला. अहमदशहाचा तळ पानीपत गांवापासून तीन कोसावर होता. दोन्हीं दळांत चकमकी उडूं लागल्या. दिल्लीचा किल्लेदार नारोशंकर याच्या प्रयत्नानें भाऊच्या सैन्याला रसदेचा पुरवठा होत होता. पुण्याहून दिल्लीपर्यंत युद्धाचें सामान दारू गोळा,

स्वार पायदळ, इत्यादि रोज येऊन दाखल होत होतें. अहमदशहा रोज सकाळीं आपला मुलगा तैमूर याला घेऊन घोड्यावरून फिरत असे. त्याचीं पथकें सुसज्ज होऊन त्याच्या तंबूबाहेर उभीं असत. आज्ञेवाचून छावणीच्या बाहेर कोणीहि पडायचें नाहीं अशी सक्त ताकीद शुजाउद्दौला आणि अफगाण सरदार यांना देण्यांत आली होती. अहमदशहाच्या रोजच्या टेहेळणींत अगदीं थोडे स्वार असत. तो शिरपेच वगैरे सारखा उंची पोशाख घालीत नसे. डोक्याला काळी टोपी, अंगांत तांबडा अंगरखा, जवळ धनुष्य आणि बाणाचा भाता असा त्याचा थाट असे. तैमूरशहाचा पोशाखहि असाच असावयाचा. अहमदशहाच्या आज्ञेनें त्याचे सरदार त्याला चकमकीची रोज यावेळीं माहिती पुरवीत. मराठयांची पथकें हल्ला करण्यास पुढें झालीं कीं अहमदशहा त्यांचा प्रतिकार करण्याकरितां आपल्या कोणत्याहि पथकाला हुकुम सोडी. त्याच्या स्पष्ट आज्ञेशिवाय हल्ला करण्यास कोणी धजत नसे. अहमदशहाला लांबून धुरळा उडतांना दिसला आणि धुरळा नजीक येत आहे असें वाटलें कीं तो म्हणे कीं आपल्या पथकांचा पराजय झाला आहे. आणि मग मदतीकरितां तो सैन्याच्या तुकड्या रवाना करी. धुरळा लांब जातांना दिसला कीं शत्रू पराजित झाला हें ओळखून त्यांच्या पाठलागाकरितां तो आपली दोन तीन घोडदळें पाठवी. त्यांनीं कुठवर पाठलाग करावा हेंहि तो ठरवीत असे. घोडदळांना तितक्या अंतरावर जाणें अशक्य आहे असें वाटलें कीं ते लोक बाणाच्या एका टप्प्यावर थांबत. मग तो पुढें जाऊन आणि चकमक चाललेली पाहून योग्य तो निर्णय घेई. कधीं कधीं हिंदुस्थानी सरदारांना तो योग्य ते हुकुम करी. हरकाऱ्यांच्या ऐवजी चकमक लढणारे शिपाईच सतत आणि एका पाठोपाठ एक त्याला बातम्या पुरवीत. बातम्यांचा मजकूर खालील प्रमाणें असे. “ ते आतां बंदुकी झाडीत आहेत; किंवा, आतां तलवारीची खणाखणी सुरू झाली आहे, किंवा इतकीं माणसें ठार झालीं, इतकीं जखमी झालीं आहेत, अमक्या अमक्या रंगाचा झेंडा, किंवा हौदा आणि अंबारी असलेला अमका अमका हत्ती समोर आहे. ” असे मजकूर त्याला सांगण्यांत येत.

अशा कार्यक्रमांत तो दोन प्रहर घालवी. त्यावेळीं मैदानांत त्याच्याकरितां एक लहानशी राहुटी आणि आडोशाची कमान उभी करण्यांत येत असे.

अहमदशहाचा वजीर शहावलीखान अशरफुल वुज़रा याचा हिंदुस्थानच्या लोकांशीं चांगलाच स्नेह होता. मीरबख्शी जहानखान, जब्तबेगी अब्दुल्लाखान, दिवाण बेगी फतुल्लाखान, सादूजाई हे त्याचे सरदार होते. बाज़ चंगखान बंगष, आणि बरखुर्दारखान अबचाकज़ाई ( हा रसद आणण्याच्या कामावर होता ) महंमदखान खोजा हा गुलार आगाशी म्हणजे अहमदशहाच्या खाजगी कडील अधिकारी होता. सय्यद रहमतखान हा तोफखान्याचा अधिकारी होता. मीर अताईखान आणि जारजी करीमदादखान हे अहमदशहाचे प्रमुख सरदार होते. नसकचीबाशी कुरूक

अगाशी मारुफखान, बाजूखान अर्जबेगी आणि हिंदुस्थानचे इतर सरदार हे अहमदशहाच्या भोवती हजर असत. अहमदशहा घोड्यावर असे तेव्हां ते त्याच्या भोवती उभे असत. तो आपल्या तंबूत बसला तरी ते त्याच्याशी उभे राहून बोलत. पण सकाळच्या प्रहरीं जेव्हां दरबार नसे त्यावेळीं हाफिज रहमत खानास पुष्कळदा बसण्याची परवानी असें कारण तो हाफिज होता. म्हणजे त्याला कुराण तोंडपाठ येत असे.

भाऊच्या सैन्यांत दुआब आणि दिल्ली येथून रसदेचा पुरवठा होत असे. नजीब खानानें अहमदशहास म्हटलें, "अंतर्वेदींत माझीं ठाणीं आहेत पण दिल्लीच्या भोंवती दहाबारा कोसपर्यंत माझा अंमल नाहीं. तुम्ही सैन्याची एक तुकडी मला द्याल तर ती मी माझ्या अधिकाऱ्याबरोबर पाठवीन म्हणजे शहादऱ्याच्या बाजूनें शत्रूला रसदेचा पुरवठा होतो तो बंद करता येईल." अहमदशहानें जरची करीमदादखान याच्या दळापैकीं एक हजार माणसें या कामाकरितां नेमलीं. सिकंद्रा आणि आसपासच्या परगण्याचे आमिल त्या पथकाबरोबर होते. त्यांनीं शहादऱ्यापर्यंत सर्व प्रदेश उध्वस्त केला. आणि माणसें सांपडतील तशीं मारलीं. दिल्लीहून नारोशंकरानें जिवाजी बख्शी आणि मीरखान नत्थूच्या नेतृत्वाखालीं कांहीं सैन्य पाठविलें. पण त्यांच्या हातून कांहीं होऊं शकलें नाहीं. त्यांचीं माणसें मारलीं गेलीं आणि त्यांना दिल्लीला परत जावें लागलें. त्या वेळेपासून शत्रूचा रसदेचा तो मार्ग बंद झाला. या नंतर अहमदशहानें जरची करीमदादखान आणि मीर अताईखान यांस म्हटलें "गेल्या दोन वर्षांपासून माझ्या सैन्याला सारखी दगदग होत आहे. तुम्ही नुक्तेच कंधारहून आला आहात. शत्रुसैन्याचा पुरवठा बंद करण्याचें काम तुम्ही झटून केलें पाहिजे." मग ते दोघे सरदार आणि मूसीखान बलोची हे मराठ्यांच्या रसदेच्या तुकडीवर दोन वेळेस तुटून पडले आणि सर्वांची कत्तल करून त्यांनीं तोहि मार्ग बंद करून टाकिला.

भाऊ वंजाऱ्यांना चांगले वेतन देत असे. ते रात्रीच्या वेळी अपरिचित आणि अवघड मार्गांनीं मराठयांच्या छावणींत धान्य नेऊन पोहोंचवीत. पण दिवसां तसें करणें कठीण होतें. भाऊच्या छावणींत आतां पैशाची टंचाई भासूं लागली. भाऊनें नारोशंकराला काळजीपूर्वक खजिना पाठविण्याची आज्ञा केली. नारोशंकरानें पांचशे शिपायांच्या बरोबर प्रत्येकीं पांचशे अश्रफ्या दिल्या. त्यांनीं त्या कंबरेला बांधल्या. भाऊच्या छावणींत जाण्यास ते निघाले. सकाळच्या प्रहरीं करीमदादखान आणि अताईखान यांनीं त्यांना गांठून त्यांच्यावर हल्ला केला आणि सर्वांची कत्तल केली. दोन तीनच माणसें काय तीं निसटून शहरांत परत आलीं. सगळा खजिना लुटला गेला. मारलेल्यांचीं डोकीं आणि पाडाव झालेले घोडे अहमदशहाला दाखविण्यांत आले. यानंतर भाऊच्या सैन्यानें धास्ती घेतली.

अशा रीतीनें उभय पक्षाच्या चकमकींत एक महिना गेला. एके दिवशीं नजीबखानाचा भाऊ सुल्तानखान याच्या हाताखालीं रोहिल्यांचें पायदळ लढत होतें. तेव्हां सुल्तानखानानें आपल्या शिपायांना म्हटलें कीं “ आपण आज नेट धरला तर मराठयांना आज आपण हांकलून देऊं. ” रोहिले कबूल झाले. मराठयांची पद्धत अशी असे कीं ते रोज तोफा मैदानांत आणीत आणि सूर्यास्ताला चार घटका राहिल्या कीं परत छावणींत नेत. त्या दिवशीं तोफा परत चालल्या असतां रोहिल्यांनीं हल्ला केला. मराठे छावणीकडे पळूं लागले आणि रोहिल्यांनीं त्यांचा पाठलाग करीत मराठयांची छावणी गांठली. मग छावणींतून सगळे सैन्य तयार होऊन बाहेर पडले. सूर्यास्ताला अल्पावधि राहिला होता. आणि मग एकच धूमश्चक्री उडाली. झाडून सारे मराठे सैन्य उठलें होतें. आणि रोहिले फक्त दोनहजार स्वार आणि तीनहजार पायदळ होते. रोहिल्यांचे घोडेस्वार गोंधळून पळून गेले. पण पायदळ शिपायांनीं आपले झेंडे हातांत धरून मराठ्यांच्या गोटांत शिरण्याचा प्रयत्न केला. रोहिल्यांनीं गोळ्यांचा वर्षाव केला त्यामुळें मराठ्यांच्या घोडदळाला त्यांच्यावर हल्ला करणें जमेना. त्याच सुमारास इब्राहीमखान गार्दी आणि बळवंतराव हे आपल्या पायदळासहित त्याठिकाणीं आले. रोहिल्यांनीं प्रयत्नाची पराकाष्ठा केली. त्यांतच बळवंतरावाला पोटांत दोन गोळ्या लागून तो खालीं पडला. इब्राहीमखान गार्दी आणि त्याचा तोफखाना यांनीं मोठी कामगिरी केली. त्यादिवशीं दीडहजार रोहिले मारले गेले. उरलेले लढत लढत परतले. अंधार पडला त्यावेळीं ते छावणींत परत आले. रोहिल्यांच्या पायदळांची इतकी कत्तल झालेली पाहून नजीबखानाला अति दुःख झालें.

या सुमारास मराठ्यांनीं तह घडून यावा म्हणून विनंति केली. वजीर शहावलीखान हा तहाला अनुकूल झाला. या वाटाघाटी हाफिज रहमतखानाच्या मार्फतीनें होऊं लागल्या. नजीबखान हा मूळचा गरीब पण आतां हाफिज रहमतखान व इतर अमीरापेक्षां त्याचें महत्त्व वाढलें होतें. त्याच्या प्रयत्नानें शुजाउद्दौला हा अहमदशहाच्या पक्षांत आल्यामुळें तर नजीबखानाचें महत्त्व भारीच वाढलें होतें. हाफिजनें सुचविलें कीं इमादुल्मुल्काला वजीर करावें आणि मराठयांशीं तह करावा. शहावलीखानानें अहमदशहापुढें ही सूचना मांडली. अहमदशहा कबूल झाला. ही गोष्ट नजीबखानाला कळली. तो दुसऱ्या दिवशीं दरबारांत आला आणि त्यानें शहावलीखानाला त्याच्या तोंडावर म्हटलें “ काल माझीं चार हजार माणसें ठार झालीं. आणि आतां कुणी कमहिमतीचा माणूस मराठयांशी तह करूं इच्छितो व अफगाणांना त्यांच्या तावडींत द्यावे म्हणतो असें मीं ऐकिलें आहे. हा माणूस भित्रा आहे आणि जातीचा अफगाण नाहीं. मी अहमदशहाला स्पष्टपणें सांगतों कीं तो इस्लामचा सम्राट् आहे. हा अफगाणांच्या इज्जतीचा प्रश्न आहे. अहमदशहानें अफगाणांना मराठयांच्या तावडींत लोटूं नये.” नजीबखानानें तडजोड घडवून आणूं पाहणाऱ्यांच्याबद्दल इतरहि कटु शब्द उच्चारले.

शहावलीखान चिडला आणि पुश्तूभाषेंत म्हणाला (गुमखोर) "मूर्खासारखे बोलूं नकोस." इतकें म्हणून तो निघून गेला. नजीबखानानें सरदार जहानखान आणि काजी इद्रीस यांचें मन वळविलें. अहमदशहापाशीं त्यांचें वजन होतें. नजीबखानानें त्यांना लढ्याची धार्मिक बाजू सांगून अहमदशहाकडे पाठविलें. मग जहानखानानें अहमदशहाला म्हटलें "काफरांच्या बरोबर तह करणें राजधर्माविरुद्ध आहे. आमची शक्ति शाबूत आहे. आमचा कांहीं पराजय झाला नाहीं. हे मराठे, यांनीं लाहोरांत आमच्या माणसाचा काय काय छळ केला नाहीं. त्यांनीं सिरहिंद येथे समदखानाचा नाश केला, दिल्लींत नजीबखानाचे त्यांनीं काय कमी हाल केले. अलीकडेच त्यांनीं कुंजपुऱ्यास अफगाणांची काय बेइज्जत केली नाहीं. इमादुल्मुल्कानेंच आलमगीरसानीचा खून करविला हा सगळा प्रळय त्याच्या मुळेंच घडून आला आहे." अहमदशहानें म्हटलें "मला हें सारें माहीत आहे. मला स्वतःला इमादुल्मुल्क आवडत नाहीं. पण माझें सैन्य पोसायला माझ्यापाशी पैसा नाहीं. मराठ्यांच्या ताब्यांतून काढलेला मुलुख मी अफगाणांना दिला आहे. ते सुस्थितींत आहेत. पण माझें सैन्य अन्नावाचून मरत आहे. मी या रोहिल्यांकडून जबरदस्तीनें पैसे उकळले तर माझा दुर्लौकिक होतो. या रोहिल्यांच्या डोक्यांत इतकी साधी गोष्ट येत नाहीं. केवळ त्यांच्याबद्दलच्या ममत्वामुळें मी दोन वर्षें मोहिमेचा त्रास सहन करीत आहे. मराठ्यांचा पराजय करण्यावरच माझें राजेपण थोडेच अवलंबून आहे. मी केवळ धर्मयुद्धाला म्हणून प्रवृत्त झालों आहे."

यावर काजी इद्रीस म्हणाला "या शब्दांनाच आपण चिकटून राहावें. कोणत्याहि लोभाची पर्वा करूं नका; कारण त्यामुळें जिहादचें पुण्य नाहीसें होतें. देवानें तुम्हाला राज्य दिलें आहे तें कांहीं रोहिल्यांच्या मदतीवर अवलंबून नाहीं. रोहिल्यांचा छळ झाला म्हणून ते तुमच्याकडे धांवले. आणि आतां अंगांत शक्ति असूनहि तुम्ही त्यांची दाद घेतली नाहीं तर परमेश्वरासमोर तुम्हाला जाब द्यावा लागेल. हें जग नश्वर आहे. हां हां म्हणता नादिरशहाची काय गत झाली हें तुम्ही पाहिलेंच आहे. शत्रूला भिऊं नका, पैसा नाहीं म्हणून कचरूं नका. फक्त परमेश्वराचा धाक मनांत ठेवा." हें बोलणें चालू असतां दुराणी सरदार हजर होते ते म्हणूं लागले— "हा काजी योग्य तेंच म्हणत आहे. या धर्मयुद्धांत आम्ही आपल्या आज्ञेचें पूर्ण पालन करूं. मग कोणताहि प्रसंग आला तरी बेहेतर. आम्ही भरल्या पोटीं असलो किंवा उपाशी असलो तरी प्रयत्नांत कोणत्याहि प्रकारें कसूर करणार नाहीं" मग अहमदशहानें म्हटलें "आतां तहाच्या गोष्टी बंद, लढाईचा फातिहा (प्रार्थना) पढा" मराठ्यांच्या वकीलांना निरोप देण्यांत आला.

नंतर बातमी आली कीं काल्पी, शिकोहाबाद, इत्यादि परगण्याचा आमिल गोविंद पंडित उर्फ गोविंद बुंदेले हा दहा हजार सैन्य घेऊन भाऊला येऊन

मिळण्याकरितां दुआबांतून येत आहे. त्यानें नजीबखानाचे परगणे उध्वस्त करण्याचा सपाटा चालविला आहे. त्याला भाऊच्या छावणींत येऊं देऊं नये म्हणून अहमदशहानें जरची करीमदादखान आणि मीर अताईखान यांना आज्ञा केली. त्या दोघांनीं नजीबखानाचा एक सरदार करीमखान याला बरोबर घेतले आणि रातोरात नदीपार करून आणि मीरठ आणि सिकंद्यामधील पन्नास कोसाची मजल मारून भल्या पहाटे गोविंद पंतावर चाल केली. त्याचें सैन्य गाफील होतें. त्यांनीं गोविंद पंताचें डोकें कापलें. गोविंद पंतांचा मुलगा बाळाजी मोठ्या कष्टानें निसटला. त्याच्या दहाहजार सैन्याची पूर्ण वाताहत झालीं. चवथ्या दिवशीं गोविंदपंताचें डोकें अहमदशहाच्या छावणीच्या बाजारांत, त्याच्या बैठकीच्या सज्जा ( मंजिल नुमा ) खालीं फेंकून देण्यांत आलें.

त्यानंतर मराठ्यांच्या छावणींत प्रत्येक गोष्टीचें दुर्भिक्ष झालें. त्यांनीं आपल्या छावणी भोवतीं मोर्चे उभे केले आणि दक्षिणी भाल्या एवढे खोल खंदक खणले. रोज चकमकीकरितां ते बाहेर पडत आणि संध्याकाळीं परत जात. असें दोन महिने चालू होतें. अन्नावाचून ते दुबळे झाले. आणि चकमकींत त्यांचा एकदांहि प्रभाव पडला नाहीं. ते अगदी हतबल झाले.

**१४ जानेवारी**:—एक दिवस मराठ्यांचें सगळें सैन्य, इब्राहीमखानाचा तोफखाना, होळकर, शिंदे इत्यादि छावणीच्या बाहेर निघालें आणि त्यांनीं युद्धाला सुरवात केली. अहमदशहानें आपल्या पद्धतीनें आपल्या सर्व पथकांना युद्धांत पडण्याचा हुकुम केला. मराठ्यांनीं आपली प्रबळ शक्ति प्रगट केली. आणि एका पाठोपाठ एक असे अब्दालीच्या सैन्यावर सारखे हल्ले करूं लागले. अहमदशहाला याच्या सारख्या बातम्या मिळत होत्या. तो स्वतः पुढें झाला. त्यानें पाहिले मराठ्यांचें सगळें सैन्य तोफखान्यासहित पुढें सरकत आहे. भाऊनें इब्राहीमखानाला शुजाउद्दौला, हाफिजरहमत, दुंदीखान इत्यादींच्या विरुद्ध पाठविलें. मल्हारराव होळकर हा नजीबखानाच्या विरुद्ध उभा होता. भाऊ स्वतः आपलें हुजरातीचें पथक घेऊन अहमदशहाच्या हाताखालीं असलेल्या पथकावर घसरला. त्याच्या समोर मोठ्या तोफा होत्या. सकाळपासून तीन तासांपर्यंत अग्निगोल आणि तोफा यांचा भडिमार चालू होता. नंतर बर्कंदाजानीं बंदुकी आणि भाले उपयोगांत आणले. मराठ्यांनीं समोरील पथकांना मागें रेटले त्यावेळीं अहमदशहानें जरची करीमदादखान आणि मीर अताईखान यांना त्यांच्या मदतीस पाठविलें. त्या सरदारांनीं चांगली लढाई केली. अहमदखान बंगश आणि दुंदीखान यांच्यावर इब्राहीमखान गार्दी आणि इतर सरदार यांनीं हल्ला केला. दुंदीखानाची अनेक माणसें ठार झालीं. त्याचे कित्येक शिपाई पळून गेले. त्याचा हत्ती पन्नास पावलें मागें हटला.

बंगशानेंहि निकराचा सामना दिला. त्याची पण कठीण अवस्था झाली. शुजाउद्दौला आणि नजीबखान यांच्यावर त्या दिवशीं कोणताच आघात झाला नाहीं.

दुपारच्या वेळीं भाऊनें घोड्यावर स्वार होऊन आणि विश्वासरावानें हत्तीवरून हल्ला केला. आणि सैन्यें भिडवून बंदुकी, भाले आणि तलवारी चालविल्या. मीर अताईखान मारला गेला. आपलें सैन्य पेंचांत आहे, हें अहमदशहाला दिसून आलें त्यानें आपल्या बाशीगुल पथकांना बोलाविलें. त्यांत सहा हजार स्वार शिपाई होते. आणि म्हणाला "पोरांनो, हीच वेळ आहे. शत्रूला चहूकडून कोंडून धरा." त्याप्रमाणें त्या तीनहि पथकांनीं भाऊच्या आघाडीवर एकदमच गोळ्यांचा वर्षाव केला. भाऊच्या अघाडीचे पाय उखडले आणि ते मागें हटून भाऊच्या मुख्य पथकांत मिसळले. त्यावेळी हलकल्लोळ झाला. लोक पळू लागले. भाऊच्या हुजरातीनें थोडा दम धरला आणि कांहीं ठिकाणी आपली जागा सोडली नाहीं. अहमदशहाच्या वरील बाशीगुल पथकापैकीं एका दस्त्यांत दोनहजार माणसें असत. एक दस्ता उजवीकडून येई आणि गोळ्यांचा वर्षाव करून डावीकडे जाई. दुसरा दस्ता डावीकडून येई आणि गोळ्या झाडून उजवीकडे जाई. तिसरा दस्ता समोरून गोळ्या झाडीत येई आणि पिछाडीकडे निघून जाई. शत्रू सावरण्यापूर्वी हे दस्ते पुन्हां पुन्हां येत आणि गोळ्यांचा सारखा वर्षाव करीत. चहकडून मराठ्यांवर हल्ला होतो असें दिसून येऊं लागलें. अशाप्रकारें लढाई चालू होती. मराठे मैदानभर पसरले होते ते झाडून एका ठिकाणीं गोळा झाले. वरील तीन दस्त्यांनीं त्यांच्या एक लाख सैन्याभोंवती सतत घिरट्या घालण्याचा क्रम चालू ठेविला.

मराठ्यांचे पाय उखडले आहेत आणि कांहींजण पळ काढीत आहेत हें पाहून बादशहानें वजीराच्या दळाला बाशीगुलच्या दस्त्यांना मदत करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यांनीं हल्ला चढविला. या सुमारास विश्वासरावाला गोळी लागली आणि मराठ्यांचा पराजय होणार असा रंग दिसूं लागला. भाऊ जवळ आला तो पाहतो काय कीं विश्वासरावाचें प्रेत हत्तीवर असून त्याचे दोन्हीं पाय हत्तीच्या डोक्याच्या दोन्ही बाजूस लटकत आहेत. भाऊला अपार दुःख झालें, आणि मरणाचा निर्धार करून त्यानें आपल्या जुन्या सरदारांना घेऊन घोडा पुढें घातला. अहमदशहानें पाहिले कीं मराठे मोठ्यानें घोष करीत वजीराच्या दळावर चाल करून येत आहेत. त्यानें आपल्या जंबूरकबाशीला आपले जंबूरकांचे उंट पुढें घालण्याची आज्ञा केली. एकाच वेळेस दीड हजार जंबूरकाचे बार झाले. या गोळीबारानें भाऊच्या बरोबर असलेले मातबर सरदार खालीं आले. आणि इतरांनीं पाठ फिरविली. वजीराचें दळ आणि बाशीगुलच्या पथकांनीं त्यांच्यावर चहूकडून हल्ले करण्यास सुरवात केली. भाऊनें दुसऱ्यांदा हल्ला केला. पण त्याचें कांहीं चालेना. फिरून एकदां त्याचीं अनेक माणसें मृत्युमुखीं पडलीं. आणि त्याला परत फिरावें लागलें. या दोन्ही वेळेस जंबूरची

आशीच्या हल्ल्यासमोर मराठे मागें हटले. अहमदशहा स्वतः जंबूरचीआशीच्या पथकापाशीं उभा होता. सूर्यास्ताला अजून तीन तास अवकाश होता. त्यावेळीं शत्रूनें टोळ्याटोळ्यांनी रणांगणांतून पळ काढण्यास सुरवात केली. शत्रूचें बळ नाहींसें झालें हें अहमदशहाला दिसून आलें. भाऊचे हत्ती, जरी पटका, आणि चार पांच हजार माणसें एका ठिकाणी राहिलीं. आपला जीव वांचविण्याकरितां तीं इकडून तिकडे फिरत होतीं. या वेळेस अहमदशहानें आपलें अब्दाली जातीचें आठ हजाराचें सैन्य मराठ्यावर घातलें.

या सुमारास भाऊ मारला गेला. इतर सरदारांची डोकीं कापण्यांत आलीं त्यांत भाऊचेंहि डोकें कांपण्यांत आलें. मग अफगाण, मोगल, रोहिले आणि शुजाचें सैन्य शत्रूवर तुटून पडलें आणि लुटालुटीला सुरवात झाली. अफगाणांच्या हातांत अगणित संपत्ति पडली. सूर्यास्तापर्यंत पाठलाग चालू होता. मराठ्यांच्या छावणींतील सगळी लूट अब्दालीच्या जातीच्या खानांच्या पथकानें घेतली. त्यांनीं शक्य तोंवर इराणी किंवा तुराणी यांना लूट घेऊं दिली नाहीं. पण त्यांनीं हिंदुस्थानी शिपायांना लुटीचा माल विकला. सुंदर ब्राह्मण बायका एक तुमान म्हणजे चार रुपायाला एक आणि उत्तम घोडे दोन तुमान म्हणजे आठ रुपायाला एक या भावानें विकल्या गेल्या. सूर्यास्तापर्यंत अफगाणांना जो कोणी सांपडला त्याचें डोकें उडविण्यांत आलें. छावणींतील खंदकांत शेकडो मराठे स्वार आणि घोडे मरून पडले होंते. त्यांची संख्या इतकी होती कीं पुढें कांहीं वर्षेपर्यंत शेतकऱ्यांना शेते नांगरणें मुष्किल झालें. नांगरतांना कुठें हाडाचे सांपळे सांपडतील तें सांगतां येत नसे. कित्येकांनीं पानीपत गांवांत आश्रय घेतला होता. त्यांना हुडकून काढून ठार मारण्यांत आले. नजीबखानाच्या कृपेनें मल्हारराव सुरक्षित निसटला. जनकोजी शिंदे हरियाना प्रांतांतील गुंडांच्या हातून मारला गेला. अंताजी माणकेश्वराची तीच गत झाली. कित्येक थंडीनें कांकडून मेले. भाऊचे प्रेत रणमैदानांत सांपडलें. ते वजीरानें शुजाकडे दिलें. त्याचें गोसावी लोकांनी विधिपूर्वक दहन केलें. भाऊची बायको बारगिरांच्या मदतीनें सात प्रहरांत साठ कोसाची मजल मारून मोठ्या कष्टानें वल्लभगडाला पोहोंचली.

## शहानामाये अहमदिया

[ निजामुद्दीन इश्रत हा पंजाबातील सियालकोट येथील राहणारा. इ. स. १७५७ मध्यें अहमदशहा अब्दाली हा आपली हिंदुस्थानची मोहीम आटपून काबुलला परत जात असतां, निजामुद्दीन हा अहमदशहाला चिनाब नदीच्या कांठीं भेटला. अहमदशहानें त्याला आपल्या पदरीं ठेवून घेतलें. निजामुद्दीननें नादिरशहाच्या चरित्रावर शहानामाये नादिरी हा काव्य ग्रंथ रचला. तो पाहून अहमदशहानें आप-

त्याहि जीवनावर निजामुद्दीननें काव्य लिहावें अशी त्याला आज्ञा केली. निजामुद्दीननें यावरून शहानामाये अहमदिया हें महाकाव्य रचलें. हें काव्य म्हणजे इतिहास नव्हे. निजामुद्दीन पानिपतावर हजर नव्हता. पण इ. स. १७६२ मधें अहमदशहानें काश्मीर जिंकल्यावर तेथें निजामुद्दीनची न्यायखात्याचा अधिकारी म्हणून नेमणूक केली.

निजामुद्दीनानें हें काव्य इ. स. १७७२ पर्यंत आणून सोडलें आहे. या ग्रंथाची एक हस्तलिखित प्रत हैद्राबादच्या सरकारी ग्रंथालयांत आहे. त्यांतील पानीपत संबधीच्या प्रकरणाचा कामापुरता मराठी अनुवाद येथें दिला आहे. अर्थात हें काव्य आहे, इतिहास नव्हें हें लक्षांत टेविलें पाहिजे. तरी कवि हा अहमदशहाच्या दरबारांत वावरत असल्यामुळें काळजीपूर्वक शोधणाऱ्याला त्याच्या काव्यांत माहितीचे कण आढळल्याशिवाय राहणार नाहींत. ]

## पानीपतपुरता अनुवाद

काफरांनीं यमुनानदीच्या कांठीं पोहोंचून तेथें छावणी केली. त्यांनी आपल्या छावणीच्या भोंवती तोफा चढविल्या त्यांची गणती होऊं शकत नव्हती. मराठ्यांच्या बरोबर गाजीउद्दीनाचे मोगल शिपाई मिळाले होते. हे नांवाचे मुसल्मान आपला धर्म विसरून हिंदूंना मिळाले होते. पण त्यांच्यावर परमेश्वरी कोप झालाच. खऱ्या धर्मापासून ( इस्लाम ) निघून तें हिंदूंच्या मंदिराकडे वळले. अशा हितशत्रूवर परमेश्वरी कोप होऊन त्यांची शिरें धडावेगळीं होणारच. त्याला शस्त्रांचीहि आवश्यकता नाहीं. गाजीउद्दीन जनकोजीला जाऊन मिळाला म्हणून त्याचा सर्वनाश झाला. बादशहाच्या हातून त्याचा पराभव होऊन त्याची आमरण फजीती झाली.

काफरांच्या सैन्याचा बंदोबस्त पाहून अहमदशहाला चेव आला. त्यानें आपल्या सैन्याला आज्ञा केली कीं धर्मयुद्धाकरितां तयार व्हा. तुमच्या पदाघातांनीं धरणी कंपायमान होवो. त्याच्या सैन्यांतील रणवाद्यांचा आवाज गगन भेदून सूर्यापर्यंत जाऊन पोहोंचला. अहमदशहा आपल्या पराक्रमी सैन्यासहित कूच करून नजीबखानाच्या मुलुखांतून निघाला. त्याच्याबरोबर नामवंत अमीर उमराव होते. त्याचें सैन्य म्हणजे पोलादाचा जणूं डोंगरच वनांतून चालत असल्याचा भास झाला.

मुक्कामावर पोहोंचल्यावर अहमदशहानें आपल्या सैन्याची रचना केली. दोन्ही सैन्यें एकमेकासमोर आलीं. वीरांना मृत्यु म्हणजे समारंभाची घडी वाटू लागली. खुरासान आणि दक्षिणी यांच्या फौजा पानीपतावर जमल्या. मरूं किंवा मारूं या भावनेनें ते बेभान झाले होते. त्या दिवशीं विश्वावर प्रळय कोसळल्याप्रमाणें झालें.

अहमदशहानें मग मैदानावर सैन्य जमविलें आणि परमेश्वराची करुणा भाकली. मग वजीरानें बादशहाचा निरोप घेतला आणि तो तोफांच्या कडे रवाना झाला. त्यावेळीं

पृथ्वी आणि आकाश ही खालीवर होऊ लागली. तोफांतून आगीचे लोळ बाहेर पडूं लागले. पृथ्वीवर एकच हलकल्लोळ उडाला. युद्धाच्या ईर्ष्येनें उभयदळें एकमेकाकडे चालून जाऊं लागलीं. दोन्हीं सैन्यें प्रचंड पर्वताप्रमाणें भासत होतीं. सैन्याच्या धुराळयानें अंधार पडला. सैन्यांतील रांगा एकेक करून पुढें सरकू लागल्या. परमेश्वरानें जणूं त्याच दिवशीं प्रळय घडवून आणण्याचें ठरविलें होतें. एवढा तळपणारा सूर्य, पण धुरानें तो दिसेनासा झाला. तोफांतून आग बाहेर पडू लागली, तिच्यासमोर नरकांतील आग म्हणजे कांहींच नव्हे. दोन्हीं सैन्यांतून तोफांचा मारा होऊं लागला. तेव्हां चोहोंकडून आगीचा दर्या वाहातो असें वाटलें. तोफांचे आवाज म्हणजे मेघांचा गडगडाटच. तोफांच्या लपेट्यांत सैन्य आलें तेव्हां अजगराच्या जबड्यांत जणू तें सांपडलें. सारांश तोफांच्या भडिमारानें रोहिल्यांची दाणादाण होऊन ते अत्यंत कष्टी झाले. आणि त्यांनीं अहमदशहाची मदत मागितली. अहमदशहानें रोहिल्यांची दुर्दशा पाहिली तेव्हां त्यानें हाजी अताई आणि हाजी करीम यांना पाठविलें. त्यांच्या पाठोपाठ महमूदखान पण निघाला. त्याच्या पाठोपाठ हसनखान हा अहमदशहाचा निरोप घेऊन निघाला. या सर्व पथकांतील शिपाई हे वाघासारखे आणि अनुभवी होते. आणि मग त्यांच्यांत आणि शत्रूंत घनघोर युद्ध जुंपलें. हत्ती आणि वाघ यांची झटापट होती. कधीं एकाला जय मिळे तर कधीं दुसऱ्याला. कृष्णवर्णीय हिंदूंच्यावर इस्लामची फौज तुटून पडली. जणूं काय अंधारावर प्रकाशानें हल्ला केला. दोन्हीं दळें हट्टाला पेटून युद्ध करीत होतीं. अनेक माणसें प्राण सोडूं लागलीं. अग्नीचे बाण म्हणजे जगाचे काळच. त्यांच्या थयथयाटांनी पृथ्वी जळून खाक होऊ लागली. दोन्ही दळांतील तोफांचा मारा चालूच होता. त्यांच्या माऱ्यानें एकेका वेळीं शंभर शंभर माणसें मरत. जाळणें हाच तोफांचा गुण आहे मग तुम्हीच सांगा त्यांच्यांत आणि नरकांत काय फरक आहे. तोफा आणि बाण यांच्याबरोबर बंदुकींचाहि मारा होऊं लागला. प्रत्येक दस्त्यापाशीं ( पथक ) हजारो बंदुकी होत्या. उभय सैन्याच्या बंदुकींच्या माऱ्यांनीं शिपायाच्या रांगाच्या रांगा उध्वस्त झाल्या. मुसलमान गाजींच्या तोंडचें पाणी पळालें. त्यांचे चेहेरे फट-फटीत झाले. अग्नीच्या पुराशी कोण युद्ध करूं शकेल? त्यांनीं युद्धासाठीं हातपाय हलविण्यापूर्वीच त्यांच्या भोंवती मृत्यूचा पाश पडूं लागला. दोन्हीं सैन्यें सारखींच प्रबळ होतीं. त्यापैकीं कुणाचेंच पारडें जड नव्हतें. उभय सैन्यांनीं शौर्यांत कोणतीच कसूर केली नाहीं. मुसलमान आणि काफर हे शक्तींत बरोबर होते. इस्लाम धर्म ( दीन ) आणि काफरी यांच्यांतील संग्राम हा कांहीं सोपा नव्हता. एकीकडे अहमद तर दुसरीकडे अबुजहल असा हा संग्राम होता. वजीराच्या सैन्यावर शत्रू इतक्या त्वेषानें तुटून पडले कीं प्रत्यक्ष प्रलयच पातला असें वाटलें. शत्रूच्या सैन्यांत प्रचंड हत्ती होते. बादशहानें आपल्या फौजेला आज्ञा केली कीं आतां गोळयांचा भडिमार सुरू करा. उभय सैन्यें एकमेकाला भिडलीं. नदींत नौका हलावी तशी पृथ्वी

कांपू लागली. अहमदशहाच्या आज्ञेनें एकामागून एक अशा पल्टणी पुढें सरकूं लागल्या. प्रत्येक स्वाराच्या हातांत बंदूक होती. प्रत्येक पल्टणींतील बंदुकींच्या एकेका भडिमारानें शत्रूंच्या दोनशे खोगिरी रिकाम्या होऊ लागल्या. एकीकडून बाण तर एकीकडून बंदुकी असा मारा चालला होता. हत्तीवर बसलेले काफर सरदार शहावलीखानावर तुटून पडले. त्या घनघोर युद्धांत अगणित माणसें मारलीं गेलीं. त्यामुळें खुरासान पासून दख्खनपर्यंत सगळा देश विपन्न दशेस पोहोंचला. शहावलीखान परमेश्वराचें नांव घेऊन आपल्या सैन्यासहित काफरांबरोबर लढू लागला. या लढाईत परमेश्वराच्या आज्ञेनें हाजी अताईखान हा स्वर्गाला गेला ( ठार झाला ). मुसलमान संख्येनें कमी आणि काफर बहुसंख्य, खमीरींत मीठ असल्याप्रमाणें. पण अहमदशहाच्या फौजेला काफरांवर जय मिळला. चंद्रप्रकाशानें अंधाराचा नाश करावा त्याप्रमाणें झालें. नाहींतरी काफरांना पवित्र धर्मावर जय कसा मिळणार ? मातीपेक्षां पाणी हें केव्हांहि श्रेष्ठच म्हटलें पाहिजे. अहमदशहानें शत्रूवर आपली फौज घातली, प्रभात काळच्या वायूंत सुगंध मिसळावा असें झालें. त्या घनघोर युद्धांत जयाचें पारडे कधीं इकडे तर कधीं तिकडे असें अनेकवेळा झुकलें. उभय दलाचे शिपाई पुढें पुढें तर तल्वारींनीं, कट्यारींनी आणि शेवटी तर नुसत्या हातांनीं लढू लागले. त्यांचे डोळे क्रोधानें लाल झाले होते. त्यांच्या हृदयांत दयेमायेचा लवलेशहि नव्हता.

असें दुपारपर्यंत चाललें होतें आणि मग बाहशहानें आपल्या पल्टणींना ( दस्त्यांना ) शत्रूवर निकराचा हल्ला करण्याचा आदेश दिला. हा हल्ला भीषण आणि भयंकर होता. सरदार जहानखान आणि शहापसंदखान हे आपल्या शिपायांना लागोपाठ शत्रूवर पाठवूं लागले. मराठयांचे कित्येक घोडेस्वार आपल्या घोडयावरून खालीं आले. नजीबखान आपल्या जागेवर पहाडासारखा ठाण मांडून उभा होता. शेवटीं परमेश्वराच्या कृपेनें अहमदशहाचा विजय झाला.

किती माणसें मारली गेलीं याचा हिशेब मला विचारूं नका. जेथें पहावे तेथें प्रेतांच्या राशीचराशी पडल्या होत्या.

म पुसे अज़मन् अदाज़ा कुश्ता हा
ब बीन पुश्ताहा पुश्ताहा पुश्ताहा

आणि मग इस्लामच्या फौजेनें पाटलाग करून शत्रूची लांडगेतोडे सुरू केली. बादशहाच्या आज्ञेनें फौजेत विजय सूचक नगारे वाजूं लागले. गर्विष्ठ असे शत्रूंचे सरदार मातींत मिळाले त्यांचे ते मुकुट कोठे गेले ? त्यांचीं तीं सिंहासनें कोठें गेलीं ? त्यांचें तें वैभव कुठें ? त्यांचें तें असंख्य सैन्य कुठें गेलें ? त्यांचे ते वैभवशाली तंबू आणि शामियाने कोठें ? त्यांची गर्वाची आणि वैभवाचीं मधुपात्रें भग्न झालीं. त्यांचें गर्वहरण होऊन ते शुद्धीवर आले.

सारांश काफरांचीं सैन्यें उध्वस्त झालीं. त्यांचा सैन्याचा सेनापति विश्वासराव हा गर्विष्ठ अशा नानाचा लाडका पुत्र होता. दैवाच्या एका फटकाऱ्यासरशी तो आपल्या अंबारींतून धुळींत पडला. आकाशांतून तारा तुटून पडावा तसा तो हत्तीवरून खाली कोसळला. या विजयानें इस्लामचें फूल टवटवीत झालें. परमेश्वरी कोपानें काफरांची दुर्दशा झाली. दुराणींनीं हजारो शत्रूंची कत्तल केली. हजारो शत्रू कैद होऊन आले. त्यांत स्त्रिया आणि पुरुष दोघेहि होते. ते दीनवाणे दयेची याचना करूं लागले.

त्या मैदानांतून जीवंत असें कोणी निसटलें नाहीं. जनकोजी आणि भाऊ हे मारले गेले. शमशेरखान (बहादुर) मारला गेला. तीच गत फिरंगी कुळांतील इब्राहीमखानाची झाली. अंताजी माणकेश्वर आणि तात्या हे तडफडून मरण पावले. मल्हार आणि राघो हे सुरक्षित निसटले नाहींत. ते मृत्यूच्या तल्वारीला बळी पडले. पुढाऱ्यांपैकीं कोणीहि सुरक्षित गेला नाहीं. अहमदशहाचा कोप म्हणजे आगच ती. पूर्वीच्या बादशहांच्या अनेक हकीकती वाचल्या आहेत पण असा विजय घडलेला मी कधीं ऐकला नाहीं. शिकंदर काय, रुस्तुम काय किंवा बहमन काय आणि इस्फिंदार काय असें घनघोर युद्ध कुणींच पाहिलें नसेल. मागें होऊन गेलेल्या कुणाहि बादशहावर युद्धांत तोफांचा आणि बंदुकींचा असा मारा झाला नसेल. या मोहिमेंत अहमदशहा दोन वर्षे गुंतला होता. त्याला विश्रांति अशी मिळाली नाहीं. रात्रंदिवस तो शत्रूच्या भोंवतीं घिरट्या घालीत होता. त्यांनें शत्रूची वाट अशी व्यवस्थित अडविली कीं त्यांचा कांहींच उपाय चालेना. धन्य आहे अहमदशहाच्या समशेरीची. मोठमोठ्या शूरांना तिनें नमविलें. अहमदशहा हा आंतून साधुवृत्तीचा आहे. तो रात्रंदिवस परमेश्वराच्या आराधनेंत निमग्न असतो. त्याचा वजीर हा दयाळु आणि परमेश्वरभक्त आहे. वजीर हा अनुभवी आणि बादशाह पवित्र विचारांचा. असा उत्तम मेळ जमला आहे.

सारांश युद्धाच्या दिवशीं अहमदशहानें कैद्यांची विचारपूरस केली. कैद्यावर दयेची दृष्टि केली. त्यानें कैद्यांना अभय दिलें. आणि सोडून दिलें. आतां यापुढें कोणालाहि कैद करूं नका असे बादशहाचे भेसावल म्हणजे शिपाई सर्वांना सूचना देत गेले. मग स्त्री आणि पुरुष कैद्यांना छावणींतून बाहेर काढण्यांत आले. आणि त्यांना कपडे आणि वाट खर्चाला रुपये देण्यांत आले.

अहमदशहाच्या हातीं शत्रूची अगणित संपत्ति पडली. सामानानें लादलेलें हजारो उंट, सोनेरी अंबारी असलेले हत्ती, सजविलेले घोडे, सोनें भरलेल्या पेट्या, असें किती म्हणून वर्णन करावें. प्रत्येक शिपाई समृद्ध बनला. इतकी लूट रूमशामचे बादशहा अगर चीनचे सम्राट यांच्याहि वांट्याला कधीहि आली नसेल.

मग हिंदुस्थानच्या अमीरांनीं अहमदशहावर सोनें मोतीं उधळलीं. शुजाउदौला, नजीबखान इत्यादीवर अहमदशाहाचीं मोटीच कृपा झाली. त्याना खिलतीचीं वस्त्रें व अलंकारही देण्यांत आलीं. या विजयाची बातमी ईराण अरबस्तान इत्यादि देशांत जाऊन पोहोंचली. मुसलमान कष्टी झाले होते. या विजयाची वार्ता ऐकून ते परमेश्वराचे आभार मानण्याकरितां सहर्ष मशिदीकडे निघालें.

परमेश्वरा, अहमदशहाचें वैभव दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊं दे. त्याचें राज्य-चिरकाल टिकूं दे.

[ या महाकाव्यांत पानीपत प्रकरणावर चव्वेचाळीस पानें आहेत. प्रत्येक पानावर तीस ओळी आहेत. म्हणजे एकंदरीत तेराशेवीस ओळी आहेत. या काव्यांत कवीचा कल्पनाविलास बहराला आला आहे असें म्हटलें पाहिजे. उपमा उत्प्रेक्षा इत्यादींची त्यानें गर्दी करून सोडलीं आहे. प्रत्येक ओळीचा अनुवाद करणें अनावश्यक होतें. उदाहरणादाखल कांहीं ओळींचा शब्दशः अनुवाद केला आहे तर बाकीचा मजकूर सारांश रूपानें दिला आहे.

या महाकाव्यांतून दोन तीन गोष्टी वाचकांच्या मनावर ठसल्याशिवाय राहात नाहींत. एक गोष्ट म्हणजे मराठ्यांच्या तोफांनीं उडविलेला कहर. या घटनेवर कवीनें निदान चारशें ओळी खर्ची घातल्या आहेत.

दुसरी गोष्ट म्हणजे रोहिल्यांची झालेली दाणादाण होय. तिसरी गोष्ट म्हणजे उभय दळें निकरानें लढलीं आणि जयाचें पारडें कधीं इकडे तर कधीं तिकडे झुकत होतें ही होय.

अहमदशहाच्या राजकवीनें लिहिलेलें हें पानीपतवरील काव्य अनेक दृष्टीनें अभ्यासकांना उद्बोधक वाटावें असे आहे. ]

## शिवप्रसाद-तारीखे फैजबक्ष

[ शिवप्रसाद हा रामपूरचा रोहिला नवाब फैजुल्लाखान याच्या पदरीं होता. फैजुल्लाखान हा इतर रोहिले सरदार हाफिज रहमतखान, दूंदेखान इत्यादीबरोबर पानीपतच्या मैदानावर हजर होता. त्याच्याबरोबर शिवप्रसादहि हजर होता. इ. स. १७७६ मध्यें शिवप्रसादनें इंग्रज अधिकारी किर्कप्याट्रिक याजकरितां म्हणून रोहिलखंडच्या रोहिल्यांचा इतिहास लिहिला. या ग्रंथाचें नांव त्यानें तारीखे फैज़बख्श असें ठेविलें.

शिवप्रसादानें पानीपत प्रसंगाचें अगदीं त्रोटक वर्णन दिलें आहे. त्याचा ग्रंथ अद्याप हस्तलिखिताच्या स्वरूपांत रामपूरच्या सरकारी ग्रंथालयांत आहे. त्यांतील आवश्यक भागाचा मराठी अनुवाद मूळ फारशीवरून खालीं दिला आहे. ]

मराठ्यांचा कोट्यावधि रुपायांचा मुलुख अहमदशहाच्या कृपेनें रोहिले सरदारांच्या ताब्यांत आला. त्या प्रांतांतील मराठे आमिल, गुमास्ते वगैरे अधिकारहीन झाले. त्यांची विपन्नावस्था होऊन ते पुण्याला बाळारावकडे गेले. आणि त्यांनीं फिर्याद केली कीं उत्तर हिंदुस्थानांतून आमचें वर्चस्व नाहींसें झालें असून रोहिल्यांनीं सत्ता बळकाविली आहे. ही वेळ आमची दाद घेण्याची आणि मदत करण्याची आहे. दक्षिणी सरदारांनीं उत्तर हिंदुस्थानची माहितीं काढली. आणि आपसांत सल्लामसलत केली. मोहीम काढली तर नतीजा बरा पावणार नाहीं असें त्यांना वाटलें म्हणून मोहिमेचा विचार करूं नये असें त्यांनीं ठरविलें. कुणालाहि अहमदशहाविरुद्ध लढण्याचें धैर्य होईना. पण कित्येकांचें मरण ओढवलें होतें आणि उत्तर हिंदुस्थानांत त्यांची माती व्हावयाची होती म्हणून अनेक सरदार मोहिमेवर निघाले. भाऊ, विश्वासराव, मल्हारराव, इब्राहीमखान गार्दी, यशवंतराव, नारोशंकर, विठलराव, माधवराव, आनंदराव, चतुरसिंग, सदाशिवराव, दामोदर, त्र्यंबकराव, दादोराव, जीवनराव, हीराजी, तात्याजी, अप्पाजी वगैरे सरदार हिंमत करून मोहिमेवर निघाले. निरनिराळ्या प्रांतांतील सैन्यें त्यांना येऊन मिळालीं तसें त्यांना अधिक बळ आलें. हां हां म्हणतां त्यांच्यापाशीं असंख्य सैन्य गोळा झालें. मराठे सरदार प्रचंड सैन्य आणि प्रबळ तोफखाना घेऊन अहमदशहाशीं लढण्याकरितां निघाले ते नरवर व ग्वाल्हेर मार्गें कूच करीत अकबराबाद आग्र्यापाशीं आले. तेथें त्यांनीं बावीस मुक्काम केले. त्यांना उत्तर हिंदुस्थानांत जागजागीं असलेलीं पथकें येऊन मिळालीं. याशिवाय सूरजमल जाट हा एक लाख स्वार आणि पायदळ घेऊन त्यांना मिळाला. यमुनेच्या कांठावरचा तमाम मुलुख त्यांच्या ताब्यांत आला. त्यामुळें त्यांना भारी गर्व चढला. ते आग्र्याहून निघाले. नदींतील नावा त्यांनीं आपल्याबरोबर घेतल्या. आणि यमुनेच्या कांठानें कूच करीत ते दिल्लीस पोहोंचले.

सूरजमलजाट हा धूर्त, धोरणी आणि अनुभवी होता. तुम्हाला रसद पुरवितों, शिवाय मला अजून युद्धसामग्रीची तयारी करावयाची आहे असें निमित्त करून तो मराठ्यांचा निरोप घेऊन आपल्या किल्ल्याच्या आश्रयाला गेला. आपण मराठ्यांचा तावडींतून सुरक्षितपणें निसटलों याबद्दल त्यानें परमेश्वराचे आभार मानले. नंतर त्यानें अहमदशहापाशीं अनेक अर्ज पाठविले. त्यांत आपण मराठ्यांपासून वेगळे झालों. आणि तुमचा बंदा गुलाम आहे असा मजकूर होता. अहमदशहानेंहि त्याच्यावर विशेष कृपा केली.

दक्षिणी सरदारांनीं दिल्लींत सांपडेल तें लहान मोटें सामान घेऊन पानीपत कर्नालकडे कूच केलें. तेथें ते थांबले. अहमदशहाचा अधिकारी अब्दुस्समदखान, हा होता. आणि नबाब सादुल्लाखानाचे अधिकारी कुतुबशहा, व मोमिनखान वगैरे

नजीबुद्दौल्यानें तेथें ठेविले होते. ते सर्व सुभेसिरहिंदचा बंदोबस्त पाहात. मराठे सैन्य येत आहे हें त्यांनीं ऐकलें. आणि त्यांचा प्रतिकार करणें अशक्य आहे असें दिसून आल्यामुळें ते सगळे कुंजपुऱ्याच्या किल्ल्यांत आश्रयाला जाऊन राहिले. मराठ्यांनीं कुंजपुऱ्याच्या किल्ल्याला वेढा दिला आणि हरप्रकारची रसद तोडली. सरतेशेवटीं त्यांनीं वरील सरदारांना कैद केले. आणि त्यांचे अनेक प्रकारें हाल करून ठार मारले.

मराठ्यांचें सैन्य चाल करून येत आहें हें पाहून अहमदशहा डगमगला नाहीं. त्यानें अनूपशहराहून कूच केलें. आणि पावसाळ्याचें शेवटीं यमुना ओलांडून तो मराठ्यांच्या समोर आला. अहमदशहाचें सैन्य आलें म्हणून मराठेहि घाबरले नाहींत. ते आपल्या जागीं ठाण मांडून राहिले. त्यांनीं कोणत्याहि प्रकारें काळजी अगर चिंता दाखविली नाहीं. उलट त्यांनीं आपले मोर्चे अधिक मजबूत केले. आणि संघटित होऊन ते राहिले.

अहमदशहानें नजीबुद्दौल्याला हुकुम केला कीं तुम्ही ताबडतोब जाऊन शुजाउद्दौल्याला आमच्याकडे घेऊन यावें. नजीबुद्दौल्यानें त्याप्रमाणें जाऊन शुजाउद्दौल्याला सर्व कांहीं समजाविलें आणि बादशहानें तुम्हाला अभय दिलें आहे, त्याची तुमच्यावर विशेष कृपा राहील असें त्याला सांगून त्याला अहमदशहाकडे आणले. अहमदशहानें त्याला वस्त्रें अलंकार वगैरे देऊन त्याचा आदर सत्कार केला.

अहमदखान बंगश हा आपलें सैन्य घेऊन सरळ अहमदशहाच्या सेवेंत हजर झाला. हें सर्व मिळून अहमदशहापाशीं प्रचंड सैन्य जमलें. त्या सहित अहमदशहा न डगमगतां आणि असंख्य असलेल्या शत्रूची तमा न बाळगतां त्यांच्याशीं लढूं लागला. आणि त्यांचा निकाल लावण्याचा त्यानें निश्चय केला.

सारांश अहमदशहानें मराठ्यांच्या छावणीपासून चार पांच कोसावर आपली छावणी केली. उभय पक्षाच्या आघाडीच्या पथकांत चकमकी होऊं लागल्या. त्यांची हकीकत अशी आहे. मराठ्यांनीं आपली गनिमी काव्यानें लढण्याची पूर्वापार पद्धत सोडून दिली. त्यांनीं छावणी कायम केली आणि मोर्चे बांधून ते राहिले. हेंच त्यांच्या सर्वनाशाचें कारण झालें. उलट जर ते आपल्या पद्धतीनें धांवपळीची लढाई लढते तर वर्षानुवर्षं ही मोहीम कांहीं संपली नसती. आणि त्यांचा मोड करण्यास फारच यातायात पडली असती. परमेश्वराची धन्य आहे कीं मराठ्यांनीं आपली जुनी युद्धपद्धति सोडून दिली. ही तीन चार लाख माणसें अक्कल हुशारी आणि शहाणपणा याला पारखीं झालीं.

मराठ्यांची विचारसरणी अशी होती. पानीपतपासून ठाणेश्वरपर्यंतची भूमि ही हिंदूंची पुण्यभूमि होय. या भूमींत ज्याला मृत्यु होईल, मग तो युद्धामुळें असो कीं इतर कारणांमुळें असो, त्याला स्वर्गाची प्राप्ति होते. त्यांचीं पापें सगळीं

नाहींशीं होतात. हें कुरुक्षेत्र आहे. येथें यश मिळालें तर चहूकडे लौकिक होईल. आणि मृत्यु आला तर सद्गति प्राप्त होईल. जर आम्ही गनिमी पद्धतीनें लढलों तर लढण्याचा प्रसंग कुठें घडेल हें कुणी सांगावें. भलत्याच ठिकाणी मृत्यु आला तर इह आणि पर या दोन्हीं लोकांना आपण मुकूं. अशा विचारानें ते आपल्याला छावणींत कोंडून घेऊन राहिले. आणि प्राणाला मुकले. त्या युद्धांतून कोणीहि दक्षिणी सरदार जिवंत गेला नाहीं. पण मल्हारराव हा अनुभवी आणि पोक्त बुद्धीचा होता. त्यानें भाऊ आणि विश्वासराव यांना हरप्रकारें समजाविलें कीं ही छावणी नव्हे, ही मृत्यूची शृंखला आहे. ती बुद्धि हरपलेल्या सरदारांच्या पायांत पडलेली आहे. तुम्हाला जीवनच नको असेल तर गोष्ट वेगळी. नसल्यास सांपडेल त्या उपायांनीं छावणीच्या बाहेर पडून निघून जावे. आणि गनिमी काव्यानें लढण्याचें करावें. भाऊ आणि विश्वासराव हे अननुभवी होते. त्यांना गर्व चढला होता. त्यामुळें त्यांना योग्य मार्ग दिसत नव्हता. त्यांनीं मल्हाररावाचें सांगणें मनावर घेतलें नाहीं. मर्दासारखें लढून मरून जाण्याचें ठरवून ते लढण्यास तयार झाले. उभय दळाच्या अघाडीच्या चकमकी होऊ लागल्या. इस्लामच्या फौजेच्या वीरांनीं शत्रूची रसद बंद करून टाकली. मराठ्यांच्या छावणीकडे रसद जात असलेली दिसली कीं इकडींल फौजेचे वीर ती लुटून आपल्या छावणींत आणीत. मराठा सैन्याचे अधिकारी रसद आणणाऱ्या पथकाचें रक्षण करण्याकरितां जात. त्यांना दरखेपेस चांगलीच तंबी घडत असे. पुन्हां त्यांना आपल्या छावणीबाहेर पाऊल टाकण्याची हिंमत होत नसे.

शेवटीं शत्रूच्या सैन्यांत उपासमार होऊन त्यांच्यांत फाक्यावर फाके पडूं लागले. जनावरें उपाशी मरूं लागलीं. दाणाचारा मिळेनासा झाला. श्रीमंत माणसांना सुद्धां मीठ भाकरी मोठ्या कष्टानें मिळूं लागली. गरीब लोक नुसते गम खाऊ लागले आणि क्रोध गिळूं लागले. आणि मरावे असा विचार करून मृत्यूची आठवण करू लागले.

इकडच्या फौजेनें रसद तोडून शत्रूची दुर्दशा केली खरी पण मराठ्यांची छावणीं आणि मोर्चे यांचा बंदोबस्त इतका आटोकाट होता कीं त्यावर चालून जाण्याचें त्यांना धाडस करवेना. त्यांचा तो (मराठ्यांचा) तोफखाना जंगी होता. त्यांनीं तोफा छावणीच्या भोंवती निवडक स्थळीं उभ्या केल्या होत्या. बंदोबस्त इतका कडक होता कीं त्यांतून पांखरू घुसणें कठीण होतें मग स्वार आणि पायदळ शिपायांची काय कथा.

माझे मालक फैजुल्ला आणि नवाब सादुल्लाखान हे रोहिल खंडांत राहून तेथील व्यवस्था आणि अहमदशहाच्या छावणींत असलेले रोहिले सरदार हाफिज रहमतखान व दूंदेखान यांची सरबराई करीत होते. उभय दळांतील युद्ध जवळ आलें आहे हें त्यांनीं ऐकलें. रोहिलखंडांतील व्यवस्था बरी चालली होती. म्हणून ते अहमदशहाला जाऊन मिळावे म्हणून निघाले. वाटेंत नवाब सादुल्लाखान हा आजारी पडल्यामुळें हसनपुर येथें

थांबला. पण माझे मालक जलदीनें कूच करून अहमदशहाच्या छावणींत दाखल झाले. त्यांनीं अहमदशहाला नजर गुजरानली. अहमदशहानेंहि त्यांच्यावर कृपेचा वर्षाव केला.

छावणींत कोंडलेले शत्रू उपासमारीनें हैराण झाले. त्यांच्या छावणींत हलकल्लोळ उडाला. उपासमारीमुळें सगळे लोक छावणींतून बाहेर पडून सैरावैरा पळत सुटतात कीं काय असें वाटूं लागले. सरदारांनीं सल्ला मसलत केली. त्यांनीं पाहिलें कीं असें झालें तर सैन्य उधळून जाईल. त्यापेक्षां उद्या छावणींतून बाहेर पडून लढाई करावी. परमेश्वर काय घडवून आणील तें पाहावें. हेरांनीं बातमी आणली कीं उद्या कल्पांत होईल असें करावें असें शत्रूनें ठरविलें आहे. अहमदशहानें हुकुम दिला कीं शत्रूच्या बेताची बातमी प्रत्येक गोटांत पोहोंचविण्यांत यावी. सर्वांनी खबरदारीनें राहावें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शत्रूचीं पथकेंच्या पथकें छावणीं बाहेर पडूं लागलीं. त्यांच्यापैकीं एकाहि सरदाराचें वैभव आणि तेज ही वर्णन करूं जावे तर रुमालचे रुमाल पुरे पडणार नाहींत. भाऊ, विश्वासराव, मल्हारराव, जनकोजी, शमशेर बहादुर, इब्राहीमखान गार्दी इत्यादि सरदार युद्धभूमीवर पोहोंचले. इकडून अहमदशहा, राजपुत्र तैमूर, वजीर शहावलीखान, जहानखान, हाजी करीम दादखान, अताईखान, बर्खुर्दारखान, शाहा पसंदखान, व, माझे मालक फैजुल्लाखान, नजीबुद्दौला, हाफिज रहमतखान, दूंदेखान, इनायतखान, अब्दुस्सतारखान, सय्यद महंमद मासूम, शेख महमद कबीर, मुल्ला महंमद मुहसिनशहा, शरफखान हे रोहिले सरदार मैदानावर हजर होते. शुजाउद्दौला व अहमदखान बंगश हे आपापलीं पथकें घेऊन रणांगणावर पोहोंचले.

लढाईला सुरवात झाली. धन्य परमेश्वराची, लढाईचें दृश्य कुणालाहि स्तिमित करून सोडणारे होतें. लढाई इतकी निकराची झाली कीं, प्रतिपक्षांनी बंदुकी, बाण इत्यादि टाकून दिल्या आणि तल्वार, भाला, खंजीर, कट्यार इत्यादींनीं लढू लागले. यानंतर तर हत्यारें टाकून देऊन उभयदळांतील वीर एकमेकाला धरून कुस्त्या खेळू लागले. शत्रूचे पाय टिकूं शकले नाहींत पण त्यांनीं दाखविलेला त्वेष आणि वीरश्री हीं पुराणकाळांतील रुस्तुम आणि इस्फंदार या वीरांची आठवण ताजी करून देत होती. त्यांनीं जे शौर्य गाजविलें त्याचें वर्णन करणें शक्तीच्या बाहेर आहे. पण अहमद-शहाला विजय मिळावा हा परमेश्वरी संकेत होता. म्हणून त्यांच्या शौर्याचा आणि शर्थीचा उपयोग झाला नाहीं.

युद्ध फारच भयंकर झालें. ठिकठिकाणीं मृतांचे आणि जखमी लोकांचे ढिगारे जमले. चहूकडून रक्ताचे पाट वाहूं लागले. माझे मालक, नजीबुद्दौला, हाफिज रहमतखान, दूंदेखान वगैरे रोहिलखंडाच्या वीरांच्या पराक्रमानें भाऊ, विश्वासराव वगैरे दक्षिणी सरदार हे अकराशे चौऱ्याहत्तर हिज्रींत मारले गेले. इब्राहीमखान गार्दी

जखमी होऊन पाडाव झाला होता. अहमदशहाच्या हुकुमानें त्याचा वध करण्यांत आला. मल्हारराव हा अनुभवी होता. युद्धांतून तो सुरक्षित बाहेर पडला. कोल्ह्याप्रमाणें धूर्तपणा दाखवीत तो कांहीं काळ बादशाही छावणीभोवती फिरून दक्षिणेकडे निघून गेला. परमेश्वराच्या कृपेनें विजयसूचक वारे बादशाही फौजेच्या दिशेनें वाहू लागले. माझे मालक फैजुल्ला याच्या पराक्रमानें अहमदशहा विजयी होऊन शत्रूचा सर्वनाश झाला. बादशहाच्या आज्ञेनें विजयाचीं शहाजणें वाजूं लागलीं. आश्चर्याची गोष्ट ही कीं शत्रूपैकीं एक विश्वासराव सोडून कुणाचेंहि प्रेत सांपडलें नाहीं. विश्वासराव हा तरुण, देखणा आणि अनुपम असा सुंदर होता. इस्लामच्या सैन्यापैकीं सगळे सरदार सुरक्षित राहिले. गनिमांची कोट्यावधि रुपायांची संपत्ति जेत्यांच्या हातीं सांपडलीं. प्रत्येक गरीब मनुष्य संपन्न झाला. सरदार, रिसालदार, जमादार आणि दफेदारापैकीं कांहीं हत्ती, उंट, घोडे मिळाले नाहींत असा कोणी राहिला नाहीं. लुटीमुळे प्याद्याचे स्वार बनले, स्वारांचे जमादार बनले, जमादारांचे रिसाल्दार, आणि रिसाल्दारांचे अमीर बनले. कैद केलेल्या स्त्री पुरुष आणि बालकासंबंधी काय लिहूं. अद्याप अंगावर कांटा येतो. एके दिवशीं एका दुराणीनें एक लहान अर्भक माझ्यासमोर आणले. त्यानें अगदीं कमी किंमतीला, जवळजवळ फुकट म्हणाना, तें मूल मला देऊन टाकलें. त्याला सांभाळणें आपल्याला जमणार नाहीं असें त्याला वाटलें. अहमदशहाच्या फौजेंत स्वारी आणि सामान नेण्यास उंटाशिवाय दुसरें साधन नव्हतें. मग पालखी, रथ, छकडे वगैरे कुठले मिळायला.

युद्धांत माणसें, हत्ती, घोडे, उंट आणि बैल इतकीं मेलीं कीं घारीगिधाडींना अनेक वर्षांचें खाद्य मिळून त्यांना आनंद झाला. शत्रूपैकीं कांहीं लाख माणसें होतीं तीं सर्व कुठे नाहींशीं झालीं? लूट करणारे आमचे शिपाई मराठ्यांच्या छावणींत गेले होते. ते सांगत कीं एक धान्य सोडलें तर मराठ्यांच्या छावणींत इतर सामान भरपूर होते. दुकानें, तंबू, राहुट्या, बाजार ही सर्व विविध सामग्रींनीं भरलीं होतीं. जखमी होऊन पडलेल्या शत्रूंच्या लोकांची गांठ पडली तेव्हां ते म्हणाले कीं धान्याच्या न मिळण्यामुळें आमचे सरदार अस्वस्थ आणि चिंतायुक्त झाले. नाहींतर पुढें कांहीं काळानें लढाई द्यावी असा विचार होता. युद्धसामग्री आणि खजिना याबद्दल त्यांना कांहीं काळजी नव्हती. आमची घोडी दाणा न मिळाल्यामुळें जाया झाली. जीं राहिलीं ती स्वारीयोग्य राहिलीं नाहींत. आम्ही दक्षिणी घोडेस्वार आहोत, पायउतार होऊन कांहीं होऊं शकत नाहीं. म्हणून आम्ही अस्वस्थ होऊन जिवावर उदार झालों.

एवढा मोठा विजय मिळवून बादशहानें परमेश्वराची प्रार्थना करून त्याचे आभार मानले.

# काशिराजाची बखर

[ काशिराज हा महाराष्ट्रीय गृहस्थ शुजाउद्दौल्याचा कारभारी या नात्यानें इ. स. १७६१ मध्यें पानीपतच्या मैदानावर हजर होता. युद्धानंतर एकोणीस वर्षांनीं त्यानें युद्धाची हकीकत फारसी भाषेंत लिहून काढली. या हकीकतीचा इंग्रजी अनुवाद दिल्ली येथील इंग्रज रेसिडेंट जेम्स ब्राउन ( १७८२–१७८५ ) यानें करून तो इ. स. १७९९ मध्यें ऐशियाटिक रिसर्चच्या तिसऱ्या खंडांत प्रसिद्ध केला. या अनुवादाचें संपादन एच. जी. रॉलिन्सन यांनीं मुंबई विद्यापीठाकरितां इ. स. १९२६ मध्यें केलें. आपल्या प्रस्तावनेंत रॉलिन्सन यांनीं मूळ फारसी हस्तलिखित नष्ट झालें आहे असें म्हटलें आहे. १७९९ तील इंग्रजी भाषान्तराचा मराठीं अनुवाद इ. स. १८७७ मध्यें 'लोकहितवादीं'नीं प्रसिद्ध केला होता.

पण मूळ हस्तलिखिताच्या प्रती लंडन आणि रामपूर येथें आढळल्या. सर जदुनाथ सरकार यांनीं लंडन प्रतीवरून सदर ग्रंथाच्या मुख्य भागाचा इंग्रजी अनुवाद करून तो इ. स. १९३४ च्या इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली या नियतकालिकांत प्रसिद्ध केला.

मूळ फारसी ग्रंथ अद्यापि प्रकाशित झालेला नाहीं. रामपूरच्या ( उत्तर प्रदेश ) रजा ग्रंथालयांतून ग्रंथाच्या हस्तलिखिताची एक प्रत करून मागविण्यांत आली. त्या फारसी प्रतीवरून मराठी अनुवाद खालीं देण्यांत येत आहे. ]

दख्खनच्या रियासतीच्या मसनदीवर असलेला बाळाराव पंडित प्रधान हा शहाणा, दूरदर्शी आणि भाग्यवान होय अशी त्याची ख्याति हिंदुस्थानांतील जनतेंत होती. पण त्याचा स्वभाव विलासी होता. हें सुद्धां त्याच्या चातुर्याचें आणि बुद्धिमत्तेचें लक्षण होय असें लोक म्हणत. घरांत भांडण तंटे नकोत म्हणून त्यानें राज्याचा कुल कारभार आपला चुलतभाऊ सदाशिवराव भाऊ याजकडे दिला होता. आणि तो स्वतः आरामांत काळ घालवीत होता. सदाशिवरावभाऊनें लहानपणापासूनच रामचंद्र बाबा शेणवी या अप्रतिम मुत्सद्याच्या हाताखालीं, मुल्की कामे, आर्थिक प्रकरणें, मुलुखगिरी, फौजफांटा इत्यादि राज्यकारभाराच्या प्रत्येक अंगाचें शिक्षण घेतलें होतें. सर्व गोष्टींत त्यानें प्राविण्य संपादन केलें. आपल्या भाग्यानें तो सर्वत्र प्रसिद्ध झाला. मध्यरात्रीपर्यंत तो प्रत्येक लहान मोठ्या प्रकरणांत लक्ष घालीत असे. प्रत्येक प्रकरणाचा तो एखाद्या पोक्त आणि अनुभवी मुत्सद्याप्रमाणें निकाल लावी. सारेजण एकमुखानें त्याची बुद्धि विलक्षण आहे असें म्हणत.

या काळांत उत्तर हिंदुस्थानांतील आणि दक्षिणेंतील अनेक प्रकरणें त्याच्या हातून तडीस गेलीं. योगायोगानें उत्तर हिंदुस्थानची मोहीम काढून तिचें आधिपत्य

रघुनाथरावाकडे द्यावे असें ठरलें. रघुनाथरावांच्या बरोबर मल्हारराव होळकर, जयाजी शिंदे वगैरे सरदार देण्यांत आले. त्यांच्याबरोबर प्रचंड सैन्य होतें. उत्तर हिंदुस्थानांतील सगळीं प्रकरणें निकालांत काढून हें सैन्य लाहोर आणि गुजरात शहादूला या भागांत पोहोंचलें. शहा अब्दालीचे सरदार जहानखान आदींचा मराठ्यांच्या हातून दणदणीत पराजय झाला. ते अटक नदी पार करून गेले. मराठयांच्या फौजेनें अटक नदीपर्यंत त्यांचा पाठलाग केला. आणि त्यांनीं त्या भागांत आपला कांहीं काळ अंमल बसविला. मोहीम पार पडली. तसा फौजेच्या पगारबाकीचा प्रश्न पुढें आला. रघुनाथराव सल्ला घेऊन परत फिरला आणि दक्षिणेकडे निघून गेला. रघुनाथरावाच्या मोहिमेचे जमाखर्च भाऊनें तपासले तो त्यास आढळून आले कीं खंडणी पेशकश इत्यादीच्या रूपानें जी रकम वसूल झाली त्यामानानें अठयाऐंशी लाख रुपये पगार बाकी आणि इतर कर्ज झालें होतें. भाऊ हा रघुनाथरावाहून प्रत्येक बाबतींत श्रेष्ठ होता. त्यानें रघुनाथरावाला टोचून म्हटलें कीं हीच का तुमची कार्य-कुशलता. आमच्याकरितां कर्ज मात्र करून आलात. रघुनाथरावानें पण उत्तर दिलें कीं या पुढें आपणच मोहिमांत लक्ष घालून व्यवस्थित खर्च करावा. या सवालजबाबांत बाळाराव मध्यें पडला. रघुनाथराव त्याचा भाऊच होता. त्याचा विचार करून बाळा-रावानें म्हटलें कीं रघुनाथराव पोर आहे. पुढें त्याला अनुभव येईल.

या नंतर तिसऱ्या वर्षी हिंदुस्थानांत मोहीम काढण्याचा मन्सुबा ठरला. त्या संबंधीं रघुनाथरावास विचारण्यांत आलें. पण त्यानें नकार देऊन म्हटलें कीं ते दौलतीचे हितचिंतक आणि व्यवस्थित जमाखर्च करणारे आहेत. त्यांच्याकडे मोहीम द्या. रघुनाथरावाचें बोलणें भाऊस लागलें. अनेक दृष्टींनीं विचार करून ती मोहीम आपल्या अंगावर घेण्याचें त्यानें कबूल केलें. पूर्वापार पद्धतीप्रमाणें बाळारावाचा सतरा वर्षांचा मुलगा विश्वासराव यास सरदार करून त्यानें बरोबर घेतलें. आणि प्रचंड सैन्य बरोबर घेऊन त्यानें उत्तर हिंदुस्थानकडे कूच केलें. त्यानें नर्मदा ओलांडली. तेथून तो प्रथम-पासून चालत आलेल्या पद्धतीस सोडून आपले नवीनच कायदे कानू चालवूं लागला. मुलकी प्रकरणांत, आमिलांचे जमाखर्चाचे हिशेब तपासण्यांत तो आपल्या मनासारखें आणि कडकपणें वागूं लागला. मल्हारराव वगैरे सरदार उत्तर हिंदुस्थानांतील व्यवहारांत अनुभव घेतलेले होते. तिकडील राजेरजवाड्यांशीं त्यांची घसट होती. त्यांची सल्ला-मसलत न घेतां तो आपल्याच पद्धतीनें वागूं लागला.

असें होत होत भाऊ सिरोंज प्रांतांत येऊन पोहोंचला. तेथून त्यानें हिंदुस्थानांतील सरदारांपाशीं वकील पाठविले. राजेरजवाडे, अमीरउमराव यांपैकीं प्रत्येकाला त्यानें मूल्यवान भेटी पाठविल्या. आणि त्यांना पत्रें लिहिलीं कीं तुम्ही आम्हाला येऊन मिळावे. म्हणजे एकत्र येऊन आपण हिंदुस्थानचीं प्रकरणें निकालांत काढूं. एक वकील शुजाउद्दौल्यापाशीं आला. त्यानें मूल्यवान वस्त्रें आणि रत्नजडित

अलंकार भेटीदाखल आणले. त्यानें भाऊचा वरील निरोप आणिला. आणि शुजाउद्दौल्यास सांगितलें कीं भाऊजवळ येतांच ते तुम्हाला आणण्याकरितां नारोशंकर यास पाठवितील.

शुजाउद्दौल्यानें वरील निरोपाला व्यवहाराला धरून जें उत्तर होतें तें दिलें. पण त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें कीं उभयपक्षांत काय घडतें तें पाहात आपण वेगळे राहावे. ज्या पक्षाला जय मिळण्याचा रंग दिसेल त्याला जाऊन मिळता येईल, मग तो पक्ष कोणता का असेना.

दत्ताजी पटेलवर जय मिळविल्यानंतर अहमदशहा अब्दालीनें अनूपशहर भागांत गंगेच्याकाठीं दुआबांत छावणी केली होती दत्ताजी पाटील हा नजीबुदौल्याच्यामुळें युद्धांत मारला गेला होता. पुढें काय होईल या भीतीनें नजीबुदौला अहमदशहा दुराणीला मिळाला होता. सरदार जहानखानाच्या पराजयाचा सूड घ्यावा असें अहमदशहानेंहि ठरविलें होतें. पण तो हिंदुस्थानांत येण्याचें मुख्य कारण म्हणजे नजीबुदौल्यानें त्याला बोलाविलें हेंच होय. अहमदशहाच्या पावसाळी छावणीसाठीं आणि इतर व्यवस्थेकरितां लागणारी रक्कम नजीबुदौल्यानें अहमदशहापाशीं पाठविली. नजीबुदौला हा युद्धांत आणि राजकारणांत पूर्णपणें मुरलेला होता. सगळे रोहिले सरदार आणि फर्रुखाबादेचे अफगाण हे नजीबुदौल्याच्या सल्ला मसलतीनें आणि स्वजातीच्या अभिमानानें शहा दुराणीला मिळाले.

सदाशिव भाऊची स्वतःची फौज होती. याशिवाय त्यानें नारोशंकर वगैरे माळव्यांतील आणि झाशी प्रांतांतील अधिकारी होते त्यांच्या फौजाहि बरोबर घेतल्या. तो चंबळ नदीच्या कांठावर पोहोंचला. तेथून त्यानें राजा सूरजमल्ला येऊन भेटण्यासंबंधीं निरोप पाठविला. सूरजमल्नें उत्तर दिलें कीं नेहमी राव मल्हार आणि शिंदे यांच्या मार्फतीनें आमचे जाबसाल होत. त्यांना मध्यें घालावें म्हणजे मी हजर होईन. असें करणें जरूर आहे हें पाहून भाऊनें शिंदे होळकरांच्या मध्यस्थीनें सूरजमल बरोबर कौल करार केला. त्यानंतर तो चंबळ ओलांडून अकबराबाद आग्र्याजवळ पोहोंचला. तेथें राजा सूरजमल जाट हा येऊन त्याला भेटला. उभयतांत सल्ला मसलत झाली. सूरजमलनें म्हटलें "तुम्ही सगळ्या हिंदुस्थानचे स्वामी आहात. आणि मी एक जमीनदार आहे. माझ्या योग्यतेप्रमाणें मी म्हणेन कीं तुमची युद्धसामग्री, बाजारबुणगे, जाडजूड तोफांचा कारखाना ही या युद्धांत उपयोगीं पडणार नाहींत. हिंदुस्थानांतील लोकांत तुम्ही सर्वांपेक्षां तडफदार आहात. पण प्रतिस्पर्धी तुमच्यापेक्षांहि जास्त तडफदार आहे. म्हणून माझा सल्ला असा आहे कीं तुम्ही सड्या सैन्यानें शत्रूवर चालून जावें. आणि तुमचे जाड सामान चंबळा नदीच्या पलीकडे तुमच्या ताब्यांत असलेल्या झांशी किंवा ग्वालियर या ठिकाणीं ठेवावें.

दुसरा सल्ला असा की माझ्या पाशीं दीग आणि इतर असें चार किल्ले आहेत. या पैकीं तुम्हाला जो किल्ला पसंत पडेल तो मी रिकामा करून देईन. त्यांत तुम्ही आपले कबीले आणि जाड सामान ठेवा. मी तुमची सोय करण्यास तयार आहे. यांत चांगली गोष्ट ती ही कीं आपला मुलुख पाठीशीं राहील. आणि रसदेची काळजी राहाणार नाहीं. आणि तुम्ही कोणत्याहि प्रकारची काळजी न करतां शत्रूशीं मुकाबला करूं शकाल. शत्रूच बहुतेक चाल करून येणार नाहीं. मोहिमेचा हा रंग पाहून शत्रू जागच्याजागीं बसून राहील."

मल्हारराव वगैरे सरदारांना हा सल्ला पटला. ते म्हणाले "तोफखाना घेऊन युद्ध करणें ही बादशाही पद्धत झाली. आम्ही मराठे गनिमी काव्यानें लढणारे आहोत. आपल्या पद्धतीनें लढणें बरें, हा मुलुख म्हणजे कांहीं आमचा मिराशी मुलुख नव्हे. येथें आम्हाला पुढें जातां आलें नाहीं तर पाय मागें घेण्यांत कांहीं नामुष्की नाहीं. सूरजमलचा सल्ला योग्य आहे. त्यायोगें शत्रू आपण होऊनच माघार घेईल. तो सध्यां या देशांत आहे. तो कसा तरी काळ काढील. पावसाळाहि आतां जवळ आला आहे. या वेळीं तो निघून जाणार नाहीं पण नंतर मात्र तो आपण होऊन आपल्या मुलुखाकडे निघून जाईल."

सगळ्या सरदारांनीं एकमुखानें हा सल्ला दिला. भाऊला आपल्या सैन्याचा आणि पराक्रमाचा गर्व होता. त्यानें तो सल्ला मानला नाहीं. तो म्हणाला "आमच्या सेवकांनीं या प्रांतांत मोटीं कामें केलीं आहेत. हेतु हा कीं हा मुलुख मिळवावा. आम्ही कांहीं निष्क्रिय म्हणून लोकांत प्रसिद्ध होऊं इच्छीत नाहीं. मल्हारराव म्हातारा झाला आहे. त्याची बुद्धि नष्ट झाली आहे. सूरजमल आपल्या योग्यतेप्रमाणें बोलला. त्याची हुशारी ती किती. आम्ही त्याच्या सल्ल्याप्रमाणें काय म्हणून वागावे."

अशा प्रकारें भाऊ कडकपणें बोलला. भाऊच्या अशा बोलण्यावरून अनुभवी आणि पोक्त माणसांनी ओळखलें कीं दुर्दैवच ओढवलें आहे म्हणून भाऊ शहाणा आणि दूरदर्शी असूनहि चांगला सल्ला ऐकत नाहीं. त्याच्या कठोर बोलण्यानें प्रत्येक सरदार दिलगीर आणि कष्टी झाला. त्यांनीं मनाशीं विचार केला कीं या ब्राह्मणाला जय न मिळणें हेंच बरें. नाहींतर आमची कदर ती काय राहाणार ?

भाऊनें राजा सूरजमलच्या बडदास्तीकरिता फौज नेमून दिली. यामुळें राजा सूरजमलला चिंता उत्पन्न झाली. मल्हारराव वगैरे सरदार त्याला म्हणाले "घाई उपयोगाची नाहीं. योग्य वेळीं जें करायचें तें करा. तूर्त भाऊच्या मर्जीस अनुसरून राहाणें योग्य होय."

या नंतर भाऊ अकबराबादेहून (आग्रा) कूच करून शहाजहानाबादेस पोहोंचला. अहमदशहाचा वजीर शहावलीखान याचा नात्यानें चुलत भाऊ असलेला

याकूब अलीखान हा बादशाही किल्ल्यांत होता. भाऊनें एकदम किल्ल्याला वेढा घातला. आणि किल्ला खाली करून द्या म्हणून सांगून पाठविलें. आपापसांत कांहीं काळ गोळा-गोळी झाली. शेवटीं याकूब अलीखानाला आपण टिकूं शकूं असें वाटेना. त्यानें शहावलीखानाचा सल्ला घेतला. आणि सरदारांच्या मार्फतीनें बोलणी लावून तो किल्ल्याच्या बाहेर पडला. भाऊ आणि विश्वासराव हे किल्ल्यांत दाखल झाले. बऱ्याच बादशाही वस्तू त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतल्या. दिवाणेखासचें छत चांदीचें होतें तें त्यांनीं तोडलें. आणि त्याची नाणीं पाडलीं. भाऊनें अशाच इतर कांहीं गोष्टीं केल्या. लोक बोलूं लागले कीं भाऊचा हेतु असा दिसतो कीं हिंदुस्थानांतील कांहीं सरदार आणि नवाब यांना काढून टाकावे. आणि अहमदशहा राहाणार नाहीं. मग विश्वास-रावाला दिल्लीच्या तक्तावर बसवावें. या गोष्टी तोंडी आणि वकीलांच्या पत्रव्यवहारानें शुजाउद्दौल्यापर्यंत पोहोंचल्या होत्या. त्याप्रमाणें येथें लिहिल्या आहेत.

नंतर पावसाळा सुरू झाला. भाऊनें शहाजहानाबादेंत छावणी केली. तो स्वतः किल्ल्यांत राहिला. त्याचें सैन्य बारा कोसपर्यंत ठिकठिकाणीं पसरलें होते. इकडे अहमदशहाची छावणी अनूपशहरजवळ गंगेच्या कांठावर होती. नजीबुद्दौल्याला चहूंकडची बातमी मिळत असे. त्यानें सगळी हकीकत शहा दुराणीला कळविली. शहा दुराणी म्हणाला कीं शुजाउद्दौल्याला सर्वप्रकारें समाधान करून इकडे आणणें योग्य होय. असें न होवो कीं तो दुसऱ्या पक्षाला जाऊन मिळाला. त्यानें आपल्या बरोबर मोठें सैन्य आणलें काय किंवा लहान आणलें काय त्याच्यावर कांहीं अवलंबून नाहीं. तो कदाचित अनुकूल राहाणार नाहीं. माझ्या हिंदुस्थानावरील सुरवातीच्या मोहिमेंत त्याचा बाप सफदरजंग आणि मी यांच्यांत कांहीं घटना घडल्या होत्या. त्यांत माझे पाय टिकले नाहींत. याची जाणीवहि शुजाउद्दौल्याला असून याची त्याला काळजी लागली आहे. तू स्वतः जाऊन शुजाउद्दौल्याचें समाधान करून माझ्यापाशीं घेऊन ये. हें काम पत्रव्यवहारानें किंवा वकील पाठवून होणारें नाहीं. तू स्वतः तडक जाऊन शुजाउद्दौल्याला घेऊन ये. वजीरशहावलीखान यानें कौलकरार करून, त्यांचें शिक्कामोर्तब करून कुराणाच्या प्रतीबरोबर शुजाउद्दौल्याला देण्याकरितां नजीबुद्दौल्या-पाशीं दिल्या. नजीबखानानें आपल्याबरोबर दोन तीन हजारांचें सैन्य घेतलें आणि तो तीन चार दिवसांत मेहदी घाटापाशीं गंगेवर पोहोंचला. शुजाउद्दौल्यानें सगळ्या गोष्टीला जागरूक राहाण्याच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीनें गंगेवर आपली छावणी ठेवली होती. गंगेच्या पलीकडील तीरावर नजीबुद्दौला एकाएकी आलेला पाहून शुजाउद्दौल्यानें निरुपाय होऊन त्याची भेट घेतली. आणि त्याचा पाहुणचार केला. नजीबुद्दौल्यानें शहा दुराणी आणि शहावलीखान यांनीं लिहिलेलीं पत्रें आणि करारमदार शुजाउद्दौल्यापाशीं दिलीं, आणि आपल्यातर्फे आणि शहा दुराणीच्या तर्फे समाधानाच्या गोष्टी सांगितल्या आणि जगांत नेहमीं कधीं वर तर खालीं असा

अनुभव कसा येतो हें त्याला सांगितलें. आणि म्हटलें " मी तर स्वतःची आशा जवळ जवळ सोडली आहे. कारण भाऊ हा माझा शत्रू आहे. पण तुम्ही स्वतःच्या बचावाची काळजी घेणें आवश्यक आहे. तुम्ही एखाद्या पक्षाशीं संघटण ठेवावें. भाऊ हा मुसलमानांचा मनःपूर्वक द्वेष करतो. त्याला शक्य झालें तर तो तुम्हांला काय आणि आम्हांला काय, कुणालाच सोडणार नाहीं. नशीबांत जें व्हावयाचें तें होईल हें जरी खरें असलें तरी आपापल्या शक्तीप्रमाणें हात पाय हलविणें हेंच योग्य होय. केवळ स्नेहभावानें मी येथपर्यंत आलों आहे. तुम्हाला जें योग्य होईल असें वाटतें तें करा."

अशा प्रकारें त्यांचें संभाषण चार दिवसपर्यंत चालू होतें. शेवटी शुजाउद्दौल्यानें विचार केला कीं एकीकडे मराठ्यांशीं आपले संबंध आहेत. अब्दालीचा पक्ष सोडून देण्यांतहि शहाणपणा आणि दूर दृष्टि दिसून येत नाहीं. नजीबुद्दौला हा स्वतः येथें आला आहे. तो निराश होऊन येथून गेला तर शहाची नामुष्की झाल्यासारखें होईल. उलट मराठयांचे आणि आपले निकटचे संबंध आहेत. मराठयांचा जय झाला काय किंवा दुराणीचा झाला काय काळजीची परिस्थिति निर्माण होईलच.

पूर्ण विचार करून आणि नजीबुद्दौल्याचा मान राखून शुजाउद्दौल्यानें शहा दुराणीकडे जाण्याचा निश्चय केला. त्यानें बेगमांना लखनौला रवाना केलें. बेणी बहादुर यास आपल्या तर्फे राज्यावर नायब म्हणून नेमलें. नंतर त्यानें नजीबुद्दौल्याला घेऊन कूच केलें. अनूपशहर जवळ तो अहमदशहाला भेटला. अहमदशहानें त्याचा सत्कार केला. आणि त्याला म्हटलें " मी तुला आपला मुलगा मानतो. तुझीच वाट पाहात होतों. आतां पहा मराठयांचा धुव्वा कसा उडवितो तें." अहमदशहानें शुजाउद्दौल्यावर कृपेची वृष्टि केली. त्यानें आपल्या फौजेंत आज्ञा जाहीर केली कीं शुजाउद्दौल्याच्या फौजेशीं कोणीहि भांडण करू नये. कोणी असें करील तर त्याचा वध करण्यांत येईल. हा ईराणी मोगल सफदर जंगाचा मुलगा शुजाउद्दौला हा आमच्या घराण्याचा खास पाहुणा आहे आणि मला आपल्या मुलापेक्षांहि अधिक प्रिय आहे. वजीर शहावलीखान हा सत्तर वर्षे वयाचा अत्यंत अनुभवी इसम होता. तो शुजाउद्दौल्याला आपला मुलगा म्हणे. त्यानेंहि शुजाउद्दौल्याचा बहुत आदरसत्कार केला. शुजाउद्दौल्याच्या छावणींत कांहीं दुराणी शिपायांनीं दांडगाई केली त्याबद्दल अहमदशहानें दोनशे शिपायांना शिक्षा केली. यानंतर कुणाल्याहि दांडगाई करण्याची हिंमत झालीं नाहीं.

ऐन पावसाळ्यांत अहमदशहानें कूच केलें. दिल्लीच्या लाल किल्ल्याच्या समोर नदीच्या अलीकडील तीरावर त्यानें छावणी केली. मराठ्यांची फौज नदीच्या पलीकडे होती. पावसाळ्याचे दिवस आणि नदीला पूर आलेला. उभय दळांपैकीं कुणालाहि नदीपार करणें शक्य झालें नाहीं.

भवानीशंकर हा औरंगाबादचा राहाणारा असून बुद्धिमान आणि चतुर होता. सदाशिव भाऊनें त्याच्याबरोबर पत्र देऊन त्याला शुजाउद्दौल्याकडे पाठविलें. त्यांत त्यानें लिहिलें कीं तुमच्या आणि आमच्या घराण्यांत स्नेह चालत आला आहे. आमच्या सरदारांनीं तुमच्या वडिलांना मदत केली आहे. तुम्ही प्रस्तुत प्रसंगीं त्यांच्यांत कां जाऊन मिळाला आहात. आम्ही तुम्हाला कोणत्याहि प्रकारें तसदी देऊं इच्छींत नाहीं. कांहीं करा पण त्या पक्षाला मिळूं नका. जर हें जमत नसेल आणि त्यांच्यापासून वेगळे राहाणें शक्य होत नसेल तर कुणाला तरी आमच्याकडे बोलणीं करण्यासाठीं पाठवा. दिल्लीचा रहिवाशी लाला संताराम याचा मुलगा राजा देवीदत्त हा उत्तम भाषण करणारा होता. त्याला शुजाउद्दौल्यानें भवानीशंकर बरोबर भाऊकडे पाठविलें. मी काशिराज नेहमी मरहूम नबाबांच्या म्हणजे शुजाउद्दौल्याच्या हुजूरांत असे. माझ्यावर त्यांची कृपा असे. त्यांनीं स्वतः भवानीशंकर पंडित यास सांगितलें कीं हे (मी, काशिराज) पण दक्षिणचे आहेत. शुजाउद्दौल्याच्या समोरच माझी आणि भवानीशंकरची भेट झाली आणि आम्ही दोघेहि एका जातीचे आणि एकाच गांवाचे रहिवाशी आहोत हें आम्हाला समजलें. मी शुजाउद्दौल्याच्या पदरीं आहे ही हकीकत भवानीशंकरानें सदाशिवभाऊस सांगितली. भाऊनें माझ्याकरितां मराठींत पत्र पाठविलें होतें. पत्राचा मायना बरोबर नव्हता म्हणून मीं त्याचें उत्तर धाडलें नाहीं. भाऊनें भवानीशंकराला विचारलें कीं अमक्या-अमक्यानें उत्तर कां धाडलें नाहीं. भवानीशंकरानें सांगितलें कीं मुन्शीनें पत्र व्यवस्थित लिहिलें नव्हतें. यावर भाऊ मुन्शीवर रागावला. आणि व्यवस्थित लिहिण्याबद्दल त्याला ताकीद दिली.

राजा देवीदत्त यानें भाऊपाशीं पुष्कळ बोलणीं केलीं पण त्यानें भाऊचें समाधान झालें नाहीं. त्यानें भवानीशंकराबरोबर सांगून पाठविलें कीं देवीदत्त हा क्षुद्रवृत्तीचा माणूस आहे. तुमच्या आणि माझ्या विश्वासास हा योग्य नाहीं. तुमचा कोणी खास मुत्सद्दी पाठवा. आणि या पुढें तुमचा काय सल्ला आहे हें त्याच्या मार्फतीनें कळवा.

त्याचवेळी मल्हारराव आणि सूरजमल यांच्याकडून शुजाउद्दौल्याला अशाच अर्थाचीं पत्रें आलीं.

शुजाउद्दौल्यानें सगळी हकीकत जशीच्या तशी नजीबुद्दौला आणि वजीर शहावलीखान यांस सांगितली. त्यांच्या सल्ल्याप्रमाणें त्यानें मराठा सरदारांशीं बोलणीं केलीं. नजीबुद्दौल्यानें बोलणीं मोडावी याबाबत सर्व उपाय केले. पण शहावलीखान म्हणाला "तुमच्या मार्फतीनें तह होत असेल तर उत्तम. मी कबूल आहे आणि बादशहाची संमति मिळविण्याची जबाबदारी मी घेतो." सारांश शहावलीखान हा थोडासा नजीबुद्दौल्याच्या विरुद्ध होता.

शेवटीं आपसांत सल्ला मसलत करून त्यांनीं महमद याकूतखान नांवाचा खोजा हुशार आणि धोरणी होता त्याला भाऊकडे पाठविलें. शुजाउद्दौल्याकडून म्हणून खालील निरोप भाऊकडे धाडण्यांत आला. "खरोखरीच तुमच्या आणि आमच्या घराण्यांत पूर्वापार स्नेह चालत आला आहे. आतां माझें येणें या स्थळीं झालें आहे. परवान वांचून मी येथून निघूं शकत नाहीं. आणि तसें करणें योग्य पण नाहीं. तरी पण मी स्नेहभावास अनुसरून सल्लामसलत आणि माहिती देण्यांत कसूर करणार नाहीं. तुम्ही माझा सल्ला विचारीत आहात तर मी म्हणेन कीं तुम्ही उत्तर-हिंदुस्थानांतील राजे आणि नबाब यांच्या पद्धतीनें लढूं नका. तुमच्या गनिमी-काव्याच्या पद्धतीनें लढा. तोफखाना आणि जड सामान एके ठिकाणीं पाठवून द्या. आणि तुम्हाला तह हवा असेल तर त्याप्रमाणें पावलें टाकण्यांत येतील."

सूरजमलला त्या लोकांनीं सांगून पाठविलें तें असें "तुम्ही जमीनदार आहात. या संकटांत स्वतःला पाडून घेण्याची जरूर काय? जमेल त्या मार्गांनी आपल्या स्वस्थळीं निघून जा कसें." सूरजमलला तसेंच वाटत होतें. त्यानें लिहून कळविलें कीं मी तुमचा सेवक आहे. तुम्ही सांगता तसें वागेन.

भाऊनें उत्तरांत लिहिलें कीं आपण हें काय लिहिलेत. जशी मसलत आम्हाला योग्य वाटेल तशी आम्ही करूं. शहा दुराणींत आणि आमच्यांत कलह असण्याचें कारण नाहीं. बादशहानीं आपल्या देशी जावे. अटकेपलीकडे त्यांचा अंमल राहील. अटकेअलीकडे हिंदुस्थानी सरदार राहतील आणि मुलुखाची व्यवस्था काय करायची ते आपसांत ठरवितील. हें कबूल नसेल तर लाहोरपर्यंत अहमदशहाचा अंमल रहावा. त्याच्या अलीकडे आमचा राहील. अगदीं शेवटचें म्हणून भाऊनें सांगितलें तें हें कीं सिरहिंदपर्यंत अहमदशहाचा अंमल राहावा आणि त्याच्या अलीकडे हिंदुस्थानी सरदारांची हुकमत राहील.

यानंतर याकूतखान निरोप घेऊन परत आला.

सूरजमल, मल्हारराव इत्यादि सरदारांचा तळ दिल्लीपासून सहा कोसावर बदरपुर येथें होता. दुसऱ्या दिवशीं मल्हारराव वगैरे सरदारांच्या इषाऱ्यानें सूरजमलनें उठविलें कीं आपण येथून जवळच कूच करून छावणी करणार आहोंत. त्यानें आपले बाजारबुणगे आणि इतर सामान आपल्या ताब्यांतील किल्ल्याकडे पाठविलें. तें सामान बारा कोसावर जाऊन पोहोंचलें आहे याची खात्री करून घेतल्यावर सूरजमल स्वतः स्वार होऊन आपल्या किल्ल्याकडे निघून गेला. भाऊला बातमी कळली तोपर्यंत सूरजमल दूर निघून गेला होता. एक रात्र आणि एक दिवस या अवधींत तो पन्नास कोसांची मजल मारून आपल्या किल्ल्यांत दाखल झाला. भाऊला बातमी कळली. त्यानें पर्वा केली नाहीं. उलट तो म्हणाला "एक जमीनदार निघून गेल्यानें काय होणार. विजय मिळाल्यावर पाहून घेऊं."

याकूतखान दुराणीच्या फौजेंत परत आला. त्यानें सगळी हकीकत सांगितली. त्याला मार्गदर्शन करण्यांत आलें नाहीं. त्यामुळें उभय पक्षांतील बोलणीं रेंगाळू लागलीं.

आतां पावसाळा संपू लागला होता. भाऊनें दिल्लीहून कुंजपुऱ्याकडे कूच केलें. कुंजपुरा दिल्लीपासून पन्नास कोसांवर असून यमुनेच्या कांठावर आहे. तेथें सिरहिंद वगैरे भागांतून आलेले दुराणीच्या सैन्यांतील वीस तीस हजार अफगाण रोहिले इत्यादि गोळा झाले होते. भाऊनें कुंजपुरा उध्वस्त केला. अफगाण रोहिल्यापैकीं अनेक लोक मारले गेले. समदखान, कुतुबखान वगैरे प्रसिद्ध अफगाण सरदार कैद होऊन मारले गेले. भाऊनें कुंजपुऱ्याचा किल्ला हल्ला करून घेतला. आणि दलेलखान वगैरे सरदार पाडाव होऊन मारले गेले. नदीला पूर असल्यामुळें शहा दुराणीकडून कांहीं मदत होऊं शकली नाहीं. अहमदशहाला कुंजपुऱ्याची हकीकत कळली तेव्हां तो अतिशय अस्वस्थ झाला.

दसऱ्याच्या एक दिवस अगोदर त्यानें आपल्या सैन्याची रचना केली. दसऱ्याच्या दिवशीं त्यानें एक उंच जागेवर थांबून प्रथम स्वतःच्या फौजेची पाहाणी केली. सैन्याचें चोवीस दस्ते ( पथकें ) मोजण्यांत आले. प्रत्येक दस्त्यांत बाराशे स्वार असत. बादशाही सैन्यांतील प्रमुख सरदारांचा तपशील खालीलप्रमाणें आहे.

मुख्य वजीर शहावलीखान, सरदार जहानखान, शहापसंदखान, नसीरखान बलोच, बरखुर्दारखान, वजीरुल्लाखान किजलबाश, मुरादजान मोगल. याशिवाय अनेक लहानमोठे सरदार होते.

वरील चोवीस दस्त्यापैकीं सहादस्ते बादशाहाच्या गुलामांचे होते. बादशहाच्या तळाभोंवती चोहीकडे अर्ध्या कोसाच्या अंतरावर या पल्टणींचे तळ असत. त्यांच्या भोंवतीं सरदारांचे तळ असत.

दोन हजार उंट जंबूरक (लहान तोफा) वाहून नेणारे होते. प्रत्येक उंटावर दोन जंबूरची असत. चाळीस तोफा आणि कांहीं शुतरनाळे फौजेंत होतें. हें सर्व अहमदशहाचें स्वतःचें सैन्य होतें. शुजाउद्दौल्याबरोबर दोनहजार पायदळ आणि दोनहजार स्वार आणि वीस लहानमोठया तोफा होत्या. नजीबुद्दौल्याबरोबर सहाहजार स्वार आणि आठहजार पायदळ होते. आणि बरीच युद्ध सामग्री होती. दूंदेखान व हाफिज रहमतखान यांच्याबरोबर पंधरा हजार पायदळ आणि तीन चार हजार स्वार आणि कांहीं तोफा होत्या. फरुखाबादेचा अहमदखान बंगश याजपाशीं दोन हजार स्वार आणि पायदळ आणि कांहीं तोफा होत्या. म्हणजे अफगाणाकडे एकंदर सैन्य पंचेचाळीसहजार स्वार आणि तीसहजार पायदळ असें होते. यापैकीं तीसहजार स्वार आणि दोनहजार काबुली शेरबचा जंबूरक स्वार बादशहाचे स्वतःचे होते. सरकारी दप्तरखान्याच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करून ही माहिती गोळा करण्यांत आली

आहे. याशिवाय सरकारी कोठारांतून रसदेचा पुरवठा करणारे यांच्याकडून हीच माहिती मिळाली.

याशिवाय यतीम शिपाई असंख्य होते. प्रत्येक दुराणी स्वाराबरोबर दोन दोन चार चार यतीम (दुसरा कोणताच आधार नसलेले अनुचर) असत. त्यांचे घोडे आणि इतर सामान इतर दुराणी शिपायांच्याप्रमाणें असें. हे यतीम स्वार शूर, व मजबूत होते. त्यांचे घोडे चपळ आणि मजला मारण्यांत निष्णात असत. लढाईत प्रथम दुराणीस्वार हल्ला करीत. नंतर हे यतीम स्वार शत्रूवर तुटून पडत. आणि लुटालूट आणि हाणमार करून शत्रूचा निकाल लावीत. पण खरे बादशाही सैन्य वर लिहिल्याप्रमाणें होतें.

फौजेची पाहाणी केल्यानंतर दुराणीनें आज्ञा केली कीं सैन्यानें तयार राहावें. उद्यां येथून कूच करणें आहे.

तिकडे भाऊला खबर लागली कीं दुराणी शहानें आपल्या फौजेची पाहाणी केली आहे. त्यानेंहि कुंजपुरा फत्ते झाल्यावर आपल्या सैन्याची चांचणी केली. मराठ्यांच्या फौजेचा तपशील असा—

इब्राहीमखान गार्दी दोन हजार स्वार आणि नऊ हजार गार्दी पायदळ दोनळी बंदुकींनीं युक्त आणि चाळीस तोफा.

हुजरातीचें पथक सहा हजार स्वार, मल्हारराव होळकर पांच हजार स्वार, जनकोजी शिंदे दहा हजार स्वार, दमाजी गायकवाड तीन हजार स्वार, यशवंतराव पवार दोन हजार स्वार, शमशेर बहादुर तीन हजार स्वार, पिलाजी जाधवाचा मुलगा तीन हजार स्वार, विठ्ठल शिवदेव तीन हजार स्वार, भाऊचा मेहुणा आणि कारभारी बळवंतराव, सात हजार स्वार, विश्वासराव खास पागा पांच हजार स्वार, अंताजी माणकेश्वर दोन हजार स्वार, इतर पथकें कुटपर्यंत म्हणून आठवावींत. एकंदरींत पंचावन्न हजार तडफदार स्वार, आणि पंधरा हजार पायदळ (गार्दी धरून), दोनशे तोफा, आणि बाण, शुतर नाळे आणि इतर युद्धसामग्री अगणित होती. शिवाय चहूकडे फिरून हूल उठविणारे आणि लूटमार करणारे असे जवळ जवळ वीस हजार स्वार शिपाई होते. याशिवाय राठोड आणि कछवाहा राजांच्या वकीलांबरोबर दोन तीन हजार स्वार होते. नारोशंकराकडे दिल्लीचा बंदोबस्त देण्यांत आला होता त्याच्याबरोबर पांच सहा हजार स्वार देण्यांत आले होते. सदाशिवभाऊनें जणू काय सारे दख्खन आणलें होतें. त्याच्याबरोबर वरीलप्रमाणें सैन्य होतें.

शहा दुराणीनें दसऱ्याच्या दिवशीं शहादरा येथें डेरे दिले. नंतरचा दिवस म्हणजे रबिलावल महिन्याची दहा तारीख होती. त्या दिवशीं भोजन करून अहमद

शहा स्वार झाला आणि त्यानें फौजेला कूच करण्याची आज्ञा केली. बाजार बुणगे मागाहून यावे अशी आज्ञा झाली. स्वतः अहमदशहा रातोरात मजल मारून यमुनेच्या कांठावर बागपत येथें पोहोंचला. बागपत हे दिल्ली पासून सोळा कोसावर आहे. तेथें त्यानें तळ दिला. दुसऱ्या दिवशीं त्यानें नदीच्या अगदीं कांठावर एक लहानसा तंबू दिला. तेथें राहून त्यानें नदीला उतार सांपडतो कीं काय याचा शोध घेण्यास सुरवात केली. बरेच लोक पाण्यांत उतरले होते ते बुडाले. अहमदशहानें दोन दिवस पर्यंत उपास आणि अनुष्ठानें केलीं. कुराणाचे मंत्र कागदावर लिहून ते पाण्यांत टाकले. तिसऱ्या दिवशीं नदीला एकाएकी उतार सांपडला. पण ती वाट अरुंद होती. इतकी कीं जरा कोणी इकडे तिकडे भटकला कीं बुडून जाई.

रबिलावलच्या पंधरा तारखेपासून सैन्यानें नदी पार करण्यास सुरवात केली. अर्धी फौज ओलांडून गेल्या नंतर कांहींसे घाई मुळें आणि कांहींसें असंख्य सैन्याच्या गर्दीमुळें कित्येक लोक बुडून मेले. १७ रबिलावल्ला नदी पार झाल्यावर मराठ्यांचीं हरावल ( अघाडी ) ची पथकें दृष्टिपथांत आलीं. इकडूनहि सैन्य पुढें झालें. दोन्हीं दळांत युद्ध झालें. उभय पक्षाचीं जवळ जवळ दोन हजार माणसें मारलीं गेलीं. संध्याकाळच्या सुमारास मराठ्यांची फौज मागें हटलीं. बादशाही फौज छावणीकडे परत आली. दुसऱ्या दिवशीं अहमदशहानें पुढें कूच केलें. रोज अघाडीच्या पथकांच्या चकमकी होत आणि दक्षिणी मागें हटत. असें होत होत अहमदशहा पानीपतपर्यंत पोहोंचला. सदाशिव भाऊनें पानीपत गांव मध्यें घेऊन आपली छावणी केली. छावणी भोंवती त्यानें वीस गज रुंद आणि हत्ती एवढा खोल खंदक खणला. त्यानें ठिकठिकाणी तोफा चढविल्या.

तेथून तीन चार कोसावर शहा दुराणीनें आपला तळ दिला. प्रत्येक मुक्कामाला दुराणी फौजेची साधी छावणी असे. छावणी भोंवतीं जंगलांतील मिळतील तीं लांकडें आणून रोवीत. पण आतां अहमदशहानें आपला तळच ठोकला त्यामुळें छावणी मोठीच तयार करण्यांत आली. बादशहाच्या डाव्या बाजूस शुजाउद्दौल्याचे डेरे होते. त्याच्या डावीकडे नजीबुद्दौल्याचे डेरे होते. उजवीकडे हाफिज रहमत, दूंदेखान, अहमदखान बंगश इत्यादींचे तळ होते. एकंदर तळ साडेतीन कोसांचा होता.

गोविंद पंडिताकडे इटावा, शिकोहाबाद आणि अंतर्वेदींतील मुलुख होता. याशिवाय काल्पीपासून सागरपर्यंतचा मुलुख त्याच्या रास्त अंमलाखालीं होता. त्याला सदाशिव भाऊनें आज्ञा केली होती कीं तुम्हीं आपलें आणि इतर जमेल ते सैन्य घेऊन शहा दुराणीच्या पिछाडीवर यावे आणि अहमदशहाची रसद तोडावी. त्याप्रमाणें गोविंदपंतानें बारा हजार स्वार घेतले. तो दिल्लीच्या बाहेर पडला. त्यानें नदी ओलांडून मीरठ पर्यंतचा मुलुख उध्वस्त केला. यामुळें अहमदशहाच्या छावणींत रसदेची इतकी टंचाई झाली कीं धान्याची धारण दोन रुपायाला एक शेर अशी

झाली. दोन दिवसपर्यंत अशी परिस्थिति होती. अहमदशहानें शहावलीखानाचा चुलत भाऊ अताईखान याला दोन हजार स्वार बरोबर घेऊन गोविंदपंतावर तावडतोब चाल करून जाण्याची आज्ञा केली. अताईखानाच्या दस्त्याच्या बरोबर दहा हजार यतीम शिपाई पण लुटीच्या आशेनें त्याच्या बरोबर निघाले. अताईखान वाटेंत कोठेंहि न थांबता भल्या पहाटे गोविंदपंतावर तुटून पडला. मराठ्यांची फौज उधळून गेली. अनेक मारले गेले आणि कित्येक जखमी झाले. गोविंदपंत शरीरानें स्थूल होता आणि घोड्याच्या स्वारीचा त्याला सराव नव्हता. धांवपळींत तो घोड्यावरून खालीं आला, आणि दुराणींच्या हातीं सांपडला. त्याचें डोकें कापण्यांत आलें. आणि मग समजलें कीं तो गोविंदपंत होता. सारांश मराठ्यांची फौज गारत झाली. चवथ्या दिवशीं अताईखान हा गोविंदपंतांचें शिर आणि शत्रूंची लूट घेऊन अहमदशहापाशीं आला. अहमदशहानें त्याची तारीफ करून त्याच्यावर कृपेची वृष्टि केली. ही बातमी ऐकून सदाशिवभाऊ हा अत्यंत कष्टी आणि अस्वस्थ झाला. याशिवाय दोन ठिकाणाहून त्याला दुर्घटनेचें वृत्त कळलें. पण तो शूर आणि हिंमतवान होता. त्यानें या गोष्टीची पर्वा केली नाहीं.

दुर्घटना घडली ती ही कीं भाऊनें दिल्लीहून खजिना आणण्यास गुप्तपणें दोनहजार स्वार पाठविले होते. त्यांनीं नारोशंकराकडून खजिना घेतला. प्रत्येकानें एकएक हजार रुपये बरोबर घेतले होते. ते भाऊच्या छावणीकडे निघाले. रात्र अंधारी होती. ते रस्ता चुकून अहमदशहाच्या छावणींत शिरलें. बादशाही सैन्यानें सर्वांना लुटलें आणि अनेकांना ठार मारलें. या घटनेनें भाऊचा धीर खचला. आणि तो चिंताक्रांत झाला.

छावणी कायम केल्यानंतर अहमदशहानें आपल्या तळासमोर एक कोसाच्या अंतरावर एक तांबड्या रंगाचा तंबू उभा केला. तेथें तो सकाळीं येऊन नमाज पढे. नंतर तो कामाला लागे. बादशहाच्या डावीकडे शहावलीखान चारहजार स्वारांनिशी, आणि उजवीकडे एक सरदार तितक्याच स्वारांनिशी उभे राहात. अहमदशहा आपला मुलगा तैमूरशहा आणि चाळीसपन्नास स्वार बरोबर घेऊन छावणीच्या भोंवती पाहणी करीत फिरे. आणि सगळ्या सरदारांच्या तळाची तपासणी करी. यानंतर मराठयांच्या छावणीला वळसा घालून नंतर तो दुपारीं आपल्या तांबड्या तंबूंत येई. दुपारचें जेवण तो कधीं तेथें तर कधीं आपल्या मुख्य डेऱ्यांत घेत असे. अशा रीतीनें तो रोज पन्नास कोसांची मजल मारी. अनेक वेळा तो मराठ्यांच्या छावणी भोंवती हिंडून येई. त्यानें पांच हजार स्वार नेमले होते. ते लष्करापासून एक कोसावर रात्रभर पहारा देत फिरत. छावणीचें रक्षण करण्याकरितां अशींच इतर पथकें नेमण्यांत आलीं होती. तो सर्वांना म्हणे कीं तुम्ही आरामांत झोपा. मी सगळीं काळजी घेईन. ही व्यवस्था सतत चालू असे. अहमदशहाचा हुकुम म्हणजे जणूं मृत्यूचा हुकुमच.

रोज उभय पक्षांच्या चकमकी होत. तोफा आणि बंदुका यांची मारगिरी चाले. संध्याकाळीं उभय दळें आपापल्या छावण्यांत परत जात; असें दोन महिने वीस दिवसपर्यंत चाललें होतें. रोज शेकडों मराठ्यांचीं डोकीं कापून आणींत.

या अवधींत उभय दळांत तीन निकराच्या लढाया झाल्या.

पहिल्या खेपेस म्हणजे रबिउस्सानी महिन्याच्या बावीस तारखेस असें झालें कीं वजीर शहावलीखान हा डावीकडे आपल्या तळावर होता. संध्याकाळच्या सुमारास तो बाहेर पडला. पानीपत गांवाच्या दक्षिणेस एक विहीर होती. ती तो पाहात होता. त्याच्या बरोबर जुजबी सैन्य होतें. हा कोणी तरी मोठा सरदार आहे हें मराठ्यांनीं ओळखलें. दहा हजार मराठे स्वार त्याच्यावर तुटून पडले. शहावलीखानाची परिस्थिति अत्यंत आणीबाणीची झाली. ही बातमी बादशहाच्या छावणींत पोहोंचताच शुजाउद्दौला आणि नजीबुद्दौला आणि बादशाही सैन्यहीं शहावलीखानाच्या मदतीस धांवलीं. उभय पक्षांत घनघोर युद्ध झालें. तीन चार घटिका युद्ध होऊन उभय दळांतील तीन चार हजार माणसें ठार अगर जखमी झालीं. प्रथम मराठ्यांना जय मिळाला. इतक्यांत शहावलीखानाला मदत आली. आणि त्याच वेळी सूर्यास्त झाला. मराठ्यांची फौज मागें हटली. बादशाही फौजेनें त्यांचा छावणीपर्यंत पाठलाग करून अनेकांना ठार मारलें.

दुसरें युद्ध जमादिलावल महिन्याच्या अठरा तारखेस झालें. नजीबुद्दौल्याच्या मोर्च्यांतील फौजेनें आक्रमण केलें. संध्याकाळच्या सुमारास भाऊचा मेहुणा बळवंतराव हा आपल्या सैन्यासहित त्यांच्यावर तुटून पडला. हा हल्ला इतक्या निकराचा होता कीं नजीबुद्दौल्यापाशीं फक्त पन्नास स्वार राहिले. तरी तो ठाण मांडून राहिला. या सुमारास दोघांनाहि कुमक येऊन पोहोंचली. रात्रीची एक घटिका होईपर्यंत मोठी निकराची लढाई चालली होती. नजीबुद्दौल्याचा चुलता खलीलुल्लाखान हा मोठी मर्दुमकी गाजवीत असतां ठार झाला. त्या दिवशीच्या युद्धांत नजीबुद्दौल्याची दोन तीन हजार पेक्षां जास्त माणसें ठार झालीं अगर जखमी झालीं. शेवटीं बळवंतराव जंबूरकची गोळी लागून ठार झाला. नंतर उभय दळें आपापल्या स्थळीं परत गलीं.

तिसऱ्या खेपस अशीच घटना घडली. रोज सकाळपासून तो रात्रीचा एक प्रहर होईपर्यंत उभयदळांत चकमकी आणि गोळागोळी होई. हिंदुस्थानी सरदार कंटाळून गेले. त्यांनीं पुन्हां पुन्हां बादशहाला म्हटलें कीं असे किती दिवस चालायचें. आतां हल्ला करावा. जें व्हावयाचें तें होईल. अहमदशहा म्हणाला "हें युद्धाचें प्रकरण तुम्हाला समजत नाहीं. ते सगळें मी करीन. बाकीच्या गोष्टी तुम्ही पाहून घ्या. तुम्ही पहा मी शत्रूचा निकाल कसा लावतो तें. योग्य वेळेवर जें करावयाचें तें करूं. बादशहानें मराठा छावणीच्या भोवतीं चार चार हजार स्वारांचीं पथकें लावून दिलीं होतीं. रात्रंदिवस टेहेळणी करून शत्रूकडे रसद मुळीच पोहोंचूं द्यायची नाहीं असें त्यांना

बजावण्यांत आलें होतें. यामुळें मराठ्यांच्या फौजेंत अन्नाचा दुष्काळ पडला. चाराहि दुआबांतून येणें कमी झालें. त्यामुळें मराठी फौजेची स्थिति हलाकीची झाली.

एके दिवशीं रात्रीं जवळ जवळ वीस हजार मराठे स्वार आणि कहींचे लोक रसद आणण्यास बाहेर पडले होते. जेथें ते पोहोंचले त्या जंगलांत शहापसंदखान आपल्या पांच हजार स्वारानिशीं होता. मराठ्यांना याची कांहींच कल्पना नव्हती. अफगाणांनीं एकाएकी मराठ्यांवर हल्ला करून त्यांना ठार मारले. रात्र असल्यामुळें भाऊ कडून कुमक येऊ शकली नाहीं. मराठ्यांचीं हजारो माणसें मारलीं गेलीं. दुसऱ्या दिवशीं अहमदशहाला ही खबर लागली. तो स्वतः स्वार होऊन त्या स्थळीं गेला. पाहातों काय कीं तेथें प्रेतांच्या राशी पडल्या होत्या. भाऊला ही बातमी कळून तो कष्टी झाला. त्याचा धीर सुटला.

भाऊच्या तर्फे गणेशपंडित नांवाचा अखबार नवीस शुजाउद्दौल्यापाशीं होता. तो स्वतः शुजाउद्दौल्यापाशीं पोहोंचू शकत नव्हता, माझ्या मार्फतीनें तो कामें काढून घेत असे. सदाशिवभाऊ नेहमीं मला स्वतः पत्रें लिही आणि आपल्या खिदमतगाराच्या हातानें माझ्याकडे पाठवी. त्यांतील मजकूर हा असें कीं कसेहि करून शुजाउद्दौल्याचें मन वळवा आणि शहावली खानाच्या संमतीनें तह घडवून आणा. हें झालें आणि आम्ही सुरक्षित राहिलों तर तुमचे हरप्रकारें अगत्य करू. तुम्ही जें ठरवाल तें मला कबूल आहे. भाऊनें स्वतःचा केशर लाविलेला पंजा करारनाम्यावर ठसवून तो पाठविला. त्याबरोबरच शिरपेंच, जडावाचा तुरा आणि आपलें पागोटें त्यानें शुजाउद्दौल्याकडे पाठविलें. इकडूनहि शुजाउद्दौल्यानें वस्त्रालंकार पाठविले. शुजाउद्दौल्यानें ही हकीकत शहावलीखान यास सांगण्याकरितां मला पाठविलें. शहावलीखान तहाच्या गोष्टीला अनुकूल होता. त्यानें अहमदशहापाशी विनंती केली. अहमदशहा म्हणाला कीं मला या सगळ्या गोष्टीशीं कर्तव्य नाहीं. मी परमेश्वराच्या इच्छेनें आपले धर्मबांधव मुसल्मान आणि जातिबांधवाच्या मदती करितां या देशांत आलों आहे. युद्ध लढविणें माझ्याकडे आहे. बाकीच्या गोष्टींत येथील मंडळी मुख्त्यार आहेत. रोहिले सरदार हाफिज रहमत, दूंदेखान, अहमदखान बंगश हे सगळे तहाला राजी होते. शहा व शहावलीखान म्हणाले कीं नजीबुद्दौल्यानें कबूल केलें तर आम्हालाहि कबूल आहे.

त्याप्रमाणें शुजाउद्दौल्यानें नजीबखानाशीं बोलून त्याची संमति मिळविण्याकरितां मला मध्यरात्रीं नजीबखानाकडे पाठविलें. आज्ञेप्रमाणें मी गेलों. नजीबुद्दौला एकटाच होता. मी सगळ्या गोष्टी सांगोपांग सांगितल्या. नजीबुद्दौला म्हणाला "शुजाउद्दौला हे माझ्या मालकांचे चिरंजीव (साहेब जादे) आहेत. त्यांना मी आपले मालक समजतो. पण ते तरुण आहेत. ते सगळ्या गोष्टी समजून घेत नाहींत. या प्रकरणांत दगा आहे. शत्रू जेरीस आला तर काय काय अजीजी करीत

नाहीं. तो कोणत्याहि गोष्टीला कबूल होईल. पण शपथा म्हणजे सांखळ्या नव्हत कीं त्यांचा गळयाला फांस पडेल. शत्रू इतक्या जेरीला आल्यावर तुम्ही त्याला जाऊं दिलेत तर तो पुढें सूड घेण्याकरितां वाटेल ते उपाय योजणार नाहीं का. या वेळीं सारे दख्खन येथें जमलें आहे. पुन्हां ते केव्हां असेंच आमच्या तावडींत सांपडेल. एका हल्लयांत हा कांटा काढून टाकतां येण्यासारखा आहे. नबाब साहेबांनीं थोडा दम धरावा. मी स्वतः हजर होऊन सगळें कांहीं सांगेन आणि काय सल्ला ठरेल तो अंमलांत आणीन. ”

या संभाषणानंतर मी परतलों. शुजाउद्दौल्याला सगळी हकीकत सांगून मी त्याला म्हटलें कीं नजीबुद्दौल्याचें मत तहाला मुळीच अनुकूल नाहीं, आणि होणारहि नाहीं. नजीबुद्दौल्यापासून मी बाहेर निघाल्यानंतर, तो त्याच वेळीं घोड्यावर स्वार होऊन अहमदशहाकडे गेला. त्यानें अहमदशहाला सगळी हकीकत सांगून म्हटलें कीं सगळे जण तहाला राजी आहेत. पण मला हें पटत नाहीं, हिंदुस्थानांत हा एकच कांटा ( मराठे ) आहे. तो काढून टाकला तर सारें हिंदुस्थानचें साम्राज्य तुमचें आहे. याउपर तुमची जी मर्जी असेल तें करा. मी शिपाई मनुष्य आहे. त्यांचें ( मराठ्यांचें ) वर्चस्व झालें तर त्यांना जाऊन मिळेल.

अहमदशहा म्हणाला, “ तुम्ही म्हणतां तेंच खरें, या बाबतींत तुमचेंच म्हणणें मी मानीन. दुसऱ्या कोणाचेंहि मानणार नाहीं. शुजाउद्दौला तरुण आहे. त्याला जगाचा अनुभव नाहीं. शत्रू ( मराठे ) हे कोल्ह्याच्या वृत्तीचे आहेत. तुमचें ऊर्जित व्हावें हें त्यांना पसंत नाहीं. मी तुम्हांला पहिल्या दिवसापासून मुखत्यार केलें आहे. तुम्हाला योग्य वाटेल तें करा. सगळ्यांचें ऐकणें हें राजकारणाला धरून आहे. पण तुमच्याशिवाय मी कुणाचाहि सल्ला मानणार नाहीं. दुसऱ्या दिवशीं नजीबुद्दौला शुजाउद्दौल्याकडे आला. अर्धरात्रीपर्यंत त्यांचीं बोलणीं चाललीं होतीं.

या सुमारास भाऊच्या लष्करांत भयंकर उपासमार झाली. त्यांनीं पानीपतचें गांव धुवून काढलें. पण एवढ्या मोठया फौजेला तें काय पुरें पडणार. शेवटी सैन्यांतील सरदार आणि शिपाई भाऊकडे गेले, आणि म्हणाले कीं दोन दिवसांपासून कोणालाहि अन्नाचा कण मिळाला नाहीं. दोन रुपये देऊनहि धान्याच्या एक शेर मिळत नाहीं. अशा हलाकीपेक्षां शत्रूशीं लढणें बरें. जें नशिबांत असेल तें होईल. सदाशिवराव म्हणाला कीं मी सुद्धां हाच निश्चय केला आहे. तुम्ही लोक जे ठरवाल त्याच्या बाहेर मी नाहीं. मध्यरात्रीपर्यंत हा खल चालला होता. शेवटीं युद्ध करावें असा निर्णय घेण्यांत आला. आणि असें ठरलें कीं उद्यां पहाटे दोनप्रहर रात्र राहिली असतां तोफखाना समोर घेऊन निघावें आणि शत्रूवर तुटून पडावे. प्रत्येकानें हा निर्णय घेऊन निरोपाचा विडा उचलला. आणि नंतर बैठक संपली. भाऊनें त्याचवेळीं स्वहस्तानें

एक पत्र लिहिलें कीं आतां पाणी डोक्यावरून गेलें आहे. आतां कांहींतरी करण शक्य असेल तर करा. नाहीं तर तसें स्पष्ट कळवा. यापुढें लिहिणें बोलणें याला वेळ मिळणार नाहीं. भाऊचा खिदमतगार बाळकराम नांवाचा होता. भाऊ त्याच्याकडून विडा लावून घेत असे. त्याच्याबरोबर भाऊनें पत्र पाठविलें. तो रात्रीचा एकप्रहर शिल्लक राहिला असतां आला. त्यावेळीं मी शुजाउद्दौल्यापाशीं होतों. पत्र पाहून मी त्याचा मजकूर शुजाउद्दौल्याला सांगितला. आणि बाळकरामाला शुजाउद्दौल्या समोर उभा केला. त्यानें सगळी हकीकत सांगितली. त्याचवेळीं हरकाऱ्यांनीं बातमी आणिली कीं तिकडे युद्धाची तयारी झाली आहें. आणि सारे सैन्य तोफखाना पुढे ठेवून त्याच्या पाठोपाठ स्वार होऊन येत आहे. त्यावेळी रात्रीच्या चार घटिका राहिल्या असतां ही बातमी ऐकतांच शुजाउद्दौला घोड्यावर स्वार होऊन बादशहाच्या तंबूकडे गेला. त्यानें तंबूच्या खोजासराला सांगितलें कीं बादशहाला लवकर उठवा. जरूरीची बातमी द्यायची आहे. हें ऐकतांच बादशहा महालांतून बाहेर आला. त्यानें विचारलें कीं काय परिस्थिति आहे. शुजाउद्दौल्यानें म्हटलें कीं बोलण्याची ही वेळ नाहीं. आपण तावडतोब स्वार व्हा आणि फौजेला तयारीचा हुकुम द्या. बादशहाच्या तंबूपाशी घोडे नेहमी तयार ठेवलेले असत. बादशहानें अंगावरील पोशाक न बदलता त्याच पोशाकांत घोड्यावर स्वार होऊन कूच केले. आपल्या तळाच्यासमोर तो अर्धा कोस आला. तेथें त्यानें सैन्याला तयार होण्याचा हुकुम सोडला.

नंतर अहमदशहानें शुजाउद्दौल्याला विचारलें कीं ही बातमी तुम्हाला कोठून मिळाली. शुजाउद्दौला म्हणाला कीं ही बातमी मला माझ्या एका कारभाऱ्यांकडून मिळाली. अहमदशहा म्हणाला कीं तो कोठें आहे. त्याला बोलवा. एक शुतर सवार (उंटस्वार) पाठवून मला बोलावण्यांत आले. मी येऊन शुजाउदौल्याच्या जवळ उभा राहिलों. अहमदशहानें विचारलें कीं काय खबर आहे. मी सांगितलें कीं ते लोक तयार झाले आहेत. लवकरच युद्ध पेटेल.

त्याच वेळेला कांहीं दुराणी स्वार तेथ येऊन म्हणाले कीं आम्ही छावणींत होतो. मराठ्यांना आम्ही पळवून त्यांचें सामान लुटून आणिलें आहे. यावर बादशहानें माझ्याकडे पाहून म्हटलें कीं हें लोक काय म्हणत आहेत. त्यावर मी म्हणालों कीं जें आहे तें आतां दिसूनच येईल. खरें खोटें काय तें कळून येईल.

हीं बोलणीं चालू होतीं. मराठ्यांचें सैन्य आपल्या छावणीच्या समोर दीड कोसावर आलें. त्यांनीं आपल्या तोफा सांखळ्यांनीं बांधल्या होत्या. त्यांनीं तोफांचा एक मारा केला. तोफांचा आवाज ऐकल्यावर अहमदशहानें आपले पाय ओढून घोड्यावर घेतले. त्यानें आपले पागोटे आपल्या मांडीवर घेतले. हुक्क्याचा एक दम भरून तो त्यानें आपल्या खिदमतगाराला दिला. पागोटे (कुलाह) आपल्या डोक्यावर चढविलें आणि शुजाउद्दौल्याकडे पाहून त्यानें म्हटले "तुझ्या दिवाणानें

सांगितलें तें खरें ठरलें " मग अहमदशहानें शहापसंदखानाला बोलाविलें. तो आपल्या गोटांत होता. त्यानें नजीबुद्दौल्याच्या डावीकडे उभे राहावे असें बादशहानें त्याला फर्माविलें. मुख्य वजीरानें सैन्याच्यामध्यें आपल्या पथकासहित राहावें, आणि एका सरदारानें हाफिज रहमतखान, दूंदेखान वगैरेंच्या म्हणजे सैन्याच्या उजव्या बाजूस राहावें असा त्यानें हुकुम दिला.

तोपर्यंत सूर्याचीं किरणें पसरूं लागलीं होती. मराठ्यांचे ध्वज दिसू लागले. त्यांनीं तोफखाना आपल्या तोंडावर टेविला होता. आणि ते दमादमानें पुढें सरकत होंते. अहमदशहा घोड्यावरून आपल्या फौजेची पाहणी करीत हिंडला. सैन्याच्या मुख्य तळापुढे एक कोसावर त्याचा तंबू होता. त्यांत तो दाखल झाला. आणि मग युद्धाला सुरवात झाली. पूर्वेकडे तोंड असलेल्या मराठ्यांच्या सैन्याची रचना खालीलप्रमाणें होती. ( शर्करू ) इब्राहीमखान गार्दी, दमाजी गायकवाड विठ्ठल शिवदेव, भाऊ, विश्वासराव आणि हुजरातीचें पथक, यशवंतराव पवार, शमशेर बहादुर वगैरे सरदार, मल्हारराव, जनकोजी शिंदे. तोफा सांखळ्यांनीं बांधून सगळ्या सैन्याच्या समोर टेविल्या होत्या. याशिवाय युद्धाचीं इतर हत्यारें ( बाण शुतरनाळे वगैरे ) होते.

अहमदशहाचें सैन्य पश्चिमेकडे तोंड करून होतें ( मगरबरूया ) त्यांनींहि तोफा सांखळ्यांनीं बांधून आपल्या समोर ठेविल्या होत्या. बाण वगैरे त्यांनीं तोफांच्या जवळ टेविले होते. जवळच जंबूरकचे उंट उभे करण्यांत आले होते. त्याजवळ शेरबचा अफगाणांचें पायदळ होते. दूंदेखान, हाफिज रहमतखान, त्यांच्यापासून थोड्या अंतरावर अहमदखान बंगश. नंतर शहावलीखान, मग शुजाउद्दौला, नंतर नजीबुद्दौला. नंतर शहापसंतखान. याला नजीबुदौल्याच्या डावीकडे ठेवण्यांत आले होतें. मराठयांनीं तिकडे हल्ला करूं नये हा हेतु होता. दूंदेखानाच्या दळाच्या उजवीकडे बर्खुर्दारखान, अमीरबेगखान वगैरेंचीं पथकें होतीं. ती इब्राहीमगार्दीच्या समोर आणि कांहींशी बाजूला पसरलीं होतीं.

सहा जमादिसानी, पौष शुद्ध अष्टमी १८१७ बुधवारीं तोफा, बाण, आणि बंदुकींचा सारखा मारा सुरू झाला. त्यांच्याकडून तोफा, जंबूरक, बाण वगैरेंतून पावसाप्रमाणें गोळ्यांचा वर्षाव होत होता. पण इकडे कोणी जाया झालें नाहीं. उभय दळें हळुहळु एकमेकाकडे सरकत होतीं. असें होत होत उभयतांमधें फार थोडें अंतर राहिलें. मराटयांच्या तोफा जाड होत्या. त्यांचे गोळ बादशाही छावणीपासून अर्ध्या कोसावर पडू लागले. इकडून फार थोड्या तोफा सोडण्यांत आल्या. पण शहावली-खानाच्या दळाकडून तोफा खूप चालल्या कारण तेथेंच उभय दळांत हाणामारी झाली.

तिकडे इब्राहीमखान गार्दी सदाशिवभाऊच्या समोर गेला आणि म्हणाला " रामराम महाराज, तुम्ही माझ्यावर रागावला होता. कारण मी तुमच्या कडून

पगाराबाबत दरमहा सहा लाख रुपये घेत असे. या महिन्यांत तुमचा खजिना लुटला गेला त्यामुळें आम्हांला पगार मिळाला नाहीं. कांहीं हरकत नाहीं. आज मी आपलें कर्तव्य बजावतों." असें म्हणून तो घोडा उडवीत आपल्या दळांत आला. त्यानें तात्रडतोब हातांत निशान आणि बंदूक घेऊन दूंदेखान व हाफिज रहमतखान याच्या सैन्यावर जोराचा हल्ला केला. थोडावेळ तोफांचे आवाज थांबले. इब्राहीमखानानें दोन पल्टणी अहमदशहाची पथके कांहीं समोर आणि कांही बाजूला होतीं, त्यांच्या तोंडावर ठेवून दिली. त्यांनीं आपल्यावर डाव्या बाजूनें हल्ला करूं नये म्हणून ही योजना होती. उरलेल्या सात पल्टणीनिशी इब्राहीमखान हा रोहिल्यांवर तुटून पडला. इकडूनहि रोहिले पुढें होऊन शत्रूला भिडले. या निकराच्या युद्धांत रोहिल्यांची आठ नऊ हजार माणसें ठार अगर जखमी झालीं. रोहिल्यांचीं स्थिति अत्यंत संकटाची झाली. हाफिज रहमतखान, दूंदेखान व अहमदखान यांजपाशीं फार थोडीं माणसें राहिलीं. शत्रूनें इतक्या जोराचा हल्ला केला कीं रोहिले सरदारांपाशीं हजार पांचशें किंबहुना कमीच माणसें जागेवर राहिलीं. त्या दिवशीं हाफिज रहमतखान आजारी होता. तो पालखींत स्वार झाला. आणि म्हणाला "माझी पालखी दूंदेखानाच्या समोर घेऊन चला. त्याच्यासमोर मला मरण येऊं द्या." युद्ध अतिशय निकराचें झालें. एकाची दुसऱ्याला वार्ता नव्हती. दूंदेखान घोड्यावरून उतरून म्हणाला कीं मित्रानो मला हाफिज रहमतखानाची खबर कळवा.

इब्राहीमखानानें दोन पल्टणी बादशाही फौजेवर हल्ला करण्याकरितां नेमल्या होत्या. त्यांनीं खूप मर्दुमकी गाजवून शत्रूंना हैराण केलें. दीड घटकापर्यंत गोळा गोळी आणि शस्त्रांची हाणामारी चालू होती. इब्राहीमखानाच्या सहा पल्टणी जखमी झाल्या अगर मारल्या गेल्या. दमाजी गायकवाड वगैरे सरदार इब्राहीमखानाच्या कुमकेस होते त्यांनींहि शौर्याची शर्थ केली. स्वतः इब्राहीमखान यास गोळी, बाण आणि बरछी यांच्या दोन तीन जखमा झाल्या. दमाजी गायकवाड यास तीन जखमा झाल्या. इतर सरदारांचीहि तीच स्थिति झाली.

इकडे हुजरातीचें पथक घेऊन सदाशिव भाऊ, विश्वासराव आणि इतर सरदार शहावलीखानावर घसरले. इतक्या निकराचें युद्ध झालें कीं आकाश आणि पृथ्वी दिसेनाशीं झालीं. आणि युद्ध पाहून आकाशाचे डोळे दिपून गेले. शहावलीखानाबरोबर दहा बारा हजार स्वार, सात आठ हजार विलायती आणि काबुली शेर बच्चयांचीं पथकें पायदळ आणि स्वार, आणि एक हजार जंबूरकचे स्वार होते. जलौघाप्रमाणें मराठ्यांनीं त्यांना गिळून टाकलें. वजीराचा चुलत भाऊ अताईखान हा मारला गेला. आणि जवळ जवळ तीन हजार दुराणी मराठ्यांच्या निर्दय शस्त्रांना (तेगे बेदरेग) बळी पडले. दुराणींची फौज मागे हटली. शहावली खानापाशीं शे दोनशे

स्वार आणि पन्नास एक जंबूरकचे उंट राहिले. शहावली खानाच्या अंगांत पूर्ण चिलखत होतें. तो घोड्यावरून उतरून खाली जमिनीवर बसला.

त्यावेळीं शुजाउद्दौल्यानें मला म्हटलें, " शहावलीखानाच्या दळाचा ध्वनि कानीं पडत नाहीं. काय प्रकार आहे ? त्याची बातमी घेऊन ये. " त्याप्रमाणें मी घोडा उडवीत त्या ठिकाणीं पोहोंचलों. मी पाहिलें कीं शहावलीखान जमिनीवर बसला असून तो तोंडांत माती घालून घेत होता. त्याच्या तोंडांतून कफ बाहेर पडत होता. तो शिपायांना शिव्या देऊन म्हणत होता कीं " विलायत ( स्वदेश ) लांब आहे. कुठें चाललांत " पण त्याचें कोण ऐकणार ?

मला पाहून तो म्हणाला, " माझा मुलगा ( मानलेला ) शुजाउद्दौला याला लवकर जाऊन सांगा कीं मी मरत आहे. माझी मदत कर " मी परत येऊन शुजाउद्दौल्याला हकीकत कळविली. शुजाउद्दौला म्हणाला कीं यावेळी येथून हलणें योग्य होणार नाहीं. शत्रूचें सैन्य आपल्या जवळ पोहोंचलें आहे. न जाणों त्यांना विचार सुचला तर ते हल्ला करतील आणि मग सर्वनाश होईल. त्यानंतर परिस्थिति अतिशय आणीबाणीची झाली. आणि मला निरोप पोहोंचविणें झालें नाहीं. शुजाउद्दौल्यापाशीं दोन हजार स्वार, एक हजार पायदळ, हें सैन्य होतें. याशिवाय वीस तोफा होत्या. बंदुकी आणि तोफा भरून तो तयारीनें राहिला. पण शत्रूचें सैन्य त्याच्या बाजूनें आलें नाहीं. मधूनमधून लांब दुरून भाले बरच्या आणि तल्वारी सूर्यप्रकाशांत तळपतांना दिसत. शत्रू चालून येतो असें वाटे पण सगळें सुरक्षित पार पडलें.

डाव्या बाजूस नजीबुद्दौला होता. त्याच्यापाशीं सहासात हजार पायदळ होतें. नजीबुद्दौला पायदळ सैन्य घेऊन हळुहळु पुढे सरके. त्याचे शिपाई आणि बेलदार पुढे जाऊन मोर्चे तयार करीत. आणि नंतर त्याचें सैन्य पुढे सरकून मोर्च्यांच्या आश्रयाला दबा धरून बसे. अशा पद्धतीनें नजीबुद्दौला दीड कोस पुढे सरकला. आणि शत्रू सैन्यापासून गोळ्यांच्या टप्प्यापर्यंत पोहोंचला. नजीबुद्दौला म्हणे कीं या युद्धांतील मी नवरदेव आहे. ही सगळी जबाबदारी माझ्या डोक्यावर आहे. बाकीचीं माणसें म्हणजे वऱ्हाडी मंडळी आहेत. जें काय होणार तें माझ्यामुळें होईल किंवा मला होईल. त्याचा अनुभव आणि शहाणपण ही किती म्हणून काय विचारावें. त्याच्या तोडीचा दुसरा कोणी नव्हता. त्याचा रुबाबहि बराच होता. त्याच्या समोर जनकोजी शिंद्याचें सैन्य होतें. दोघांच्यांत हाडवैर होतें. रोहिल्यांच्यापाशीं बाणांचा सांठा होता. प्रत्येक वेळेस ते हजार हजार बाण सोडीत. त्यांच्या दणदणाटानें आकाश आणि पृथ्वी दिसेनाशी होत आणि कान फाटून जात. शत्रूनें पुढें होण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण बाणांच्या माऱ्यामुळें त्याला संधि सांपडली नाहीं. मराठ्यांची स्थिति खालींवर होऊं लागली.

नजीबुद्दौल्याच्या डावीकडे शहापसंदखान होता. तो अनुभवी आणि कसलेला होता. त्याच्या समोर असलेल्या मराठ्यांच्या सैन्याला हातपाय हलविण्यास मुळींच अवकाश मिळाला नाहीं.

सकाळपासून मध्यान्हापर्यंत युद्ध निकारानें चालू होतें. परिस्थिति विचित्र वाटूं लागली. मराठयांचें शौर्य आणि धाडस यावरून ते विजयी होत आहेत असें दिसून आलें. दोनप्रहरीं अहमदशहाला आढळून आलें कीं शहावलीखान, रोहिले, आणि उजव्या बाजूचे बादशाही सरदार (बर्खुर्दारखान वगैरे) यांचीं सैन्यें मोडलीं आहेत. हें ऐकतांच अहमदशहानें नसक्चींचें पथक बोलाविलें. दोनहजार नसक्ची हजर झाले. अहमदशहानें हुकुम दिला कीं पांचशे नसक्चींनीं तळावर जावे आणि जबरदस्तीनें (कुऱ्हाडीच्या मागच्या बाजूनें आघात करून) बाहेर काढावें. दीडहजार नसक्चींना त्यानें हुकुम दिला कीं युद्धांतून जे पळून चालले आहेत त्यांना कुऱ्हाडीनें बदडून काढून परत युद्धांत पाठवावें. नसक्चीनीं बादशहाच्या आज्ञेची अंमलबजावणी केली आणि जवळ-जवळ सातहजार माणसें एका ठिकाणीं जमा झालीं. तळावरून कांहीं आलीं आणि कांहीं बादशहाच्या राखीव पथकापैकीं होतीं. या सैन्यापैकीं चारहजार शिपाई उजवीकडे रोहिले आणि बर्खुर्दारखान यांच्या मदतीस पाठविण्यांत आले. दहाहजार सैन्य शहावलीखानाच्या मदतीस पाठविण्यांत आलें. त्यांना हुकुम देण्यांत आला कीं चहूंबाजूनें शत्रूवर निकरानें तुटून पडावे. शहापसंदखान आणि नजीबुद्दौला यांना फर्मावण्यांत आलें कीं शहावलीखान हा हल्ला चढवील त्यावेळीं त्यांनीं सुद्धां हल्ला चढवावा.

सारांश दोनप्रहरीं चार घटिका गुदरल्या असतां शहावलीखानाबरोबर असलेल्या फौजेनें मराठ्यांच्या मुख्य दळावर हल्ला केला. त्या दळांत सदाशिव भाऊ व विश्वासराव हे होते. त्याचवेळीं उजव्या व डाव्या बाजूचीं सैन्येंहि त्यांच्यावर तुटून पडलीं. नजीबुद्दौल्यानेंहि हल्ला केला आणि त्याचवेळीं आपल्या पायदळाला बाण उडविण्याची त्यानें आज्ञा केली. एका वेळेस हजारो बाण उडविण्यांत आले. त्या योगानें उभयदळांना आकाश आणि पृथ्वी दिसेनाशी झालीं. शहावलीखान शत्रूवर तुटून पडला. दोन घटिका तुंबळ युद्ध झालें. तल्वारी, भाले, बरछी, परशु इत्यादि शस्त्रांनीं उभयदळांनीं जी निकर केली त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. मराठ्यांनीं तल्वारी आणि भालेबरछांनीं सीमेपरतें शौर्य दाखविण्यांत कसूर केली नाहीं. त्यांनीं निकरानें हल्ले केले. त्यांत त्यांचे अनेक लोक मारले गेले. दिवस मावळण्यास एक प्रहर दोन घटिका राहिल्या असतां विश्वासराव मारला जाऊन घोड्याखालीं आला. भाऊला ही बातमी कळल्यावर त्यानें आज्ञा केली कीं विश्वासरावाला खाशा हत्तीवर घालावे. त्यावर अंबारीच्या मागें खवाशींत बाबू पंडित बसला होता. या नंतर भाऊनें कमरेला तल्वार आणि हातांत भाला घेऊन शहावलीखानाच्या दळावर त्वेषानें हल्ला केला. एक घटिका पर्यंत निकराचें युद्ध झालें

नंतर डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच मराठ्यांची फौज कापुरासारखीं एका एकी नाहींशी झाली. मैदानावर कोणी राहिलें नाहीं. ठिकठिकाणीं प्रेतांच्या राशी मात्र पडल्या होत्या.

हें पाहून इकडील शिपाई आणि स्वार हे पाठलाग करूं लागले. त्यांना लुटीचीहि आशा होती. पाठलाग करीत ते पानीपत गांवाच्याहि पलीकडे गेले. जेथें जेथें मराठे पळत होते तेथें त्यांना गांठून मारण्यांत आलें. चांदणी रात्र होती. दहा बारा कोस पर्यंत सैन्यानें पाठलाग करून कत्तल आणि लूट केली. जमीन प्रेतांनीं भरून गेली. त्या दिवशीं मराठ्यांच्या सैन्यांतील आणि बाजार बुणग्यांतील जवळ जवळ एक लाख माणूस मारलें गेलें. जे जगले त्यांपैकीं अनेकांना आसपासच्या प्रांतांतील जमीनदारांनीं नागविलें आणि मारले. मराठ्यांच्या छावणींत जाऊन बादशाही फौज आणि रोहिले यांनीं लूट करून अनेकांना कैद केले. एकेकाच्या हातांला जी लूट लागली आणि जीं माणसें कैद झालीं त्यांची काय गणती करावी. एकेका स्वारानें सामानानें लादलेले दहा दहा वीस उंट आणले. पकडून आणलेल्या घोड्यांची गणती काय करावी ? ते घोडे म्हणजे शेळ्या-मेंढरासारखें होते. हत्ती पकडण्यांत आले. दास आणि दासी पाहतां जवळ जवळ चाळीस हजार माणसें कैद करण्यांत आलीं. जवळ जवळ आठ हजार माणसें सर्वस्वीं नागविलीं जाऊन शुजाउद्दौल्याच्या आश्रयाला आलीं. शुजाउद्दौल्यानें त्यांच्या रक्षणार्थ आपलीं पथकें नेमलीं. त्यांना कोणी मारूं नये म्हणून ही व्यवस्था होती. पण दुराणींच्या फौजेंत मराठ्यांचे शें दोनशें माणूस पकडून आणीत आणि छावणी भोंवती त्यांना ठार मारीत. दुराणी शिपाई म्हणत कीं आम्ही स्वदेशांतून निघतांना आमचे आई वडील आणि बहिणी आणि बायका यांनीं आम्हाला ताकीद केली कीं आम्हाला पुण्य लागावें म्हणून विजय मिळाल्यावर आमच्या नांवानें इतके इतके काफर तुम्ही मारावे. म्हणून त्यांनीं हजारो माणसें मारलीं. बादशहा आणि सरदार यांचे तंबू सोडले तर सगळीकडे डोक्यांच्या राशी पडल्या होत्या. मराठ्यांच्यावर तर तो कल्पांत कोसळला होता.

सगळे सरदार बादशहासमोर गेले आणि त्यांनीं विजयाबद्दल त्याचें अभिनंदन केलें. बादशहानें स्वार होऊन मैदानाची दुरून पाहणी केली आणि तो आपल्या छावणीच्या तंबूत दाखल झाला. सरदार लोक आपापल्या तंबूकडे गेले.

अजून दिवस मावळण्यास एक घटिका अवकाश होता. बर्खुर्दारखानाच्या दुराणी शिपायांनीं विश्वासरावाचा हत्ती, आणि त्याच्या अंगावरील अलंकार काढून घेऊन विश्वासरावाचें शव पालखींत घालून शुजाउद्दौल्याकडे आणले. शुजाउद्दौल्यानें त्यांना दोन हजार रुपये बक्षीस म्हणून दिले. आणि शव आपल्या रक्षणाखालीं घेतलें. इब्राहीमखान गार्दी जखमी होऊन शुजाउद्दौल्याचा सरदार शुजाफुलीखान

याच्या हातांत सांपडला. त्यानें त्याला गुप्तपणें आपल्या तंबूत ठेविलें आणि याची खबर शुहाउद्दौल्याला दिली. शुजाउद्दौल्यानें इब्राहीमखानाला गुप्त रीतीनें ठेऊन त्याचा औषधोपचार करा अशी आज्ञा केली. नंतर अहमदशहानें शुजाउद्दौल्याला आज्ञा केली कीं विश्वासरावाचें प्रेत आम्ही पाहूं इच्छितों. तें पाठवून द्या. त्याप्रमाणें शुजाउद्दौल्यानें प्रेत बादशहाकडे पाठविलें. शहावलीखान आणि इतर अफगाण आणि हिंदुस्थानी सरदार यांनीं विश्वासरावाचें प्रेत पाहिलें. आणि ते म्हणू लागले कीं अशा वर्णाचा आणि सुंदर बांध्याचा मनुष्य आमच्या आजपर्यंत पाहण्यांत आला नाहीं. त्याचा वर्ण चंपकफुलासारखा होता. तो नाजुक बांध्याचा होता. त्याचीं गात्रें रेखीव होतीं. त्याचे हात मांडीपर्यंत पोहोंचले होते. त्याचे डोळे अर्धे उघडे होते. मृत असूनहि त्याच्या चेहेऱ्यावर कांति कायम होती. असें वाटे कीं तो झोपेंत आहे. त्याच्या मानेवर दोन्ही कानाच्यामध्यें तल्वारीची जखम होती. ही जखम अर्ध्या बोटाएवढी खोल होती. त्याच्या भुंवईपाशी बाणाची एक जखम होंती. तेथें एक बोटभर कातडे निघालें होतें. पण ते शरीराला चिकटून होतें. त्याच्या अंगावर रक्ताचा एकहि डाग नव्हता.

दुराणी शिपायांनीं एकच गर्दी केली. ते म्हणू लागले कीं हा दख्खनचा बादशहा होता. त्याचें प्रेत वाळवून देशीं नेले पाहिजे. शेवटीं विश्वासरावाचें प्रेत तेथून काढून बर्खुर्दारखानाचा दिवाण मोतीलाल याच्या तंबूंत ठेवण्यांत आलें. शुजाउद्दौल्याला ही बातमी कळतांच तो अहमदशहाकडे गेला आणि शहावलीखानाच्या संमतीनें म्हणाला "वैर हें जिवंतपणी असते. हिंदुस्थानांत परंपरा अशी आहे कीं विजयानंतर शत्रूच्या मृत सरदारांचें दहन अगर दफन त्यांच्या पद्धतीप्रमाणें करवावे. असें करण्यांतच लौकिक आहे. याच्याविरुद्ध वागलें तर बदनामी होईल. आपण या देशांत थोडेच दिवस राहाणार आहांत. आम्हाला नेहमी त्यांच्याशीं (मराठ्यांशी) संबंध आहे. विश्वासरावाला आमच्या ताब्यांत देण्यांत यावें. हिंदुधर्माप्रमाणें त्याचें दहन करवूं." नजीबुद्दौल्यानें अशीच विनंति केली. इतर सरदारांनींहि पण असेंच सांगितलें.

एकदां मला नजीबुद्दौल्याचा दिवाण मेघराज याच्याबरोबर बर्खुर्दारखानाचा दिवाण मोतीलाल याजकडे जाणें घडलें. दुसऱ्या खेपेस मी एकटाच गेलों. तेव्हां दिवाणानें (मोतीलाल) म्हटलें कीं तुम्ही याच कामासाठीं (विश्वासरावाचे प्रकरणीं) आला आहात कीं दुसरें कांहीं आहे. मी म्हटलें दुसरे काय असणार. पण मी हजर आहे.

मोतीलालानें मला गुप्तपणें तंबूत नेलें. तंबूच्या एका भागांत राजा बाबू पंडित हा जखमी होऊन बसला होता. त्याच्याशीं थोडें बोलणें झालें. त्यानंतर दुसऱ्या तंबूंत मला नेण्यांत आलें. तेथें जनकोजीराव जखमी होऊन बसला होता. त्याच्या डोक्यावर

एक बुऱ्हाणपुरी शेला होता. आणि पायावर गुजराती मश्रूचा जांघ्या ( मांडचोळणा ) होता. त्याच्या हातावर एक गोळीची आणि एक भाल्याची अशा जखमा होत्या. त्यानें आपल्या फेट्यानें हाताला बांधून हात लटकत ठेविला होता. जनकोजी हा तरुण, आणि देखणा असून वीस वर्षांचा होता. मला पाहून त्यानें मान खालीं घातली. मी म्हटलें " रावसाहेब, असें काय करता, तुम्ही शूराला जे करतां येणें शक्य आहे ते केलें आहे. तुमच्या शौर्याच्या कथा दीर्घकाळपर्यंत जगाच्या पाठीवर टिकतील. परमेश्वरी इच्छेपुढें इलाज नाहीं." जनकोजीनें म्हटलें, " मी युद्धांत पडलो असतों तर बरें झालें असतें. पण नशिबानें हें असें घडलें. आतां हे लोक माझ्याकडून रकमेची अपेक्षा करीत आहेत. तें कांहीं कठीण नाहीं. पण या ठिकाणीं रकम मिळत नाहीं. तुम्ही माझ्या वडिलांना ओळखत होता. शुजाउद्दौलाच्या आणि माझ्या घराण्यांत वडिलांपासून स्नेह आहे. माझ्या वडिलांनीं त्यांच्या वडिलांचें काम केलें आहे. यावेळीं नबाबसाहेबांनीं मज पीडिताची मदत केल्यास बरें होईल."

मी म्हटलें. " नबाबसाहेब या वेळीं मागे पुढे करणार नाहींत. किती रकम मागतात " मोतीलाल म्हणाला कीं सातलाख रुपये मागतात असें दिसतें. पण यावरच अडतील असें नाहीं, कमी जास्तीवरहि याचा निकाल होऊं शकेल.

मी निरोप घेऊन निघालों. तो शुजाउद्दौल्याकडे आलों. त्यावेळीं शुजाउद्दौला आणि नजीबुद्दौला हे एका मसनदीवर बसून नाच पहात होते. मी सगळी हकीकत सांगितली. नजीबुद्दौला हा अतिशय हुशार आणि चौकस होता. जनकोजी कैद झाल्याचा त्याला वहीम होता. तो हेराकडून बातम्या मिळवी. मला माहीत होतें कीं त्याचें आणि शिंदे घराण्याचें हाडवैर होतें. म्हणून मी त्यावेळीं जनकोजीसंबंधीं कांहीं बोललों नाहीं. मैफिलींतून उठून गेल्यानंतर ते दोघे दुसरीकडे बसले. त्यावेळीं नजीबुद्दौला शुजाउद्दौल्याला म्हणाला कीं यांच्या चेहेऱ्यावरून असें वाटतें कीं हा तुम्हांला कांहीं गोष्टी सांगूं इच्छितो पण मी येथें असल्यामुळें सांगू इच्छीत नाहीं. शुजाउद्दौला म्हणाला कीं तुमच्यांत आणि माझ्यांत परकेपणा थोडाच आहे. असें म्हणून त्यानें मला बोलावूं पाठविलें. आणि मला गंगेची शपथ घातली. आणि म्हटलें कीं काय असेल तें बोला, निरुपाय होऊन मी हकीकत सांगितली.

नजीबुद्दाला हा धूर्त आणि धोरणी होता, हें ऐकतांच तो आनंद दर्शवून म्हणाला,

" वाः उत्तम, लोक अशाच वेळीं दुसऱ्यावर उपकार करतात. आपण याचा निर्णय घ्या. जी रक्कम ठरेल त्याची निम्मी रक्कम मी देईन." असें तो वरकरणी बोलला पण शुजाउद्दौल्याच्या येथील बैठक आटोपल्यावर नजीबुद्दौला शहावली खानाकडे गेला आणि त्यानें त्याला सगळी हकीकत सांगितली. नजीबुद्दौला हा शिंद्यांचा

कांटा काढू इच्छीत होता. आणि शहावलीखानाचे बर्खुर्दारखानाशीं वांकडें होतें. यामुळें शहावलीखान बादशहाकडे गेला आणि सगळी हकीकत त्यानें बादशहाच्या कानावर घातली. अहमदशहानें बर्खुर्दारखानाला बोलावू पाठविलें. त्यानें या गोष्टीचा साफ इन्कार केला. मला साक्षी करितां बोलावण्यांत आलें. तरी बर्खुर्दारखान कबूल होईना. शेवटीं बादशहानें त्याच्या गोटाचा झाडा घेण्यासाठीं नसक्ची नेमले. मग बर्खुर्दारखानानें आपल्या माणसांबरोबर सांगून पाठविलें कीं जनकोजीचा ताबडतोब वध करून तेथेंच पुरून टाका. त्याचा कुणालाहि पत्ता देखील लागतां कामा नये. परमेश्वराच्या इच्छेनें जनकोजीची अशी गत झाली.

इब्राहीमखान गार्दी जखमी होऊन शुजाउद्दौल्याच्या लष्करांत आला होता. त्याला गुपचुपपणें आपल्या सुभ्यांत रवाना करावें असें शुजाउद्दौल्यानें ठरविलें होतें. ही बातमी अहमदशहाच्या सरदारांना कळली. त्यांनीं ती बादशहापर्यंत पोहोंचविली. अहमदशहानें शुजाउद्दौल्याला बोलावूं पाठवून त्याला लघळपणें म्हटलें "तुम्हाला मी आपला मुलगा समजतो. तुमच्यामुळें हा जय मिळाला आहे. खरें सांगा इब्राहीमखान तुमच्या लष्करांत आहे कीं नाहीं" शुजाउद्दौल्यानें प्रथम इन्कार केला. मग अहमदशहानें शपथ घातली तेव्हां तो हो म्हणाला. त्याच वेळीं पूर्वी ठरल्याप्रमाणें दुराणी शिपायांनीं गर्दी केली आणि ओरडूं लागले कीं इब्राहीमखान आमचा शत्रु आहे. त्याच्यामुळें आम्ही लोक मारले गेलो. त्याला आमच्या हवाली करा. नाहींतर ज्यानें त्याला आपल्यापाशीं ठेविले असेल त्याच्याशीं आम्ही लढूं. शुजाउद्दौल्यालाहि त्वेष चढला. त्याच्यांत आणि दुराणी शिपायांत कटकट होणार असा रंग दिसूं लागला. शहावलीखानानें शुजाउद्दौल्याला एकांतांत नेलें. आणि म्हटलें कीं एक आठवड्याकरितां इब्राहीमखानाला तुम्ही माझ्या हवाली करा. नंतर त्याला बरा करून सुरक्षित तुमच्या हवाली करतो. शुजाउद्दौला म्हणाला "न जाणो तुम्ही दगा कराल." यावर शहावलीखानानें कुराणाची शपथ घेतली. यावर निरुपाय होऊन शुजाउद्दौल्यानें इब्राहीमखानाला शहावलीखानाच्या हवालीं केलें.

अहमदशहानें इब्राहीमखानाला आपल्या समोर बोलाविलें आणि विचारले "तूं इब्राहीमखान आहेस काय" तो म्हणाला "हो." अहमदशहा म्हणाल "तुझी ही काय बहादुरी आहे (जीवंत राहिलास)" तो म्हणाला "परमेश्वरी इच्छेपुढें कुणाचेंच कांहीं चालत नाहीं. माझे मालक माझ्या आधीं दोन घटिका रणांत पडले. मी या परिस्थितींत सांपडलों. आतां आयुष्य राहिले आणि बादशहांनीं चाकरींत घेतलें तर यापेक्षांहि जास्त कामगिरी करून दाखवीन." नंतर अहमदशहानें त्याला शहावलीखानाकडे त्याची वास्तपुस्त करण्याकरितां म्हणून हवाली केलें. तेथें त्याच्या जखमेवर विष बांधण्यांत आलें आणि त्याला वाईट अन्न देण्यांत आलें. अहमदशहा दिल्लींत दाखल झाल्यानंतर सात दिवसांनीं इब्राहीमखान वारला.

विजयानंतर दुसऱ्या दिवशीं अहमदशहानें उंची जामानिमा केला. हिंदुस्थानच्या बादशहाकडून नादिरशहानें घेतलेलीं आणि त्याच्याकडून मिळालेलीं रत्नें त्यानें आपल्या अंगावर धारण केलीं. आणि नंतर तो घोड्यावर स्वार होऊन निघाला. त्यानें युद्ध भूमीची पाहाणी केली. ठिकठिकाणीं प्रेताच्या राशी पडल्या होत्या. अशा बत्तीस राशी होत्या. कांहींत पांचशे, तर कांहींत सातशें, तर कांहींत हजार प्रेतें होतीं. तीन चार राशींत तर दीड दीड हजार प्रेतें होतीं. त्या लोकांनीं कंबरा कसून अत्यंत शौर्य गाजवून आपले प्राण सोडले होते. भाऊनें आपल्या छावणी भोंवती खंदक खणला होता. तो सगळा प्रेतांनीं भरून गेला होता. याशिवाय पानीपत गांवाभोवतीं, आणि जंगलांत प्रेतें पडलीं होतीं. त्यांची मोजदाद करणें अशक्य आहे.

अहमदशहानें पानीपत गांवांत जाऊन बू अली कलंदर या साधूच्या समाधीचें दर्शन घेतलें. तो आपल्या डेऱ्यांत गेला.

शुजाउद्दौल्यानें शेकडो भिस्ती ( पाणी वाहाणारे ) आपल्याबरोबर घेतले आणि रणांगणावर मराठे सरदारांचीं प्रेतें शोधून काढण्याचा प्रयत्न केला. विशेषतः भाऊचें प्रेत शोधून काढण्याचा खूप प्रयत्न केला. शशधर पंडित आणि गणेश पंडित हे मराठ्यांचे वकील आणि इतर कांहीं माणसें कैद होऊन आलीं होतीं. ते लोक भाऊ आणि इतर सरदारांच्या जवळ नेहमीं असत. त्यांना बरोबर घेऊन शुजाउद्दौला भाऊच्या प्रेताचा कसून शोध करू लागला. यशवंतराव पवार, जाधव वगैरेंचीं प्रेतें आढळलीं. कोणी कुठपर्यंत काय काय पाहूं शकेल. दुसऱ्या दिवशीं तपास काढतां एका माणसानें सांगितलें कीं मैदानावर पावकोसाच्या अंतरावर पुष्कळ प्रेतें पडलीं आहेत आणि तीं सरदारांचीं दिसतात. शुजाउद्दौला तेथें पोहोंचला. आणि एक प्रेत काढून त्याला धुण्यांत आलें. प्रेत काढतांना त्यावरून मूल्यवान मोती खालीं पडले. त्यावरून हा सरदार आहे याची खात्री पटली. शुजाउदौल्यानें ते मोती, शशधर पंडित बरोबर होता, त्याला दिलें. त्यानें प्रेत पाहून हें भाऊचेंच प्रेत आहे असें सांगितलें. त्यांत एक काळा तीळ लहान पैशाएवढा, पाटीवर मुजफ्फरखानानें केलेली कट्यारीची जखम, पायावर मत्स्याची खूण, अशा खुणा शरीरावर दिसल्या. भाऊ पस्तीस वर्षांचा तरुण आणि मजबूत शरीराचा होता. तो रोज बाराशे सूर्यनमस्कार घालीत असे. नमस्कारामुळे त्याचे दंड आणि मांड्या यावर घट्टे पडलेले होते.

त्यावेळीं एक दुराणी शिपाई तेथें आला. तो दूर उभा राहून हें सर्व पाहात होता. तो हंसला. मी शुजाउद्दौल्याला म्हटलें कीं हा दुराणी शिपाई बऱ्याच वेळेपासून उभा असून हंसत आहे. कदाचित या प्रेतासंबंधीं त्याला कांहीं माहिती असावी. शुजाउद्दौल्यानें त्या दुराणी शिपायाला बाजूला नेऊन पुसलें. तो म्हणाला " युद्धाच्या वेळी मी याला पाहिले होतें. हा एका मोठ्या घोड्यावर स्वार होता. युद्धांत याच्या

मांडीखाली दोन घोडे ठार झाले. दुसऱ्या खेपेस हा घोड्यावर स्वार झाला त्यावेळीं याला दोन जखमा झाल्या. एक जखम गोळीची आणि दुसरी भाल्याची, त्यामुळे तो घोड्यावरून खालीं आला. त्याचवेळीं त्याच्या फौजेचा मोड झाला. हा तरुण धीरानें वागत होता. त्याच्या अंगावर जड जवाहीर होते. आणि हातांत भाला घेऊन तो हळुहळु मैदानांतून बाहेर चालला होता. तो आम्ही चार स्वार त्याच्या अलंकाराच्या आशेनें त्याच्यापाशीं आलों. आम्ही त्याला घेरले. मी त्याला विचारलें " मिया, तू कोण आहेस ? तू कोणी सरदार असलास किंवा भाऊ असलास तरी खरें सांग. तुला अभय आहे. तूं म्हणशील तेथें आम्ही तुला पोहोंचवूं. " तो कांहींच बोलला नाहीं. माझ्या बरोबरीचा एक स्वार रागावला. त्यानें एक बाण मारला. या माणसानें त्याला आपल्या भाल्यानें जखमी केलें. निरुपाय होऊन त्याला ठार मारण्याचें आम्हीं ठरविलें. त्यानें दोघांना भाल्यानें जखमी केलें. शेवटी आम्हीं त्याचें डोकें कापलें. ते डोकें एका माणसापाशीं आहे. ही शेवटची गोष्ट त्यानें लपवून ठेविली, कारण शेवटी शीर त्याचेपाशींच सांपडलें. सारांश शुजाउद्दौल्यानें तें प्रेत आणि संताजी वाघाचें प्रेत ( त्याच्यावर तलवार आणि इतर शस्त्रांच्या जवळ जवळ चाळीस जखमा होत्या ), अशी दोन प्रेतें हत्तीवर घालून आणलीं. आणि अहमदशहाला सगळी हकीकत कळविलीं. अहमदशहानें शुजाउद्दौल्याच्या भिडेमुळें आज्ञा केली कीं तीं प्रेतें आणि विश्वासरावाचें प्रेत यांचें हिंदूंच्या पद्धतीप्रमाणें दहन करण्यांत यावें. हिंदूंचे जे जे संस्कार असतील ते करण्यांत यावे. त्यानें वीस नसक्ची व्यवस्थेकरितां तैनात केले. दहन समयी कोणी गडबड करू नये म्हणून ही व्यवस्था होती.

त्याप्रमाणें तीं तीन शवें शुजाउद्दौल्यानें माझ्याकडे दिलीं आणि म्हटलें कीं तुम्ही त्यांच्या जातीचे आणि देशाचे आहात. तुमच्या पद्धतीप्रमाणें दहन-विधि पार पाडा. राजा अनूपगीर, आणि बादशहाचे वीस नसक्ची माझ्या बरोबर देण्यांत आले. बादशहा आणि शुजाउद्दौला यांच्या छावणीच्या मध्यें एके ठिकाणीं ती शवें नेण्यांत आलीं. गंगाजलानें त्यांना स्नान घालण्यांत आले आणि चंदनाची चिता रचून त्यांचें दहन करण्यांत आलें. त्यावेळीं भाऊच्या लष्करांतून पळून आश्रयाला आलेलीं दोन हजार माणसें माझ्या बरोबर होतीं. सगळ्यांची खात्री झाली कीं हें शव भाऊचेंच होय.

दहन केल्यानंतर दिवस मावळण्यास दोन घटिका राहिल्या असतां आम्हीं आपल्या स्थळीं आलों.

रात्रीच्या वेळी शुजाउद्दौल्यानें दुराणी शिपायानें काय केलें याची हकीकत शहावलीखानास सांगितली. तो दुराणी शिपाई बरखुर्दारखानाच्या गोटांतील होता. शहावलीखानानें त्याला बोलावून त्याचें समाधान केलें कीं शवावरील अलंकार तू घेतले असशील तर ते आम्ही तुझ्याकडून काढून घेऊं अशी भीति तूं मुळीच बाळगूं नकोस.

मी तुला क्षमा करतों. पण शीर कुठें आहे तें सांग. त घेऊन ये. दुराणी शिपायानें रुमालांत शीर घालून तें वजीरासमोर टाकलें. मराठ्यांचा वकील राजा बाबू पंडित हा कैद झाला होता. त्याला बोलावून तें शीर दाखविण्यांत आलें. त्यानें पाहून म्हटलें कीं हें शीर भाऊसाहेबांचेंच होय. ते माझे मालक होते. त्यांचे उपकार माझ्यावर आहेत. कृपाकरून तें माझ्या हवाली करा. म्हणजे मी त्याचें विधिपूर्वक दहन करीन. वजीर हंसला. त्यानें तें शीर राजा बाबू पंडित याच्या हवाली केलें. आणि आपले नसक्ची त्याच्या बरोबर दिले. राजा बाबू पंडितानें तें डोकें शाही छावणीच्या बाहेर नेलें आणि त्याचें दहन केलें. त्यावेळीं भाऊ मारले गेले याची खात्री झाली. ही झाली युद्धाची आणि भाऊच्या मरण्याची तपशीलवार हकीकत. लांब लांबून माणसें आलीं. त्यांच्याशीं अधिक तपास केला तेव्हां समजलें कीं मल्हारराव दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव वगैरे सरदार जीवंत निसटले. भाऊची लग्नाची दुसरी बायको पंचवीस वर्षांची होती. तिला एका सेवकानें घोड्यावर बसवून नेलें. रात्रंदिवस प्रवास करून ती सूरजमलपाशीं पोहोंचली. राजा सूरजमलनें तिचा आदर सत्कार केला. तिला वस्त्रें, पालखी, प्रवासखर्च, आणि संरक्षणासाठीं माणसें तिच्या-बरोबर देऊन त्यानें तिला झांशीला पोहोंचविली. तेथून ती दक्षिणेकडे गेली. शमशेर बहादुरला जंबूरकच्या गोळीची जखम झाली होती. त्या अवस्थेंत तो दीग येथें पोहोंचला. राजा सूरजमलनें त्याचे उपचार केले. पण तो बरा न होता मृत्यु पावला. त्याचीं कबर दीग येथें बांधण्यांत आली.

विजयानंतर पांच दिवसांनीं अहमदशहा दिल्लीकडे रवाना झाला. चार मजला करून तो दिल्लींत दाखल झाला. हिंदुस्थानांत राज्य कायम करावें असा त्यानें विचार केला. पण परमेश्वराची तशी इच्छा नव्हती. शुजाउद्दौला दिल्लीला पोहोंचल्यावर, मराठ्यांच्या लष्करांतून पळून आलेली जवळ जवळ तेवीस हजार माणसें, यांना त्यानें आपलीं माणसें बरोबर देऊन, माहोदल आणि पुलोल ही जाटांच्या मुलुखांत होतीं तिकडे पाठविलीं.

दिल्लीस पोहोंचल्यानंतर आठ दिवसांनीं परमेश्वरी योगायोगानें दुराणी शिपायांनीं दंगा केला. ते म्हणाले "दोन वर्षें झालीं. तुम्ही आम्हाला स्वदेशांतून आणलें. तुम्ही वचनें दिलीं होतीं. या अवधींत तुम्ही आमचा पगार दिला नाहीं. पगार नसल्यामुळें आमची ही स्थिति झाली आहे. तुम्हाला जय मिळाला आहे. आतां स्वदेशाला परत चला. आम्हीहि आपापल्या घरीं जाऊन बायकापोरांना भेटूं." कांहीं दिवस असाच गोंधळ चालला होता.

याच सुमारास एका बाईवरून दुराणी शिपायांनीं शुजाउद्दौल्यावर आळ घेऊन त्याच्याशीं भांडण सुरू केलें. यानें चिडून जाऊन शुजाउद्दौला शहावली खानाला

म्हणाला, " हीच का तुमचीं वचनें. मला बोलाविलेत आणि आतां माझ्याशीं अशी वागणूक करतां काय. " शहावली खानानें त्याला समाधानाच्या बऱ्याच गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला कीं अहमदशहाला तुझें फार अगत्य आहे. हे दुराणी शिपाई म्हणजे शुद्ध सैतान आहेत. यानंतर वजीरानें शुजाउद्दौल्याला आलिंगन देऊन त्याला निरोप दिला.

तेथून परत डेऱ्यास आल्यावर शुजाउद्दौल्यानें आपल्या मित्रांशीं आणि मुत्सद्यांशीं सल्ला समलत केली. सर्वांनीं सल्ला दिला कीं आतां येथें राहणें योग्य नाहीं. त्याच दिवशीं तीन प्रहरीं दिल्लीहून तो निघाला. पहिल्या दिवशीं त्यानें पंधरा कोसाची मजल मारली. असेंच मजल दर मजल करीत पांचव्या दिवशीं शुजाउद्दौला आणि त्याच्या बरोबरीचें सैन्य गंगेवर मेहदीघाट येथें पोहोंचले. होळीच्या एक दिवस आधीं त्यांनीं गंगा ओलांडली, आणि सुरक्षितपणें ते आपल्या सुभ्यांत पोहोंचले.

या नंतरच्या आलेल्या बातम्यावरून कळलें कीं अहदशहानें ठरविलें कीं हिंदुस्थानांत राहिलें तर आपल्याच फौजेकडून आपल्याला धोका आहे. त्यानें हिंदुस्थानच्या राज्याचा विचार टाकून देऊन स्वदेशाकडे कूच केलें. एक वर्षांत झालेल्या खर्चाबाबत त्याला नजीबुद्दौल्यानें चाळीस लाख रुपये दिले.

मराठे आणि अहमदशहाच्या युद्धाची हकीकत मी एकोणीस वर्षांनंतर लिहिलीं आहे. जें जें पाहिलें तें मांडण्यांत कांहीं कसूर केली नाहीं. मराठ्यांचें गर्वहरण करून त्यांचा निकाल लावण्याकरितां परमेश्वरानें शहा दुराणीला आणिले.

तारीख नऊ रबिउस्सानी १२२७ हिज्री रोजीं ( इ. स. १८१२ ) लखनौ येथें लिहिली गेली.

[ येथे काशिराजाच्या बखरीचा अनुवाद संपला. ब्राउन आणि जदुनाथ यांनीं ज्या प्रतीवरून इंग्रजी अनुवाद केले ती अगर त्या प्रती लंडन येथें आहेत. जदुनाथांनीं अनुवादिलेली प्रत इ. स. १७८५ त लिहिली गेली आहे. रामपुरची प्रत इ. स. १८१२ ची आहे. दोन्हीं प्रतींतील मजकूर सर्वसामान्यपणें तोच असला तरी कांहीं ठिकाणीं थोडा बहुत बदल आढळतो. तो किती आणि कोठेंकोठें आहे हे ब्राउन आणि जदुनाथांचे अनुवाद वरील मराठी अनुवादांशीं ताडून पाहिल्यास दिसून येईल. ]

# अहवाले नजीबद्दौला

[ ‘ अहवाले नजीबद्दौला ’ या ग्रंथाचा कर्ता बिहारीलाल याचें घराणें नजीबखानाचें पिढीजाद नोकर होय. त्याचा चुलता मनसुखराय हा नजीबखानाचा मुलगा जाबिताखान याचा कारभारी होता. बिहारीलालनें इ. स. १७८७ मधें नजीबखानाचें छोटेसें चरित्र फारसी भाषेंत लिहिलें. तो ग्रंथ अद्याप प्रसिद्ध झाला नाहीं पण त्याचा इंग्रजी अनुवाद सर जदुनाथ सरकार यांनीं केला आहे. त्यातून पानीपतसंबंधीचा मजकूर पुढें दिला आहे. ]

कांहीं काळानें माधवराव शिंद्यांचा सरदार दत्ता पाटील यानें नजीबखानाकडे वकील पाठवून हरिद्वार आणि ज्वालापुर हीं हिंदूंचीं तीर्थक्षेत्रें आपल्याला देण्यांत यावीं अशी मागणी केली. नजीबनें मागणीला नकार दिला. यांतूनच नजीबखान आणि मराठे यांत विरोध निर्माण झाला. नजीबखानानें शुक्रताल येथें ठाण मांडून दहाबारा हजार स्वार आणि पायदळासहित मराठ्यांशी लढाई चालू केली. याठिकाणीं गंगेच्या कांठावर पुष्कळ खोल डोह आहेत. नजीबखानानें सादुल्लाखान, दुंदीखान, हाफिज रहमत आणि सरदारखान बख्शी या रोहिले सरदारांना लिहिलें कीं तुम्हाला आपला प्रदेश वांचवायचा असेल तर मला मदत करा. नाहींतर मराठे मला हांकलून लाविल्यानंतर तुम्हाला सोडणार नाहींत. अशाच प्रकारचीं पत्रें त्यानें शुजाउद्दौल्याला लिहिलीं. इ. स. १७५९ चा पावसाळा त्यानें मराठ्यांशीं लढण्यांत घालविला. मराठ्यांपाशीं सत्तर हजार सैन्य होतें. हाफिज आणि इतर रोहिले सरदार चांदपुर आणि इतर परगण्यांत निवळ बसून राहिले. नजीबला कोणीच येऊन मिळालें नाहीं. फक्त आम्ही येत आहोत या अर्थाचीं पत्रें त्यांनीं पाठविलीं. शेवटी मराठ्यांनीं सबलगडच्या घाटापाशीं रोहिल्यांच्या मुलुखांत प्रवेश केला. तेथें सरदारखान बख्शी रोहिला होता. मराठ्यांनीं गंगेच्या डाव्या कांठावरील सर्व महाल लुटले. आणि मग हाफिज आणि इतर सरदारांना टाळून त्यांनीं पुढें कूच केलें आणि जलालाबादचें गांव जाळून फस्त केलें.

नवाब शुजाउद्दौला आणि नजीबखान यांचा स्नेह होता. म्हणून नजीबखानाच्या मदतीला तो धांवून गेला. त्याचें सैन्य मुरादाबादेपर्यंत आलें असें पाहून मराठे कांहींसे मागें हटले. त्यापूर्वी हाफिज रहमतखान आणि इतर रोहिले सरदार गंगेच्या कांठावर पोहोंचले होते. शुजाचे सरदार उमरावगीर वगैरे हे पण गंगेच्या कांठावर पोहोंचले. तोपर्यंत मराठ्यांनीं गंगा ओलांडली होती.

नजीबखान मराठ्यांच्या तावडींत सांपडला त्यावेळेपासून त्यानें अहमदशहाला सतत पत्रें पाठविलीं “ दक्षिणी मराठ्यांनीं मला कोंडलें आहे. आपल्या जातीच्या लोकांना वांचवायचें असेल तर यावें ” अशा अर्थाची पत्रें गेलीं. अहमदशहानें पत्रें पाहतांच तडक कूच केलें. आणि तो कुंजपुऱ्यास पोहोंचला. अहमदशहा येत आहे हे

लोकांस खरें वाटलें नाहीं. ते म्हणाले कीं नजीबखानाच्या सांगण्यावरून कुंजपुऱ्याच्या रोहिल्यांनीं अफगाणासारख्या टोप्या वापरण्यास केली आहे. यावरून अहमदशहाचे सैन्य येत आहे अशी हूल उठलीं आहे. पण जेव्हां अहमदशहानें हिंदुस्थानच्या सरदारांना लिहिलेलीं पत्रें येऊन थडकलीं तेव्हां सर्वांना वस्तुस्थिति कळून आली. शुजाउद्दौला घाबरला. त्यानें नजीबखानाला म्हटलें "मला आपल्या राज्यांत पुष्कळ कामें आहेत. मी जातो. आतां काय अफगाणांचा बादशहाच तुमच्या मदतीला येत आहे." असें बोलून तो आपल्या प्रांताकडे परतला. अहमदशहा येत आहे हें पाहून मराठ्यांचें धैर्य खचलें आणि ते मागे हटले. अहमदशहानें कुंजपुऱ्याच्या घाटावरून यमुना ओलांडली. आणि सहारणपुर गांठलें. तेथें नजीबखान, हाफिज रहमत, दुंदीखान आणि इतर रोहिले सरदार अहमदशहाला जाऊन मिळाले. नजीबखान आणि दत्ताजी पाटील यांत लढाई झाली. त्यांत दत्ताजी मारला गेला. मूर्तुजाखान बारेच नांवाचा समाना गांवचा सरदार होता. त्यानें दत्ताजीचें डोकें कापून आणिलें.

त्यानंतर भाऊ, समशेरबहादुर आणि इतर मराठे सरदार एक लाख पायदळ आणि घोडेस्वारांचें सैन्य घेऊन नजीबखानाविरुद्ध आले. पानीपतजवळ मराठ्यांनीं आपली छावणी कायम केली. तेथें त्यांचीं अहमदशहा, नजीबखान, शुजाउद्दौला, आणि कटेहर (रोहिलखंड)च्या रोहिले सरदारांबरोबर युद्धें झालीं. सात आठ दिवसांनीं मराठा सैन्याची फार कुचंबणूक होऊ लागली. बाहेरून मराठा सैन्यांनीं छावणींतील सैन्याची कुमक करण्याचा प्रयत्न केला. पण अहमदशहाच्या दुराणींनीं त्यांचा नाश केला. गोविंदपंत बुंदेले हा तीस हजार स्वार आणि पायदळ घेऊन ग्वालेरीच्या बाजूनें मराठ्यांना मदत करण्यास आला होता. अहमदशहाला ही बातमी कळतांच त्यानें हाजी अताईखान आणि सरफराज़खान यांस त्यांच्याविरुद्ध पाठविलें. त्यांनीं संबलका या गांवाहून गोविंदपंताविरुद्ध कूच केलें. गोविंदपंत तेथून चाळीस कोसाच्या अंतरावर होता. पण अहमदशहाच्या सैन्यानें एका रात्रींत ती मजल मारली. आणि सकाळीं ते गोविंदपंताच्या सैन्यावर तुटून पडले. त्याचें सैन्य गाफिल होतें. कांहींजण झोपेंत होते तर कांहीं पूजेंत गुंतले होते. दुराणींच्या पांच हजार शिपायांनीं गोविंदपंतांच्या तीस हजार सैन्याची कत्तल केली. आणि त्यांची डोकीं कापून हिंदान नदींत फेंकून दिलीं. अशा रीतीनें हां हां म्हणता बुंदेल्यांचा नाश करून दुराणींची फौज परत आली.

नजीबखानानें आपल्या प्रदेशांतून अहमदशहाच्या छावणींत रसदेचा पुरवठा केला. प्रथम प्रथम दोन्हीं सैन्यांत रसदेचा तुटवडा होता. पण मराठ्यांचे सैन्य मात्र हलाखीला पोहोंचलें. शेवटी एक दिवस नजीबखानानें मराठ्यांवर निकराचा हल्ला केला. तो त्यांच्या छावणींत शिरला असता. पण रात्र झाली आणि नजीबखानाचा

चुलता इब्राहीमखलीलखान युद्धांत मारला गेला. नजीबखानाचें सैन्य मराठ्यांच्या छावणींत घुसले होतें तें रात्र झाल्यामुळें परत आले. नजीबखानाचे जवळ जवळ सातशे शिपाई या चकमकींत मारले गेले. कित्येक मराठेहि मारले गेले. नजीबखान आपल्या तळाला परत आला.

मराठ्यांनी छावणी केल्यानंतर तळाभोंवतीं जवळ जवळ सातशे तोफा चढविल्या. गार्दी पायदळ जवळ जवळ तीस हजार होते. मराठ्यांचें सैन्य एकंदरींत सत्तर ते ऐंशी हजार होते. दुराणींनीं त्यांचा इतका कोंडमारा केला कीं मराठयांच्या छावणींत रसद पोहोंचणें अशक्य झालें. प्रत्येक चकमकींत दुराणींना यश मिळत गेलें. शेवटीं निवळ उपासमार झाल्यामुळें मराठे आपल्या छावणींतून बाहेर पडले. नजीबखान आणि मल्हारराव यांचा स्नेह होता. म्हणून त्यानें मल्हाररावाला मराठा सैन्यांतून पळून जावे, आपण आडकाठीं करणार नाहीं, असा निरोप पाठविला. दुराणींचें आणि दुंदीखानाचें शूर सैन्य मराठयांवर तुटून पडलें. मराठयांचा पराजय झाला. त्यांचीं पन्नास हजार माणसें आणि जनावरें या लढाईत पडलीं. मराठयांनी पळ काढण्यास सुरवात केली. वाटेल त्या लोकांनीं त्यांना लुबाडलें. दुराणींच्या सैन्यानें त्यांचा पाठलाग केला आणि सोनपतच्या आसपास त्यांची कत्तल केली. दुंदीखानाचे कित्येक लोक लढाईत पडले. रोहिले आणि दुराणी यांच्या हातीं कोट्यावधि रुपयांची संपत्ति पडली. पाडाव झालेले घोडे रुपायाला एक या हिशेबानें विकले गेले कारण उपासमारीमुळें त्यांच्यांत पळण्याचें त्राण राहिलें नव्हतें.

## शहाअलमनामा

[ शहाअलमनाम्याचा लेखक गुलामअलीखान हा शहाआलम बादशहाचा मुलगा मिर्जा जवानबख्त जहांदारशहा याच्या पदरीं होता. त्यानें इ. स. १७९० च्या सुमारास शहाआलम बादशहाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. या ग्रंथांच्या तीन खंडापैकीं पहिला भाग एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालनें इ. स. १९१४ मधें प्रसिद्ध केला आहे. यांत पानीपतसंबंधीं मजकूर आला आहे. मूळ फारशीवरून केलेला मराठी अनुवाद खालीं दिला आहे. ]

(१७०) भाऊ आणि विश्वासराव हे मराठयांचे उमदे सरदार होते. पंजाबमधून मराठयांची फौज दुर्दशा पावून आली होती. त्या पराजयाचा सूड घेण्याच्या उद्देशानें त्यांच्याबरोबर फौज रवाना झाली. बाळाजी हा त्यांचा मुख्य होता. त्यानें दोनतीन लाखाची जंगी आणि तोफखान्यानें सुसज्ज असलेली फौज त्यांच्याबरोबर पाठविली आणि तो स्वतःहि त्यांच्या मागोमाग निघाला. भाऊ आणि विश्वासराव हे दिल्लीपाशीं पोहोंचले. नदीला पूर आल्यानें अहमदशहाला आपल्या सैन्यासह नदी ओलांडणें

शक्य झालें नाहीं. तो नदीपलीकडे छावणी करून राहिला. नजीबखान त्याच्याबरोबर होता. दिल्लीचा किल्लेदार वजीर शहावलीखानाचा आप्त याकूबअलीखान हा होता.

(१७१) शुजाउद्दौला, हाफिज रहमतखान, दूंदेखान आणि इतर सरदार अहमदशहापाशीं होते. त्यावेळी अहमदशहाचा तळ कोल ( अलीगड ) व जालेश्वरच्या भागांत होता. सूरजमल जाट मराठ्यांच्या धर्माचा असल्यामुळें त्यांना मिळाला. आणि सगळ्या कलहाचें मूळ असलेला गाजिउद्दीन हाहि त्यांना मिळाला. त्यानेंच सूरजमलचें मन वळवून बादशहाच्या चाकरींतून त्याला परतविलें. त्याचें मन वळविल्यावर ते दोघे मराठ्यांच्या छावणीकडे रवाना झाले. दिल्लीला आल्यानंतर त्यांनीं याकूब अलीखानाशीं झगड्याचा प्रसंग आणला. मराठ्यांच्या असंख्य सैन्याशीं टक्कर घेण्याचें याकूब अलीखानाला सामर्थ्य नव्हतें. म्हणून तो किल्ल्यांत राहिला. आणि शक्य तो बंदोबस्त त्यानें केला. इतक्यांत मराठ्यांनीं शहरांत लूट मार करण्यास सुरवात केली. त्यांच्या पेंढाऱ्यांनीं लोकांच्या घरांत सांपडेल ते नेले.

(१७२) यानंतर मराठे नदीच्या बाजूनें किल्ल्याकडे आले. त्यांनीं तटावर गोळे टाकले. त्यांचीं दोन तीनशे माणसें असदबुरुजाकडून चढून आंत उतरलीं आणि त्यांनीं लूटमार करण्यास सुरवात केली. हें पाहून याकूब अलीखानानें त्यांना हांकलून लाविण्याकरितां शिपाई पाठविले. त्यांनीं मराठ्यांना थोड्याशा मारामारीनंतर पकडले. आणि कित्येकांना ठार मारले. यानंतर याकूब अलीनें किल्ल्याचा कडक बंदोबस्त केला. या सुमारास भाऊनें त्याच्याबरोबर तडजोडीचें बोलणें लाविलें. आणि आपला बंदोबस्त किल्ल्यांत राहावा अशी मागणी केली. याकूबअलीनें पाहिलें कीं किल्ल्यांत शिबंदी थोडी आहे. धान्याचा सांठाहि कमी आहे. साधनसामग्रीहि नाहीं आणि नदीपलीकडून मदत येण्याचाहि संभव नाहीं. या सर्व गोष्टीचा विचार करून तो तडजोडीला कबूल झाला. त्यानें आपल्या माणसांसहित किल्ला रिकामा करून मराठ्यांना दिला आणि स्वतः नदी पार करून अहमदशहाच्या छावणींत पोहोंचला.

गाजिउद्दीनानें एका राजपुत्राला शहाजहान हें नांव देऊन बादशाहीवर बसविले होतें हें पूर्वी सांगितलें आहे. आलमगीर ( दुसरा ) हा मारल्यानंतर त्यानें हा बनाव घडवून आणला होता. शहाजहान हा निष्क्रिय आणि निकामी होता. तो केवळ नामधारी बादशहा होता.

(१७३) मराठ्यांनीं हें पाहून त्याला गादीवरून काढण्याचें ठरविलें. गाजि-उद्दीनाचे कुटिल हेतू त्यांनीं ओळखले होते. सूरजमलच्या कारस्थानांचीहि त्यांना माहिती झाली. त्यांनीं गाजिउद्दीन आणि सूरजमल यांना कैद करण्याचें ठरविलें. हें त्यांना कळतांच ते रातोरात पळून सूरजमलच्या मुलुखांत जाऊन बसले. सूरजमलच्या किल्ल्यांतून साधन सामग्री चांगली होती. तेथें पोहोंचून त्यानें मराठ्यांना पुष्कळ

लंगड्या सबबी सांगितल्या. भाऊचा मुख्य उद्देश अहमदशहाशीं लढण्याचा होता. त्यामुळें सूरजमलशी त्यानें भांडण उपस्थित न करतां त्याला स्नेहाचीं पत्रें पाठविलीं.

बादशाही नोकर सैफुद्दौला सैफुद्दीन महंमदखान बहादुर आणि ताज महंमदखान खवास यांनीं ही संधी चांगली आहे हें पाहून भाऊबरोबर बोलणी सुरू केली आणि मिर्जा जवान बख्ताला यौवराज्यावर बसविण्याची खटपट चालविली.

(१७४) कांहीं लाख रुपये तूर्त देण्याचे आणि नंतरहि कृपा करण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें. असें म्हणून त्यांनीं मराठयांचें मन वळविलें. परमेश्वरकृपेनें आणि बादशहाच्या भाग्यानें सर्व कांहीं मनासारखें घडून आलें. या नंतर भाऊनें शहाजहान (दुसरा) बादशहाला गादीवरून काढून त्याला महालांत परत पाठविलें. आणि मिर्जा जबान बख्त जहांदारशहाला मसनदीवर बसविलें आणि जीनत महाल इचा मानसन्मान केला.

(१७५) भाऊनें सर्वांना जवानबख्ताची ताबेदारी करावी अशी आज्ञा केली. स्वतः मराठे सरदारांनीं जवानबख्ताला मुजरा केला. त्यांना आणि नारोशंकर याला खिलतीचे पोशाक आणि जवाहीर, चेगा इत्यादि अलंकार देण्यांत आले. इतरांना दोनशेपर्यंत दुशाली देण्यांत आल्या.

कांहीं काळानें मराठयांच्या फौजेचा प्रवासाचा थकवा दूर झाला. मराठे सरदारांच्या मनांत युद्धाचे विचार खेळूं लागले. ताज महंमदखान खवास यानें त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला कीं अहमदशहाच्या फौजेशी लढणें योग्य नाहीं.

(१७६) त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दिवाणेखासच्या चांदीच्या छतावर त्यांची नजर पडली. तें त्यांनीं काढून घेतलें. आणि कोट्यावधि रुपयांचा माल त्यांनीं बावीस लाख रुपयाला विकला.

यानंतर मराठयांचें असंख्य सैन्य सज्ज होऊन पानीपतच्या दिशेनें चालू लागलें. दिल्लींत हें सैन्य सुमारे दीड महिने होते. लाहोरपर्यंत धडक मारावी आणि तो मुलुख उध्वस्त करावा असा त्यांचा बेत होता. समदखान हा अहमदशहातर्फे सिरहिंदचा अधिकारी होता. त्यानें कुंजपुरा येथें मराठयांशीं लढाई केली. निकराचें युद्ध होऊन मराठयांचा जय झाला. दुराणींचे अनेक लोक मारले गेले. खुद्द समदखान शौर्यानें लढतां लढतां मारला गेला.

(१७७) ही बातमी अहमदशहाला मिळतांच त्यानें कोलहून मराठयांच्या दिशेनें कूच केलें. अघाडीला नजीबखान, अहमदखान बंगश, हाफिज रहमतखान आणि दूंदेखान हे सरदार होते. त्यांच्या कुमकेला शुजाउद्दौल्याची नेमणूक होती. पावसाळ्यामुळें नदीला इतका पूर होता कीं त्यावर पूल बांधणें कठीण होतें. सैन्याला पार करतां येईल असें दिसेना. पावसाळा संपेपर्यंत त्या दिशेनें खटपट करणें जमेना.

या सुमारास मराठ्यांचा उमदा सरदार गोविंद पंडित हा इटावा वगैरे प्रांताच्या अधिकारावर होता. रसद आणि खजिना घेऊन तो दक्षिण्यांच्या छावणीकडे निघाला होता. ही बातमी अहमदशहाला कळताच त्यानें गोविंदपंताचा बीमोड करण्याकरितां सरदारांना आज्ञा केली. त्याप्रमाणें अहमदशहाचे सरदार तडक कूच करून गोविंदपंतावर तुटून पडले. गोविंदपंत पळ काढण्याच्या प्रयत्नांत होता. पण ते साधलें नाहीं.

(१७८) तो व त्याची दोन तीन हजार माणसें मृत्युमुखीं पडलीं. त्याचें सैन्य गारत करून अहमदशहाची फौज छावणीला परतली.

यानंतर अहमदशहाच्या फौजेनें सुलभतेनें यमुना ओलांडली. मल्हारराव होळकर हा एक अनुभवी सरदार होता. त्यानें सल्ला दिला कीं आपण गनिमी-काव्यानें लढावे. अफगाणास्तानांतून आलेल्या ताज्या दमाच्या फौजेशीं लढण्याची आपल्याला कल्पनाहि करवत नाहीं. पण गर्वानें भरून गेलेल्या भाऊला त्याचा सल्ला काय रुचणार. त्यानें मल्हाररावावर राग केला आणि त्याला टाकून बोलला. भाऊ म्हणाला कीं आमची फौज जंगी आहे. जबरदस्त तोफखाना आणि युद्धोपयोगी सामान आमच्या जवळ आहे. मोठेमोठे सरदार आमच्या बरोबर आहेत. अहमद-शहाचें सैन्य विजयी होईल असें तुला कसें वाटतें? आम्ही लढूं. जय मिळाला तर काबुलपासून ईराण पर्यंतचा मुलुख हातांत येईल. आणि मेलो तर कल्पांतापर्यंत आमचें नांव गाजत राहील. तुमचा विचार शिपाईगिरी आणि सरदारी याला सोडून आहे.

(१७९) इतकेंच नव्हे तर त्यानें मराठ्यांची अब्रू मातींत मिळेल. सारांश भाऊला आपल्या सैन्याचा आणि पराक्रमाचा भारी मद चढला होता. तो कोणाचाहि सल्ला ऐकेना. त्यानें पानीपतला मजबूत छावणी बांधली आणि तेथें तो आपलें सैन्य आणि गार्दी यांच्या सहित राहिला.

रोज उभयपक्षाच्या निकराच्या चकमकी झडूं लागल्या. मराठे बाण, बंदुकी आणि तोफांच्या द्वारें प्राण पणाला लावून लढू लागले. अहमदशहाचें सैन्यहि तितक्याच निर्धारानें लढू लागले. ते लढत लढत मराठ्यांना गोटांत घालीत. पण मराठ्यांची छावणी अतिशय मजबूत होती. त्यावर लहान मोठ्या तोफा चढविण्यांत आल्या होत्या. त्या तोफा म्हणजे लोखंडाचे डोंगरच होत. त्यांच्या माऱ्यापुढें अहमदशहाचे बेत टिकेनात. त्याच्या इच्छेला फळ येईना. हळु हळु पावसाळा संपेपर्यंत ही मोहीम रेंगाळू लागली. अशा रीतीनें सहा महिनें ही मोहीम लांबली.

(१८०) रोज लढाया होत. अहमदशहाच्या फौजेनें हल्ले करून अनेकांना मारावे, मराठ्यांची रसद लुटावी, असें चाले. मराठ्यांच्या छावणी भोंवतीं त्यांनीं अखंड कडें बांधल्यासारखें केलें. आणि मराठ्यांची रसद अजीबात बंद केली. त्यामुळें

त्यांची माणसें आणि जनावरें यांची उपासमारीनें अत्यंत हलाकीची स्थिति झाली. मराठयांच्या सैन्यांत यामुळें भयंकर गोंधळ उडाला आणि त्यांच्यांत दुर्बलतेचीं चिन्हें दिसूं लागलीं.

बाळाजीच्या कानावर ही हकीकत गेली. त्यानें बैलाच्या पाटीवर पांच लाख रुपये लादून पाठविले. दिल्लीचा किल्लेदार नारोशंकर यानें ही रकम मराठ्यांच्या छावणींत पाठविण्याचें ठरविले. पण अफगाणांच्या भीतीनें तो विचारांत पडला. पण मराठ्यांना पैशाची निकड होती म्हणून त्यानें दीड लाख रुपये पाठविण्याची व्यवस्था केली. दीडशे शिपाई जमवून त्यानें प्रत्येकापाशीं एकएक हजार रुपये दिले. आणि त्यांची रवानगी केली. ते लोक रात्रीच्या अंधारांत रवाना झाले. दुर्दैवानें ते चुकून अहमदशहाच्या लष्करांत शिरले. भल्या पहाटे त्यांनीं छावणींतून अल्लाहुअकबर आणि या अली या घोषणा एकल्या तेव्हां ते घाबरले.

(१८१) त्यांना पाहून अफगाणांनीं त्यांची सरसकट कत्तल करून त्यांचा खजिना हस्तगत केला. यानंतर दोन हजार रोहिल्यांनीं मराठयांच्या छावणीवर हल्ला केला. ते छावणींत घुसले आणि कित्येकांना ठार मारीत ते तोफखान्यापर्यंत आले. मराठयांत भयंकर गडबड उडाली. पण इब्राहीमखान गार्दी व मल्हारराव होळकर आणि इतर सरदार शूर आणि निर्धाराचे होते. भाऊचा त्यांच्यावर विश्वास होता. त्यांनीं निकर करून रोहिल्यांना चहूबाजूंनीं कोंडले. रोहिल्यांची या माऱ्यामुळें अत्यंत कठीण अवस्था झाली. ते निकरानें लढू लागले पण त्याचा कांहीं उपयोग न होता दोन हजार रोहिले मारले गेले. मराठयांपैकीं एक मातब्बर सरदार आणि चार पांच हजार माणसें ठार अगर जखमी झाली.

(१८२) या गोष्टीचा मराठयांच्या मनावर फार परिणाम झाला. या हानीमुळे ते फार सचिंत झाले. रसद बंद होऊन गेल्यानें त्यांची स्थिति हलाखीची झाली होती. आतां लढण्याशिवाय कांहीं उपाय राहिला नाहीं हें त्यांना दिसून आले. त्याप्रमाणें त्यांनीं पूर्ण तयारी केली. ते अहमदशहाच्या सैन्यावर तुटून पडले. नजीबखान आणि शुजाउद्दौला अघाडीला होते. हाफिज रहमतखान, दूंदेखान, अहमदखान बंगश हे त्यांच्या पाठीशीं होते. ते आपापल्या फौजा घेऊन पुढें झाले. आणि निकरानें लढू लागले. अहमदशहा आपले अफगाण, किजलबाश आणि गुलामांची पलटण घेऊन मध्यें उंभा राहिला.

( १८३ ) मैदानांत युद्धाची एकच रणधुमाळी माजली. अजगरासारख्या तोफा ओकूं लागल्या. जंबूरक हे सैनिकांचे प्राण हरण करू लागले. आणि बाणांचा पाऊस पडू लागला. आणि बंदूकीच्या गोळ्या सुटून प्रत्येकाच्या कानांत मृत्यूची बातमी सांगू लागल्या. युद्धाच्या भेरी आणि कर्णे यांच्या आवाजानें वीरांना स्फुरण येऊं लागले.

सैन्याचा नाश करण्याकरितां प्रत्यक्ष मृत्यूच रणांगणांत येऊन ठाकला. बाणांचा पाऊस पडूं लागला आणि शिंपल्यांत जलबिंदू जाऊन बसावे त्याप्रमाणें बाण शिपायांच्या तनुरूपी शिंपल्यांत जाऊन बसूं लागले. तल्वारीच्या आघातांनीं वीरांच्या शरीराचे तुकडे होऊं लागले आणि घोड्यांच्या खोगिरी त्यांच्या रक्तानें रंगविल्या गेल्या. वीरांच्या आरोळ्यांनीं दशदिशा दणाणून गेल्या.

(१८४) या पानावर लेखकानें कवितेंत युद्धाचें वर्णन केलें आहे. कवितेंत चाळीस ओळी आहेत. ठरीव ठशाचीं वर्णनें आहेत.

(१८५) लढाई अत्यंत निकराची झाली. परमेश्वरी इच्छेनें जय मिळावयाचा होता. मराठ्यांचें सैन्य प्रचंड असूनहि कांहीं उपयोग झाला नाहीं. युद्धाच्या धुमश्चक्रींत भाऊ, आणि विश्वासराव हे अनुभवी, शूर आणि निर्धाराच्या सरदारांना बरोबर घेऊन इतक्या त्वेषानें लढत होते कीं असें दृश्य काळानें आतां पर्यंत पाहिले नसेल. या पूर्वींच्या कोणत्याहि युद्धांत असें जय्यत सैन्य मैदानांत आलें नसेल. भाऊ वगैरे सरदारांना बंदुकींच्या गोळ्या लागून ते गतप्राण झाले. दक्षिण्यांनीं पाठ फिरविली आणि विजयाचा वारा अफगाणांच्या ध्वजाला फडकवूं लागला.

शत्रूची अगणित लूट अफगाणांच्या हातीं पडली. जड जवाहीर, सोने नाणें, आणि इतर जिनसा असा अंदाजे तीनचार कोटीचा माल अफगाणांच्या हातीं पडला. पानीपत पासून दिल्ली पर्यंत दहा पंधरा हजार दक्षिणी अफगाणांच्या तल्वारींना बळी पडले. नारोशंकरानें हें सर्व ऐकिलें. प्रतिकाराची शक्ति आपल्यांत नाहीं हें पाहून तो लाल किल्ला सोडून पळून गेला.

(१८६) जीनत महालनें आस्थेनें नारोशंकराला सल्ला दिला कीं तुम्ही आपली चीजवस्त आणि सरदारांचे कबीले वगैरे घेऊन, अहमदशहाचें सैन्य येऊन दाखल होण्यापूर्वींच येथून त्वरित निघून जावे. पानीपताहून पळून येणाऱ्यांना लोकांनीं नागविले पण जीनतमहालच्या कृपेनें नारोशंकराला उपसर्ग झाला नाहीं. हबशखान हा लाल किल्ल्यांत नोकरीला होता. त्यानें आपल्या माणसांना बरोबर घेऊन नारोशंकराशी पगारबाकीबद्दल झगडा केला. आणि त्याच्याकडून कांहीं हजार अश्रफ्या उपटल्या. नारोशंकरानें दिल्ली सोडतांना सुरक्षिततेच्या दृष्टीनें साडेतीन लाख रुपयाची रोकड आणि जिनसा जीनतमहालपाशीं ठेव म्हणून ठेविल्या होत्या. गडबडीत त्या आपल्या-बरोबर नेणें नारोशंकराला जमलें नाहीं.

पण अहमदशहा दिल्लीला आल्यावर हे सर्व त्याच्या सैन्याच्या हातीं पडले.

इब्राहीमखान गार्दी याचा वध करण्यांत आला. त्याच्याबद्दल रदबदली झाली पण त्याचा उपयोग झाला नाहीं. अहमदशहानें हबशखानाकडून जवळ जवळ दहा हजार अश्रफ्या हिसकावून घेतल्या.

जीनत महाल आणि जवानबख्त हे अहमदशहाला बारा कोसावर नरेला या गांवीं सामोरे गेले. आणि ज्याफत म्हणून अहमदशहाला एक लाख रुपये आणि वजीर शहावलीखान यास पन्नास हजार रुपये दिले.

# मनाजिल अल्फतूह

[ महंमद जाफर शाम्लू हा ईराणच्या बादशहाच्या पदरीं होता. अहमदशहाच्या पानीपतच्या युद्धप्रसंगीं तो हजर असून या युद्धावर त्यानें एक छोटासा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाचें नांव मनाजिलल्फतूह म्हणजे यशाचे टप्पे हें होय. हा ग्रंथ अद्यापि अप्रकाशित आहे. यांतील पानीपत प्रसंगाचा इंग्रजी अनुवाद ईलियट आणि डौसनच्या ग्रंथाच्या आठव्या खंडांत देण्यांत आला आहे. सदर ग्रंथाची फोटो स्टाटप्रत महाराष्ट्रराज्याच्या सरकारी दप्तरखान्याचे संचालक डॉ. पी. एम. जोशी यांच्या प्रयत्नानें पाहाण्यास मिळाली. प्रस्तुत अनुवाद मूळ फारसीवरून करण्यांत आला आहे. ]

( २९ ) अहमदशहानें उन्हाळा साबितगड येथें काढला. पावसाळा जवळ आला तसें अहमदशहानें कूच करून अनूपशहर येथें छावणी केली. त्यानें आज्ञा केली कीं प्रत्येकानें गवताची झोंपडी तयार करावी. म्हणजे पावसाळ्यांत तंबू वगैरे खराब होणार नाहींत. कामगारांनीं तडकाफडकीं गवताची छपरें तयार केली. तोंच बातमी आली कीं विश्वासराव आणि त्याचा नायब भाऊ हे शहाजहानाबादेंत दाखल झाले आहेत. त्यांच्याबरोबर जवळजवळ साडेतीन लाख स्वार शिपाई आहेत. याच सुमारास शुजाउद्दौला हा तीस हजार स्वार आणि पायदळ आणि पन्नास तोफा घेऊन अहमदशहाच्या लष्करांत दाखल झाला.

( ३० ) अहमदशहानें शुजाउद्दौला आणि शहापसंदखान यांस आज्ञा केली कीं तुम्ही येथून निघून तडक शहादऱ्याला पोहोंचावें आणि तेथें तंबू उभारावे. शहादरा हें ठिकाण यमुनेच्या कांठीं असून दिल्लीच्यासमोर आहे. म्हणजे दिल्लीच्या किल्ल्यांत आपले लोक आहेत त्यांना धीर येईल. आज्ञेप्रमाणें ते दोघे निघाले. पावसामुळें जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें होतें. कांहीं ठिकाणीं तर पाणी घोड्यांच्या छातीपर्यंत लागत होतें. हिंडन आणि काली या नद्यांना पूर आला होता. रस्ते कोठेंच दिसत नव्हतें. अत्यंत अडचण सोसून ते शहादऱ्याला पोहोंचले. तेथें त्यांनीं तंबू उभे केलें. दिल्लीच्या किल्ल्यांत अडकलेले अब्दालीचे शिपाई आणि किजलबाश हे नावांतून नदी पार करून छावणींत आले. पावसाळा होता. आणि यमुनेला पूर आल्यामुळें मराठ्यांना यमुना पार करणें योग्य वाटलें नाहीं. कुंजपुरा येथें अब्दुस्समदखान, कुतुबजंग, नजाबतखान वगैरे अफगाण सरदार दहा पंधरा हजार सैन्यासहित जमले होते.

( ३१ ) अब्दालीच्या छावणींत जाऊन मिळावे तर नदी पार करणें अशक्य होतें म्हणून ते विवंचनेंत कुंजपुऱ्यास राहिले होते. ही बातमी भाऊ आणि विश्वासराव यांना लागली. कुंजपुऱ्यांतील अफगाण सरदारांचा बीमोड करावा म्हणून त्यांनीं तिकडे कूच केलें. कुंजपुऱ्यास मराठे पोहोंचल्यावर तेथें मोठी लढाई झाली. मराठ्यांची संख्या अधिक होती. त्यांनीं अफगाणावर विजय मिळवून सर्वांची कत्तल केली. अब्दुस्समद आणि कुतुबजंग हे मारले गेले. नजाबतखान कैद झाला.

त्यावेळी मराठ्यांची शक्ति इतकी वाढली होती कीं त्यांनीं अटकेपर्यंतचा सगळा मुलुख आपल्या ताब्यांत आणिला होता. सारांश अफगाण सरदारांचा पराजय आणि त्यांचा वध यांची हकीकत अहमदशहाला कळली. त्यानें पुष्कळ खेद केला. पण त्याचा काय उपयोग. आतां पावसाळा संपत आला होता.

( ३२ ) अहमदशहानें शहादऱ्याहून कूच करून कुंजपुऱ्याचा रोख धरला. ही बातमी मराठे सरदारांना लागताच ते कुंजपुऱ्याहून निघून पानीपतला येऊन पोहोंचले. अहमदशहापाशीं खालीलप्रमाणें सैन्य होतें. स्वतः अहमदशहापाशी साठहजार स्वार आणि वीसहजार पायदळ, दोनहजार उंटावरील जंबूरकधारी स्वार आणि दोनशे तोफा. शुजाउद्दौल्यापाशीं तीसहजार स्वार आणि पायदळ व पन्नास तोफा, अहमदखान बंगश याजपाशीं पंधरा हजार स्वार आणि पायदळ आणि साठ तोफा, नजीबखान याजपाशीं तींस हजार स्वार आणि पायदळ आणि तीस तोफा, हाफिज रहमतखान याजपाशी, पंचवीस हजार स्वार आणि पायदळ आणि पंचवीस तोफा, दूंदेखान याजपाशी बारा हजार स्वार आणि पायदळ आणि दहा तोफा.

( ३३ ) असदुल्लाखान याजपाशीं वरीलप्रमाणे म्हणजे बारा हजार स्वार आणि पायदळ आणि दहा तोफा.

हें सगळें सैन्य घेऊन अहमदशहानें तीन दिवसांत यमुना ओलांडली आणि मराठा सैन्याच्या समोर आपली छावणी उभी केली.

काका पंडित नांवाचा बारा हजार स्वारांचा सरदार होता. मराठ्यांनीं त्याला गाजीउद्दीन नगरकडे पाठविले. अहमदशहाच्या छावणींत रसद येत होती ती बंद पाडावी ही कामगिरी त्याला देण्यांत आलीं. याचा परिणाम असा झाला कीं तीन दिवसांत अहमदशहाच्या छावणींत धान्याचा तुटवडा पडला. रुपायाला एक शेर अशीं धारण झाली. यामुळें सैन्यांत घबराट निर्माण झाली.

या नंतर अहमदशहा शिकारीचे निमित्त करून बाहेर पडला. शिकारींत असता त्यानें हाजी नवाब अल्कुजाई याला सांगितलें कीं दोन हजार शिपाईबरोबर घे आणि अमक्या अमक्या दिशेला शिकार करून ये. अहमदशहानें हाजी अल्कुजाईला एकांतांत

सूचना केली की काका पंडितावर हल्ला करून त्याला शिक्षा करावी आणि हांकलून लावावे.

(३४) त्याप्रमाणें हाजी नवाबखान यानें यमुना ओलांडली आणि एका दिवसांत त्यानें गाजिउद्दीन नगर गांठले. त्याच्यांत आणि मराठ्यांत दोन प्रहर युद्ध होऊन मराठ्यांचा पराजय झाला. आणि त्यांचे अनेक लोक तल्वारीना बळी पडले. काका पंडित या युद्धांत मारला गेला आणि मराठ्यांचे उरलेले सैनिक पळून गेले. हाजी नवाब हा विजय मिळवून आणि वंजाऱ्यांना घेऊन छावणींत आला. अहमदशहाच्या छावणींत आतां सुबत्ता झाली.

मराठे आणि अफगाणांच्या छावण्यांत तोफांच्या दोन गोळ्यांच्या टप्प्याचें अंतर होते. उभय सैन्याच्या आघाडीच्या चकमकी रोज होत.

एकदां मराठ्यांचे हजार स्वार दिल्लीहून खजिना घेऊन येत होते. प्रत्येक स्वारापाशीं दोन दोन हजार रुपये होते.

(३५) अब्दालीकडील सैन्याच्या भीतीनें ते रात्री प्रवास करीत होते. पहाटेच्या वेळी डोळ्यावर झोंप अपल्यामुळे ते रस्ता चुकले आणि अब्दालीच्या छावणींत आले. त्यांच्या बोलण्यावरून ते मराठ्यांच्या छावणींत खजिना घेऊन चालले आहेत असें कळलें. लगेच अफगाण वीर त्यांच्यावर तुटून पडले आणि सूर्योदयापर्यंत त्यांनीं तीन चारशे लोकांना ठार मारले. शहावलीखान वजीर याचा खोजा आका संदल हबशी हा होता. त्यानें एका मराठा स्वाराला ठार मारून दोन हजार रुपये लुटले. बाकीचे मराठे पळून आपल्या छावणींत गेले.

अशाच प्रकारे एक दिवस हजार दोन हजार मराठे रसद आणि चारा गोळा करण्याकरिता बाहेर पडले त्यावेळी अब्दालीचे अफगाण आणि हिंदुस्थानी शिपायी यांनीं त्यांना गारद केले.

(३६) शेवटी परिस्थिति अशी झाली कीं मराठ्यांच्या छावणींतून कोणी बाहेर पडेनासें झालें. छावणींतील मजूर मात्र लपत छपत बाहेर जाऊन गवत कापून आणीत. हें अहमदशहानें पाहिलें. त्यानें आज्ञा केली कीं सरदार जहानखान आणि हाजी नवाबखान अल्कुजाई यांनी रोज मराठा सैन्याभोंवती दोन कोसांच्या अंतरावर उत्तर आणि दक्षिण या दोन्हीं दिशेनें घिरट्या घालाव्या आणि छावणींतून रसद आणावी म्हणून कोणी बाहेर पडले तर त्याला ठार करावे. त्याप्रमाणे दोघे सरदार दोन महिनेपर्यंत मराठा छावणी भोंवती घिरट्या घालीत आणि रसद आणण्याकरितां म्हणून बाहेर पडलेले कोणी दिसले कीं त्यांना गांठून ठार करीत. आणि परस्परांना भेटून एक पूर्वेकडे तर दुसरा पश्चिमेकडे कूच करी.

(३७) सारांश रसदेच्या तंगीमुळें मराठ्यांच्या लष्कराचे हाल झाले. आणि युद्ध करण्याच्या उद्देशानें त्यांचें सैन्य छापणींतून बाहेर पडलें. त्यांच्या घोड्यांच्या टापांनीं उडालेला धुराला आकाशापर्यंत पोहोंचला. तो इतका कीं दिवसाच्या ऐवजी रात्रीचा अंधार भासू लागला. एकत्र बसलेली माणसेंहि परस्परांना दिसेनाशीं झालीं. शहापसंदखान हा सेनापति, पाग्याचा मुख्य, आणि हरकाऱ्यांचा प्रमुख होता. त्याला अहमदशहानें हुकुम केला कीं जाऊन काय खबर आहे ती घेऊन ये. मराठ्यांच्या लष्कराची काय हालहवाल आहे त्याची बातमी आण.

शहापसंदखान, प्रस्तुत लेखक, आणि इतर कांहीं घराचीं माणसें असे ऐन अंधारांत निघालों. आमच्या माणसांना मराठ्यांशीं नेहमी प्रसंग पडत असल्यामुळें त्यांची माहिती होती. त्यांच्या (मराठ्यांच्या) छावणीच्या दिशेनें आम्ही निघालों.

(३८) चार घडींत (घटका) आम्ही अर्धा कोस मजल मारली. तोंच मराठयांच्या तोफांचे आवाज माझ्या आणि माझ्या सोबत्यांच्या कानीं पडले. आमच्या घोड्यांच्या टापांचे आवाज त्यांच्या गोलंदाजांच्या कानावर गेलें. त्यांना वाटलें कीं अहमदशहाची फौज अंधारांत चाल करून येत आहे. त्यांनीं कांहीं तोफा उडविल्या. त्यांचे गोळे आम्हा लोकांच्या जवळून गेले. पण आम्हाला इजा न होतां आम्ही परतलों आणि अहमदशहाला कळविलें कीं मराठी फौज युद्धाकरितां तयार होऊन येत आहे.

अहमदशहानें आपल्या सैन्याची रचना केली. आपल्या उजव्या बाजूस त्यानें शहावलीखान वजीर यास नेमले. शहावलीखानाच्या बाजूला अहमदखान बंगश, बंगशच्या बाजूला हाजी नवाबखान अल्कुजाई, त्याच्या पलीकडे हाफिज रहमतखान, त्याच्या पलीकडे अजमतखान अलीजाई, आणि त्याच्या पलीकडे असदुल्लाखान आणि दूंदेखान, अशी योजना होती.

सैन्याच्या मध्यभागीं स्वतः अहमदशहा होता. अग्राडीला त्याच्या समोर दोनहजार जंबूरकधारी असे उंटावरील स्वार होते.

(३९) त्यांच्या मागे वीसहजार जेजल्ची यांची पायदळ फौज होती. त्यांच्या मागे अहमदशहाचे अधिकारी होते. त्यांच्या मागे नगारखाना होता. अहमदशहाच्या पाठीशीं दहाहजार किजलबाश स्वार होते. त्यांच्या मागे दुराणी आणि गिलजाई फौजेचें ठाण होतें. उजव्या फळीच्या मागे हाजी जमालखान बारकुजाई याला एक मैलाच्या अंतरावर उभे करण्यांत आले होतें. हेतु हा कीं समोरील पथकांवर शत्रूनें हल्ला केला तर त्यांस ताबडतोब मदत करावी.

अहमदशहाच्या डाव्या बाजूची सैन्य रचना अशी होती. प्रथम शुजाउद्दौला, त्याच्या जवळ जहानखान, त्याच्या जवळ नजीबखान.

(४०) नजीबखानाच्या जवळ शहापसंदखान, आणि त्याच्या जवळ मुल्ला सरदार रोहिला. डाव्या फळीच्या पाठीशीं नसरुल्लाखान नूरजाई हा नेमण्यांत आला होता. समोरील पथकें मागे हटलीं तर त्यांना त्यानें मदत करावी असें ठरलें होतें.

उभय दळें एकमेकासमोर उभी राहिलीं. कांहीं काळपर्यंत उभय सैन्यें अशीच समोरा समोर उभीं होतीं. सैन्याच्या हालचालीमुळें धुराळा आकाशापर्यंत गेला. नंतर उभय दळें परस्पराच्या जवळ येतांच दोन्हीं सैन्यांतील वीर परस्परांवर तुटून पडले. आणि एकमेकावर शस्त्रांनीं आघात करू लागले. फिरंगी जातींतील गोलंदाजांनीं तोफांचा भडिमार करण्यास सुरवात केली. बाण फेंकणाऱ्यांनीं द्रुतगतीचे आणि बहिरीससाण्या-प्रमाणें उडणारे बाण फेंकून वीरांचे प्राण हरण केले.

(४१) पण वीरांनीं गोळ्यांच्या वर्षावाची मुळीच पर्वा केली नाहीं. हे गोळे आपले काय करणार असें त्यांना वाटले. पण त्या प्रखर संघर्षाच्या धुमश्चक्रींत शूर-वीरांना धाक होता तो तोफांचा आणि बंदुकींचा होता.

सारांश दिवस मावळण्यास तीन घटिका असेपर्यंत युद्ध चालू होतें. उभय सैन्यांतील शूरवीर तल्वारी आणि भाले यांनीं लढत होते. जखमी लोकांचे विव्हळणे चालू होतें. सुरवातीला भाऊ आणि विश्वासराव यांनीं इतके मोठे आणि सतत हल्ले केले कीं अहमदशहाला आपला निभाव लागणार नाहीं असें वाटलें. त्यानें माणसें पाठवून बायकांना घोड्यावर स्वार होऊन तयार राहाण्याची व्यवस्था केली. काफरांचा विजय झाला तर त्यांनीं तात्बडतोब निघून जाऊन सुरक्षित स्थळ गांठावे अशी व्यवस्था करण्यांत आली. महमूदखान गुर्दबल्बास हा खोजा आणि जनानखान्याचा रक्षक होता. त्याच्याबरोबर आठ नऊ हजार किजलबाशांचें तडफदार सैन्य होते. तो अहमदशहाच्या मागे ठाण मांडून होता.

(४२) त्यानें निर्धारानें पुढें होऊन अशी तल्वार चालविली की सारे जण थक्क झाले. त्याच्या सततच्या हल्ल्याचा असा परिणाम झाला कीं मराठे आपल्या जागेवरून पुढे हलू शकले नाहींत.

याच वेळी जंबूरकधारी, आणि जेजलची यांना अहमदशहानें आज्ञा केली कीं तुम्ही शत्रूवर जेजले आणि जंबूरक यांचा मारा करून त्यांचा नाश करा. त्या प्रमाणें त्यांनीं भडीमार केला.

(४३) अहमदशहाच्या सुदैवानें जंबूरकची एक गोळी विश्वासरावाच्या कपाळावर बसली. आणि दुसरी भाऊच्या बागलेला लागली. त्यामुळे ते दोघेहि ठार झाले. इतरहि किजल बाशांच्या शस्त्राघातांनीं मृत्युमुखीं पडले. सारांश, आपले सरदार मारले गेले असे मराठी सैन्यानें पाहिलें आणि त्यांनीं पळ काढण्यास सुरवात केली एका क्षणांत रणमैदान रिकामें झालें.

हरकाऱ्यांनीं शहापसंदखानास कळविलें कीं मराठे रणांतून पळून गेले आहेत. आणि मैदानांत कोणी राहिलें नाहीं. जनकोजी आणि मल्हारराव हे मातबर मराठे सरदार होते. आपल्या लाख स्वारानिशीं ते निर्धारानें शहापसंदखानाशीं झुंजत होते.

( ४४ ) मराठ्यांचा मोड झाला हें शहापसंदखानानें ऐकलें. त्यानें हिंमत करून आपल्या समोर असलेल्या मराठा सरदारांवर हल्ला चढविला. दोन घटका युद्ध झालें. शेवटी ते रणांगण सोडून पळून गेले. शहापसंदखानाबरोबर ईराणी आणि दुराणी शिपायी होते. त्यांनीं मराठ्यांचा पाठलाग सुरू केला. मी ( प्रस्तुत लेखक ) मात्र शहापसंदखानापाशीं उभा होतों. शेवटीं शहापसंदखान म्हणाला कीं मी अहमदशहाचें अभिनंदन करण्यास जात आहे. तूंहि जा आणि स्वतःकरितां लूट घेऊन ये.

मला परवानगी मिळतांच, मी, माझा चुलतभाऊ आणि एक नोकर असे आम्ही घोड्यावरून निघालों. आम्ही मराठ्यांच्या छावणींत पोहोंचलो. तेथें तीस हजार माणसें, पाटीशी बंदुकी आणि हातांत तल्वारी धरलेलीं अशी फिरत होतीं.

( ४५ ) आम्ही तिथे त्यांच्या रांगेंतून घुसलो आणि सामानाचें लादलेले चवदा उंट घेऊन बाहेर पडलों. तीं माणसे तीस हजारावर होतीं. ती इतकीं घाबरलीं होतीं कीं त्यांना आपलीं शस्त्रें चालविण्याचें भान राहिलें नाहीं. यापेक्षां आश्चर्याची गोष्ट घडली ती अशी कीं आम्ही आपल्या छावणीकडे परत येत असतां वाटेंत आम्हाला एक मराठा सरदार भेटला. तो सैन्याच्या पिछाडीवर नेमलेला होता. त्याच्याबरोबर सहासात हजार माणसें होतीं आणि तो पळून जाण्याच्या तयारींत होता. आम्हाला त्यांच्याकडून उपसर्ग होऊं नये म्हणून आम्ही त्यांच्या दिशेनें आमच्या बंदुकी चालविल्या मग ते लोक दुसऱ्या दिशेनें निघून गेले. आम्ही त्यांच्याकडून दोन उंट घेतले. एकावर नगारे होते आणि दुसऱ्यावर रसद होती.

( ४६ ) हे सगळे घेऊन आम्ही रात्रीच्या पांच घटका झाल्या तसें छावणींत सुरक्षित आलो. त्यावेळीं अहमदशहा आणि इतर हिंदुस्थानी सरदारांच्या गोटांतून नगाऱ्याचे गगनभेदी ध्वनी निघत होते. या लढाईत पेशव्यांचा मुलगा समशेरबहादुर आणि इब्राहीमखान गार्दी ( हा तीस हजार तेलंगे गार्दीं यांचा मुख्य होता ) आणि गुजरातचा सुभेदार हे मारले गेले. मराठा सैन्य साडेतीन लाख होते. त्यापैकीं पन्नास हजार सैन्य मोठ्या कष्टानें दक्षिणेंत पोहोंचले. बाकीचें युद्धांत अगर वाटेंत गाजींच्या समशेरींना बळी पडले.

मी स्वतः डोळ्यांनीं जें पाहिलें आणि तेथें हजर असलेल्या हरकाऱ्यांकडून जें ऐकलें आहे तेंच लिहिलें आहे. या युद्धाबद्दल मला जितकी माहिती आहे तितकी कुणालाच नाहीं.

(४७) हरकारे सगळे माझ्या हाताखालीं होते. आणि मी शहापसंदखानाचा कारभारी होतो. आणि हरकाऱ्यांनी आणलेली प्रत्येक बातमी माझ्या मार्फतीनेंच शहापसंदखानापाशीं पोहोंचत होती. मी वर दिलेल्या मजकुरास सोडून कोणी दुसरें कांहीं सांगेल तर तें खोटें समजावें. ईराणी आणि दुर्राणींनीं दिल्लीच्या पलीकडे असलेल्या बल्लमगड आणि फरीदाबादपर्यंत म्हणजे पानीपतपासून साठ कोसापर्यंत मराठ्यांचा पाठलाग केला. आणि सांपडले त्यांनीं घोडीं वगैरे काढून घेऊन त्यांना ठार मारले.

(४८) मी महंमदबेगखान हमदानीबरोबर महादजी शिंद्यांच्या छावणींत कांहीं दिवस होतो. शिंदे याचा पाय इतका अधु होता कीं त्याला जागेवरून उठविण्यास दोन माणसें लागत. एकानें याचें कारण विचारलें शिंद्यानें दीर्घ निश्वास सोडून सांगितलें कीं दैव विरुद्ध झालें तर युक्तीचें कांहीं चालत नाहीं.

(४९) मी बारा हजार रुपये देऊन भीमथडी घोडी घेतली होती ती वाऱ्यापेक्षांहि चपळ होती. भाऊ आणि विश्वासराव हे मारले गेले त्यावेळी माझी आणि जनकोजीची ताटातूट झाली. मी रणांगणांतून पळू लागलों. एक मोगल, तुर्की घोड्यावर स्वार असलेला माझा पाठलाग करू लागला. प्रत्येक वेळेस मी मागे वळून पाही तों त्याचा घोडा पुढे चालून येत असलेला दिसे. शेवटी माझी घोडी थकली. त्या स्वारानें मला गांठलें. आणि घोडी आणि सामान काढून घेतले. जातांना त्यानें माझ्या पायावर तलवारीनें वार केला आणि म्हटलें कीं हा वार जन्मभर तुझ्या आठवणींत राहील. त्या वेळेपासून मला ही पीडा आहे म्हणून तो प्रसंग मला आठवतो.

दुसरी गोष्ट अशी कीं मराठे पळत असतां कांहीं जण सोनपतच्या सराईंत जेवणासाठी थांबले.

(५०) इतक्यांत अब्दालीचे शिपाई पाठोपाठ पोहोंचले. सराईच्या रक्षकांनीं भीतीनें दरवाजे बंद केले. मराठे पळूं पाहात होते पण सराईचे दरवाजे तर बंद होते. एका मराठ स्वारानें भिंतीवरून आपलीं घोडी उडविण्याचा प्रयत्न केला. घोडीनें बहिरी ससाण्याप्रमाणें झेंप घेतली. पण भिंतीच्या तटावर अडकून ती मरण पावली. तीस वर्षांपूर्वी माझे त्या भागांत जाणें घडलें. तटावर त्या घोडीच्या हाडांचा सांपळा मला दिसला. त्या घोडीनें दाखविलेली कामगिरी चहूकडे प्रसिद्ध आहे.

या गोष्टी ११७४ हिज्रींत (१७६०-६१) मध्यें घडल्या.

# फ्र्यांकलिनकृत शहा आलमच्या कारकिर्दीचा इतिहास

[ इ. स. च्या अठराव्या शतकांत फ्र्यांकलिन नांवाचा एक लष्करी अधिकारी ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरींत क्याप्टनच्या हुद्यावर होता. हिंदुस्थानांत त्यानें अनेक वर्षें काढलीं. त्यानें इ. स. १७९८ मधें शहा आलमच्या कारकिर्दीचा इतिहास लिहून काढला. या ग्रंथाच्या लेखनांत आपण खालील फारसी हस्तलिखितांचा उल्लेख केला असें तो म्हणतो.

गुलाम अलीखान हा शहा आलमचा मुलगा मिर्जा जवान बख्त जहांदारशहा याच्या पदरी होता. त्यानें शहा आलम नामा नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. मनूलाल हा शहा आलमच्या पदरीं होता. त्यानें शहा आलमच्या कारकिर्दीच्या पहिल्या तेरा वर्षांची हकीकत दिली आहे. फ्र्यांकलिननें त्याच्याहि हस्तलिखिताचा उपयोग केला आहे. फ्र्यांकलिनच्या ग्रंथांत पानीपत संबंधीचा मजकूर संक्षेपानें आला आहे. तो खालील प्रमाणें आहे. पानें १८ ते २५. ]

निजामाशी तह केल्यानंतर बाळाजी हिंदुस्थानांतील मोहीम तडफेनें चालविण्यास मोकळा झाला. त्यानें एक लाख सैन्य जमविलें आणि तें आपला मुलगा विश्वासराव याच्या आधिपत्याखालीं देऊन पाठविलें. विश्वासरावाच्या बरोबर शमशेर बहादुर, सदाशिवराव, इब्राहीमखान गार्दी, अंताजी माणकेश्वर, अप्पाजी, जयाजी, रघोजी ही प्रमुख मंडळी होती. ते सर्व प्रथम जाटांच्या मुलुखांत पोहोंचले. वजीर गाजिउद्दीन, जाट आणि मल्हारराव होळकर हे त्यांना बिया नदीच्या कांठावर भेटले. उभय सैन्यांच्या ( अफगाण आणि मराठे ) मध्यें यमुना नदी होती. पावसामुळें नदीला पूर आला असल्यामुळें दोन्हीं सैन्यांना स्वस्थ बसून राहावे लागले.

या काळांत विश्वासरावानें अब्दालीला सुचविलें कीं नादिरशहाच्या काळांत जो तह झाला होता तो कायम राहावा. अब्दालीनें तिरस्कारानें ही सूचना फेटाळली. त्यानें उलट मागणी केली कीं मराठ्यांनीं आपल्या मुलुखास परत जावे, पुन्हां नर्मदा ओलांडू नये. आपली सत्ता कर्नाल पानीपतपर्यंत चालावी, साम्राज्याचा वसूल बादशाही अधिकाऱ्यांनीं करावा आणि त्यांनीं मराठ्यांना चौथाईची ठरलेली रक्कम द्यावी, आणि मराठ्यांनीं वसूलीच्या कामांत लक्ष दखल देऊ नये.

दोन्ही पक्ष आपापल्या मागण्यावर अडून राहिल्यामुळें वहाची बोलणी थांबली.

शहाजहानाबाद ( दिल्ली ) हें अब्दालीचा सरदार याकूब अलीखान याच्या ताब्यांत होतें. त्याच्यापाशीं दोन हजाराचें सैन्य होतें. त्यांत पांचशे अफगाण होते. शिबंदीची दुर्बल अवस्था लक्षांत येताच विश्वासरावानें दिल्ली शहराला वेढा घालून तें आपल्या ताब्यांत घेतलें. याकूबखान आणि त्याच्या शिपायांची मालमत्ता घेऊन

त्यांना काढून लावण्यांत आलें. दिल्ली ताब्यांत आल्यावर विश्वासरावानें गाजीउद्दीन वजीराची नेमलेली माणसें बडतर्फ केलीं. खुद्द वजीरासहि त्यानें उपेक्षेनें वागविलें त्यामुळें तो नाराज झाला आणि मराठ्यांच्या छावणीपासून दोन कोसावर त्यानें आपला तळ हलविला.

शुजाउद्दौल्याला वजीर म्हणून नेमावा म्हणून याच सुमारास मराठ्यांनीं त्याच्याशीं खाजगी बोलणीं सुरू केली असावीत. या अवधींत शुजाउद्दौला अब्दालीच्या छावणींत आला होता. रोहिल्यांच्या सल्ल्यानें अब्दालीनें शुजाउद्दौल्याला मराठ्यांशीं बोलणीं करण्याकरितां पाठविलें. यावेळीं अटी घालवण्यांत आल्या होत्या. जाटांनीं या बोलण्यांत मध्यस्थांचें काम करावें असें ठरलें. विश्वासरावानें शुजाउद्दौल्याला वजीर या नात्यानें सन्मानानें वागविलें. गाजिउद्दीन वजीराचा वकील राजा दिलेरसिंग होता. त्याला विश्वासरावानें आपल्या छावणींतून काढून लाविलें. गाजिउद्दीननें पाहिलें कीं कोणत्याच पक्षाला आपण नकोसे झालो आहोत. आणि आपली आतां दाद लागणें शक्य नाहीं. तो तेथून निघून जाटांच्या मुलुखांत त्यांच्या आश्रयाला राहिला.

शुजाउद्दौल्यानें तहाचीं काय बोलणीं केलीं याचा तपशील समजला नाहीं. या वाटाघाटींत दोन महिने गेले. तरीहि तहाचा रंग हिसेना. पण शुजाउद्दौला अगदींच स्वस्थ होता असें दिसत नाहीं. अबदालीला येऊन मिळालेल्या लोकांचे वेगवेगळे हितसंबंध होते. पण गाजिउद्दीनला विरोध करण्यांत सगळ्यांचें एकमत होतें. शुजाउद्दौल्याचे उद्देश म्हणजे आली गौहर ( शहाआलम ) ची मोहीम यशस्वी करणें आणि स्वतःकरितां कायम वजीरी करून घेणें हे होते. गाजिउद्दीन तर बडतर्फ झालाच होता. आली गौहरला बादशहा म्हणून अब्दालीनें मान्यता दिली होती. आतां आपलें आसन स्थिर करण्याकरितां फक्त मराठ्यांची संमति त्याला हवीं होती. मराठ्यांशी बोलणीं करण्यांत शुजाउद्दौल्याचा हाच उद्देश असावा असें दिसतें. याचा परिणाम असा झाला कीं विश्वासरावानें आली गौहरला बादशहा म्हणून मान्यता दिली. आणि त्याच्या गैरहजेरींत त्यांच्या मुलाला प्रतिनिधि म्हणून नेमलें. या नेमणुकीच्या मागें एक अट होती. ती ही कीं या बाबत विश्वासरावाला पांच लाख रुपये देण्यांत यावे. मोगल राजपुत्राच्या आईनें या मोबदल्यांत मराठ्यांना पांच लाख रुपायांचें जडजवाहीर दिलें. या प्रकारानें अब्दालीला काळजी उत्पन्न झाली. शुजाउद्दौल्यानेंच हें सर्व घडवून आणलें या कल्पनेनें तो त्याच्यावर चिडला. आणखी एका घटनेमुळें त्याचा शुजाउद्दौल्यावरील संशय बळावला. दिल्लीच्या वायव्येस सात दिवसांच्या प्रवासावर कुंजपुरा नांवाचें रोहिल्यांचें ठिकाण आहे तेथें अब्दालीतर्फे, पानीपतचा फौजदार अब्दुस्समद खान आणि रोहिल्यांतर्फे कुतुबखान हे राहात होते. मराठ्यांनीं कुंजपुऱ्यावर चाल केली. त्या शहराला वेढा घालावा असा त्यांचा बेत होता. अब्दुस्समदखान आणि कुतुबखान यांनीं लढाई दिली. पण त्यांचा पराजय

होऊन ते कुंजपुऱ्याकडे परत आले. मराठ्यांनीं त्यांना फुरसद न देतां हल्ला करून कुंजपुरा घेतला आणि तेथील शिबंदीची आणि रहिवाशांची कत्तल केली. शहर त्यांच्या ताब्यांत आलें. तेथें त्यांना अलोट संपत्ति मिळाली. अब्दुस्समदखान आणि कुतुबखान यांना कैद करून विश्वासरावाकडे पाठविण्यांत आले. त्यानें अब्दुस्समदखानाचा वध करविला आणि कुतुबखानाला कैदेंत टाकलें. अब्दालीला या हानीची बातमी लागली. त्याला अतिशय संताप आला. नदीला पूर असल्यामुळें ती त्याला ओलांडता येईना. म्हणून त्यानें शुजाउद्दौल्यावर आपला राग काढला. तू बेमान फितूरी आहेस असे म्हणून त्यानें त्याला छावणींतून निघून जाण्यास सांगितलें. पण रोहिल्यांनीं मध्यस्थी केली म्हणून त्यानें शुजाउद्दौल्याला क्षमा करून परत बोलाविलें. पण त्याच्यावरचा त्याचा संशय जाईना म्हणून त्यानें शुजाउद्दौल्याला आपल्या छावणींत राहूं दिलें नाहीं. कुंजपुऱ्यासारखें स्थळ हातचें गेलें आणि शत्रू अगदीं बिनधोकपणें विजय मिळवीत आहे हें पाहून त्यांच्यावर तावडतोब सूड घेण्याचा अब्दालीनें निश्चय केला. तो हत्तीवर स्वार होऊन नदीला कोठें उतार मिळतो काय हे पाहण्याकरितां पाण्यांत उतरला. पण त्याला कोठेंहि उतार सांपडेना. कोठेंहि जा, नदीचें पाणी हत्तीपेक्षां उंच वाहात असलेलें त्याला दिसलें. विलंब होतो हें पाहून त्यानें आपल्या सैन्याला आपल्या मागोमाग येण्याची आज्ञा केली आणि स्वतः पाण्यांतून पोहून त्यानें परतीर गांठलें. आपल्या नेत्याचें धाडस पाहून अब्दालीचें सैन्य त्याच्या मागोमाग पाण्यांत उतरलें आणि विशेष हानि न होता सगळे सैन्य परतीरावर जाऊन थांबले. जी कांहीं हानि झाली ती शुजाउद्दौल्याच्या सैन्याची झाली.

आपल्या सैन्याची जमवाजमव करून अब्दालीनें राजधानीकडे चाल केली. पण तेथील बंदोबस्त उत्तम होता. अब्दालीपाशीं तोफखाना नसल्यामुळें त्यानें शहरावर हल्ला केला नाहीं. परत फिरून त्यानें मराठ्यावर हल्ला केला. त्यांत त्यांचा पराजय झाला. पण ही लढाई निर्णायक स्वरूपाची होती असें वाटत नाहीं. कांहींच्या मतें यांत मराठ्यांचाच जय झाला. पण हे असंभवनीय वाटतें. या वेळेपासून जानेवारीच्या सुरवातीपर्यंत विशेष असें कांहीं घडलें नाहीं. दोन्हीं सैन्यें आपापल्या छावणींत होतीं. अब्दालीची छावणी पानीपतच्या पूर्वेस सेहालेह येथें चार कोसावर तर मराठ्यांची छावणी पानीपतजवळ सेघेर येथें होती. डिसेंबर महिन्यांत अब्दालीला पंधरा हजार फौजेची कुमक आली. याच सुमारास मराठ्यांना दक्षिणेंतून सदतीस लाख रुपये आले. या खजिन्याच्या रक्षणाकरितां आठ हजारचें सैन्य होतें. अब्दाली आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या मानानें मराठ्यांचें बळ इतकें कमी होतें कीं ते छावणींतून बाहेर निघण्याची हिंमत करीनात. ते आपल्या छावणींत बसून राहिले. अब्दालीनें भोंवतालचा मुलुख आपल्या ताब्यांत घेतला आणि मराठ्यांची रसद पूर्णपणें बंद केली.

कुंजपुऱ्याचा जमीनदार दलीलखान रोहिला यानें मराठयांना ज्या ज्या खेड्यांतून रसद मिळण्याचा संभव होता तीं सर्व उध्वस्त केलीं. अब्दालीच्या इतर पथकांनीहि असेंच केलें. मराठयांना कांहीं हालचाल करण्याची हिंमत झाली नाहीं. त्यांची गुरेंढोरें आणि माणसें उपासानें मरूं लागलीं, छावणींत रसद अगदी शिल्लक नाहीं अशी त्यांची अत्यंत हलाखीची स्थिति झाली. अशा परिस्थितींत विश्वासरावानें सगळ्या सरदारांना एकत्र बोलावून त्यांचा सल्ला घेतला. सर्वांच्या मतें ठरलें कीं उमासमारीपेक्षां युद्ध करणें बरें. हा निर्णय घेतल्यावर मराठयांचें सैन्य छावणींतून बाहेर निघालें आणि त्यांनीं चवदा जानेवारीच्या पहाटे शत्रूवर चाल केली. अब्दालीच्या छावणीपासून ते दोन कोसावर आले तो अब्दालीनें त्यांच्याशी सामना देण्याकरितां कूच केलें. उभय सैन्यें समोरा समोर आलीं. दुपारपर्यंत त्यांनीं परस्परांवर तोफांचा भडिमार केला. आणि मग परस्परांना भिडून त्यांनीं हत्यारें चालविलीं. लढाई अत्यंत निकराची झाली. आणि जयाचें पारडें कधीं इकडे तर कधीं तिकडे झुके. दिवसाच्या उत्तरार्धांत मराठ्यांना जय मिळणार असा रंग दिसूं लागला. ते अब्दालीच्या छावणींत घुसून आले. एन याच वेळीं शुजाउद्दौल्याच्या पदरी असलेल्या फकीरांच्या ( गोसावी ? ) दळानें मराठयांवर इतक्या त्वेषानें हल्ला केला कीं युद्धाचा रंग पालटला. इतका निकराचा हल्ला मराठयांना सहन झाला नाहीं. तें मागे हटले. अब्दालीच्या सैन्यानें त्यांचा पाठलाग सुरू केला. आणि मराठयांनीं पळण्यास सुरवांत केली. युद्धांत आणि पाठलागांत हजारो मराठे मारले गेले. हा पाठलाग दुसऱ्या दिवशीहि चालू होता. मैदानांतून वाचून पळालेल्यांना जमीनदारांनीं लुबाडले किंवा मारले. त्यांतून बचावलेले आपापल्या सरदारांना जाऊन मिळाले. त्यांतून बहादुर आणि इब्राहीमखान गार्दी आपल्या शिपायांबरोबर मारले गेले. विश्वासरावाचा प्रमुख सरदार सदाशिवराव यानें आपलीं बायका माणसें शत्रूच्या हातीं पडूं नये म्हणून त्यांना विष घालून मारले आणि स्वतः नारनोलच्या दिशेनें दक्षिणची वाट धरली. विश्वासराव, मल्हारराव, जनकोजी आणि इतर सरदार मारले गेले असें म्हणतात पण नक्की काय तें समजत नाहीं. पण अब्दालीला पूर्ण विजय मिळाला याबद्दल सर्वांचें एक मत आहे.

## गुलिस्ताने रहमत

[ हाफिज रहमतखानाचा मुलगा मुस्ताजब अलीखान यानें गुलिस्ताने रहमत या नांवानें आपल्या बापाचें चरित्र लिहिलें आहे. ग्रंथाचा लेखन काल १२०७ हिज्री म्हणजे इ. स. १७९३ हा आहे. या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर इलियट यानें इ. स. १८१४ त केलें. हा इंग्रजी अनुवाद लंडन येथून इ. स. १८३१ मधें प्रसिद्ध झाला. त्यांतील पानीपत संबंधीच्या मजकुराचा मराठी अनुवाद खालीं दिला आहे. ]

( ५९-६७ ) पावसाळ्यांत, सदाशिवराव भाऊ, विश्वासराव, समशेर बहादुर हे असंख्य मराठा सैन्य बरोबर घेऊन दत्ताजीच्या वधाचा सूड घेण्याकरितां दक्षिणेंतून रवाना झाले. जनकोजी आणि मल्हारराव होळकर त्यांना वाटेंत येऊन मिळाले. हें सैन्य ११७३ हिज्रीच्या जिल्हज महिन्याच्या एकोणीस तारखेस दिल्लीस आलें. पावसाळा संपून अनुकूल मोसम येईपर्यंत मराठे दिल्लीला छावणी करून राहिले. ११७४ हिज्रीच्या सफर महिन्याच्या एकोणतीस तारखेस भाऊनें मुहीयुस्सल्तनतला गादीवरून काढून त्याच्या जागीं मिर्जा जवान बख्त याला त्याचा बाप आली गौहर हा बंगालमध्यें होता म्हणून आली गौहर (शहा आलम) चा नायब म्हणून नेमलें.

कुंजपुऱ्याचा किल्ला यमुनेच्या तीरावर असून कर्नालनजीक आहे. तेथें अब्दालीच्या फौजा असून त्यांचें नेतृत्व समदखान, मूमीखान, कुतुबखान आणि नजाबत खान यांच्याकडे होते. किल्ला हवाली करण्याबद्दल नजाबत खानानें मराठ्यांच्या कडून लांच घेतली होती. किल्लावर हल्ला करण्याकरितां दिल्लीहून मराठ्यांची फौज रवाना झाली. समदखान आदि सरदार मराठयांशीं लढण्याकरितां किलयांतून बाहेर पडले. किलयांत कोणी तरी राहिले पाहिजे, या सबबीवर नजाबत खान बाहेर निघाला नाहीं. अल्प युद्धानंतर दुराणींचा पराजय झाला आणि ते किलयाकडे परत येऊं लागले. पण त्या हमारखोर नजाबतनें किलयाचे दरवाजे बंद केले. हे पाहून समदखान वगैरेनीं मराठ्यावर चाल करून प्रखर लढा दिला आणि अनेकांना मारून स्वतः रणांगणांत पडले. फितुरी नजाबत खानानें किल्ला मराठयांच्या हवाली केला. पण त्याचे उपकार न मानतां मराठयांनीं त्याला सर्वस्वी नागविले आणि त्याला पकडून ठार केलें.

कुंजपुरा मराठयांच्या हातीं पडला हें ऐकून अहमदशहाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यानें सैन्य सज्ज करण्याचे ताबडतोबीचे हुकूम दिले. सैन्यांत एक लाख शिपाई होते. अहमदशहा—तीस हजार स्वार, हाफिज रहमत—स्वार आणि पायदळ तीस हजार, नजीबखान-पंधरा हजार, शुजाउद्दौला—सात हजार आणि अहमदखान पांच हजार. आणि इतर सरदारांची पथकें होतीं तीं वेगळीं. हें सगळें सैन्य यमुनेच्या कांठावर आलें. त्यानें नावांचे तीन पूल तयार केले. आणि बागपतपाशीं नदी ओलांडली. ही बातमी मराठ्यांस कळतांच ते पानीपतला आले आणि गांवाच्या समोर त्यांनीं छावणी केली. अहमदशहानें मराठ्यांच्या छावणीसमोर आपली छावणी केली. उभयदळाच्या अघाडीच्या पथकांत रोज चकमकी होऊं लागल्या.

भाऊला वाटलें कीं आपलें सैन्य शत्रूपेक्षां जास्त आहे. आपण शत्रूची रसद तोडूं शकूं. आणि शत्रूची हलाखीची स्थिति झाली म्हणजे आपण त्यांच्यावर हल्ला करूं

आणि मग आपल्याला हटकून जय मिळेल. या विचारानें त्यानें युद्ध करण्याचें लांबणीवर टाकण्याचें ठरविलें. अहमदशहानें रसद आणण्याकरितां सैन्याची एक तुकडी नेमली होती. ती अडविण्याकरितां भाऊनें चार सरदार नेमून त्यांच्याबरोबर मोठें घोडदळ दिलें होतें. त्यांच्या चकमकी नेहमी होत. एवढ्या मोठ्या सैन्याला रसद आणावयाची ती लांबून आणावी लागे. यामुळें अहमदशहाच्या सैन्यांत रसदेची टंचाई झाली. भाऊचा उद्देश पूर्णपणें सफळ झाला नाहीं. शत्रूची रसद तोडण्याकरितां त्याला अधिक सैन्य वापरण्याची आवश्यकता वाटली. म्हणून त्यानें छावणीभोंवती खंदक खणला आणि तेथें त्यानें आपल्या तोफा उभ्या केल्या. तोफांची संख्या सातशे होती. त्या इब्राहीमखान याच्या हाताखालीं होत्या. त्यांचें रक्षण करण्याकरितां बारा हजार पायदळ शिपाई नेमले होते. असा बंदोबस्त केल्यामुळें भाऊला दूरदूरपर्यंत घोडदळ पाठवून शत्रूची रसद अडविण्याचें काम करणें सोपें झालें. या कामावर गोविंदरावाची नेमणूक करण्यांत आली. त्याच्या दिमतीस पंचवीस हजार स्वार देण्यांत आले. कटेहर (रोहिलखंड) आणि अंतर्वेदींतून अहमदशहाकडे येणारी रसद तोडण्याचें त्याला काम देण्यांत आलें. भाऊची ही योजना इतकी यशस्वी झाली कीं अहमदशहाच्या छावणींत धान्य रुपायाला एक शेराच्या हिशेबानें विकूं लागले. गोविंदरावानें रोहिलखंडावर हल्ला करण्याची आवई घातली.

याच सुमारास हाजी अताईखान आणि करीमदादखान हे सहाहजाराचें सैन्य घेऊन कंधारहून आले होते. गोविंदरावानें रसद तोडण्याचें काम यशस्वीपणें चालविलें आहे हें ऐकून त्याच्यावर हल्ला करण्याचें काम त्यांनीं पत्करलें आणि त्याच्या दिशेनें कूच केलें. चाळीस कोसाची मजल मारून त्यांनीं यमुना पार केली आणि पहाटे गाजीउद्दीन नगर गांठलें. त्यांनीं गोविंदपंताच्या सैन्यावर हल्ला करून त्याची दाणादाण उडविली. गोविंदपंताचें शिर कापून तें त्यांनीं अहमदशहाकडे छावणींतून निघाल्याच्या दुसऱ्याच दिवशीं पोहोंचविलें. दोन दिवसांत त्यांनीं ऐंशी कोसाची मजल मारली, एक मोठी नदी पार केली, आणि प्रखर लढाई केली.

त्यावेळेपासून अहमदशहाच्या छावणींत रसद वेळेवर येऊं लागली. जहानखानाबरोबर सहा हजार स्वार देण्यांत येऊन मराठ्यांची रसद तोडण्याचें काम त्याला सांगण्यांत आलें. शहापसंदखानानें आपल्या सहाहजार सैन्यानिशीं मराठ्यांच्या छावणी भोंवतीचा दहा कोसापर्यंतचा प्रदेश उध्वस्त करून टाकला. तिसरी सहाहजाराची तुकडी बहादुरखानाकडे देण्यांत येऊन मराठ्यांच्या छावणीभोंवतीं सतत घिरट्या घालून लोकांची येजा बंद करणें, बाहेर कोणी दिसला कीं कापून काढणें इत्यादि कामें त्याला सांगण्यांत आलीं. मराठ्यांच्या रसदीवर हल्ले करण्यांत जहानखानाला उत्तम यश आलें. मराठ्यांना मधून मधून रसद पोहोंचत असली तर त्यांची स्थिति अत्यंत हलाखीची

झाली. रसदेच्या रक्षणार्थ त्यांचीं अनेक माणसें लढून मेलीं. याशिवाय रोगराई आणि उपासमारीनें कित्येक लोक मेले.

इनायतखान (हाफिज रहमत खानाचा मुलगा आणि ग्रंथकर्त्यांचा भाऊ) हा वयानें लहान असल्यामुळें त्याला बरेलींत ठेवण्यांत आले होतें. पण बापाकडे पानीपत-वर जाण्यासंबंधीं त्याचा उत्साह इतका दांडगा होता कीं दोनशे स्वारशिपाई घेऊन तो अहमदशहाच्या छावणींत आला. त्याचा उत्साह आणि तडफ पाहून अहमदशहाला आनंद झाला. त्यानें त्याला मानाचा पोशाख आणि उत्कृष्ट तल्वार दिली. यावेळीं इनायतखानाची आई वारल्याची बातमी हाफिज रहमतखानाला प्रथमच कळली. अहमदशहानें दुखवट्याकरितां आपले सर्व सरदार त्याच्याकडे पाठविले. पण ही वेळ खेद करीत बसण्याची नव्हती. हाफिज रहमतखानानें सैन्याचें नेतृत्व आपल्याकडे चालू ठेविलें. पण पत्नीवियोगाचें दुःख आणि कामाची दगदग यामुळें तो अतिशय आजारी पडला. यामुळें त्यानें आपल्या दळाचें नेतृत्व आपला चुलत भाऊ दूंदीखान आणि मुलगा इनायतखान यांजकडे सोंपविलें.

बहादुरखान, शहापसंदखान आणि जहानखान यांच्या प्रयत्नानें मराठ्यांची परिस्थिति अत्यंत कटीण झाली. एक एक दिवसाची मजल मारली तरी जळणाचें लाकूड अगर गवत दृष्टीस पडेनासें झालें. मराठ्यांनीं सैन्याची एक तुकडी धूळकोट-पर्यंत पाठविली. ती छावणीकडे परत येत असतां जहानखान आपल्या दहा हजार सैन्यासहित त्यांच्यावर तुटून पडला. त्यानें पांचहजार माणसें मारलीं आणि त्यांचीं घोडीं आणि रसदेचे उंट आणि बैल आपल्या छावणींत नेलीं. मराठ्यांना आतां युद्ध सुरू केल्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. सहा जमादिलावल ११७४ हिज्री रोजी भाऊ आपल्या सर्व सैन्यासहित छावणीच्या बाहेर पडला. तोफखाना आणि पायदळ हीं इब्राहीमखानाच्या हाताखाली देण्यांत आलीं होतीं. त्यानें सुरवातीसच दूंदेखानाच्या दळावर तोफांचा भडिमार केला. त्याला उत्तर म्हणून इकडूनहि तोफा चालू झाल्या पण त्याचा विशेष परिणाम झाला नाहीं. मराठे जवळ येतील आणि मग तलवारी घेऊन आपण त्यांच्यावर तुटून पडूं या विचारानें रोहिले सरदार प्रतीक्षा करूं लागले. पण इब्राहीमखानापाशीं मोठ्या तोफा होत्या. लांबून रोहि-ल्यांवर मारा करणें त्याला फायद्याचें होतें. त्याचा भडिमार इतका प्रखर होता आणि रोहिल्यांचें इतकें नुकसान झालें कीं दळांतील कित्येक शिपाई मागे हटले, आणि अहमद-खान बंगष त्यांच्या मदतीला येत होता त्याच्या आश्रयाला राहिले. पण ही मदत येण्याची दूंदेखान आणि इनायतखान यांनीं वाट पाहिली नाहीं. त्यांनीं इब्राहीमखानाच्या सैन्यावर हल्ला चढविला. यावेळीं उभय पक्षांतील असंख्य माणसें ठार झालीं. अफगाणांच्या शौर्याला फळ आलें. त्यांनीं मराठ्यांचा तोफखाना काबीज केला आणि त्यांना मागें रेटलें. याचवेळीं भाऊ ऐंशी हजार स्वारांसहित पुढें झाला. मराठा पायदळाला

कुमक मिळतांच तें परत आलें आणि त्यांनीं अफगाणावर हल्ला चढविला. आतां अफगाणांवर मागें हटण्याची पाळी आली. तरी दूंदीखान, शेख कबीर आणि सय्यद मासूम हे आपल्या जागीं ठाण मांडून शत्रू सैन्यावर बंदुकीचा मारा करीत होते.

या आणीबाणीच्या प्रसंगीं अहमदखान बंगश त्या जागीं आला. यामुळें अफगाणांना पुन्हां ठाण मांडून लढणें शक्य झालें. पण त्यांचें भयंकर नुकसान झालें होतें आणि शत्रु-सैन्य संख्येनें इतकें अधिक होते, कीं त्यांचा निश्चित पराजय झाला असता. पण अहमदशहा एका टेकडीवर उभा राहून ही हालचाल काळजीपूर्वक पाहात होता. त्यानें अताईखान आणि करीमदादखान यांच्या नेतृत्वाखालीं सहा हजार स्वार रोहिल्यांच्या मदतीस पाठविले. त्यांनीं मराठ्यांवर निकराचा हल्ला चढविला. त्यांत अहमदशहाचा शूर सरदार अताईखान हा ठार झाला. शहापसंदखानानें सहा हजार सैन्य घेऊन मराठ्यांच्या पिछाडीवर हल्ला केला. त्यानें त्यांची छावणी, बाजार इत्यादि उध्वस्त केली. अहमदशहानें उत्तम नेमबाज लोक निवडले. मराठ्यांचे सरदार हत्तीवर असल्यामुळें सहज ओळखूं येत. त्यांच्यावर गोळ्या झाडण्याचा हुकुम देण्यांत आला. भाऊ, जनकोजी, मल्हारराव, रघुनाथराव ( येथें विश्वासराव पाहिजे ), शमशेरबहादुर हे सगळे, एक मल्हारराव वगळता मारले गेले. आपले पुढारी मारले गेले हें पाहून मराठ्यांनीं पळ काढण्यास सुरवात केली. अहमदशहाच्या सैन्यानें त्यांचा पाठलाग केला. रणांगणावर मृतांचे ढीग पडले. अहमदशहाचें सगळे घोडदळ मराठ्यांच्या पाठलागावर निघाले. तीन दिवसपर्यंत पाठलाग चालू होता. दिल्लीची वाट असंख्य प्रेतांनीं भरून गेली. प्रत्यक्ष मैदानावर पंचवीस हजार प्रेतें मोजण्यांत आलीं, हत्ती, घोडे, उंट, बैल, सोनेनाणें, आणि तोफा याची लूट तर अगणित हातीं पडली. हिंदुस्थानांत इतकी मोठी लढाई कधीं झाली नाहीं. आणि इतकीं मोटीं सैन्यें समोरासमोर कधींच आलीं नव्हती. पूर्वी दिल्लींत इमादुल्मुल्कानें नजीबखानाशीं विरोध केला होता. त्या वेळीं मल्हाररावानें नजीबखानाला मदत केली होती. त्याचा मोबदला म्हणून नजीबखानानें मल्हाररावाला रणांतून पळून जाण्यास मदत केली.

इब्राहीमखान आणि त्याचा मुलगा हे इनायतखान आणि दूंदीखान याच्या हातीं सांपडले होते. त्याला अहमदशहाच्या सुडापासून वांचवावे असा बेत केला. पण अहमद-शहाला इब्राहीमखान छावणींत आहे असें कळले. त्यानें कसून चौकशी केली. आणि मग हाफिज रहमतखानाला कबूल करावें लागलें कीं बादशहाचा राग शांत होईपर्यंत आपण त्याला लपवून ठेविण्याचें ठरविलें होतें. अहमदशहानें सांगितलें कीं काफरांशीं मिळून मुसलमानांचा नाश करू पाहणाऱ्याला जीवंत ठेवणें शक्य नाहीं. त्याच्यावर दया दाखविली तर पुढें मागें आपण लांब आहोंत असें पाहून तो पुन्हां युद्ध करण्यास मागें पुढें पाहणार नाहीं. अहमदशहानें इब्राहीमला ठार मारण्याची आज्ञा केली. त्याच्या मुलाला हाफिज रहमत खानानें सोडून दिलें.

कांहीं दिवसांनीं अहमदशहा दिल्लीस पोहोंचला. आणि तेथून कंधारला परतण्याची त्यानें तयारी केली. सरदारांना निरोप देतांना त्यानें सांगितलें कीं हिंदुस्थानांत येण्यांत आपला उद्देश मराठ्यांचा नाश आणि मुसलमानी सत्तेची स्थापना हा होता. तो पूर्ण झाला आहे. आतां एकी राहिली तरच त्यांचें वर्चस्व टिकेल. शुजाउद्दौला हा भांडणें लाविल्याशिवाय राहाणार नाहीं हें ओळखून त्यानें त्याला आपल्याबरोबर कंधारला नेण्याचें ठरविलें. पण हाफिज रहमतखानानें आपले आणि शुजाउद्दौल्याचे घनिष्ठ संबंध ओळखतां, अहमदशहाला विनंती केली कीं शुजाउद्दौल्याला अवधकडे परत जाऊं द्यावें. अहमदशहा या गोष्टीला नाखुशीनें कबूल झाला. पण शुजाउद्दौला अफगाणांना स्वस्थ बसूं देणार नाहीं, असा धोक्याचा इषारा त्यानें हाफिज रहमतखानाला देऊन ठेविला.

## तारीखे हुसेनशाही

[ या ग्रंथाचा कर्ता इमामुद्दीन हुसेनी हा १२१२ हिज्री म्हणजे इ. स. १७९६–९७ मध्यें अहमदशहा अब्दालीचा नातू शहाजमान याच्या बरोबर लाहोर ते पेशावरच्या प्रवासांत होता. पेशावर येथें पोहोंचल्यावर त्यानें अब्दालीच्या घराण्याचा इतिहास लिहून काढला. त्यानंतर तो लखनौला परत आला. तेथें त्यानें आपला ग्रंथ आपला गुरु सय्यद ख्वाजा अबु मुहसिन यास दाखविला. तो त्याला पसंत पडला. अबु मुहसिनने त्याला म्हटलें कीं अहमदशहा आणि त्याचा मुलगा तैमुर यांच्या हकीकतीचें एक पुस्तक माझ्यापाशीं आहे. त्याचें तूं साध्या फारसींत भाषांतर कर. आणि आपल्या पुस्तकांत समाविष्ट करून एक ग्रंथ तयार कर. '

गुरुच्या आज्ञेप्रमाणें इमामुद्दीन हुसेनी यानें पुढील वर्षी ग्रंथ तयार करून त्याचे नांव तारीखे हुसेनशाही ठेविलें. या ग्रंथाचा उपयोग अब्दुलकरीम अलवी यानें इ. स. १८४२ मधें लिहिलेल्या आपल्या अब्दाली घराण्याच्या चरित्रांत केला आहे. तसच सुल्तान महंमद खान यानें इ. स. १८६३ मधें तारीखे सुल्तानी या नांवाचा अब्दाली घराण्याचा इतिहास लिहिला त्यांतहि तारीखे हुसेनशाहीचा उपयोग करून घेण्यांत आला आहे.

हा ग्रंथ अद्याप अप्रकाशित आहे. महाराष्ट्र राज्याच्या सरकारी दप्तर खान्याचे संचालक डॉ. पी. एम्. जोशी यांच्या प्रयत्नानें या ग्रंथाची फोटोस्टाट प्रत मिळाली. या ग्रंथांतील पानीपत संबंधीचा जो मजकूर आहे त्याचा मराठी अनुवाद खाली देण्यांत येत आहे. ]

( ५४ ) पावसाळा संपला. दक्षिणेंतील फौजा सर्व प्रकारच्या युद्ध सामग्रीनें सज्ज होऊन, समुद्राच्या लाटाप्रमाणें, आणि मुंग्या आणि टोळ यांपेक्षांहि अधिक अशा

संख्येनें युक्त होऊन इस्लामीयांचा बीमोड करणें आणि अहमदशहाशीं युद्ध करणें हे उद्देश धरून उत्तर हिंदुस्थानच्या रोखानें निघाल्या. त्या शहाजहानाबाद येथें पोहोंचल्या या सैन्यांत अनेक उत्कृष्ट आणि अनुभवी सरदार होते. विशेषतः त्यांचा सेनापति भाऊ नांवाचा होता. त्याच्याबरोबर मराठा राष्ट्राचा प्रमुख बाजीराव याचा मुलगा विश्वासराव हा होता. जनकोराव आणि सुभेदार मल्हारराव यांचा उल्लेख पूर्वी आला आहे. बाजीरावाचा मुलगा शमशेर बहादुर हा मुसलमान होता. त्याची आई मुसलमान होती. हिंदूंच्यांत अशी पद्धत आहे कीं एखादी मुसलमान बाई त्यांनीं घरांत घातली तर तिच्या पोटी झालेला मुलगा अगर मुलगी यांना ते मुसलमान करतात. इब्राहीमखान गार्दी याजपाशीं बारा पल्टणी होत्या. प्रत्येक पल्टणींत एक हजार बंदूकधारी पायदळ शिपाई असतात. त्यांची युद्धपद्धति ही फिरंग्याप्रमाणें असते. याशिवाय इब्राहीमखानापाशीं स्वारहि होते. इब्राहीमखान हा मोठा धीराचा सरदार होता. त्यानें दक्षिणेंत उत्कृष्ट कामगिरी बजाविली होती. त्याच्या शौर्याचा प्रभाव साऱ्या मराठा सरदारांवर पडला होता. शिंदे पाटीलहि सैन्यांत होते. पण त्या वेळीं त्यांच्या हातांत सत्ता नव्हती. मराठा सैन्यांत पांचशे तोफा होत्या. या तोफांचे तोफची हे बहुतेक फिरंगी खिस्ती होते. सैन्यांत बाराहजार राऊत आणि कांहीं हजार (पान ५५) पट्टाबाज होते. दक्षिणेंत तल्वार आणि भाले चालविण्यांत निष्णात असणाऱ्यांना पट्टाबाज म्हणतात. याशिवाय सैन्यांत साधनसामग्री बरीच असून बुणगेहि बरेच होते. एकंदरींत स्वार आणि पायदळ मिळून सैन्य इतकें प्रचंड होतें कीं त्याची गणती करणें अशक्य आहे. इतकें मोठें सैन्य यापूर्वी कोणी डोळ्यांनीं पाहिलें नाहीं आणि त्याचा मजकूर म्हाताऱ्या माणसांकडून ऐकिला नाहीं. सर्व प्रकारच्या साधनांनीं युक्त असलेलें हें सैन्य शहाजहानाबादेपाशीं येऊन पोहोंचलें. गाजीउद्दीन इमादुल्मुल्क आणि सूरजमल जाट हे या सैन्याला येऊन मिळाले.

सारांश त्या सर्व सरदारांनी मिळून लाल किल्ल्याला वेढा घातला. त्यावेळीं लाल किल्ल्याचा किल्लेदार नवाब मुहसिनुल्मुल्क याकूब अलीखान हा होता. त्यानें किल्ला लढविण्यास सुरवात केली. दिल्लीहून पूर्वेच्या दिशेला सुमारें दीडशे कोसावर शहाजहानपुर हें गांव आहे. तेथें याकूब अलीखानाचें घराणें कांहीं पिढ्यापासून वास्तव्य करून होतें. या पूर्वी याकूब अलीखान हा हाफिज रहमत खानातर्फे वकील म्हणून अहमदशहाचा वजीर शहावलीखान याच्याकडे गेला होता. हा आपल्या जमातीचा आहे हें पाहून शहावलीखानानें त्याला अहमदशहाच्या पदरीं लाविलें.

(५६) याकूब अलीखानाला दिल्लीची किल्लेदारी देण्यांत आली. शहाबलीखान हा बामजई टोळीचा होता. याकूब अलीखान हि बामजई होता.

सारांश टोळधाडी प्रमाणें मराठ्यांनीं लाल किल्ल्याच्या भोंवती गर्दी केली. याकूब अलीखान आणि किल्ल्यांतील इतर माणसें यांची स्थिति फार पेंचाची झाली. याकूब अलीखान हा स्वभावानें साल्स आणि दयाळु होता. किल्ल्यांतील लोकांचे त्यानें हाल पाहिले. सर्व हकीकत त्यानें अहमदशहाच्या आणि शहावलीखानाच्या कानावर घातली. आणि वेळ प्रसंग ओळखून त्यानें किल्ला मराठ्यांच्या हवाली केला.

याच सुमारास इमादुल्मुल्क आणि सूरजमल जाट हे तेथून निघून भरतपूर कुंभेरीकडे रवाना झाले. याला काय कारणें घडलीं तें कळलें नाहीं. मराठ्यांनीं किल्ल्याचा बंदोबस्त केला आणि एकाला किल्लेदार म्हणून नेमला. त्यावेळी भाऊ आणि इतर मराठे सरदार आपसांत बोलूं लागले कीं अहमदशहाचा पराजय होऊन अफगाण सरदार मारले गेले आणि मुसल्मानांचा बीमोड झाला कीं विश्वासरावाला हिंदुस्थानचा बादशहा बनवावा. आपल्याबरोबर देवाची मूर्ति आणिली आहे तिची स्थापना जुम्मामशिदींत करावी आणि मशिदीचें मंदिरांत रूपांतर करावें. नमाजाच्या अप्रिय अशा बांगेऐवजी तेथें शंखाचा ध्वनि चालू करावा.

पण परमेश्वरी योजना त्या मूर्ख जमातीच्या (मराठ्यांच्या) विचारावर हंसत होती. यानंतर मराठ्यांचें सैन्य कुंजपुऱ्याकडे रवाना झाले.

(५७) अब्दुस्समदखान महंमदजई, मियां कुतुबशहा आणि मोमिनखान हे आपल्या सैन्यासहित तेथें जमले होते. त्यांचा तळ कुंजपुऱ्याच्या बाहेर होता. कुंजपुऱ्याचा जमीनदार नजाबतखान गुरगश्ती हा त्यांना म्हणाला कीं मराठ्यांचें सैन्य मोठें आहे. तुम्ही किल्ल्यांत या आणि तुमची फौज किल्ल्याबाहेर राहूं द्या. अब्दुस्समदखान व इतर सरदार हे नजाबतखानाच्या म्हणण्याप्रमाणें किल्ल्यांत गेले. मराठ्यांनीं एकच गर्दी करून हल्ला केला. अफगाणांची फौज किल्ल्याबाहेर होती तिची पिछेहाट झाली. पण किल्ल्याचे दरवाजे बंद केले असल्यानें त्यांना आंत जातां येईना. यामुळें अनेक लोक मारले गेले. मराठ्यांनीं किल्ला घेतला. अब्दुस्समदखान महंमदजई, मियां कुतुबशहा वगैरे सरदार हे नजाबतखानाच्या दगाबाजीमुळें जखमी होऊन मारले गेले. केलेल्या पापाची शिक्षा म्हणून कीं काय नजाबतखानहि मारला गेला.

मराठ्यांची फौज कुंजपुऱ्याकडे रवाना झाली हें ऐकून अहमदशहानें अनूपशहराहून आपला मुक्काम हलविला. त्याच्याबरोबर नजीबखान, शुजाउद्दौला, अहमदखान बंगश, हाफिज रहमतखान, अलीमहंमदखान रोहिल्याचा मुलगा फैजुल्लाखान इत्यादि सरदार होते.

(५८) मराठ्यांना शिक्षा करून त्यांचा मोड करण्याच्या उद्देशाने ते सगळे रवाना झाले. अहमदशहाचें सैन्य बागपतला पोहोंचलें तोच बातमी आली कीं दुष्ट मराठ्यांच्या हातून अहमदशहाच्या एकनिष्ठ सरदारांचा पूर्ण निकाल लागला आहे.

या बातमीनें अहमदशहाला अतिशय वाईट वाटलें आणि त्वेष आला. बागपत येथें यमुनेच्या कांठावर उभें राहून अहमदशहानें नजर टाकली तो त्याला दिसून आलें कीं यमुनेला मोठा पूर आला आहे. नावा नसल्या तर सैन्य नदीपार होणें कठीण होतें. आणि इतक्या नावा मिळविणेंहि कठीण. अहमदशहानें आपल्या भात्यांतून बाण काढला आणि त्याच्यावर मंत्र फुंकून त्यानें बिस्मिल्लाअ–रहमानु–रहीम हे शब्द उच्चारून तो बाण नदींत उडविला. त्यावेळीं अहमदशहापाशीं गुलामांच्या चार पल्टणी उभ्या होत्या. त्यांना अहमदशहानें आज्ञा केली कीं परमेश्वराचें नांव घेऊन तुम्ही नदीपार व्हावे आणि टेहेळणी म्हणून पैलतीरावर चार कोसाच्या अंतरापर्यंत उभे राहावे. कारण शत्रूंचें बेसुमार सैन्य पंचवीस कोसांच्या अंतरावर ठाण मांडून आहे. बादशहाच्या आज्ञेप्रमाणें गुलामांच्या पल्टणींनीं नदी ओलांडली.

( ५९ ) असें म्हणतात कीं नदीचें पाणी घोड्यांच्या खोगिरीपर्यंत येऊन लागलें होते. यानंतर अहमदशहानें आज्ञा केली कीं प्रत्येक स्वारानें एक पायदळ शिपाई आणि थोडे सामान आपल्या पाठीमागे घोड्यावर घ्यावे. जड सामान हत्तींच्या पाठीवर ठेवण्यांत येऊन नदीपलीकडे नेण्यांत आलें. अशा प्रकारे परमेश्वराच्या कृपेनें आणि अहमदशहाच्या भाग्यानें सर्व सैन्य सुखरूपपणे पार झालें.

हें झाल्यानंतर अहमदशहाच्या आज्ञेनें सैन्यानें श्रमपरिहार होऊन आपली तयारी पूर्वीप्रमाणें व्हावी या उद्देशानें एक दोन दिवस संथ आणि हळु प्रवास केला. आणि सराई संभलका या ठिकाणी अहमदशहाचें सैन्य येऊन ठेपलें. तेथें त्यांना कळलें कीं मराठ्यांचें पंचवीस हजार स्वार लढण्याच्या उद्देशानें संभल्का आणि आसपासच्या भागांत जमले आहेत. अहमदशहा घोड्याच्या जीन पोश ( खोगिरी ) वर बसून सैन्याच्या रचनेचा हुकुम देत होता. सरदार शहापसंदखान हा देखणा, भव्य आणि पराक्रमी होता. तो त्यावेळी अहमदशहापाशी उभा होता. त्याच्याकडे वळून अहमदशहा म्हणाला कीं शहापसंदखान आजची अघाडीची ( करावली ) लढाई तुझी. हीं जीं कुत्रीं ( मराठे ) आज येथें जमलीं आहेत त्यांना शिक्षा करणें हें तुझ्याकडे सोंपवीत आहे.

( ६० ) आज्ञेप्रमाणें शहापसंदखान यानें अहमदशहाला कुर्निसात केला आणि आपले तीनचार हजार स्वारांचें पथक घेऊन तो निघाला. मराठे आणि अफगाण यांची गांठ पडली. आपसांत चांगलेंच युद्ध झालें. शेंवटीं मराठ्यांना अफगाणांचा मारा सहन न होऊन ते मागें हटले. अफगाणांनीं अनेकांना धुळींत मिळविले. आणि अनेकांची डोकीं कापलीं. शहापसंदखानानें कापलेलीं डोकीं अहमदशहापाशीं आणिलीं. असें म्हणतात कीं शहापसंदखानाच्या पथकांतील तीनचार हजार स्वारापैकीं प्रत्येक स्वारापाशीं एक, दोन किंवा तीन पर्यंत मराठ्यांचीं डोकीं होतीं. अहमदशहा

अब्दालीला हा एक शुभ शकूनच वाटला. त्यानें शहापसंदखानाची स्तुति करून त्याच्या बद्दल धन्योद्गार काढले आणि त्याला बक्षिसी देऊन त्याचा मानसन्मान केला.

शहापसंदखानानें विनंति केली की किब्लाये आलम, माझे प्राण आपल्या कारणीं पडोत. या कुत्र्यांची ( मराठ्यांची ) युद्ध पद्धति मी आज पूर्णपणें पाहिली आहे. इन्शाल्ला आपल्या भाग्यानें या सर्व कुत्र्यांची कत्तल होईल. त्यावेळी अहमदशहाच्या तोंडून भविष्यवाणी बाहेर पडली कीं शहापसंदखान, या कुत्र्यांचा आणि काफरांचा पूर्ण निःपात होण्यास अद्याप कांहीं अवधि आहे. शेवटी हीं दक्षिणी कुत्रीं पूर्णपणें नाश पावतील. अहमदशहाची ही भविष्यवाणी म्हणजे चमत्कारच समजला पाहिजे.

( ५१ ) अहमदशहा आपलें सैन्य आणि सरदार यांसहित कूच करून आला ही बातमी भाऊ आणिं इतर सरदार यांना लागली तेव्हां ते कुंजपुऱ्याहून निघून कर्नाल आणि पानीपतच्या मधें पोहोंचले. पानीपत हें गांव दिल्लींहून पश्चिमेकडे चाळीस कोसांवर वसलें आहे. अहमदशहाच्या आज्ञेप्रमाणें दुराणी सैन्यानें मराठी सैन्याच्या भोंवती लूटमार चालविली. मराठ्यांचें सैन्य प्रचंड होतें. तरी त्यांनीं सैन्याभोंवर्ती खंदक खणून छावणी उभी केली. आणि दमदमे बांधून अजगराच्या तोंडाप्रमाणें दिसणाऱ्या तोफा त्यांवर चढविल्या. अहमदशहानें या वेळी एक युक्ति केली. त्यानें पश्चिमेच्या दिशेनें कूच करण्याचें सोंग केलें. आणि मुक्कामावर त्यानें हलके आणि कुचकामाचें सामान आणि निकामी घोडीं आणि जनावरें टेवून दिलीं. मराठे आणि हिंदुस्थानीं आपसांत बोलूं लागले कीं असेंच हलु हलु सरकत अहमदशहा शेवटी आपल्या देशाला निघून जाईल. मराठ्यांना ही बातमी लागताच त्यांनीं अहमदशहानें टाकून दिलेल्या गोटावर चाल केली. आणि तेथें सांपडलेली घोडीं, गुरें ढोरें आणि इतर सामान लुटून ते छावणीकडे परत येऊ लागले.

( ६२ ) इतक्यांत सरदार जहानखान हा जवळच दबा धरून बसला होता त्यानें मराठ्यांच्यावर एकाएकी हल्ला चढविला. मालमत्ता लुटून नेण्यांत मराठे गुंतले होते. त्यांची घोडीं सामानानें लादलेलीं होतीं तीं घाबरून इकडे तिकडे धावूं लागलीं. अफगाणांनीं मराठ्यांवर तुटून पडून सर्वांचीं कत्तल केली. असें म्हणतात कीं त्या चकमकींत मराठ्यांचा एकहि मनुष्य निसटला नाहीं. युद्ध संपल्यावर सरदार जहानखान हा एका टेकडीवर बसून आपली तल्वार स्वच्छ करीत होता त्यावेळीं रणांत पडलेल्यांना पाहण्याकरितां शुजाउद्दौला त्या ठिकाणीं आला. शुजाउद्दौल्यानें म्हटलें कीं 'सरदार सलाम आलेकुम. जहानखानानें म्हटले आलेकुम सलाम, यावे यावे, कुशल आहे ना. शुजाउद्दौला म्हणाला, हो बादशहाच्या कृपेनें सगळें ठीक आहे. यावर जहानखान म्हणाला, बोला, नवाब मिर्जा, मी किती काफरांना मारलें असेल, यावर शुजाउद्दौला म्हणाला कीं सुमारे पांच हजार काफर मारले गेले असतील. यावर जहानखान हंसला आणि थट्टेनें म्हणाला कीं.

(६३) नवाब फर्जंदखान बहादुर, प्रत्येक डोक्याला एक रुपाया देण्याचें तुम्ही कबूल केलेत तर मी तुम्हाला वीस हजार डोकीं दाखवीन. असें म्हणून त्यानें आपल्या फौजेला बोलाविलें. फौजेंतील शिपायांनीं आपापल्या तोबऱ्यांतून (पिशव्या) डोकीं काढून तीं शुजाउद्दौल्यासमोर टाकलीं. असें म्हणतात कीं प्रत्येक तोबऱ्यांत तीन चार डोकीं होतीं. जहानखानाबरोबर एकंदरींत चार पांच हजाराचें तरी सैन्य होतें. शुजाउद्दौला हें पाहून थक्क झाला. त्यानें जहानखानाच्या शौर्याची खूप तारीफ केली. मग ते दोघे मिळून छावणीला परतले. मग जहानखानानें कापलेली डोकीं अहमदशहाला दाखविलीं. त्यानें पण जहानखानाबद्दल धन्योद्गार काढले. नंतर ती सर्व डोकीं मैदानांत टाकून देण्यांत आलीं. तेथें त्यांचे ढिगारे सर्वांच्या नजरेस पडत. अशा प्रकारें प्रत्येक हल्ल्यांत दोन तीन हजार मराठे मारले जात. अफगाण सैन्यांत कमी माणसें मारलीं जात.

या सुमारास अफगाण छावणींतील हिंदुस्थानी (रोहिले) सरदारांना बातमी लागली ती अशी—भाऊच्या आज्ञेनें गोविंद पंडित नांवाचा सरदार दिल्लीहून निघाला आहे. रोहिले आणि शुजाउद्दौला यांचा मुलुख लुटण्याचा त्याचा उद्देश आहे.

(६४) अहमदशहाला जे लोक मिळाले आहेत त्यांची मालमत्ता, आप्तइष्ट, बायका पोरें हीं नष्ट करावी या हेतूनें तो गाजिउद्दीन नगरपाशीं तळ देऊन आहे. त्याच्या बरोबर चाळीस पन्नास हजाराची फौज आहे. या बातमीनें अत्यंत अस्वस्थ होऊन रोहिले सरदार आणि शुजाउद्दौला यांनीं ही हकीकत अहमदशहाला कळविली. त्यावेळी हाजी अताईखान आणि हाजी करीमदादखान हे सरदार नुक्तेच अफगाणिस्तानांतून आले होते. ते या वेळी अहमदशहापाशी हजर होते. रोहिले सरदार आणि शुजाउद्दौला इत्यादींची काळजी दूर व्हावी या हेतूनें अहमदशहानें अताईखान आणि करीमदादखान यांना आज्ञा केली कीं तुम्ही ताबडतोब गोविंद पंडितावर चाल करून जावें. आणि त्याचा मोड करून उद्यां या वेळपर्यंत शत्रूंचीं डोकीं हजर करावीत. त्यावेळीं दिवस मावळण्यास एक प्रहरापेक्षाहि कमी असा अवधि होता. त्या उभय सरदारांनीं हाफिज रहमतखानाचा मुलगा इनायतखान याच्या सैन्यांतून पांचशे स्वार आणि सहा हेर घेतले. आणि स्वतःचे तीन चार हजार स्वार बरोबर घेऊन ते कूच करून निघाले. त्यांनीं यमुना ओलांडली आणि ऐन पहाटे गोविंद पंडितावर तुटून पडले.

(६५) त्यांनीं त्याच्या सैन्याचा धुव्वा उडविला आणि गोविंद पंताचें डोकें कापून घेतलें. तसेच आणखी पांच हजार शत्रूंचीं डोकीं कापून घेऊन ते दुसऱ्या दिवशीं त्याच वेळी छावणींत परत आले. या घटनेनें हिंदुस्थानी सरदारांची काळजी दूर झाली.

सारांश भाऊच्या आणि अफगाणांच्या आघाडीच्या चकमकी नेहमी होत. अफगाणांच्या छावणींत प्रत्येक जण आपापल्या मोर्च्यांत ठाण मांडून राहात होता.

परमेश्वरी संकेत पहा. एके रात्री दिल्लीहून मोठा खजिना भाऊच्या सैन्यांत येत होता. योगायोगानें खजिन्याचे रक्षक मराठे हे चुकून रोहिल्यांच्या छावणींत आले. त्यांच्या पैकीं एकानें दक्षिणी भाषेंत विचारलें कीं ही कोण्या सरदाराची पागा आहे. हें ऐकताच रोहिल्यानीं त्यांच्यावर हल्ला करून त्यांना ठार मारले आणि खजिना लुटला. या धुमश्चक्रीत दुराणी फौजेचे अफगाण शिपाई आले. सारांश सर्व मराठे शिपाई मारले गेले आणि संपूर्ण खजिना हस्तगत झाला.

असेंच एके रात्री इब्राहीमखान गार्दी याचा भाऊ फत्तेखान यानें तयारी करून रोहिल्यांच्या मोर्च्यावर छापा घातला.

(६६) मोर्च्यांतील लोक सावध होऊन लढू लागले. त्यांनीं शत्रूचीं तीस निशाणें आणि कांहीं तोफा हस्तगत केल्या. पराजय होऊन फत्तेखान आपल्या छावणीकडे परत गेला.

आणखी एकेदिवशीं नजीबखान आणि इनायतखान यांचे रोहिले आपल्या मोर्च्यांतून बाहेर पडले आणि लढत झगडत शत्रूच्या छावणींत घुसले. नजीबखानाच्या रोहिल्यांनीं तशीच पुढें चाल केली. आणि कित्येकांना मारीत ते मराठा छावणींतील बाजारापर्यंत पोहोंचले. मराठ्यांच्या तोफावर बसून ते डफ वगैरे वाद्यें वाजवू लागले. इतक्यांत चाळीस पन्नास हजार मराठे त्यांच्यावर तुटून पडले. आणि त्यांनीं अफगाणांना आपल्या छावणींत कोंडले. मराठ्यांनीं आपल्या तलवारी आणि भाले चालविण्यास सुरवात केली. त्याप्रसंगी मोठे घनघोर युद्ध झाले. अफगाण निकरानें लढले. परंतु ते संख्येनें कमी होते. मराठ्यांचें सैन्य प्रचंड होतें, मराठ्यांच्या स्वारांनीं त्यांना अतिशय मार दिला. त्यामुळें अफगाणांची दुर्दशा होऊन ते मारले गेले. नजीबखानाच्या सैन्यापैकीं जवळजवळ सहा हजार माणसें त्यादिवशीं मारलीं गेली. **नजीबखानाची सगळी शक्ति त्यांच्यामुळेंच होती.** वेढल्या गेलेल्या रोहिल्यापैकीं फक्त पांचशे माणसें जब्बर जखमा अंगावर घेऊन परत आलीं.

(६७) ते शिपाई जखमी झाले होते तरी त्यांचा उत्साह दांडगा होता. ते डफ वाजवीत आणि नाचत बागडत आपल्या छावणीकडे परत येत होते. शुजाउद्दौल्यानें त्यांना पाहिले आणि म्हटले कीं काय शूर माणसें आहेत ही. शुजाउद्दौला आणि नजीबखान यांचे मोर्चे जवळजवळ होते. त्यांचे तंबूहि जवळ जवळ होते. हाफिज रहमतखान हा आजारी असल्यामुळे प्रत्यक्ष युद्धांत भाग घेऊ शकला नाही. पण त्याचा मुलगा इनायतखान आणि चुलतभाऊ दूंदेखान यांनी लढाईत उत्कृष्ट कामगिरी बजाविली. बहुतेक हिंदुस्थानी सरदारांनीं या युद्धांत चांगली कामें केलीं. आणि प्रत्यक्ष लढाईत ते धीरानें आपल्या जागी ठाण मांडून राहिले.

असें म्हणतात कीं जवलजवळ पांच महिनेपर्यंत मराठे आणि अफगाण यांच्यांत चकमकी चालू होत्या. अफगाण फौजेनें मराठा छावणीची रसद तोडली होती. त्यामुळें त्यांच्या छावणींत धान्याची आणि चाऱ्या कडब्याची इतकी टंचाई झाली की लोक जनावरांच्या हाडाचे पीठ करून भक्षू लागले. अनेक घोडी निकामी होऊन उपासमारीनें मेलीं.

( ६८ ) निरुपाय होऊन दक्षिणी सरदार हे तोफखाना आणि इतर सामग्री बरोबर घेऊन छावणीच्या बाहेर पडून युद्धाला प्रवृत्त झाले. मोठें घनघोर युद्ध होऊं लागले. काळानें यापूर्वी शस्त्रसौदामिनींचा असा लखलखाट कधींच पाहिला नसेल आणि आकाशानें यापूर्वी तोफांचा असा दणदणाट कानानें कधीं ऐकिला नसेल. रणभूमीवर उडालेल्या धुराळ्यानें सर्वत्र अंधार पसरला. पृथ्वी कंपायमान होऊ लागली. तल्वारी, बाण इत्यादि शस्त्रे वीरांचे प्राण हरण करू लागलीं. यावेळी हाफिज रहमतखानाचा मुलगा इनायत खान हा तरुण होता.

( ६९ ) आपण कामगिरी बजावून दाखवावी या ईर्ष्येनें प्रेरित होऊन तो आपल्या कांहीं हजार रोहिल्यासहित मराठ्यांच्या गोटांत घुसला आणि त्वेषानें लढू लागला. जवळ जवळ साठ हजार मराठे स्वारांनीं त्याला वेढलें. आणि त्याची बाहेर निघण्याची वाट बंद करून टाकली. नंतर तल्वारी, भाले, बरछी इत्यादींनीं त्यांनीं त्याच्या सैन्यावर मारा केला. अफगाण निर्धारानें लढत होते. तो वाघाचा बच्चा इनायतखान इतके ठाण मांडून लढत होता कीं आकाश आणि पृथ्वी हल्ली असती तरी तो रेसभरहि विचलित झाला नसता. इतर हिंदुस्थानी सरदारहि आपापल्या मोर्चावर हिंमतीनें लढत होते. अहमदशहा अब्दाली एका उमद्या घोड्यावर स्वार झाला. त्याचें सैन्य तयार होऊन त्याच्या आज्ञेची वाट पाहूं लागले. इतक्यांत शुजाउद्दौला घोड्यावर बसून त्याठिकाणीं आला. आणि म्हणाला, ' कुर्बानत शवम, मी तुमच्यावर कुर्बान होवो. सर्व मराठे आज छावणींतून बाहेर पडून युद्ध करीत आहेत. ' अहमदशहानें विचारले कीं फर्जंदखान बहादुर, हें तूं आपल्या डोळ्यानें पाहिलेस काय. यावर शुजाउद्दौला म्हणाला कीं हो मी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे.

( ७० ) अहमदशहा म्हणाला कीं पुन्हां नीट चौकशी करून मला सांग. यावर शुजाउद्दौला तेथून निघून आपल्या मोर्च्यांकडे गेला. याच सुमारास रोहिल्यांनीं येऊन विनंति केली कीं इनायतखान हा शत्रूच्या तडाख्यांत सांपडला असून लवकरच त्याचा निकाल लागेल असें वाटू लागलें आहे. त्याची कुमक लवकर व्हावी. यावर अहमदशहानें हाजी अताईखान यास फर्माविलें कीं, अताईखान, तूं जा आणि त्या कुत्र्यांना आपल्या तल्वारीचा प्रताप दाखीव. त्याप्रमाणें हाजी अताईखान हा आपल्या दोन-

तीन हजाराच्या पथकासहित निघाला आणि त्यानें शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव केला. पण या धुमश्चक्रींत मराठ्यांची गोळी लागून अताईखान हा ठार झाला. हाजी अताई-खान मदतीस आला म्हणून रोहिल्यांना हिंमत आली होती. पण तो मारला जाऊन त्याचें दळ मागें हटलें हें पाहून ते फिरून निराश झाले. तरी इनायतखान मराठ्यांशीं निकरानें लढत होता. पण मराठे संख्येनें अधिक होते त्यामुळें इनायतखानाच्या सैन्यांतील लोक मारले गेले अगर जखमी झाले. हें पाहून अहमदशहानें आपल्या गुलामांच्या तीन पल्टणी तिकडे रवाना केल्या. प्रत्येक पल्टणींत एक एक हजार स्वार असत.

(७१) या पल्टणीच्या प्रमुखांना मिंगाबाशी म्हणत. अहमदशहानें त्यांना आज्ञा केली "जा आणि त्या कुत्र्यांना शिक्षा करा" एक पल्टन आज्ञेप्रमाणें रवाना झाली. ती थोड्या अंतरावर गेली होती तोच तिच्या मागोमाग दुसरी पल्टण रवाना झाली. लगेच पाठोपाठ तिसरी पल्टण निघाली. एके ठिकाणीं भाऊ आणि इतर सरदार हत्तीवर स्वार होते; आणि तेथें एकंदर तीनशे हत्ती होते त्या ठिकाणी अब्दालीची पहिली पल्टण पोहोंचलीं. तिनें बंदुकीच्या फैरी केल्या आणि ती मागे फिरलीं. लगेच तिच्या मागे असलेली पल्टण पुढें झाली आणि तिनें गोळ्यांचा वर्षाव केला आणि ती पण मागें फिरून बंदुकी भरूं लागली. या अवधींत तिसरी पल्टण पुढें होऊन गोळ्या झाडीत होती. नंतर पहिली पल्टण पुन्हां पुढें झाली. त्यानंतर दुसऱ्या पल्टणीनें तिची जागा घेतली. असा सतत प्रकार चालू होता. या गोळ्यांच्या वर्षावामुळें, भाऊ, विश्वासराव आणि इतर अनेक सरदार मरण पावले. हत्ती मार खाऊन आपल्या सैन्यांत सैरावैरा धावूं लागले.

(७२) अफगाणांनीं पुढे होऊन मराठी सैन्यावर तल्वारी चालविण्यास सुरवात केली. दक्षिण्यांचा फार मोठा पराजय झाला. त्यांचें सैन्य मोठे आणि युद्ध सामग्रीहि भक्कम, पण तें पळ काढूं लागलें. अफगाण, रोहिले आणि हिंदुस्थानी सैन्यानें चोहोकडे कत्तल आरंभिली. इतके दक्षिणी मारले गेले कीं काळानें अशी कत्तल कधींच पाहिली नसेल. पृथ्वीला इतकें रक्त यापूर्वी कधींच पिण्यास मिळालें नसेल. चाळीस पन्नास कोसापर्यंत प्रेतें पडलीं असून, जगांतील गर्वोन्मत्तांना धडा शिकवीत होतीं. सारांश मेलेल्यांची गणती करणें शक्य नाहीं. सारे मैदान प्रेतांनीं आणि सारे वातावरण जखमी लोकांच्या आर्तस्वरांनीं भरून गेलें होतें. असें म्हणतात कीं एक मल्हारराव सोडून दक्षिणी सरदारांपैकीं एकहि निसटला नाहीं. मल्हारराव याचें शुजाउद्दौला आणि नजीबखान यांच्याबरोबर सूत होतें.

(७३) आणि त्यांचे मोर्चेहि परस्परांसमोर होते. त्यामुळें मल्हारराव आपल्या माणसांसहित सुरक्षित निघून गेला. शिंदे पाटील याला पुढें हिंदुस्थानांत मोठा अधिकार

प्राप्त झाला. तो जखमी होऊन निसटला. एका स्वारानें त्याचा साठ कोसापर्यंत पाठलाग केला. त्यानें पाटील बुवाला घोड्यावरून खाली ओढले. आणि घोड्यावरील सोनेचांदी लुबाडून तो चालता झाला. पाटील बुवांना झालेल्या जखमामुळें मरेपर्यंत त्याला दोन माणसांच्या साहाय्याशिवाय उठतां येत नसे. समशेर बहादुर जखमा खाऊन भरतपुर कुंभेरीकडे गेला. सूरजमलनें त्याचा पुष्कळ उपचार केला पण कांहीं उपयोग न होता तो मृत्यु पावला.

इब्राहीमखान गार्दी जखमी होऊन कैद झाला.

( ७४ ) शुजाउद्दौला आणि इतर सरदार यांनी त्याच्याबद्दल अहमदशहापाशीं बरीच रदबदली केली. पण उपयोग झाला नाहीं. अहमदशहा शुजाउद्दौल्याला म्हणाला कीं फर्जंदखानबहादुर मी या दुष्टाला ( इब्राहीमखान ) अनेक वेळेला लिहून कळविलें कीं तूं मुसल्मान आणि अफगाण आहेस. तू माझ्या चाकरींत ये. तुला मी मोठा प्रांत देईन. या फुटक्या नशिबाच्या माणसानें मला उत्तर दिलें कीं मी काफर आणि मुसल्मान यांना ओळखीत नाहीं. मी भाऊसाहेबाबरोबर आहे. ते मला सांगतील त्यांच्याशीं युद्ध करण्यास मी तयार आहे. म्हणून या रस्ता चुकलेल्या धर्मभ्रष्टाला वध हीच शिक्षा योग्य होय. अहमदशहाच्या आज्ञेनें इब्राहीमखानाला मारण्यांत आलें. त्याच्या प्रेताला दोर बांधून ते छावणींतून फरफटत ओढण्यांत आलें. नंतर तें कावळे आणि गिधाडे यांचें भक्ष्य बनलें. शत्रूचे हत्ती, घोडे, सोने, चांदी इत्यादि अगणित संपत्ति अफगाणांच्या हातीं पडलीं. सारांश अहमदशहाच्या विजयाचा डंका अलम दुनियेंत वाजूं लागला.

( ७५ ) अहमदशहाचें सर्व सरदारांनीं अभिनंदन केलें. त्यानेहि सर्वांना वस्त्रें अलंकार देऊन त्यांचा गौरव केला. अहमदशहानें इनायतखानाला म्हटलें कीं हा विजय तुला मुबारक असो. आणि परमेश्वराची कृपा तुझ्यावर आणि तुझ्या बापावर सदैव असो.

नंतर तो सर्व सरदारांना म्हणाला कीं दिल्लीपासून बंगाल दख्खनपर्यंत मी सारे शत्रू नाहींसे केले आहेत. आतां तुम्ही एकोप्यानें आणि गुण्यागोविंदानें नांदून आमचें अभिष्ट चिंतन करावें. शुजाउद्दौला हा तुमच्या जमातीच्या ( रोहिला ) नाहीं. मी त्याला आपल्या बरोबर नेतो आणि तेथें त्याला समृद्ध राज्य देतो.

हें ऐकून सगळे सरदार गप्प राहिले. कारण ते आंतून या गोष्टीला कबूल होते. पण हाफिज रहमतखान म्हणाला कीं आमच्यांत आणि शुजाउद्दौल्यांत कांहीं वैमनस्य नाहीं. त्यानें अडचणीच्या वेळी आमची मदत केली आहे. आपण त्याला बरोबर घेऊन जाऊन तिकडे राज्य द्याल हें खरें असलें तरी,

(७६) लोक हेंच म्हणतील कीं सगळे अफगाण एक झाले. आणि एक उरलासुरला मोगल राहिला होता त्याला त्यांनीं काढून लाविलें. हें आम्हांला खरें वाटत नाहीं. अहमदशहा म्हणाला कीं मी शुजाउद्दौल्याच्या विरुद्ध नाहीं. तुमच्या हिताकरितां मीं असें म्हटलें. तुम्हाला पटलें नाहीं. पण लक्षांत ठेवा कीं या गोष्टीचा परिणाम वाईट होणार आहे. यानंतर अहमदशहानें सगळ्या हिंदुस्थानी सरदारांना निरोप दिला आणि तो अफगाणिस्तानकडे रवाना झाला.

## डौ कृत हिंदुस्थानचा इतिहास

[अलेक्झांडर डौ हा अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत ईस्ट इंडिया कंपनीच्या पदरी लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यावर होता. त्यानें फारसी साधनांवर आधारलेला असा हिंदुस्थानचा इतिहास तीन खंडांत लिहिला आहे. या ग्रंथाची दुसरी आवृत्ति इ. स. १८०३ मधें प्रसिद्ध झाली. या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाच्या पान चारशेचार वर तो म्हणतो—

"ईराणचा नादिरशहा यानें हिंदुस्थानवर स्वारी केली त्याला तीस वर्षें झालीं. या काळांत दिल्लीच्या दरबारांत जी स्थित्यंतरें झालीं त्याची माहिती यूरोपमधें नाहीं. आशियांतहि त्यांची हकीकत लिहून ठेविण्यांत आली नाहीं. मोगल साम्राज्यांतील अंदाधुंदी अशीच चालू राहिली तर या काळांत वावरणाऱ्या व्यक्तीबरोबरच या कालखंडाच्या स्मृति नष्ट होतील. म्हणून नादिरशहाच्या स्वारीनंतर घडलेल्या घटना प्रस्तुत ग्रंथकर्त्यानें वर्णिल्या आहेत. या हकीकतीला आधार म्हणून ग्रंथकर्त्यानें एका फारसी हस्तलिखिताचा उपयोग केला आहे. त्या ग्रंथांत महंमदशहा बादशहाच्या कारकीर्दीच्या सहा वर्षांची हकीकत आली आहे. सध्याचे मोगल बादशहा (शहा आलम) यांचा चिटणीस रायरायान हा प्रस्तुत ग्रंथकर्त्याचा निकटचा मित्र आहे. त्यानें मोगल राज्यांतील अलीकडच्या काळांतील हकीकती थोडक्यांत लिहून काढल्या आहेत. त्याचाहि उपयोग करून घेण्यांत आला आहे."

डौनें हा मजकूर इ. स. १७६७ च्या सुमारास म्हणजे पानीपत नंतर सहा वर्षांनीं लिहिला आहे. तो पानीपत संबंधीं काय म्हणतो तें नजरेखालीं घालण्यासारखें आहे. अर्थात रायरायान यानें तो मजकूर अलाहाबाद येथें शहा आलमच्या दरबारी असतांना लिहून दिला हें पाहतां मजकुरांत अनेक चुका आढळतात.]

डौ म्हणतो—(४७६) "या सुमारास बातमी आली कीं दक्षिणेंतून प्रचंड सैन्य घेऊन मराठे सरदार चालून येत आहेत. हिंदूंचें राज्य पुन्हां स्थापन करणें हा त्यांचा हेतु होता. या सैन्याचें आधिपत्य विश्वासराव, भाऊ, आणि इब्राहीमखान गार्दी यांजकडे होतें. अब्दालीनें पराजित केलेलें मराठ्यांचें सैन्य जमेंत धरून एकंदर

मराठी सैन्यांत एक लाख घोडदळ होतें. मुसलमान सगळे घाबरून गेले. इस्लामच्या संरक्षणासाठीं अब्दालीला जाऊन मिळणें त्यांना आवश्यक वाटलें. शुजाउद्दौला, अहमदखान बंगश आणि इतर रोहिले सरदार हे आपापलीं सैन्यें घेऊन दिल्लीस रवाना झाले.

या सुमारास मराठ्यांनीं जाटांच्या मुलखांत प्रवेश केला. आपल्याला येऊन मिळावें अशी त्यांनीं सूरजमलपाशी मागणी केली. हिंदू या नात्यानें सूरजमलला वाटत होतें कीं हिंदुस्थानांत मुसलमानांचा नाश व्हावा. पण मराठ्यांच्या सत्तेचाहि त्याला तिटकारा होता. म्हणून त्यानें मराठ्यांची मागणी मान्य केली नाहीं. यामुळें चिडून जाऊन मराठ्यांनीं जाटांचा मुलुख उध्वस्त केला. आणि सूरजमलला आपलें पन्नास हजार सैन्य घेऊन मिळण्यास भाग पाडलें. मराठ्यांच्या सैन्यांत आतां दोन लाख स्वार जमले. अब्दालीच्या नेतृत्वाखाली जमलेलें मुसल्मान सैन्य दीड लाखाचें होते. या युद्धाकडे साऱ्या हिंदुस्थानचे डोळे लागले होते. सार्वभौम सत्ता मुसल्मानांकडे चालू रहावी कीं हिंदूंच्या हातांत परत यावी याचा निर्णय या युद्धानें होणार होता. मराठे येताहेत असें पाहून अब्दालीनें दिल्ली सोडली आणि यमुना ओलांडून पलीकडील तीरावर आपली छावणी केली.

मराठ्यांनीं लागलीच दिल्लींत प्रवेश करून शहर उध्वस्त केलें. याचवेळीं गाजिउद्दीनला कळून आलें कीं अब्दाली आपल्याविरुद्ध असून नजीबुद्दौल्याचा हितचिंतक आहे. त्यामुळें त्यानें मराठ्यांशीं संधान बांधण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनीं त्याला धुडकावून लाविलें. हें पाहून तो जाट राजाच्या आश्रयाला गेला. मराठ्यांना सोडून निघून जाण्याविषयीं त्यानें सूरजमलचें मन वळविलें. त्याप्रमाणें सूरजमल आपल्या मुलखाला गेला. गाजिउद्दीन पण त्याच्याबरोबर गेला. गाजिउद्दीनचे सार्वजनिक जीवन येथें संपलें. इतर दुष्ट माणसांनीं आपल्या दीर्घ आयुष्यांत केलीं नाहींत इतकीं दुष्कृत्यें आणि राजकारणें त्यानें थोडक्या काळांत केलीं. त्याच्या आजान म्हणजे निजामुल्मुल्कानें दक्षिणचा सुभा मिळविला. तसें करणें गाजिउद्दीनला जमलें नाहीं. पण निजामुल्मुल्काचा धूर्तपणा, विश्वासघातकीपणा इत्यादि स्वभावविशेष त्याच्यांत थोड्या फार प्रमाणांत उतरले होते असें म्हणणें वस्तुस्थितीचें होईल.

दिल्लींत प्रवेश केल्यानंतर मराठ्यांनीं शहाजहान बादशहाला कैदेंत टाकलें. त्यानें कांहीं आठवडेच राज्यपद भोगले होतें. मराठ्यांना कांहीं मुसल्मान अमीर उमराव मिळाले होतें. त्यांचें समाधान करण्याकरितां मराठ्यांनीं आलीगौहरचा मुलगा जवानबख्त याला गादीवर बसविलें. आलीगौहरनें यापूर्वीच बिहारमधें आपल्याला शहाआलम या नांवानें बादशहा म्हणून जाहीर केलें होतें. जवानबख्ताला राज्य करण्याची पात्रता जरी असती तरी ज्यांच्यावर राज्य करावयाचें ते प्रजाजन कुठें होते.

तो नाममात्र राजा होता. उध्वस्त झालेल्या राजधानींत त्याचें राज्य म्हणजे राज्यपदाची विटंबनाच होय.

जाट मराठ्यांना सोडून गेले हें ऐकल्यावर अब्दालीला यमुना ओलांडून मराठ्यांशीं गांठ घेण्याची तळमळ लागली. या उद्देशानें तो नदीच्या कांठाकांठानें कुंजपुऱ्याला पोहोंचला. तेथें नजाबतखान हा रोहिला सरदार होता. अब्दालीनें त्याला शरण येण्यास सांगितलें. तें त्यानें नाकारल्यावरून कुंजपुरा हल्ला करून घेण्यांत आला. तेथील शिबंदीची आणि रहिवाशांची कत्तल करण्यांत आली. मराठ्यांनीं दिल्लीच्या बाजूनें कूच केलें. त्यांना आपल्या शक्तीवर फाजील विश्वास होता. म्हणून त्यांनीं अब्दालीला रामऱ्याच्या उतारानें यमुनापार होऊं दिलें. पण त्याच्या धडाडीच्या हालचाली पाहून त्यांना थोडी काळजी वाटू लागली. म्हणून त्यांनीं कर्नालजवळ छावणी केली. महंमदशहा बादशहानें मागें तेथें छावणी केली होती. नादिरशहानें जेथें तळ ठोकला होता त्याच जागेवर अब्दालीनें आपली छावणी केली.

उभय सैन्यें बारा दिवसपर्यंत आपापल्या छावणींत होतीं. या काळांत मधून-मधून चकमकी होत होत्या. अब्दालीनें मराठ्यांची रसद तोडली. मराठ्यांच्या छावणींत कांहींहि पोहोंचू नये याचा त्यानें कडक बंदोबस्त केला. मराठ्यांच्या छावणींत भयंकर दुष्काळ पडाला. त्यामुळें अकराशे चौऱ्याहत्तर हिज्रींत वीस जमादिसानी रोजी ते आपल्या छावणीबाहेर पडले आणि त्यांनीं अब्दालीवर हल्ला केला. त्यांचा पहिला हल्ला अत्यंत निकराचा होता. मराठ्यांनीं निर्धारानें चाल केली. त्यांनीं इतक्या प्रखरपणें अब्दालीवर हल्ला केला कीं त्याला मैदान सोडून पळुन जाण्याची पाळी आली होती. पण शुजाउद्दौला आणि अहमदखान बंगश हे दहाहजार स्वारासहित मराठ्यांच्या फळ्यावर तुटून पडले. यामुळें जयाचें पारडें एकदम बदललें. अब्दाली गोंधळला होता. त्यानें जमवाजमव करून पुन्हां हल्ला केला. आणि मराठ्यांना परतविलें. या युद्धाच्या बातम्या ज्या मिळाल्या आहेत त्या पाहतां, या लढाईंत आणि पाठलागांत पन्नासहजार मराठे मारले गेले. ते कांहीं असो. लढाई फारच निकराची झाली. कारण मराठ्यांचे सर्व सरदार लढाईंत मारले गेले. एक मल्हारराव होळकर मात्र पहिल्या हल्ल्यांतच मैदान सोडून पळून गेला. तीन दिवस मराठ्यांचा पाठलाग केल्यानंतर अब्दाली दिल्लीस परतला."

[ वरील मजकुरांतील चुका हास्यास्पद आहेत. अब्दालीनें कुंजपुरा घेऊन कत्तल केली. उभय सैन्याचा तळ कर्नालजवळ पडला होता. शुजाउद्दौला आणि अहमदखान बंगश यांच्यामुळें युद्धाची बिघडलेलीं घडी सांवरली गेली वगैरे गोष्टी वस्तुस्थितीला सोडून आहेत. पानीपतच्या युद्धानंतर अवघ्या सात वर्षांच्या आंत हा मजकूर लिहिला गेला हें पाहतां एखाद्या वस्तुस्थितीविषयीं गैरसमज किति लवकर उद्भवतात आणि पसरतात हें दिसून येईल. ]

## ( १ ) इमादुस्सादत

[ सय्यद गुलामअली नकवी हा रायबरेलीचा राहाणारा. गुलाम कादिरनें शहा आलमचे डोळे काढले त्यावेळीं गुलाम अली हा दिल्लींत होता. नंतर तो लखनौच्या नवाबाच्या आश्रयाला गेला. इ. स. १८०७ मधें त्यानें इमादुस्सादत आणि त्यानंतर निगारनामाये हिंद. हे दोन ग्रंथ लिहिले. पानीपत संबंधी त्यांतील माहिती ही काशिराजाच्या ग्रंथावरून घेतली असली तरी काशिराजाच्या ग्रंथांत न आलेली थोडी-बहुत हकीकत आपल्याला त्याच्या ग्रंथांतून आढळते. तितक्याच मजकुराचा मूळ फारसींवरून ( इमादुस्सादत आणि निगारनाम्यांतील पानीपतसंबंधीचें प्रकरण हीं प्रसिद्ध झालीं आहेत. ) मराठी सारांश दिला आहे. ]

## इमादुस्सादत ( पान ७७ ते ८४ )

दत्ताजीच्या वधाची बातमी कळतांच बाळाजी कोपायमान झाला. भाऊला बोलावून त्यानें विश्वासरावाचा हात त्याच्या हातांत देऊन म्हटलें कीं आपल्या पुतण्याला बरोबर घेऊन जा. उत्तरेंतील अफगाणेतर अमीर उमरावांना मिळवून घेऊन अफगाण जमातीचीं पाळेंमुळें खणून काढा. मी तुमच्या पाठोपाठ जंगी फौज घेऊन निघतो. श्री भवानीच्या कृपेनें मी तेथें पोहोंचलों कीं कंधार हस्तगत करीन आणि अफगाणांचें बीज शिल्लक ठेवणार नाहीं. त्यानंतर बंगालचा जाफर अलीखान, शुजाउद्दौला सारखे एक दोन मुसलमान राहतील. ते शरण न आल्यास त्यांना अज्ञातवासांत पाठवीन, आणि शरण आले तर कबूतराप्रमाणें त्यांचे पंख कापून त्यांच्यावर लक्ष ठेवीन. नंतर विश्वासरावाला दिल्लीच्या गादीवर बसवून मी तीर्थयात्रेला निघेन. बाळाजीच्या आज्ञेप्रमाणें भाऊ विश्वासरावाला घेऊन निघाला. असें म्हणतात कीं भाऊ कमालीचा गर्विष्ठ आणि धर्मांध होता. त्याचें एक उदाहरण खालीलप्रमाणें आहे. मथुरेस आल्यानंतर भाऊचें लक्ष अब्दुलनबीच्या मशिदीकडे गेलें. भाऊनें सूरजमलला म्हटलें " तुम्ही हिंदू राहिला कसें याचें आश्चर्य वाटतें. तुमची धर्मावर श्रद्धा असती तर शहराच्या मधोमध असलेली ही मशीद प्रथम पाडून टाकली असती." सूरजमलनें उत्तर दिलें कीं " महाराज, हिंदुस्थानची सत्ता बटकीसारखी आहे. आज अमक्याच्या हातीं तर उद्या तमक्याच्या हाती अशी स्थिति आहे. माझ्या हयातीपर्यंत हें शहर माझ्या ताब्यांत राहील अशी मला खात्री झाली तर ही मशीद पाडून जमीनदोस्त करीन. पण मी आज मशीद पाडावी आणि उद्या मुसलमानांचा ताबा झाला तर ते आपलीं प्रसिद्ध मंदिरें पाडतील आणि एका मशिदीच्या ऐवजी चार नव्या मशिदी उभ्या करतील. आतां आपण आलाच आहात तर सर्व कांहीं करणें सवरणें आपल्या हातीं आहे " हें ऐकून थोड्यावेळानें

भाऊनें म्हटलें " बरें आहे. अफगाणांवर विजय मिळाल्यावर मी जेथें जेथें मशिदी आढळतील त्यांचा समाचार घेईन "

सारांश भाऊ मथुरेहून दिल्लीला आला. तेथें शहाआलमला बादशहा म्हणून जाहीर करून जवानबख्तला युवराज म्हणून गादीवर बसविलें. यापूर्वी जाहीर करण्यांत आलेल्या शहाजहान ( कामबख्शाचा नातू ) याला कोपऱ्यांत बसविण्यांत आलें. या नंतर भाऊनें कुंजपुऱ्यावर स्वारी करून कुतुबशहाला मारलें. ( गुलाम अलीनें भाऊ आणि कुतुबशहा यांचा संवाद दिला आहे. )

कुंजपुऱ्याची बातमी अहमदशहाला समजली. मराठ्यांचें लष्कर प्रचंड आहे. हें ऐकून अफगाण व रोहिले हादरले. अहमदशहा काळजींत पडला. कारण त्याला दक्षिणी फौजेची पूर्ण माहिती नव्हती. पण त्यानें हिंमत सोडली नाहीं. त्यानें आपला वकील मराठ्यांकडे पाठविला. आपल्या सैन्याचें बळ त्यांच्या मनावर ठसवावें हाहि हेतु होता. तहाची अट हीं होती कीं सिरहिंदच्या अलीकडे मराठे आणि सिरहिंदच्या पलीकडे अटकेपर्यंत अफगाणांचा ताबा असावा. या अटीवर मराठे म्हणाले कीं आम्हाला युद्ध हवें आहे असें नाहीं. अहमदशहानें काबुलपर्यंत आम्हाला मुलुख देऊन टाकावा. काबूलच्या पलीकडे त्यानें राज्य करावें. नाहींतर कुठला तह आणि काय ? आमच्या दक्षिणी घोड्यांचें पाणीं तुमच्या शहानें अजून जोखलें नाहीं. त्याला आपल्या विलायती (अफगाण) घोड्यांबद्दल गर्व आहे. त्याला माहीत नाहीं कीं आमच्या सैन्यांत दहाहजार स्वार असे आहेत कीं त्यापैकीं एक एक स्वार शंभर मोगल किंवा अफगाणी यांच्याबरोबर युद्ध करून त्यांना आपल्या भाल्यानें जमिनीवर लोळवूं शकतो. इतकें सांगून मराठ्यांनीं त्र्यंबकदास पंडित नांवाचा हुशार वकील दुराणी वकीलाच्या बरोबर पाठविला. त्यानें अब्दालीचा दरबार आणि त्यांत जमलेले नरव्याघ्र पाहिले तेव्हां त्याची बोबडी वळली. त्यानें धैर्य करून मराठ्यांचा निरोप सांगितला. दरबारांतील लोकांनीं त्याला ठार करण्याचें ठरविलें पण वकीलाला इजा पोहोंचविणें राजनीतीच्या विरुद्ध होय म्हणून त्याची सुटका झाली. जीव वांचला यांतच सारें कांहीं आलें असें समजून वकील भाऊकडे परत आला.

इकडे अहमदशहानें शुजाउद्दौल्याला घेऊन येण्याकरितां नजीबखानाला त्याच्याकडे पाठविलें. त्यापूर्वी भाऊनें खालील अर्थाचें पत्र शुजाउद्दौल्याला पाठविलें होतें " तुम्ही आणि आम्ही एकाच भात्यांतील बाण आहोत. मोगल बादशाही भरभराटींत असावी हीच आपली इच्छा आहे. अफगाण हे हिंदुस्थानी लोकांचे, त्यांच्या मानमरातबाचे, आणि अब्रूचे शत्रू होत. हिंदुस्थानांतील मुसलमानांना ते हिंदूपेक्षांहि वाईट लेखतात. हिंदुस्थानांतील एकसुद्धां सरदार इतमामांत रहावा हें त्यांना खपत नाहीं. तुम्हीच एक शिल्लक आहात. अहमदखान ( बंगश ) हा बादशहामुळें वैभवाला चढला असला तरी केवळ त्यांच्या जातीचा म्हणून त्यांच्याशी मिळूं इच्छितो. आपण

धरून चालू कीं अफगाणांचा दक्षिणी लोकावर विजय होईल. अशा स्थितींत अहमदशहा भोवतीं अफगाण सरदारांचाच घोळका राहील. तुम्हाला कोण विचारील. इतक्या सरदारांत एका हिंदुस्थानी सरदाराचें काय चालणार. मोगल बादशहा कुठें असणार आणि काय करूं शकणार ? आमचा उद्देश अफगाणांचा बीमोड करणें हाच आहे. कारण अहमदशहाच्या बळावर हे रोहिले माजले आहेत, आणि त्यांना अस्मान ठेंगणें वाटत आहे. तैमूरचे वंशज भटकत फिरावेत आणि त्यांच्या जागीं दूसरे स्थानापन्न व्हावेत हें आम्हाला पटत नाहीं. या घराण्याच्या मिठाला जागावे आणि आपलें ऊर्जित करून घ्यावें असें वाटत असेल तर तुम्ही निस्संकोचपणें आम्हाला येऊन मिळावे. परमेश्वरानें आमचे बरें केलें तर शत्रूवर जय मिळवून आम्ही शहा-आल्मला बादशहा आणि तुम्हाला वजीर करूं आणि आमचा ठरलेला भाग घेऊन आम्ही दक्षिणेकडे परत वळूं. आमच्याशी तुम्ही येऊन मिळावें याचा अर्थ तुम्ही फौज घेऊन आमच्याकडे यावें असें आम्ही म्हणत नाहीं. उलट हिंदुस्थानी फौज आमच्या सैन्यांत आल्यानें भानगडी होतील. तुम्ही आपल्या राज्यांतच राहावे आणि अहमदशहाचें म्हणणें ऐकूं नये. श्रीमंत बाजीरावसाहेब आणि नवाब बुऱ्हाणुल्मुल्क यांच्यांत जे करारमदार झाले होते ते सर्वांना माहीत आहेत. पूर्वापार चालत आलेला स्नेह चालू न ठेवणें आणि आमच्यावर राग करून दुसऱ्यांना जाऊन मिळणे न्यायाला सोडून आहे असें आम्हाला वाटतें."

सारांश नजीबखानानें शुजाउद्दौल्याची मेहंदी घाट येथें गांठ घेतली. आणि त्याला अहमदशहाचें पत्र दिलें. या शिवाय अहमदशहाचा तोंडी निरोप त्यानें कळविला. शुजाउद्दौल्यानें त्याला भाऊचें पत्र दाखविलें. तें पाहून नजीबखान म्हणाला "हें सर्व मराठ्यांनीं पसरलेलें कुटिल जाळें आहे. सांप्रतचें युद्ध हें इस्लाम आणि काफर यामधील होय. आपण अहमदशहाला येऊन मिळावे" यावर शुजाउद्दौल्यानें म्हटलें, "मी कोणत्याच पक्षाला मिळणार नाहीं. मराठयांचा जय झाला तर त्यांनीं मला पत्रांत लिहिल्याप्रमाणें ते माझ्या वाटेला जाणार नाहींत. बरे शहाला जय मिळाला तर त्यावेळीं काय करावें याचा मी नंतर विचार करीन. मी काय म्हणून या दगदगींत पडावें. अब्दालीच्या छावणींत आपला अपमान करून घेण्यापेक्षां मराठयांच्या बरोबर मिळून लढणें बरें. एक तर आम्ही हिंदुस्थानी, आणि दुसरे म्हणजे आम्ही शिया पंथाचे आहोत, अब्दालीच्या छावणींत आम्हाला नांदणें कठीण आहे."

नजीबखानानें यावर म्हटलें, "आपल्याला अब्दालीच्या फौजेशी काय कर्तव्य आहे. परमेश्वर साक्ष, अब्दाली तुमच्याकडे वांकड्या नजरेनें पाहूं तर द्या, माझ्या हातांनीं मी त्याचे डोळे उपटून काढीन. असें केलें नाहीं तर मी आपल्या बापाच्या बीजाचा नाहीं. हिंदुस्थानांत जवळ जवळ दीड लाख रोहिले असतील. त्यांना आपण आपले दास समजा. दुसरे कुणी आपल्याकडे आले असते आणि आपण नाहीं

म्हणाला असता तर तक्रारीला जागा नसती. पण मी स्वतःच आपली कृपा होईल या आशेनें आलों आहे. आतां आपण दोन्हीपैकीं एक काम करावे. एकतर माझ्याबरोबर अब्दालीला येऊन मिळावे. नसल्यास हा खंजीर आणि ही माझी मान हजर आहेत. माझी गर्दन छाटावी. आपण आज्ञा कराल तर मी लिहून द्यायला तयार आहे कीं माझ्या मृत्यूची जबाबदारी आपल्यावर नाहीं. शुजाउद्दौल्यानें पाहिलें कीं नजीबखान एकनिष्ठ आहे आणि कमालीचा आग्रह करीत आहे. मग त्यांनीं अब्दालीला जाऊन मिळण्याचा बेत केला. आणि तीस हजार स्वार आणि दहा हजार पायदळ बरोबर घेऊन अब्दालीकडे प्रयाण केलें.

शुजाउद्दौल्यानें अब्दालीला एक लाख रुपये नजर दिली.

आतां निजामअलीखान, आणि बंगालचा सुभेदार जाफरअलीखान सोडले तर झाडून सारे अमीर उमराव अब्दालीभोंवती गोळा झाले होते. सूरजमलने हें पाहून भाऊला म्हटलें "यावेळी प्रसंग कठिण दिसतो. सगळ्याच मुसलमानांनीं या खेपेस कमरा कसल्या आहेत (हमा मुसलमानान बंद दर बंद क़ुबाबाफ्ता अंद). मला आपण आपल्या देशी परत जाण्याची आज्ञा द्यावी. तेथून मी आपल्या सैन्याला रसदेचा पुरवठा करीन. भाऊला हा सल्ला पटला. त्यानें सूरजमलला निरोप दिला. राधाकिशन हा सूरजमलचा विश्वासू मुत्सद्दी होता. तो म्हणाला कीं सूरजमलला भाऊची वागणूक पाहून हंसू आलें. सूरजमल म्हणाला कीं भाऊ आणि विश्वासराव यांचें मरण ओढवलें आहे. त्यांचें सैन्य धुळीला मिळणार. अब्दाली आणि त्याचे अफगाण रोहिले हे सर्वांना आपल्या तलवारीचे भक्ष्य बनवितील. कारण हे लोक गर्विष्ठ आणि मूर्ख बनले आहेत. आणि शत्रू अनुभवी आणि दूर दृष्टीचा आहे. मराठयांच्या मूर्खपणाचें उदाहरण माझ्याचबद्दलचें पहा. माझ्या सारख्या माणसाला त्यांनी निरोप दिला आहे. आतां त्यांनी आकाश पाताळ एक केलें तरी मी त्यांच्या तावडींत सांपडणार नाहीं. मी आपल्या किल्ल्यांत जाऊन बसेन. यावेळी त्यांनीं माझ्याकडून दोन कोटि रुपये मागितले तरी ते मला देणें प्राप्त होईल कारण यावेळी मी त्यांच्या तावडींत आहे. एकदां येथून गेलो कीं त्यांनीं एक दमडी मागितली तरी देणार नाहीं. माझ्याबरोबर चाळीस हजार माणसें आहेत. शिवाय माझ्या मुलुखांतील किल्ले आणि सैन्य वेगळींच. माझ्या ताब्यांत दीड कोटि उत्पन्नाचा मुलुख आहे. आणि माझ्या खजिन्यांत पांच सहा कोटि रुपये आहेत. माझ्यासारख्या माणसाला, प्रबळ शत्रू समोर ठेवून हे लोक सबळ कारणांवाचून निरोप देत आहेत यापेक्षां त्यांचा मूर्खपणा आणखी काय असणार.

सारांश सूरजमल दीगच्या किल्ल्याच्या आश्रयाला गेला. मराठे आणि अब्दाली यांचें युद्ध सुरू झालें. नंतर परमेश्वरी इच्छेनें जें कांहीं घडून आलें तें सर्वांनाच विदित आहे.

त्याची थोडक्यांत हकीकत अशी कीं गोविंद पंत आणि गंगाधर हे अब्दालीची रसद बंद करण्यासाठीं तीस हजार सैन्य घेऊन अहमदशहाच्या छावणीपासून चाळीस कोसावर आले. अहमदशहाच्या हुकुमानें अठराशे स्वार त्यांच्यावर तुटून पडले. त्यांचा धुव्वा उडवून प्रत्येक शिपायानें पांच पांच मराठ्यांचीं डोकीं छावणींत आणलीं. प्रत्येक डोक्याला पांच रुपये बक्षीस देण्यांत येईल असें बादशहाच्या छावणींत जाहीर करण्यांत आले. यानंतरच्या लढाईत विश्वासराव आणि भाऊ मारले गेले. मराठे पळून गेले. दुराणी आणि रोहिले यांनीं त्यांचा पाठलाग केला. हजारो माणसें मारलीं गेलीं. जिकडे नजर फेंकावी तिकडे प्रेताचे ढीग दिसत होते. साठ कोसापर्यंत मराठ्यांच्या रक्तानें जमीन भिजली होती. या युद्धांत मल्हारराव आणि नजीबखान यांचें असें ठरलें होतें कीं अब्दालीचा जय झाला तर तुम्हाला कोणताच उपसर्ग लागूं देणार नाहीं. आणि तुम्हाला जय मिळाला तर तुम्ही आम्हाला त्रास देऊ नये. त्या दोघांत संगनमत होतें यांत कांहींच शंका नाहीं.

सारांश मराठ्यांचीं वीस हजार माणसें जाटांच्या मुलुखांत गेलीं. तेथें तीं अक्षरशः भिकेला लागलीं होतीं. सूरजमलला त्यांची दया येऊन त्यानें त्यांपैकीं प्रत्येकाला एक घोंगडी आणि दोन दोन रुपये वाटखर्चाला देऊन दक्षिणेकडे पाठविले. शुजाउद्दौल्यानें दहा बारा हजार माणसांना प्रत्येकी दोन रुपये देऊन काल्पीकडे पाठविले. इब्राहीमखान आणि त्याच्या इतर सोबत्यासाठीं कफनाची व्यवस्था पण शुजाउद्दौल्यानें केली.

## ( २ ) निगार नामाये हिंद

[ हें गुलामअली नकवी याचें दुसरें पुस्तक होय. यांत पानीपतचें युद्ध त्यानें तपशीलवार वर्णन केलें आहे. गुलामअलीची आणि काशिराज यांची चांगलीच ओळख होती. त्यानें लिहिलेल्या ग्रंथावरून गुलामअलीनें आपली हकीकत उतरून घेतली आहे. ती देणें म्हणजे मजकुराची पुनरावृत्ति करणें आहे. पण काशिराजाच्या ग्रंथांत न आलेली माहिति गुलामअलीनें नमूद केली आहे तीच तेवढी खाली दिली आहे. )

**सदाशिवरावभाऊचें सूरजमलला पत्र**—“अफगाणांनीं सर्व एक चित्त होऊन अहमदशहाला अफगाणिस्तानाहून बोलाविलें आहे. हिंदुस्थानांत हिंदु म्हणून शिल्लक ठेवायचा नाहीं अशी त्यांची इच्छा आहे. आम्ही हिंदूंच्या रक्षणाकरितां हिंमत धरली आहे. हिंदूंचें कर्तव्य आहे कीं आमच्याशी मिळण्यांत त्यांनीं आपलें हित आहे हें ओळखून आम्हाला येउन मिळावे. सूरजमलचें नांव मर्द माणूस म्हणून हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. मुसलमान सरदारांच्या घोळक्यांत सूरजमलच एक असा

हिंदु आहे कीं ज्यानें नजीबखानाशी यशस्वी शत्रुत्व केलें आहे. त्यानें पत्र मिळतांच आपल्या सैन्यासहित येऊन मिळावे."

(१७९) शुजाउद्दौल्यानें याकूतखान खाजासराबरोबर भाऊला खालील निरोप धाडला—

"तुमच्या आणि आमच्या घराण्याचें प्रेम पूर्वीपासून आहे हें खरें आहे. पण प्रत्येक जातीला आपला धर्म अशा स्नेहापेक्षाहि महत्त्वाचा वाटतो. सगळे मुसल्मान इकडच्या पक्षांत एकत्र झाले आहेत म्हणून त्यांना जाऊन न मिळणें मला धार्मिक दृष्टीनें योग्य वाटलें नाहीं. शिवाय मी या पक्षांत असणें आणखी एका दृष्टीनें योग्य आहे. तहाची बोलणीं करणे आणि आपल्या स्नेह्याचें हित करणें सोयीचें पडेल. तुम्हाला तह आणि तडजोड हवी असलीं तर मी मनःपूर्वक प्रयत्न करीन. यावेळीं तडजोडीची बोलणीं चालू असलीं तरी तुम्ही लष्करी हालचाली थांबवूं नयेत. या वेळी या युद्धाला धार्मिक स्वरूप प्राप्त झालें आहे. सगळे मुसल्मान सरदार अहमदशहाला मिळाले आहेत. मला आपला स्नेही समजा. तहाकरितां माझ्याकडून शक्य तें करीन. तुम्ही जड सामान टाकून देऊन अहमदशहाशी गनिमी काव्यानें लढावें. जडसामान आणि तोफखाना बाळगल्यानें अडचणी निर्माण होतील."

शुजाउद्दौल्यानें सूरजमलला आपल्या देशी परतण्याचा सल्ला दिला. आणि मल्हाररावाला लिहिलें कीं तुम्ही भाऊचें मन तहाकडे वळवावे. विपरीत कांहीं घडल्यास तुमच्या संबंधीं जें कांहीं करणें शक्य आहे तें स्नेहभावानें आम्ही करूं.

जनकोजी शिंद्यांनीं वजीर शहावलीखान याच्यावर हल्ला केला. त्याचा वृतांत (२२ नोव्हेंबर १७६०) "दुपारी तिसऱ्या प्रहरी शहावलीखान हा थोडीं माणसें घेऊन पानीपतजवळ एका विहिरीपाशीं टेहेळणी करितां गेला असतां दक्षिणी लोकांनीं त्याला पाहिले. त्यांच्याबरोबर थोडीं माणसें आहेत असें पाहून ते त्याच्यावर तुटून पडले. त्यांच्याबरोबर पंधरा हजार स्वार होते. त्यांनीं दुराणींना कोंडले. शहावलीखानानें मोठ्या मर्दुमकीनें त्यांचा प्रतिकार केला. दक्षिणी त्वेषानें लढले आणि त्यांनीं शौर्याची शर्थ केली. दुराणीनीं चांगलेंच शौर्य गाजविले. पण त्यांचे अनेक लोक मृत्युमुखीं पडले. उभय दळें एकमेकांत अशीं मिसळलीं कीं धुळी मुळें शत्रुमित्र ओळखू येईनात. युद्धाच्या गोंगाटानें प्रळयकाळाचा भास झाला. शहावलीखानाचे सैन्य अल्प असल्यामुळें मुसलमानांची मोठी कठिण अवस्था झालीं. ही बातमी अबदालीच्या छावणींत समजतांतच इकडून शुजाउद्दौला आणि नजीबखान यांनीं आपलीं सैन्यें आणि अहमदशहाचें थोडे सैन्य घेऊन शहावलीखानाच्या मदतीला धांव घेतली. शहावलीखानाचें सैन्य पूर्णपणें कोंडले जाऊन निकरानें लढत होतें. मदत आल्याबरोबर त्याला हिंमत आली. संध्याकाळपर्यंत तुंबळ युद्ध झालें. एक दोन घटकांच्या आंत उभयपक्षाचीं तीन चार हजार माणसें ठार अगर जखमी झालीं. दुराणींची आणि शुजाउद्दौला व नजीब-

खान यांची मदत मिळाल्यामुळें शत्रूंच्या सैन्यांचे पाय डळमळूं लागले. हें पाहून मुसल्मानांनीं त्वेषानें त्यांच्यावर चाल करून त्यांना हटविलें. शहावलीखान रक्ताच्या समुद्रांत रक्तपिपासू नक्राच्या दाढेंत सांपडला होता तो बाहेर पडला. दक्षिण्यांचा मोड झाला. शहावलीखान, नजीबखान वगैरेनीं त्यांचा छावणीपर्यंत पाठलाग केला. आपला वजीर आणि अमीर सुखरूप आल्याबद्दल अहमद शहानें परमेश्वराचे आभार मानले.

**नजीबखान आणि मेहेंदळे यांच्या युद्धाचा तपशील**—( डिसेंबर १७६० ) त्या दिवशीं असें घडलें कीं नजीबखानाच्या मोर्च्याच्या लोकांनीं समोर कांहीं अडथळे नाहींत असें पाहून पुढें चाल केली. शत्रू दबा धरून बसला होता. नजीब खानाचें सैन्य पुढें येत आहे असें पाहून बळवंतराव मेहेंदळ्यानें आपल्या पथकासहित इतक्या शौर्यानें हल्ला केला कीं रुस्तुम आणि इस्फिंदारच्या शौर्य कथांना विसरावयास लाविलें. नजीबखानाची माणसें या हल्ल्यापुढें मागें हटली. नजीबखाना-पाशीं फक्त पन्नास माणसें राहिलीं. तरी हिंमत करून तो निर्धारानें लढत होता. या सुमारास त्याला चहूकडून कुमक आली. त्यामुळें युद्धाला जोर आला. संध्याकाळपासून रात्रीची एक घटका होईपर्यंत तुंबळ युद्ध चाललें होतें. तोफांचे आणि बंदुकीचे आवाज कल्पांताची आठवण करून देत होते. घोड्यांच्या हालचालींनीं धुरळा उडून आकाशा-पर्यंत पोहोंचला. त्या दिवशीं नजीबखानाचा चुलता खलीलुर्रहमानखान हा निकरानें लढत असतां मृत्युमुखीं पडला. असें म्हणतात कीं त्यादिवशीं नजीबखानाचीं दोनतीन हजार पेक्षां जास्त माणसें मारलीं गेलीं. शत्रू मागें हटेना. कुमक आल्यामुळें नजीबखानाचें सैन्य निर्धारानें टिकून राहिलें. त्याची पर्वा न करतां बळवंतराव वाघासारखा हल्ल्यावर हल्ले करीत होता. मृतांचे ढीग चहूंकडे पडत होते. बळवंत-रावाच्या सहकाऱ्यांनीहि शौर्यांत कसूर केली नाहीं. पण ऐन धुमश्चक्रींत बळवंतराव गोळी लागून पडला. मग मराठ्यांचें सैन्य आपल्या छावणीला परतले.

[ गुलामअलीनें पुढची सगळी हकीकत काशिराजावरून जशीच्या तशी घेतलेली दिसते. ब्राउनच्या अनुवादांत भाऊची एक बायको घोड्यावर बसून पळाली असें आहे. गुलामअलीनें त्या प्रसंगाचा तपशील खालीलप्रमाणें दिला आहे. ]

भाऊची दुसरी बायको ( लग्नाची ) वय सुमारे पंचवीस, रणांगणांतून सुखरूपपणें पळाली. तिच्या नोकरानें तिला घोडीवर बसवून डीगला सूरजमलकडे पोहोंचती केली. सूरजमलनें तिचें आदरातिथ्य करून तिच्याबरोबर माणसें देऊन झांशीला रवाना केली.

[ सारांश इमादुस्सादत या ग्रंथांत आपल्याला एकदोन तपशील काशिराजाच्या माहितीपेक्षां वेगळे आढळत असले तरी निगारनामाये हिंदमधें गुलामअलीनें जवळ जवळ सगळी माहिती काशिराजाच्या ग्रंथावरून घेतली असें दिसते. ]

# गुले रहमत

[ हाफिज रहमत खान आणि त्याचा मोठा मुलगा इनायतखान हे रोहिले सरदार पानीपतच्या युद्ध प्रसंगी हजर होते. हाफिजरहमतखानाचा एक मुलगा मिस्तजाबखान यानें ' गुलिस्ताने रहमत ' या नांवाचें आपल्या बापाचें चरित्र लिहिलें आहे. त्याचा इंग्रजी अनुवाद ईलियट यानें इ. स. १८३१ मधें प्रसिद्ध केला. हाफिज रहमतखान याचा एक मुलगा हाफिज महंमद यारखान हा होता. त्याचा मुलगा सादतयारखान यानें इ. स. १८३४ मध्यें गुले रहमत या नांवाचें आपला आजा हाफिज रहमतखान याचें चरित्र लिहिलें आहे. हा ग्रंथ फारसी भाषेंत असून अद्याप अप्रकाशित आहे. त्याची एक हस्तलिखित प्रत पंजाबचे राज्यपाल श्री. न. वि. गाडगीळ यांच्या प्रयत्नानें उपलब्ध होऊन अवलोकनांत आली. सदर ग्रंथांतील ( पान ६४–७२ ) पानीपत-प्रकरणाचा मराठी अनुवाद खाली दिला आहे. ]

दुराणी शहाची बातमी दक्षिणेंत आली. सर्व मराठे सरदार एक झाले. बाळाजींना भाऊ भाऊसाहेब, व मुलगा विश्वासराव हे शमशेर बहादुर आणि इतर मराठे सरदार यांना घेऊन दत्ताजी पाटील यांचा सूड घेण्याच्या उद्देशानें ऐन पावसाळ्यांत दक्षिणेंतून रवाना झाले. जनकोजी आणि मल्हारराव हे त्यांना येऊन मिळाले. मराठ्यांनीं पावसाळा शहाजहानाबाद आणि शहागंज येथें काढला. पावसाळा संपल्यानंतर ते कुंजपुऱ्याकडे चाल करून गेले. त्याठिकाणी अहमदशहातर्फे अब्दुस्समदखान व मोमिनखान हे ठाणेदार होते. कुंजपुऱ्याचा जमीनदार नजाबतखान हा मराठयांना आंतून मिळाला होता. त्यानें अब्दुस्समदखान वगैरेना मराठयांशीं लढण्यास चिथावलें आणि स्वतः मात्र कुंजपुऱ्याच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला. अब्दुस्समदखान आणि इतर सरदारांपाशीं फार थोडें सैन्य होतें. पण जमीनदाराच्या चिथावणीवरून ते किल्ल्याबाहेर येऊन मराठा फौजेवर तुटून पडले. शत्रूचें सैन्य मोठे असल्यामुळें त्यांचा पराजय झाला. माघार घेत ते किल्ल्याच्या तटाखालीं आले. त्या विश्वासघातकी नजाबतखानानें किल्ल्याचे दरवाजे बंद केले आणि तटावरून तो त्यांच्यावरच शस्त्रांचा मारा करू लागला. त्यामुळें अब्दुस्समदखान आणि इतर सरदार तेथून हटून पुन्हां मराठयांवर तुटून पडले. त्यांनीं मर्दुमकी गाजविली पण सारे जण मारले गेले.

ही बातमी शहादुराणीला कळली. ती ऐकून त्याला अतिशय त्वेष आला. त्यानें हाफिजरहमतखान आणि इतर हिंदुस्थानीं सरदारांना आपापलीं सैन्यें बोलावून घेण्याचा हुकुम केला. आज्ञेप्रमाणें थोड्याच काळांत हिंदुस्थानांतील सर्व सरदारांचीं सैन्यें अहमदशहाच्या छावणींत दाखल झालीं. अहमदखान बंगश गालिबजंग हाहि अहमदशहाला येऊन मिळाला. सगळे सैन्य गोळा झालें आहे आणि युद्ध सामग्री जमली आहे हे पाहून मराठयांच्या दिशेनें कूच करण्याचा अहमदशहानें हुकुम केला.

अफगाण आणि हिंदुस्थानांतील रोहिले आणि इतर सैन्य मिळून एक लाख स्वार आणि पायदळ असा जमाव झाला. अहमदशहाच्या बरोबर अफगाणिस्तानांतून आलेलें सैन्य तीस हजार होतें. हाफिज रहमत खानानें रोहिलखंडांतून जवळ जवळ तीस हजार स्वार आणि पायदळ बोलाविलें होतें. नजीबखानाबरोबर पंधरा हजार स्वार आणि पायदळ होतें. शुजाउद्दौल्याबरोबर वीस हजार सैन्य होतें. अहमदखान बंगश गालिबजंग याच्याबरोबर सुमारें सहा हजार स्वार आणि पायदळ होतें.

हें सगळें सैन्य घेऊन अहमदशहा कूच करीत यमुनेच्या कांठावर आला. त्यानें नदीवर तीन पूल बांधण्याचा हुकुम दिला. एक स्वतःच्या सैन्याकरितां, दुसरा हाफिज रहमतखान आणि अहमदखान बंगशच्या सैन्याकरितां, आणि तिसरा शुजाउद्दौल्याच्या सैन्याकरितां. थोड्याच अवधींत पूल तयार झाले. आणि बागपतपाशीं सगळें सैन्य नदीपार झालें.

ही बातमी कळतांच भाऊ आणि इतर सरदार आपलें सैन्य घेऊन कुंजपुऱ्याहून निघाले ते पानीपतपाशीं आले. तें गांव आपल्या पाठीशीं घेऊन त्यांनीं लढण्याची तयारी केली. स्वार आणि पायदळ मिळून मराठ्यांचें सैन्य तीन लाख असावें. अहमदशहानें बागपतहून कूच करून मराठ्यांच्या समोर कांहीं कोसावर मुक्काम केला. त्याच दिवसापासून दोन्ही सैन्याच्या आघाडीच्या दळांत चकमकी होऊं लागल्या. प्रत्येक वेळेस अहमदशहाच्या सैन्याची सरशी होई. अफगाण स्वारांची आक्रमक वृत्ति पाहून भाऊ आणि इतर मराठे सरदार यांनीं ठरविलें कीं मोठी लढाई करण्याचें कांहीं दिवस लांबणीवर टाकावें आणि अहमदशहाच्या सैन्यांत येणारी रसद बंद करण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे अहमदशहाच्या सैन्यांत रसदेची टंचाई भासेल.

ती संधी साधून आपण मोठी लढाई करावी आणि जय मिळवावा. या हेतूनें मराठ्यांनीं एक मोठा खंदक खणला. त्या भोवतीं तोफा चढविल्या आणि इब्राहीमखान गार्दीपाशीं बाराहजार बर्कंदाज पायदळ होते त्यांनां तोफखान्याच्या बंदोबस्ताचें काम दिलें. आणि ते निश्चिंतपणें आपल्या छावणींत राहिले. चार पांच सरदारांना निवडक सैन्य बरोबर देऊन त्यांनीं रसद तोडण्याच्या कामावर नेमिलें. हें पाहून केवळ रसदेचा बंदोबस्त करण्याकरितां अहमदशहानें अफगाण स्वारांचें एक पथक नेमलें. अहमदशहानें हिंदुस्थानी सरदारांना हुकुम केला कीं त्यांनीं मराठ्यांशी सतत चकमकी चालू ठेवाव्या. अहमदशहाच्या आज्ञेप्रमाणें अफगाण स्वार मराठ्यांकडे येणारी रसद अडवून अफगाण छावणींत आणू लागले आणि हिंदुस्थानी सरदार मराठ्यांशी चकमकी करूं लागले.

वरील संघर्षाची बातमी रोहिलखंडांत येऊन पोहोंचली. हाफिज रहमतखानाचा मुलगा इनायतखान हा आपल्या बापाची परवानगी न घेता, निवडक माणसें बरोबर

घेऊन अफगाण छावणींत पोहोंचला. हाफिज रहमतच्या मार्फतीनें तो अहमदशहा पाशीं रुजू झाला. त्यानें इनायतखानावर विशेष कृपा दाखविली.

या सुमारास भाऊनें इटावा आणि बुंदेलखंडाचा अधिकारी गोविंद यास लिहिलें कीं तुम्ही दुआब्यांत पोहोंचावे, अफगाणांकडे येणारी रसद थांबवावी आणि रोहिलखंड उध्वस्त करावे. त्याप्रमाणें गोविंदनें पंचवीस हजार सैन्यानिशी दुआब्यांत घुसून तेथून आणि रोहिलखंडांतून येणारी रसद अडविली. त्याचा परिणाम असा झाला कीं अहमदशहाच्या छावणींत महागाई वाढू लागली. गोष्टी या थराला गेल्या कीं छावणींत धान्याची धारण रुपायाला एक शेर याप्रमाणें झालीं. गोविंदपंतानें रसद बंद केली असून रोहिलखंड उध्वस्त करण्याचा त्याचा इरादा आहे अशी बातमी अहमदशहाच्या छावणींत पसरली. त्यावेळीं हाफिज रहमतखानानें ही खबर अहमदशहाच्या कानावर घातली. त्यावेळीं हाजी अताईखान आणि करीमदादखान हे अफगाणिस्तानांतून सहा हजाराचें सैन्य घेऊन नुकतेच आले होते. अहमशहानें त्यांना त्वरेनें गोविंद मराठ्याचें शिर कापून हजर करण्याचा हुकुम केला.

त्या दोघा सरदारांनीं अद्याप आपल्या घोड्याच्या खोगिरी काढल्या नव्हत्या. त्यांच्या अंगावरील प्रवासाची धूळहि अजून निघाली नव्हती. अजून दिवस ढळण्यास दीडप्रहराचा अवकाश होता. त्यांनीं आपलें सहा हजाराचें सैन्य बरोबर घेतले. आणि छावणीपासून चाळीस कोसावर गाजिउद्दीन नगर होतें त्या दिशेनें चाल केली. रातोरात त्यांनीं यमुना ओलांडली आणि ऐन पहाटे ते गोविंदाच्या लष्करावर तुटून पडले. त्यांनीं शत्रूच्या फौजेचा नाश केला. अनेकांचीं डोकी कापलीं. गोविंदाचें डोकें कापून, ती सर्व घेऊन आणि शत्रूची विपुल सामग्री हस्तगत करून ते मोठ्या उत्साहानें परतले. नदीवर पूल काय नांवा काय कांहींच नव्हतें. ती पार करून दुसऱ्या दिवशीं दिवस मावळण्यास दीड प्रहर राहिला असतां ते छावणींत परत आले. नंतर त्यांनीं गोविंद आणि इतर मराठ्यांचीं डोकीं अहमदशहाच्या समोर ठेविलीं. धन्य त्या परमेश्वराची, सुभानल्ला, काय ते चपळ गतीचे स्वार आणि काय ती वाऱ्याचे पाय असलेलीं त्यांचीं घोडीं. केवळ एका दिवसांत त्यांनीं ऐंशीकोस प्रवास केला. यमुना ओलांडली, शत्रूचा फन्ना पाडला आणि सुरक्षितपणें छावणींत परत आले.

सारांश, गोविंदाच्या मृत्यूनंतर अहमदशहाच्या छावणींत फिरुन रसद येऊ लागली आणि धान्य स्वस्त झालें. यानंतर मराठ्यांची रसद तोडण्याकरितां अहमदशहानें जहानखानाबरोबर सहा हजार स्वार दिले. शहापसंदखानाबरोबर सहा हजार स्वार देण्यांत येऊन त्यानें मराठ्यांच्या छावणीभोंवती पंधरा कोसापर्यंतचा मुलख बेचिराख करावा असें ठरविण्यांत आलें. मराठयांच्या छावणीभोंवती सतत टेहेळणी करण्याच्या कामावर बहादुरखान याची नेमणूक करण्यांत येऊन त्याच्याबरोबर सहा हजार स्वार देण्यांत

आलें. मराठ्यांच्या छावणींतून एकाहि माणसाला बाहेर पडूं देऊं नये अशी त्याला ताकीद देण्यांत आली.

आज्ञेप्रमाणें वरील तिन्ही सरदारांनीं आपल्या कामगिऱ्या बजावल्या. रसदेकरितां बाहेर पडणाऱ्या मराठ्यांच्या दळांत आणि अफगाण सरदारांत प्रखर संघर्ष झाले. प्रत्येक वेळेस मराठे मार खाऊन खंदकाच्या आंत पळून जात. अफगाणांच्या धास्तीनें ते छावणीबाहेर पडेनासे झाले.

अहमदशहानें हुकुम केला होता कीं जो कोणी मराठ्यांचीं डोकीं कापून आणील त्याला प्रत्येक डोक्यामागे पांच रुपयांचें बक्षीस देण्यांत येईल. यामुळें रोज चारपांचशे डोकीं अहमदशहापुढें हजर करण्यांत येत.

पण मराठे फार बंदोबस्तानें राहात त्यामुळें कापून आणलेल्या डोक्यांची संख्या कमी होऊं लागली. मग बक्षिसाची रकम पांचावरून दहावर नेण्यांत आली. शेवटी डोक्यामागे एक अश्रफी देण्यांत यावी असेंहि जाहीर करण्यांत आले. असा प्रकार कांहीं दिवस चालला.

यानंतर हाफिज रहमतखानाची आई वारल्यांची बातमी आली. त्यामुळें त्याला अतिशय दुःख होऊन तो आजारी पडला. आजार बराच वाढल्यानें त्यानें आपल्या मोर्चांच्या देखरेखीची कामगिरी दूंदेखान आणि इनायतखात यांच्याकडे सोंपविली. मधून मधून त्याला बरें वाटलें कीं तो स्वतः मोरच्यांची तपासणी करीत असे. रसदेच्या टंचाईमुळें मराठ्यांची अवस्था कठीण होऊं लागली. एके दिवशी मराठ्यांचें एक मोठें पथक खंदकाच्या बाहेर पडले. रसद, धान्य आणि गवत वगैरे आणण्यासाठीं ते धूळकोटकडे रवाना झाले. तेथें त्यांनीं रसद मिळवून उंट आणि बैल यांवर लादलीं. ती घेऊन ते आपल्या छावणीकडे परतले. वाटेंत जहानखान यानें दहा हजार स्वारांनिशी त्यांच्यावर हल्ला केला. जवळ जवळ पांच सहा हजार मराठे मारले गेले. बाकीचे पळून खंदकाच्या आश्रयाला गेले. अफगाणांनीं विपुल रसद आणि घोडी जनावरे हस्तगत करून आपल्या छावणींत आणलीं.

युद्धाच्या आदल्या रात्री मराठ्यांनीं आपसांत सल्ला मसलत केली. आतां युद्ध लांबणीवर टाकले तर नाशाशिवाय दुसरा परिणाम होणार नाहीं हें त्यांना दिसून आलें. निरुपाय होऊन त्यांनीं युद्ध करण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें तयारी केली. ११७४ हिज्री जमादिलावलच्या सहा तारखेस सदाशिवराव भाऊ सैन्यासहित बाहेर पडला. इब्राहीमखान गाडदीचा प्रचंड तोफखाना आणि पायदळ हे त्यानें आपल्या आघाडीवर ठेविले. पायदळाच्या मागें त्यानें घोडदळ ठेविलें. तो स्वतः आणि इतर मराठे सरदार हत्तीवर स्वार झाले. अशा प्रकारें मराठ्यांचे सैन्य छावणी बाहेर पडले आणि तोफीं आणि बंदुकींच्या भडिमारानें युद्धास सुरवात केली. मराठ्यांचें सैन्य हळुहळु सरकत

हाफिज रहमतखानाच्या मोर्च्यांपाशी आलें. अहमदशहानें हिंदुस्थानी सरदारांना आपले मोर्चे कायम करण्याचा हुकुम केला. त्यावेळीं सरदारांनीं आपापसांत सल्ला मसलत करून कोणी कोठे मोर्चे कायम करावें हें ठरविलें होते. शुजाउद्दौला आणि नजीबखान यांचे मोर्चे मल्हारराव आणि जनकोजीच्यासमोर होते. हाफिज रहमतखान, आणि अहमदखान बंगश यांचे मोर्चे इब्राहीमखान गार्दी आणि इतर मराठे सरदारांच्या समोर होते. या सर्वांच्या अघाडीच्या दळांच्या नेहमीं चकमकीं होत. या खेपेस इब्राहीमखानानें तोफांचा भडिमार चालू केला. आणि हाफिज रहमतखानाच्या सैन्यावर त्यानें चाल केली.

मराठे युद्धाच्या तयारीनें येत आहेत हें पाहून अहमदशहानें आपल्या सैन्याला तयार होण्याचा हुकुम दिला. मराठेजवळ येईपर्यंत अफगाण सैन्य आपल्या ठरलेल्या जागेवर उभें होतें. इतक्यांत इब्राहीमखानानें तोफा आणि बंदुका यांच्या गोळ्यांचा पाऊस पाडण्यास सुरवात केली. हाफिज रहमतखान आजारी होता. चालण्या फिरण्याची त्याला अद्याप शक्ति आली नव्हती. म्हणून इतर रोहिले सरदार म्हणजे फैजुल्ला खान इनायतखान, दूंदेखान वगैरे आपल्या मोर्च्यांतून बाहेर पडून तोफा आणि बंदुकांनीं शत्रूशी लढू लागले.

इब्राहीमखानाचें सैन्य जवळ येईपर्यंत ते आपल्या जागी ठाण मांडून राहिले. आपल्यापैकीं किती मेले आणि किती जखमी झाले याची त्यांनीं पर्वा केली नाहीं. तोफा आणि बंदुकीच्या युद्धांत इब्राहीमखान म्हणजे केवळ जादुगार होता. त्यानें तोफांचा आणि बंदुकींचा प्रखर मारा केला. आणि एकाहि अफगाणाला त्यानें पापण्यांची उघडझाप करण्यास किंवा एक पाऊल पुढें टाकण्यास अवसर दिला नाहीं. त्यानें असंख्य लोकांचे प्राण घेतले. या युद्धांत रोहिलखंडचे बरेंच रोहिले जखमी होऊन मागे हटले. अहमदखान बंगश हा चंडोलला मागे उभा होता. तो म्हणतो कीं ते रोहिले मागे हटून त्याच्या सैन्यांत मिसळले. अहमदखान बंगश यानें त्यांची छी, थू केली. त्यांना आपल्याबरोबर घेऊन, तो इनायतखान अघाडीवर लढत होता त्याच्या मदतीसाठी धावला. तो अजून त्याला जाऊन मिळाला नव्हता इतक्यांत इनायतखानानें आपल्या सैन्याची दुस्थिति पाहून, स्वतः शौर्यानें शत्रूच्या फळीवर हल्ला चढविला. तोफांच्या भडिमारांतून जे वाचले ते पुढे होऊन तल्वार आणि कटारीनीं लढू लागले. त्यांनीं इतक्या निकरानें लढाई केली कीं इब्रामीमखानाच्या दळाची पांगापांग झाली. त्यांनीं तोफा टाकून देऊन माघार घेतली. अफगाणांनीं तोफा ताब्यांत घेतल्या आणि ते शत्रूची कत्तल करू लागले. भाऊ आणि इतर मराठे सरदार इब्राहीमखानाच्या पाठीशीं उभे होते. त्यांनी लढाईचा रंग पाहिला आणि ते इब्राहीमखानाच्या मदतीला धावले. ऐंशी हजार स्वारानिशीं ते अफगाणांवर तुटून पडले. अफगाणांनीं आपल्या परीनें प्रतिकाराचा प्रयत्न केला.

त्यांनीं अनेक मराठे स्वारांना घोड्यावरून खाली ओढून धुळीस मिळविले. पण मराठ्यांचें सैन्य प्रचंड होतें. त्यांच्या घोडदळाच्या माऱ्यापुढें त्यांची पायमल्ली होऊन त्यांची पांगापांग झाली. आणि त्यांनीं युद्धांतून तोंड फिरविलें. तरीपण इनायतखान, दूंदेखान, फैजुल्लाखान, हे सरदार आणि शेख कबीर, सय्यद मासूम इत्यादि रिसालदार हे आपल्या जागेवर ठाण मांडून निर्धारानें लढत होते. मराठ्यांचा सतत मारा होत असतांनाहि ते आपल्या जागेवरून हलले नाहींत.

अशा संकटाच्या प्रसंगी अहमदखान बंगश हा माघारी फिरलेल्या अफगाणांना धीर देऊन त्यांना बरोबर घेऊन इनायतखानाला येऊन मिळाला. इतके असूनहि मराठ्यांचे सारखे हल्ले होत होते. आणि त्यांना वरचेवर कुमक मिळत होतीं. त्यामुळें अफगाणांच्या वांट्याला मरणें अगर जखमी होणें याशिवाय दुसरें कांहीं आलें नाहीं. अफगाणांवर परमसंकट ओढवलें. सैन्यांतून पळून गेलेल्यांनीं खबर उडविली कीं इनायखान आणि इतर रोहिले सरदार मारले गेले आहेत. हाफिज रहमतखान दोन कोस मागे होता. त्याला ही बातमी कळतांच तो पालखींत स्वार झाला आणि चार हजार स्वार आणि पायदळ बरोबर घेऊन तो युद्धभूमीकडे निघाला.

या वेळी अहमदशहा एका उंच टेकडीवर उभा राहून युद्धाचा रंग पाहात होता. अफगाणांची दुर्दशा होत असलेली त्यानें पाहिली. त्यानें हाजी अताईखान आणि करीमदादखान यांची सहा हजार स्वार बरोबर देऊन रवानगी केली. रोहिल्यांच्या आणि मराठ्यांच्या मधें पडून त्यांनीं शत्रूवर बंदुकींचा मारा करावा आणि शत्रूंत धुमश्चक्री करावी अशी त्यांना आज्ञा देण्यांत आली. त्याप्रमाणें ते शत्रूवर तुटून पडले. या हाणामारींत हाजी अताईखान हा मारला गेला. याच वेळीं शहा पसंदखानानें चाल करून मराठ्यांच्या गोटाला आग लाविली. आणि त्यांची छावणी, डेरे इत्यादि नष्ट केलें. अफगाणांची नवीन फौज चालून आली आणि आपली छावणी उध्वस्त झाली हें पाहून भाऊ आणि इतर सरदार काळजींत पडले.

याच वेळेस अहमदशहानें आपल्या गुलामांच्या पलटणींना हुकुम दिला कीं मराठे सरदार ज्या ठिकाणी जमून कुमक पाठविण्याचा विचार करीत आहेत तेथें पोहोंचून गोळ्यांचा त्यांच्यावर वर्षाव करावा. आणि नंतर तलवारी चालवून त्यांचा निकाल लावावा. आज्ञेप्रमाणें गुलामांच्या पलटणी रवाना झाल्या. भाऊ, विश्वासराव, रघुनाथराव, शमशेरबहादुर, जनकोजी, मल्हारराव वगैरे सरदार उभे होते त्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं बंदुकींचा मारा केला. परमेश्वराची कृपा आणि अहमदशहाचें भाग्य यामुळें एक मल्हारराव सोडून सगळे मराठे सरदार गोळ्यांना बळी पडून आपापल्या हौद्यांत मरण पावले. याच सुमारास अब्दालीच्या फौजेनें मराठ्यांची कत्तल करण्यास सुरवात केली.

मराठयांच्या प्रेतांच्या राशी पडूं लागल्या. आपले सरदार मारले गेले आहेत हें पाहून मराठे घाबरून रणांगणांतून पळू लागले. अहमदशहानें पळणाऱ्या मराठयांचा पाटलाग करण्याकरितां सैन्याच्या तुकड्या नेमिल्या, आणि त्यांना आज्ञा केली कीं दिल्लीपर्यंत पाटलाग करावा आणि जे जे मराठे हातीं लागतील त्यांची कत्तल करावी. हाफिज रहमतखाला वाटेंतच अफगाणांच्या विजयाची बातमी कळली. इनायतखान वगैरे सरदार सुरक्षित असलेले पाहून त्यानें परमेश्वराचे आभार मानले.

अफगाण फौजेनें दिल्लीपर्यंत मराठ्याचा पाठलाग केला. इतके मराठे मारले गेले कीं त्याची मोजदाद करणें कठीण आहे. एक मल्हारराज होळकर आणि महादजी शिंदे सोडून या युद्धांत सगळे नामांकित मराठे सरदार मरण पावले. नजीबखान आणि मल्हारराव यांचें आपसांत सूत होतें. नजीबखानाच्या इशाऱ्यानें मल्हारराव त्याच्या छावणीच्या बाजूने निघून सुरक्षितपणें कर्नालकडे पळून गेला. इब्राहीमखान गार्दी हा आपल्या मुलासहित हाफिज रहमतखानाच्यां सैन्याकडून कैद होऊन आला. उभय पक्षाचे मिळून जवळ जवळ पंचवीस हजार प्रेतें मोजण्यांत आलीं. मुख्य युद्धापूर्वीच्या चकमकींत आणि नंतरच्या पळांत जीं मारलीं गेलीं त्यांची गणती नाहीं. अफगाणांच्या हाती जडजवाहीर, डेरे, तंबू, युद्ध सामग्री इतकी पडली कीं त्याचें मोजमाप करणें शक्य नाहीं. सारांश परमेश्वरी कृपेनें साध्य झालेला हा विजय अहमदशहाला मिळाला.

## तारीखे अहमद

[ अब्दुल्करीम अल्वी यानें इ. स. १८४५ च्या सुमारास अब्दाली घराण्याचा इतिहास लिहिला आहे. या ग्रंथाची हस्तलिखित प्रत मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयांत आहे. आपल्या प्रस्तावनेंत अब्दुल्करीम म्हणतो

मी शुजाउल्मुल्क दुरानी ( शाहशुजा ) ची हकीकत लिहून काढली. इंग्रजांच्या मदतीनें त्यानें लुधियानाहून निघून खुरासान गांठलें. ( १२५५ हिज्री १८३९–४० इ. स. ) आणि तेथें बंडखोरांचा बीमोड करून तो आपल्या वडिलार्जित गादीवर बसला. त्याचें चरित्र लिहून काढल्यानंतर मला वाटलें कीं अहमदशहाच्या कारकिर्दीच्या प्रारंभापासून दुराणी घराण्याचा इतिहास लिहून काढावा. त्या दृष्टीनें मी साधनें तपासून हकीकत लिहिली आहे. इतिहासकारांनीं दुराणी बादशहाविषयीं थोडें लिहिलें आहे. इमामुद्दीन हुसेनीनें एक इतिहास 'लिहिला' आहे. तो अफगाणिस्तानांत अनेक वर्षे होता. आणि त्यानें संशोधन करून दुराणी बादशहांची हकीकत लिहून काढली आहे. ग्रंथांतील मजकूर त्यानें १२१२ हिज्रीपर्यंत ( इ. स. १७९८ ) आणला आहे. जमानशहा बादशहा ( अहमद शहाचा नातू ) ची कारकिर्दहि त्यानें वर्णिली आहे. माझ्या ग्रंथांत मी हुसेनीच्या इतिहास ग्रंथांतील बराच मजकूर घेतला आहे.

अब्दुल्करीमच्या या ग्रंथांत दोनशे पानें आहेत. त्यांत पानीपतसंबंधी मजकूर खालील प्रमाणें आहे. ]

( १९ ) पावसाळा संपला. इस्लामधर्मीयांचा कांटा काढणें, आणि अहमद शहाशी लढणें या उद्देशानें दक्षिणेंतून प्रचंड आणि सुसज्ज फौजा उत्तरेच्या रोखानें निघून दिल्लीपाशीं पोहोंचल्या. या सैन्यांत मातबर सरदार होते. त्यांचा सेनापति भाऊ होता. विश्वासराव, जनकोजी, मल्हारराव, शमशेर बहादुर हे इतर सरदार होते. इब्राहीमखान गार्दीबरोबर बारा पल्टणी होत्या. प्रत्येक पल्टणींत एक हजार शिपाई होते. त्यांची लष्करी शिस्त ही फिरंग्यांच्या पद्धतीवर होती. इब्राहीमखान हा अतिशय शूर आणि पराक्रमी होता. त्याचें शौर्य सगळे मराठे मानीत. याशिवाय आणखी एक सरदार शिंदे होते. पण त्यावेळी त्याला विशेष अधिकार नव्हता. सैन्याबरोबर पंधराशे तोफा होत्या. त्याचे गोलंदाज हे फिरंगी पद्धतीचे होते. सैन्यांत बाराहजार घोडेस्वार होते. याशिवाय कांहीं हजार पट्टाबाज होते. ते तल्वार बहाद्दरींत निष्णात होते. याशिवाय लष्कराबरोबर बाजारबुणगे होतो. सारांश सैन्यांत असंख्य स्वार शिपाई होते. इतकें प्रचंड सैन्य कोणी अद्यापपर्यंत पाहिलें नव्हते. वृद्धांच्या सांगण्यावरून, महाभारत काळांत इतकें सैन्य एकत्र झाले असावे असें वाटतें.

( २० ) हें सैन्य दिल्लीजवळ आलें. सर्व कलहाचे मूळ असलेला इमादुल्मुल्क आणि सूरजमल जाट हे मराठ्यांना मिळाले. आणि सर्वांनीं मिळून दिल्लीला वेढा घातला. त्यावेळी मुहसिनुल्मुल्क याकूब अलीखान हा किल्लेदार होता. त्यानें किल्ला लढविला. मराठ्यांनीं किल्ल्यावर सारखे हल्ले करून याकूब अलीखानाला मोठ्या पेंचांत आणले. त्यानें सगळी परिस्थिति अहमदशहा आणि वजीर शहावलीखान यास कळविली. अहमदशहाच्या सल्ल्यानें त्यानें किल्ला दक्षिण्यांच्या हवाली केला.

( २१ ) याच सुमारास इमादुल्मुल्क आणि सूरजमल जाट हे मराठ्यांना सोडून भरतपुर कुंभेरीकडे गेले. कारण काय झालें समजत नाहीं. मराठ्यांनीं शहराचा बंदोबस्त केला. एकाला त्यानीं किल्लेदार म्हणून नेमले. कमालीचा गर्व झाल्यामुळें भाऊ आणि इतर मराठे सरदारांच्या तोंडून निघालं की अहमदशहावर विजय मिळवून, अफगाणांची कत्तल करून मुसल्मानांचा बीमोड केल्यावर आम्ही विश्वासरावाला हिंदुस्थानाच बादशहा बनवूं. आमच्या बरोबर शिळेची एक मोठी मूर्ति आहे तिची स्थापना जुम्मामशिदींत करून आम्ही मशिदीचें मंदिर बनवूं. तेथें अजान ( प्रार्थनेची हांक ) ऐवजी शंखाचा ध्वनि ऐकू येईल.

कोणत्याहि मार्गानें का होईना परमेश्वरानें त्या सर्वांचा नायनाट केला. यानंतर दक्षिण्यांची सर्व फौज कुंजपुऱ्यावर चालून गेली. तेथील किल्ला घेऊन आणि कत्तल करून त्यांनीं विपुल संपत्ति हस्तगत केली. नजाबतखान हा तेथें किल्लेदार होता. त्यानें

दगाबाजी केली. मराठ्यांची फौज आली तेव्हां त्यानें किल्ल्यांचे दरवाजे बंद केले. आणि अब्दुस्समदखान आणि मियां कुतुबखान इत्यादि अफगाण सरदारांनाहि त्यानें येऊ दिलें नाहीं. ते मराठ्यांच्या हातीं सांपडून मारले गेले. नजाबतखानालाहि मराठ्यांनीं ठार मारलें.

मराठ्यांनीं कुंजपुऱ्यावर चढाई केली ही हकीकत अहमदशहाच्या कानीं पडली. मराठ्यांना शिक्षा करण्याच्या उद्देशानें तो अनूपशहराहून निघाला.

(२२) त्याच्या बरोबर नजीबुद्दौला, हाफिज रहमतखान, अली महंमद रोहिल्याचा मुलगा फैजुल्ला, वगैरे सरदार होते. कूच करीत ते बागपत पाशीं पोहोंचले. तेथें त्यांना कळलें कीं मराठ्यांनीं कुंजपुऱ्याच्या अफगाण सरदारांचा वध केला आहे. अहमदशहाला हें ऐकून अतिशय त्वेष आला. आपण नदीपार करून विजेप्रमाणें मराठ्यांवर तुटून पडावे असें त्याला वाटलें. पण नदीला पूर आला होता. आणि फौज पार करण्यास नावा मिळणें मुष्किल होतें. असें म्हणतात कीं अहमदशहा नदीच्या कांठावर उभा राहिला. त्यानें आपल्या भात्यांतून बाण काढला. आणि त्याच्यावर कुराणांतील मंत्राची फुंकर घालून तो त्यानें नदींत उडविला. त्यावेळी त्याची चार हजार गुलामांची पल्टण जवळ उभी होती. त्यांना त्यानें हुकुम सोडला कीं परमेश्वराचें नांव घेऊन त्यांनीं आपले घोडे नदींत घालून नदी पार करावी. परतीरं गांठल्यावर त्यांनीं तेथें शिस्तीनें तयार राहावें. कारण नदीकांठापासून पंचवीस कोसांवर शत्रूचें असंख्य सैन्य तळ ठोकून आहे. अहमदशहाची आज्ञा ऐकून त्याच्या पल्टणीनें नदींत घोडे घातले. असें म्हणतात कीं नदीचे पाणी घोड्यांच्या खोगिरीपर्यंत लागलें. घोड्यावर स्वाराच्याबरोबर एक पायदळशिपायाला जुजबी सामानासहित बसण्याचा हुकुम देण्यांत आला. जडसामान हत्तींच्या पाठीवरून वाहून नेण्यांत आलें. अशा रीतीनें परमेश्वर कृपेनें आणि अहमदशहाच्या भाग्यानें सगळी फौज लवाजम्यासहित नदीपार झाली.

(२३) सारें सैन्य पार झाल्यानंतर त्यांना विश्रांति देण्यासाठीं अहमदशहा एकदोन दिवस तेथें थांबला. नंतर तेथून कूच करून तो संभलक्याजवळ आला. तेथें त्याला कळलें कीं संभलक्याच्या सराईजवळ मराठ्यांची पंचवीस हजार फौज तळ देऊन बसली आहे. अहमदशहा घोड्यावर स्वार झाला. आणि त्यानें सैन्याच्या तयारीचा हुकुम दिला. शहापसंदखान सरदार हा त्याच्याजवळ उभा होता. त्याला अहमदशहानें म्हटलें की शहापसंदखान, आज शत्रूचा मोड करण्याची कामगिरी तुझ्याकडे सोंपविली आहे. शहापसंदखानापाशी तीन चार हजार फौज होती, ती घेऊन त्यानें मराठ्यांवर चाल केलीं. उभय दळें एकमेकाला भिडलीं. लढांई मोठ्या निकराची झाली. मराठ्यांचा धीर सुटून ते पळू लागले. शहापसंदखानाच्या सैन्यानें

अनेकांची डोकी कापलीं. प्रत्येक स्वार परततांना आपल्याबरोबर दोन तीन डोकीं घेऊन आला. तीं सर्व अहमदशहाला दाखविण्यांत आलीं.

(२४) आपल्या कार्याला हा शुभशकुनच झाला असें समजून अहमदशहानें शहापसंदखानाला धन्यवाद दिले. शहापसंदखानानें विनंति केली कीं किबलाये आलम तुमच्या कारणीं माझा देह पडो. आज मला मराठ्यांच्या लढण्याच्या पद्धतीची पूर्ण माहिति मिळाली. इन्शाल्लाह (परमेश्वर इच्छील तर) परमेश्वराच्या कृपेनें आणि आपल्या भाग्यानें त्या सर्वांचा नाश होईल. आपल्या फौजेच्या दुर्दशेची बातमी भाऊ आणि इतर सरदार यांना समजताच ते कुंजपुऱ्याहून कूच करून करनाल आणि पानीपतच्या मधें पोहोंचले. हें स्थळ दिल्लीपासून पश्चिमेच्या दिशेनें चाळीस कोसावर आहे. अहमदशहाच्या आज्ञेनें दुराणी फौजेनें मराठ्यांच्या लष्करा भोंवती लूटमार सुरू केली. मराठ्यांचें सैन्य प्रचंड आणि प्रबळ होतें. असें असूनहि त्यांनीं आपल्या लष्करा भोंवती रुंद आणि खोल खंदक खणला. आणि भक्कम छावणी उभी केली. आणि दमदमें बांधून त्यावर तोफा उभ्या केल्या. अहमदशहानें पश्चिमदिशेनें कांहीं मजला केल्या. आणि मुक्कामावर पोहोंचून जड आणि अनावश्यक सामान, घोडीं आणि इतर जनावरें तेथें ठेवून दिलीं. हिंदुस्थानी आणि दक्षिणी म्हणू लागले कीं आपल्या देशाकडे हळु हळु निसटून जाण्याचा अहमदशहाचा बेत दिसतो. मराठ्यांना ही बातमी लागतांच त्यांनीं अहमदशहाच्या गोटावर छापा घालून घोडीं, गुरेढोरें जीं कांहीं हातीं लागलीं तीं हस्तगत केलीं.

(२५) पण जवळच जहानखान सरदार हा आपल्या सैन्यासहित लपून बसला होता. त्यानें तेथें आलेल्या मराठ्यांच्या दळावर एकाएकी हल्ला करून सर्वांचीं कत्तल केली. अहमदशहाचा गोट लुटण्यास आलेल्या या पथकांत कोणी जिवंत राहिला नाहीं. योगायोगानें शुजाउद्दौला त्या बाजूनें गेला. जहानखानानें त्याला कापलेल्या डोक्यांचे ढिगारे दाखविले. असें म्हणतात कीं वीस हजार डोकीं मोजण्यांत आलीं. ती अहमदशहाला दाखविण्यांत आलीं.

अशाच प्रकारे दर चार पांच दिवसांनी दोन तीन हजार मराठे मारले जात.

या सुमारास अहमदशहाच्या लष्करांतील हिंदुस्थानीं सरदारांना बातमी लागली कीं गोविंद पंडित नांवाचा सरदार चाळीस पन्नास हजार सैन्य घेऊन दिल्लीहून निघाला असून रोहिले आणि शुजाउद्दौला यांचा मुलुख लुटण्याचा त्याचा इरादा आहे. ही बातमी ऐकून रोहिले आणि शुजाउद्दौला हे अत्यंत काळजींत पडले. त्यांनीं ही हकीकत अहमदशहाला सांगितली. रोहिल्यांच्या मुलखाचें रक्षण करण्याच्या उद्देशानें, कंधारहून आपल्या छावणीत नुकत्याच आलेल्या हाजी अताईखान आणि हाजी करीमदादखान.

(२६) या सरदारांना आज्ञा केली कीं तुम्ही ताबडतोब येथून निघून गोविंद पंडित यांचा बीमोड करावा. आणि उद्या यावेळेपर्यंत शत्रूंची डोकीं हजर करावी. दिवस मावळण्यास थोडा अवधि होता. उभय सरदारांनीं मार्गदर्शनाकरितां म्हणून हाफिज रहमतखानाचा मुलगा इनायतखान याच्या रिसाल्यांतील-पांचशे स्वार आणि सहा हेर घेतले आणि आपले तीन चार हजार स्वार घेऊन ते तडक छावणींतून निघाले. त्यांनीं रातोरात यमुना ओलांडली आणि भल्या पहाटे ते गोविंद पंडिताच्या सैन्यावर तुटून पडले. त्यांनीं असंख्य लोकांची कत्तल केली. आणि गोविंदपंत आणि इतर अठरा हजार लोकांचीं डोकीं कापून ते दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं अहमदशहाच्या छावणींत परतले. त्यांनीं कापलेलीं डोकीं अहमदशहाला दाखविलीं. यामुळें रोहिले सरदारांचें समाधान झालें.

मराठ्यांच्या आणि अफगाणांच्या सैन्याच्या सतत चकमकी चालत. अफगाण सैन्यांत प्रत्येकजण सावध आणि तत्पर असे. एका रात्रीं दिल्लीहून भाऊकरितां खजिना येत होता. खजिन्याबरोबर असलेले मराठे अंधाऱ्या रात्रीं वाट चुकून अफगाणांच्या छावणींत शिरले. आणि ही आपलीच छावणी असें समजून त्यांनीं पहारेकऱ्यांना मराठींत विचारलें कीं अमक्या अमक्या सरदाराची पागा कोठे आहे. हे ऐकतांच रोहिले त्यांच्यावर तुटून पडले. आणि त्यांनीं खजिना हस्तगत केला.

हा गोंधळ ऐकून अफगाण शिपाई तेथें आले. आणि खजिन्याबरोबर असलेल्या मराठ्यांनीं कत्तल झाली. आणि सर्व खजिना अफगाण सैन्याच्या हातीं पडला.

एके दिवशीं इब्राहीमखानाचा भाऊ फत्तेखान हा रात्रीचा छापा घालण्याच्या उद्देशानें फौज आणि तोफा घेऊन अफगाणांच्या छावणीवर चालून आला. मोर्चावर हिंदुस्थानी (रोहिले) होते. ते सावध झाले आणि दोन्ही दळांत युद्ध जुंपले. शेवटी फत्तेखानाची तीस निशाणे आणि कांहीं तोफा अफगाणांनीं हिसकावून घेतल्या. फत्ते-खानाचा बीमोड होऊन त्याला आपल्या छावणींत परत जावें लागलें.

आणखी एकेदिवशी इनायतखान आणि नजीबुद्दौला यांनीं आपलें सैन्य घेऊन मराठ्यांच्या छावणींत प्रवेश केला. लढाई सुरू झाली. बरेच मराठे कत्तल झाले. रोहिल्यानीं पुढे घुसून मराठ्यांच्या तोफखान्याकडे कूच केले. त्यापैकीं कांहीं तोफा ताब्यांत घेऊन त्यांनीं उडविण्यास सुरवात केली. अकस्मात चाळीस पन्नास हजार मराठे त्यांच्यावर तुटून पडले आणि त्यांनीं रोहिल्यांना कोंडलें. मराठ्यांनीं तल्वारी चालविण्यास सुरवात केली. रोहिलेहि शर्थीनें लढले. पण मराठ्यांची फौज प्रचंड असल्यामुळें रोहिल्यांचें कांहीं चाललें नाहीं. त्यांच्यापैकीं बरेच मारले गेले.

(२८) त्यादिवशीं नजीबुद्दौल्याचे सहा हजार रोहिले मारले गेले. जवळ जवळ पांचशे शिपाई रक्तबंबाळ होऊन मराठ्यांच्या छावणींतून परत आले. शुजाउद्दौ-ल्याचा गोट नजीबुद्दौल्याजवळ होता. रोहिल्यांचें शौर्य पाहून त्यानें धन्योद्गार काढले.

हाफिज रहमतखान आजारी होता. पण त्याचा मुलगा इनायतखान हा या युद्धांत हजर होता. रोहिले सरदारांनीं त्यादिवशीं उत्कृष्ट कामगिरी बजावली. असें म्हणतात कीं आपलें सैन्य कमी आणि शत्रूचें जास्त आणि तेंहि तोफखान्यानें युक्त असूनहि अहमदशहानें असें युद्ध केलें कीं मराठ्यांचा बीमोड झाला.

पांच महिनेपर्यंत मराठे आणि अहमदशहा यांच्यांत छापे, चकमकी आणि गोळागोळी या चालू होत्या. अफगाणांनीं मराठयांची रसद पूर्णपणें तोडली.

( २९ ) मराठयांच्या छावणींत इतका भयंकर दुष्काळ पडला कीं लोक शेवटीं जनावरांच्या हाडाचें पीठ करून खावू लागले. उपासमारीनें अनेक घोडीं मेलीं आणि उरलेलीं निकामीं झालीं. शेवटी नाइलाज होऊन मराठे छावणी सोडून मैदानांत आले. उभय सैन्यांत घनघोर युद्ध झालें. त्या दिवशीं हाफिज रहमतखान याचा मुलगा इनायतखान यानें आपलें सैन्य घेऊन निकराची लढाई केली. पण त्याच्यासमोर मराठयांची फौज असंख्य असल्यामुळें तो त्यांच्या कचाट्यांत सांपडला. अहमदशहाला हें कळतांच त्यानें इनायतखानाच्या मदतीकरितां हाजी अताईखान यास पाठविलें. अताईखानानें मराठयांवर हल्ला चढविला. पण त्याचें मरण ओढवले होतें. बंदुकीची गोळी लागून तो ठार झाला. त्यानंतर अहमदशहानें आपली एक हजार गुलामांची पल्टण पुढे पाठविली. आणि मग एका पाठोपाठ एक अशा पलटणी तो सारखा पाठवीत गेला. विश्वासराव आणि इतर सरदार हत्तीवर होते. तेथें एकंदर तीनशें हत्ती होते. त्यांच्यावर पहिली पलटण तुटून पडली: पलटणींतील शिपाई बंदुकीची एक फैर झाडीत आणि दुसऱ्या बाजूनें निघून जात. लगेच दुसरी पलटण त्यांची जागा घेई. त्यांनीं बंदुकी सर करून मराठयांच्याभोंवतीं फिरावे तो तिसरी पलटण त्यांची जागा घेई. तोपर्यंत पहिली आणि नंतर दुसरी अशा फल्टणी परत येत आणि बंदुकांचा मारा करीत.

( ३० ) या तिन्ही पल्टणींच्या माऱ्यानें भाऊ, विश्वासराव आणि अनेक सरदार गोळ्या लागून मृत्युमुखी पडले. हत्तीना जखमा लागल्या. तोफांच्या आणि बंदुकींच्या आवाजानें ते घाबरून जाऊन सैरावैरा धावू लागले. त्यामुळे मराठा पथकांची पांगापांग होऊ लागली. बंदुकीच्या फेरी झाडल्यानंतर वैरील अफगाण पल्टणींनीं आपल्या तल्वारी बाहेर काढल्या आणि मराठयांवर चालविण्यास सुरवात केली. दक्षिण्यांचा सर्वनाश झाला. इतकी युद्धोपयोगी सामग्री जवळ असूनहि त्यांच्यांत भयंकर पळापळ झाली. रोहिल्यांनी हल्ल्यावर हल्ले चढवून त्यांची कत्तल केली. दक्षिण्यांची इतकी माणसें मारलीं गेलीं की इतकीं प्रेतें पडलेलीं या पूर्वी कोणीं पाहिलीं नसतील. आणि ऐकलींहि नसतील. चाळीसपन्नास कोसापर्यंत प्रेतांच्या राशी पडल्या होत्या. गर्विष्ठांचा मद उतरून धडा मिळावा असा प्रकार घडला. असें म्हणतात कीं त्या कत्तलींतून एकहि सरदार सुटला नाहीं. मल्हाररावाचें पथक शुजाउद्दौला आणि

नजीबुद्दौल्याच्या मोर्चासमोर होतें. म्हणून तो आपल्या पथकासहित सुरक्षित निसटला. दौलतराव शिंद्यांचा चुलता महादजी याला पटेल म्हणत. तो पुढें नांवलौकिकास चढला. आणि हिंदुस्थानांत त्याला मोठा अधिकार प्राप्त झाला.

(३१) तो जखमी होऊन पळाला. एका अफगाणानें त्याचा साठ कोसापर्यंत पाठलाग केला. आणि त्याच्या पायावर वार करून त्याला पाडले. आणि त्याचें सामान घेऊन आपल्या छावणीकडे परत गेला. यामुळें महादजी शिंद्याचा पाय अधू होऊन त्याला दुसऱ्याच्या मदतीशिवाय उठता येत नसे. समशेर बहादुरला मानेवर भारी जखम झाली. तो कसाबसा भरतपुरला पोहोंचला. सूरजमलनें त्याचा इलाज करण्याची पराकाष्ठा केली पण त्याचा कांहीं उपयोग न होता तो मरण पावला. इब्राहीमखान गार्दीला कैद करून अहमदशहाकडे आणण्यांत आलें. शुजाउद्दौल्यानें त्याच्याबद्दल पुष्कळ रदबदली केली. पण उपयोग झाला नाहीं. अहमदशहानें त्याच्या वधाची आज्ञा केली.

(३२) त्याचें कारण असें कीं त्यानें आपल्याला येऊन मिळावें म्हणून अहमदशहानें बऱ्याच वेळा निरोप पाठविला होता. पण तो कबूल झाला नाहीं. आणि हिंदूंची सोबत त्यानें सोडली नाहीं. या युद्धांत शत्रूची विपुल संपत्ति अहमदशहाच्या हातीं लागली. जिकडे तिकडे जयघोष होऊं लागले. अफगाण सैन्यांतील प्रत्येक सरदाराला वस्त्रें अलंकार वगैरे देण्यांत येऊन त्याची प्रशंसा करण्यांत आली. हाफिज रहमतखानाचा मुलगा इनायतखान यावर बहुत संतुष्ट होऊन अहमदशहा म्हणाला कीं या जयाबद्दल तुझें अभिनंदन. परमेश्वराची तुझ्यावर आणि तुझ्या बापावर कृपा राहो. नंतर सरदारांना उद्देशून तो म्हणाला कीं आतां दिल्लीहून बंगाल आणि दक्षिणेपर्यंतचा सगळा मुलुख मी तुमच्याकरितां निष्कंटक करतो. तुम्ही सर्वांनीं निश्चिंत राहून माझें अभिष्टचिंतन करावें. शुजाउद्दौला तुमच्या जमातीचा नाहीं. त्याला मी आपल्याबरोबर घेऊन जाईन आणि तिकडे मी त्याला विस्तृत मुलुख देईन. हें ऐकून सगळे रोहिले सरदार गप्प राहिले. मग हाफिज रहमतखानानें म्हटलें कीं आमच्यांत आणि शुजाउद्दौल्यांत परकेपणा नाहीं. त्यांनीं आमची पुष्कळ वेळा मदत केली आहे. आपण त्यांना बरोबर नेऊन तिकडे मुलुख द्याल. पण हिंदुस्थानांतील लोक म्हणतील कीं सगळे अफगाण एक झाले. एकच बिगर अफगाण राहिला होता त्याला त्यांनीं हिंदुस्थानाबाहेर काढलें. शुजाउद्दौल्याला हिंदुस्थानाबाहेर नेणें आम्हाला बरें वाटत नाहीं.

(३३) यावर अहमदशहा म्हणाला कीं मला शुजाउद्दौल्याशीं अदावत नाहीं. केवळ तुमच्या हिताकरितां मी बोललों. तुम्हाला पटत नाहीं. पण लक्षांत ठेवा याचा परिणाम तुम्हाला एके दिवशीं दिसून येईल. मग अहमदशहानें हिंदुस्थानी सरदारांना निरोप दिला. सिरहिंदच्या सुभेदारीवर जैन खानाची त्यानें नेमणूक केली. आणि कूच करीत तो कंधारला पोहोंचला.

# फेरियर कृत अफगाणांचा इतिहास

[ जनरल फेरियर हा फ्रेंच अधिकारी इ. स. १८४० च्या सुमारास ईराणांत होता. ईराणचें सैन्य तयार करण्याचें काम त्याच्याकडे होतें. पुढें ईराणच्या राजकारणांत रशियाचें वजन वाढू लागलें तसें त्याला फ्रांसला परत जावें लागलें. फेरियर फिरून एकदां ईराणांत आला तो अफगाणिस्तान मार्गे पंजाबांत जाऊन रणजितसिंहाच्या पदरीं नोकरी पत्करावी या उद्देशानें. या निमित्तानें त्यानें अफगाणिस्तानांत प्रवास केला. प्रवासांत त्याला अनेक हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या. पंजाबांतील परिस्थिति रणजितसिंहाच्या मृत्यूनंतर पालटली होती. त्यामुळें फेरियरला अफगाणिस्तानांतून परत जावें लागलें. अफगाणिस्तानाच्या प्रवासावर फेरियरनें दोन उत्कृष्ट ग्रंथ लिहिले आहेत. एकाचें नांव कारवान जर्नीज् असें असून दुसरा ग्रंथ अफगाणांचा इतिहास हा आहे. दोन्ही ग्रंथांचें भाषांतर क्याप्टन जेस यानें केलें असून अफगाणांचा इतिहास हा ग्रंथ लंडन येथें इ. स. १८५८ मधें प्रसिद्ध केला आहे. या पांचशे पानाच्या ग्रंथांत अफगाणांची मोठी तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. विशेषतः एकोणिसाव्या शतकांतील कंधार, हिरात, बल्ख इत्यादि भागांतील घडामोडी फेरियरनें स्वतः पाहिल्या होत्या. त्यांचा त्यानें खूपच तपशील दिला आहे. त्यापूर्वीची हकीकत त्याला कांहीं ग्रंथावरून आणि ऐकीव माहिती वरून द्यावी लागली. पान १३४ वर तो म्हणतो.

"येथपर्यंत (शहाशुजाच्या राज्यारोहणापर्यंत) मी दिलेली माहिती दोन हस्तलिखित ग्रंथांवरून घेतली आहे. मिर्जा अली महंमदच्या ग्रंथावरून मी अफगाणांचें ईराणवरील आधिपत्य संपेपर्यंतच्या काळाचें वर्णन केलें. त्या वेळेपासून शहाशुजाचें काबुल येथें आगमन होईपर्यंतची हकीकत मी अब्दुल्लाखान हिरातीच्या ग्रंथावरून घेतली आहे. अब्दुल्लाखान हिराती हा हिरातचा राजपुत्र शहा कामरान (अहमदशहा अब्दालीचा पणतू) याचा पेशखिदमत म्हणजे कारभारी होता. त्याच्या हकीकतींत तारखांचे उल्लेख नाहींत. शिवाय ती अगदीं त्रोटक आहे हें मात्र सांगितलें पाहिजे. त्यामुळें मला इतरत्र साधनें धुंडाळावीं लागलीं. अफगाणिस्तानांतील माझ्या सफरींत मी शहा तैमूर आणि त्याच्या मुलांची समकालीन माणसें यांच्या तोंडून माहिती ऐकली. त्यांनीं प्रत्यक्ष घटनांत भाग घेतला होता. त्या माहितीची भर मी आपल्या हकीकतींत घातली आहे."

पानीपतसंबंधीं फेरियरनें जी माहिती दिली आहे त्यांत अनेक चुका आहेत. तारखांची तर चांगलीच गल्लत झाली आहे. पण पानिपत-पूर्व आणि पानीपतोत्तर घटनांचा परिणाम अफगाणिस्थानच्या राजकारणावर कसा झाला हें पाहाण्याच्या दृष्टीनें फेरियरनें दिलेला मजकूर मराठी इतिहासाभ्यासकांस माहितीपूर्ण वाटेल. ]

( ८६ ) फेरियर म्हणतो " अहमदशहा गूरकानी हा दिल्लीचा बादशहा होता. इ. स. १७५३ मधें त्याचा वजीर गाजीखान यानें त्याला गादीवरून काढलें आणि त्याचा पुतण्या आलमगीर यास त्याच्या जागी बसविले. आलमगीर हा अगदी निर्बुद्ध होता. गाजीनें इ. स. १७६० मध्यें त्याचा खून केला आणि सगळा अधिकार स्वतः बळकाविला. अहमदशहा मुल्तान येथें येऊन दाखल होण्यापूर्वी कांहीं दिवस त्याला ही बातमी कळली. मोगल आणि मराठा सैन्यें एकत्र आलीं आहेत हें पण त्याला कळलें.

नादिरशहाच्या दिल्लीवरील स्वारीपासून हिंदुस्थानांत अंदाधुंदी माजली होती. महंमदशहाच्या मृत्यूनंतर अराजकच झालें. हिंदुस्थानचे राजे रजवाडे आणि नवाब मराठयांना खंडणी देत. मराठामंडळानें आपल्या मानेवर लादलेलें जूं झुगारून द्यावें याची त्यांना तळमळ होती. अहमदशहानें त्यांची ही प्रवृत्ति वाढीला लागावी म्हणून त्यांच्याकडे गुप्त संधान लाविलें. त्यांना सोयीचें जावें म्हणून तो आस्ते आस्ते कूच करीत होता. सिंध आणि मुल्तानची व्यवस्था करण्यांत त्याने कांहीं काळ घालविला. नंतर त्यानें पंजाबांत प्रवेश केला. तो येतो हे पाहतांच मराठयांनीं न लढतांच पंजाबांतून पाय काढला. अहमदशहा लाहोरांत येऊन थांबला. हिंदुस्थानांतील राजे रजवाड्यांनीं मराठ्यांची आज्ञा मानली. अहमदशहाचीं कारस्थानें चालू होतीं तरी त्यांनीं आपलीं सैन्यें मराठयांच्याकडे पाठविलीं. मराठयांच्या या संयुक्त सैन्यांत दोन लाख माणसें होतीं. त्यांत सत्तर हजार घोडदळ, वीस मोठया तोफा आणि दोनशे जंबूरक ( लहान तोफा ) होत्या.

हें सैन्य दिल्लींत जमेपर्यंत अहमदशहानें लढाई केली. आणि यमुना नदी गांठली. पण पाणी खोल आणि वेग मोठा. नदीवर पूलहि नव्हता म्हणून नदीचे पाणी उतरेपर्यंत वाट पाहाण्याचें त्यानें ठरविले. यांत त्याची बाजू दुबळी होती. कारण त्याला रसद मिळावयाची ती नदीच्या पलीकडून आणि तो भाग तर शत्रूच्या ताब्यांत होता. आणि मराठयांनीं नदीवर सारखा पहारा ठेविला होता. त्यामुळें अफगाणांच्या छावणींत दुर्भिक्ष्य होऊं लागलें. कांहींनीं तक्रार करण्यास सुरवात केली तर कांहींनीं छावणी सोडून पळून जाण्याचा बेत केला. पण याच सुमारास, अहमद शहाच्या प्रयत्नाचें फळ म्हणून कीं काय त्यांची रसदची टंचाई दूर झाली. आणि त्यांच्या उमेदी बळावल्या. लखनौचा नवाब शुजाउद्दौला यानें नाखुशीनें आणि निरुपायानें मराठयांचें अंकितत्व पत्करलें होतें. त्यानें आतां मराठयांना सोडलें आणि तो अफगाणांच्या छावणींत आला. त्याच्या पाठोपाठ इतर राजेरजवाडे आलें. त्यांच्याबरोबर पंचवीस हजाराचें सैन्य होतें. आतां अहमदशहाचें सैन्य पंच्याऐंशी हजारापर्यंत गेलें. त्यांत पंचेचाळीस हजार घोडेस्वार आणि बाकीचे पायदळ शिपाई होते. शिवाय सतरा मोठ्या तोफा आणि ऐंशी जंबूरक होते. अफगाणांच्या सैन्यांत बिनलढवय्ये असे दहा हजार माणूस होते. उलट मराठयांच्या सैन्यांत एक

तृतीयांश माणसें बाजार बुणगी म्हणजे नोकर, चाकर, बैल, घोडी, आणि उंट हाकणारे अशी होतीं. त्यामुळें लढणाऱ्यांची संख्या एक लाख किंवा एक लाख दहा हजारांच्यावर नव्हती.

शुजाउद्दौल्यांनें अफगाणांच्या सैन्यांत रसद पोहोंचविली. नदी ओलांडणें अशक्य आहे, असा सरदारांचा अभिप्राय पडला होता. पण त्यांच्या शंका दूर करण्यांत आल्या. आणि लढाई देण्याचें ठरलें. सात जानेवारी सत्राशे एकसष्ट रोजीं अहमदशहानें सरदार समदखान यास आज्ञा केली कीं त्यानें पांच हजार स्वारांसहित नदी ओलांडावी आणि मोगलांवर तुटून पडावे. सरदारानें ही आज्ञा ताबडतोब अंमलांत आणिली. पण नदीचा वेग इतका होता कीं समदखान यूसुफ जईचे बहुसंख्य घोडेस्वार पाण्यांत वाहून गेले. शत्रूच्या तोफखान्यानें त्यांच्यावर इतका भडिमार केला कीं त्यांतून वाचलेलें सैन्य मोठ्या पेंचांत सांपडलें. त्याला मदत पाठवावी लागेल हें दिसतांच त्यानें सरदार दिलावरखान इसाकजई आणि झाल बेग पोपलजई यांना त्यांच्या मदतीस धाडलें. त्यांचा आणि समदखान यांचा आपसांत द्वेष होता. त्यांनीं मनःपूर्वक कामगिरी बजावली नाहीं. आणि त्यांनीं समदखानाचें सैन्य गारत होऊं दिलें. अहमदशहानें सगळी परिस्थिति एका क्षणांत ओळखली. आणि युद्धाचें भवितव्य लहान काय मोठ्या काय सर्वच गोष्टीवर अवलंबून आहे हें जाणून त्यानें पाण्यांत घोडा घातला. त्याच्या मागोमाग त्याचे शरीररक्षक नदीत उतरले. त्याचे इतर सरदार आतांपर्यंत स्वस्थ उभे होते. त्यांना पण नदींत उतरणें भाग पडले. आपला बादशहा मृत्यूची पर्वा करीत नाहीं आणि आपण मात्र तमाशा पाहात आहोत याची अहमदशहाच्या सैन्याला लाज वाटली. हा हल्ला परतविण्याकरितां मराठ्यांनीं तोफांचा जोराचा भडिमार केला. हा मारा इतका भयंकर होता कीं नदीचें पात्र माणसें आणि घोडीं यांच्या प्रेतांनीं भरून गेले. आणि त्यांच्या रक्तानें पाणी लाल झालें. पण भयंकर हानि सहन करूनहि अफगाणांनीं नदीचा किनारा गांठला. आणि त्वेषानें व सूड बुद्धीनें ते शत्रूवर तुटून पडले. त्यांनीं शत्रूचा पराजय केला. मराठ्यांचे वीस हजार शिपाई रणांगणावर पडले. त्यांचा तोफखाना आणि इतर अपार लूट जेत्यांच्या हातीं लागली. हें भयंकर आणि संस्मरणीय युद्ध दिल्लीच्या उत्तरेस कांहीं परसंग (एक परसंग म्हणजे चार मैल) अंतरावर पानीपत येथें झालें.

शुजाउद्दौल्याला आतांपर्यंत अफगाणांच्या शौर्याची पूर्ण कल्पना नव्हती. पण त्यानें त्यांचें शौर्य डोळ्यांनीं पाहिलें. अफगाणांच्या कृतघ्नतेची पण त्याला कल्पना होती. आपण त्यांना विनाकारण मदत केली असें त्याला वाटून त्याला पश्चात्ताप झाला. पण त्यानें अफगाणांना सोडलें नाहीं. दिलावरखान आणि जालबेग यांनीं अहमदशहाची आज्ञा पाळली नव्हती.त्यांनीं समदखानाला साह्य केलें नाहीं. अहमदशहाचा आपल्यावर राग होईल या कल्पनेनें त्यांनीं युद्धाचा निकाल लागण्यापूर्वीच आपल्या

पथकांसहित छावणींतून पलायन केलें. या प्रकारानें अहमदशाहा डगमगला नाहीं. त्यानें चाल करून मराठयांचा मुलुख घेतला. तेथून तो मोगलांच्या हद्दींत शिरला. हें पाहून गाजिउद्दीननें शुजाउद्दौल्याच्या मार्फतीनें अहमदशाहाशीं तह करण्याचें ठरविलें. शुजाउद्दौला याला अनुकूल होता. पण त्यानें दोन अटी घातल्या. एक म्हणजे गाजिउद्दीननें आपले सगळे अधिकार मोगल सम्राटाच्या हवाली करावे आणि दुसरें म्हणजे त्यानें युद्धखर्च म्हणून भली मोठी रक्कम द्यावी, या अटी गाजिउद्दीननें कबूल केल्या. अहमदशहाच्या मनांत शहाआलमला गादीवर बसवायचे होतें पण त्यानें न ऐकल्यामुळें अहमदशहाचा मुलगा जवानबख्त याला मसनदीवर बसविलें.

दिल्लीचा बंदोबस्त केल्यानंतर अहमदशहानें पंजाबची व्यवस्था लावण्याकरितां त्या दिशेनें कूच केलें. तेथून तो दक्षिणेकडे जाण्याच्या विचारांत होता. इतक्यांत त्याला मराठे दिल्लीवर चाल करून येत आहेत असें कळलें. तो ताबडतोब तिकडे वळला. यामुळें शुजाउद्दौला मराठयांच्या तडाख्यांतून वाचला. कारण अहमदशहा येत आहे असें कळतांच मराठे दिल्लीहून निघून गेले. शुजाउद्दौल्यानें मराठयांशीं कारस्थानें करून जवानबख्तचा पाडाव करण्याचें ठरविलें होतें म्हणा किंवा अफगाण सरदारांना शुजाउद्दौल्याचा उत्कर्ष सहन न होऊन त्यांनीं त्याचा नाश करण्याकरितां अहमद-शहास खोट्या गोष्टी सांगितल्या म्हणून म्हणा, अहमदशहानें झालेल्या घटनांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी, शुजाउद्दौल्याकडून जबर रकमेची मागणी केली. शुजाउद्दौल्याला याचा राग आला. त्यानें अहमदशहाचें म्हणणें कबूल केलें. नाहीं. उलट त्यानें आपल्या सैन्यासहित अहमदशहाच्या छावणींतून गुपचूप पलायन करून आपलें राज्य गांठलें. आधींच दिलावरखान आणि जालबेग हे आपल्या दहाहजार सैन्या-सहित त्याला सोडून गेले होते. त्यांत शुजाउद्दौल्याच्या पलायनाची भर पडली. यामुळें अहमदशहाचें सैन्य थोडेसेंच राहिलें. त्याला आपली मोहीम चालू ठेवणें अशक्य झालें. त्यामुळें आतांपर्यंतच्या युद्धांत हस्तगत झालेल्या संपत्तीवर समाधान मानून तो आपल्या देशाकडे परत फिरला. तेथें कांहीं महत्त्वाच्या घटना घडल्यामुळेंहि अहमदशहाला आपल्या देशाकडे परत फिरणें भाग पडलें.

कांहीं महत्त्वाकांक्षी आणि असंतुष्ट सरदार अहमदशहाची छावणी सोडून निघून गेले होते. ते दिलावरखान आणि जालबेगला मिळाले. अहमदशहा अबदालीचा पुतण्या अब्दुल खालिकखान यानें बंड केलें होते. वरील सरदारांनी कंधार जवळील गिरिश्क येथें त्याला बादशहा झाल्याचें जाहीर केलें. आणि मग सर्वांनीं मिळून कंधारवर चाल केली. यापूर्वी जेरगुरानी जमातीचा सरदार हाजी जमालखान यानें अहमदशहा अबदाली हिंदुस्थानाकडे रवाना झालेला पाहून, आपण बादशहा असल्याचें कंधार येथें जाहीर केले होतें. त्यानें आपल्या नांवानें नाणीं पण पाडलीं होतीं. पण अहमद-

शहाला विजय मिळाल्याचें त्यानें ऐकिलें तेव्हां त्यानें आपण बादशहा असल्याचा दावा सोडून देण्यांतच आपलें हित आहे हें ओळखलें. पण हा पोंच अब्दुल खालिकला राहिला नाहीं. राज्य मिळविण्याकरितां त्यानें प्रयत्नाची शिकस्त केली. कंधारमधें काय होत आहे याची बातमी अहमदशहाला लागली. पण स्वतः तिकडे न जातां त्यानें अब्दुल्लाखान इसाकजई उर्फ शहापसंदखान या सरदाराला आपल्या पुतण्याचें आणि त्याला मिळालेल्या सरदारांचें बंड मोडण्याकरितां कंधारला पाठविलें. बंडखोर सरदार गिरिश्कहून कंधारला पोहोंचण्यापूर्वींच शहापसंदखानानें कंधार गांठावें अशी त्याला ताकीद देण्यांत आली होती. पण शहापसंद खानाला कंधारला पोहोंचणें झालें नाहीं. बंडखोरांनीं तोपर्यंत अहमदशहाचा मुलगा सुलेमान मिर्जाला कंधारांतून हांकलून लाविले होतें. पाठिंबा देण्याचें दिलावरखान आणि जालबेग यांनीं बातमी पसरविली होती कीं पानीपत येथें अहमदशहाचा पराजय झाला असून त्याची फार दुर्दशा झाली आहे. या बातमीवर विश्वास ठेवून अनेक अफगाण सरदारांनीं अब्दुल खालिकच्या बंडाला पाठिंबा दिला होता. पण खरी वस्तुस्थिति त्यांना लवकरच कळली. शहापसंद खानाचें सैन्य कंधारवर चालून आलेलें त्यांनीं पाहिलें. आणि मग त्यांना आपल्या वागणुकीचा पश्चात्ताप झाला. शरण जाणें हाच उत्तम मार्ग आहे हें पाहून ते सर्व शहापसंदखानाला जाऊन मिळाले. कंधार शहर त्यांनीं शहापसंद खानाच्या ताब्यांत दिलें. इतकेंच नव्हे तर त्यांनीं अब्दुल खालिकलाहि पकडून त्याच्या हवालीं केलें.

अहमदशहा पेशावरच्या प्रवासांत असतां त्याला शहापसंद खानानें लिहून पाठविलेली सगळी हकीकत कळली. आपल्या पुतण्याचा गळा कापून प्राण घ्यावा असें त्यानें शहा पसंदखानाला लिहून कळविलें. त्याप्रमाणें शहा पसंदखानानें ताबडतोब अंमलबजावणी केली.

नंतर सुलेमान मिर्जानें जाल बेगला कपटानें कंधारला बोलावून ठार मारलें. दिलावरखान हातीं सांपडला नाहीं. त्याला अहमदशहाचा दुसरा मुलगा तैमूर यानें आश्रय दिला.

[प्रा. गंडासिंग यांनीं अहमदशहा अब्दालीचें चरित्र लिहिलें आहे. त्यांत वरील बंडांचा उल्लेख केला आहे. पानीपतला अहमदशहा हरला असता तर त्याला आपलें राज्यपद टिकवितां आलें असतें काय ? ]

# तारीखे सुल्तानी

[ सदर ग्रंथ सुल्तान महंमदखान दुराणी यानें १२८१ हिज्री म्हणजे इ. स. १८६४ मध्यें लिहिला. तो १२९८ हिज्री म्हणजे इ. स. १८८१ मध्यें मुंबई येथें छापून प्रसिद्ध करण्यांत आला. हा ग्रंथ फारसी भाषेंत आहे. या ग्रंथाचीं एक प्रत मुंबई येथें उर्दू संशोधन मंडळाच्या ग्रंथालयांत आहे. संशोधन मंडळाचे संचालक प्राध्यापक नदवी यांच्या सौजन्यानें ती मिळाली. खालीं या ग्रंथांतील पानीपत संबंधींच्या मजकूराचा मूळ फारसीवरून अनुवाद देण्यांत येत आहे. सदर ग्रंथांतील अहमदशहा अब्दालीच्या चरित्राचा इंग्रजी अनुवाद रेहाटसेक यांनीं केला असून तो इ. स. १८८७ च्या इंडियन अँटिक्वेरीच्या अंकांत पान २६५–२७४ आणि पान २९८–३०३ वर छापलेला आहे. पुढील मजकूर मूळ फारसीवरून दिलेली आहे. फारसी प्रतीचीं पानें १३५–१४२ ]

राजपुत्र तैमूर, सरदार जहानखान आणि नवाब नजीबुद्दौला यांच्या अर्जीवरून हिंदुस्थानांतील कोलाहलाची बातमी अहमदशहाला कळली. त्यानें काबुल आणि कंदाहारहून सैन्ये जमविलीं आणि त्वरेनें तो पेशावर येथें दाखल झाला; काफरांचा मोड करून लाहोर आणि दिल्ली परत हिसकावून घेण्याचा त्यानें निश्चय केला. दत्ताजी पाटील हा अफगाणावर देखरेख ठेवणें आणि अटकेवर टेहेळणी करणें या कामावर नेमिला गेला होता. अहमदशहाची येण्याची खबर लागतांच तो हिंदुस्थानच्या दिशेनें पळाला. अदीना बेग या सुमारास मरण पावला. अहमदशहाच्या येण्याची खबर लागताच गाजिउद्दीन दिल्लींत दाखल झाला. अहमदशहाबरोबर संधान बांधीत आहेत असे निमित्त दाखवून त्यानें आलमगीर बादशहा (दुसरा) आणि वजीर कमरुद्दीनचा मुलगा इंतिजामुद्दौला यांचा वध करविला. आणि अहमदशा अब्दाली विरुद्ध युद्धाचा झेंडा उभा केला. गाजिउद्दीननें जनकोराव मराठा यास जंगी फौजेसहित अघाडीस ठेविले. आणि तो स्वतः इतर मराठे सरदारांबरोबर मागें राहिला. जनकोरावानें यमुना ओलांडली. दत्ता पाटील पंजाबांतून आला होता. त्याची जनकोरावानें कुंजपुऱ्यानजीक गांठ घेतली. अहमदशहा संबंधीची माहिती काढल्यावर त्यांनीं कुंजपुऱ्याहून कूच करून छावणी कायम केली. अहमदशाहानें सिंधु नद ओलांडला. राजपुत्र तैमूर आणि सरदार जहानखान यांना त्यानें बिनीवर पाठविलें स्वतः पाठोपाठ निघून तो लाहोरांत दाखल झाला. तेथें त्यानें ख्वाजा मिर्जा जान यास पकडलें. या सुमारास हिंदुस्थानांतील अफगाण सरदार हाफिज रहमतखान आणि त्याचा पुत्र इनायतखान, व दूंदेखान वगैरे अदमदशहाच्या छावणींत दाखल झाले. आणि त्याच्या आज्ञेनें राजपुत्र तैमूर याला जाऊन मिळाले. तेथून अफगाणांच्या सैन्यानें कूच करून यमुनेच्या कांठावर मराठयांची छावणी होती तिच्यावर हल्ला चढविला. रोहिल्यांचें सैन्य मुख्यतः घोडेस्वारांचें होतें. त्यांच्या आघातांनीं रोहिले जर्जर झाले. पण आपली नामुष्की कबूल करणें त्यांना मानहानीचें वाटलें. अहमदशहानें तें ओळखलें आणि

रोहिला पायदळाच्या मदतीला त्यानें निवडक आणि तडफदार सैन्य धाडलें. आणि स्वतःहि त्या दिशेनें त्वरेनें प्रयाण केलें. अहमदशहानें आपल्या सैन्याला हुकूम केला. कीं जंबूरकरांचा मारा करावा. सैन्यानें उंटांची एक भिंतच सैन्याभोवती उभी केली आणि त्यांवरून जंबूरकरांचा मारा सुरू केला.

आणि दुसरीकडून गुलामांच्या पल्टणीनें यमुना पार होऊन मराठयांच्या तळावर गोळ्यांचा वर्षाव केला. घोर युद्ध झाल्यावर दत्ता पटेल मारला गेला. जनकोरावाला जखमा लागल्या. बाकीचे मराठे शिपाई पळून गेले. गाजिउद्दीन घाबरून दिल्ली सोडून पळाला आणि त्यानें कुंभेरीची वाट धरली आणि सूरजमलचा आश्रय घेतला. अहमदशहानें विजयाबद्दल परमेश्वराचें आभार मानले आणि तो दिल्लींत दाखल झाला. अफगाण सैन्यांतील शिस्तीच्या अभावामुळें दिल्लींतील बाजारपेठा उध्वस्त झाल्या. असें म्हणतात कीं तीन दिवसपर्यंत दिल्लीत कल्पांत कोसळला होता. चौथ्या दिवशीं वांचलेल्या लोकांना अभय प्राप्त झालें. आलमगीर दुसरा मारला गेल्यानंतर त्याचा मुलगा आली गौहर याच्या नांवानें द्वाही फिरविण्यांत आली होती. कारण आलमगीर ( दुसरा ) यानें त्यालाच युवराज म्हणून नियुक्त केलें होतें. अहमदशहा अब्दालीचा कलहि त्याच्याच कडे होता. जयपुर जोधपुर इत्यादींच्या राजेरजवाड्यांनीं अहमदशहाच्या आगमनाची वार्ता ऐकिली तेव्हां त्यांनीं त्याच्याकडे खंडणी पाठवून त्याचें अंकितत्व स्वीकारलें. तिकडच्या भागाचा बंदोबस्त केल्यानंतर अहमदशहाच्या फौजा सूरजमलचा मोड करण्याकरितां वळल्या. प्रथम त्याच्या साबितगढ किल्ल्याला त्यांनीं वेढा घातला. सूरजमलनें त्याचें नांव आराम गढ ठेविलें होतें. तेथें सूरजमलचा खजिना होता. सोळा दिवसांच्या वेढ्यानंतर तो किल्ला घेण्यांत आला. त्यांतील सामग्री हस्तगत करण्यांत आली. इमादुल्मुल्क आणि सूरजमल यांच्या विनंतीवरून हाफिज रहमतखान यानें अहमदशहापाशीं जाऊन त्यांचे कसूर माफ व्हावे अशी विनंति केली. शुजाउद्दौला आणि अहमदखान बंगश हे अहमदशहाच्या सेवेंत हजर झाले. शुजाउद्दौल्यानें अदीना बेगचा मोड करण्याच्या कामांत नजीबुद्दौल्याची मदत केली होती हें लक्षांत घेऊन अहमदशहानें शुजाउद्दौल्यावर विशेष कृपा दाखवून त्याला फर्जंदखान हा किताब दिला.

पावसाळा जवळ आल्यामुळें अहमदशहानें अनूपशहर येथें छावणी केली.

दत्ताचा मृत्यु आणि बाजीरावाचा पराजय याच्या बातम्या दक्षिण्यांना मिळाल्या. त्यांना त्याचें अत्यंत आश्चर्य वाटलें. मराठयांचें सैन्य अहमदशहाचा मोड करण्यास निघालें.

(१३७) त्यांत बाळाजीचा पुतण्या भाऊ, मुलगा विश्वासराव, जनकोराव, सुभेदार मल्हारराव, बाजीरावाचा मुसलमान बाईकडून झालेला शमशेर बहादुर, हे होते.

दहा हजार स्वार व बारा हजारच्या पल्टणी होत्या. प्रत्येक पल्टणींत एकएक हजार पायदळ होते. फिरंग्यांच्या शिस्तींत या पल्टणी वाढल्या होत्या. त्यांचा मुख्य इब्राहीमखान आणि त्याचे सहकारी होते. शौर्यांत त्यांचा कोणी हात धरणारा नव्हता. इब्राहीमखानाबरोबर एक हजार तोफा आणि मोठ्या बंदुका होत्या. गोलंदाजहि फिरंगी शिक्षण घेतलेले होते. सैन्यांत बारा हजार राऊत आणि उत्कृष्ट रीतीनें तल्वारी चालविणारे पट्टेबाज होते. असें म्हणतात कीं सैन्य एकंदरींत तीन लाख होते. अहमदशहाचा पाडाव करावा आणि हिंदुस्थान जिंकून घ्यावा या उद्देशानें हें सैन्य उत्तरेंत पोहोंचलें. मराठ्यांच्या येण्याची बातमी लागली तेव्हां अहमदशहा अतिशय गोंधळून गेला. पण त्यानें विचार केला कीं कंधार लांब आहे. परमेश्वरावर भरवसा ठेवा.

पावसाळा संपल्यानंतर त्यानें हिंदुस्थानांतील सरदारांच्या मदतीनें मराठ्यांशीं लढण्याचें ठरविलें. आणि नजीबुद्दौला, हाफिज रहमतखान, आणि फैजुल्लाखान (अली महंमदखान रोहिल्याचा मुलगा) इत्यादि रोहिले सरदारांना घेऊन त्यानें कूच केलें.

इमादुल्मुल्क आणि सूरजमल, यांची अहमदशहापाशीं निराशा झाली होती. ते मराठ्यांना जाऊन मिळाले आणि दिल्ली काबीज करावी म्हणून त्यांनीं मराठ्यांचें मन वळविलें. दिल्लीचा किल्लेदार याकूब अलीखान बामूजई हा शहाजहानपूरचा रहिवासी होता. तो अहमदशहाचा वजीर शहावलीखान याच्या जमातीचा होता. म्हणून त्यानें याकूब अलीखानास दिल्लीचा अधिकार सांगितला होता. मराठी सैन्यानें दिल्लीला वेढा घातला. कांहीं दिवसांनीं वजीर शहावलीखानाच्या संमतीनें याकूब अलीखानानें दिल्ली सोडली आणि तो अहमदशहाच्या सैन्यांत दाखल झाला. मराठ्यांनीं दिल्ली घेतली. अत्यंत गर्व चढून ते आपापसांत म्हणूं लागले कीं अफगाणांवर विजय मिळविल्यावर दिल्लींतील जुम्मामशिदीचें आम्ही मोठें मंदिर बनवूं. म्हणजे आमचे तेज आणि वैभव त्यांना कळून येईल.

मराठ्यांनीं अब्दुस्समदखान महंमदजई हश्त नगरी, मियां कुतुबशहा, नजाबतखान आणि इतर सरदारांचा वध केला. त्यांनीं कुंजपुरा सगळा लुटून घेतला. ही बातमी अहमदशहाला कळतांच तो कुंजपुऱ्याच्या दिशेनें चाल करू लागला. वरील सरदारांच्या वधाची बातमी त्याला बागपत येथें लागली. ती ऐकून त्याला विलक्षण त्वेष आला. केव्हां एकदां आपण यमुना पार करतो आणि शत्रूवर आगीचा वर्षाव करतो असें त्यास होऊन गेलें.

(१३८) पण नदीला पूर होता. त्यामुळें तो काळजींत पडला. नदीपार करण्यास नावा नव्हत्या. त्यानें आपल्या गुलामाच्या पल्टणीला नदीपार करून जाण्याचा हुकुम केला. हें ऐकताच पल्टणीचे चार हजार लोक परमेश्वरावर भरवसा ठेवून पाण्यांत उतरले. असें म्हणतात कीं आपला घोडा पाण्यांत घालण्याचा हुकूम

अहमदशहानें प्रथम अहमदखान खैबरी नांवाच्या स्वाराला दिला. तो आपल्या दोन हजार स्वारानिशीं पाण्यांत उतरला. नदीच्या परतीरावर मराठ्यांचें रक्षक दल होतें. त्यांनीं ही परिस्थिति पाहिली. त्यांनीं गोळ्यांचा वर्षाव केला. अहमदशहानें, अहमदखानाचें संकट पाहिलें. त्यानें आपल्या स्वारांना धीर दिला. आणि म्हटलें कीं नदीला पाणी कमी आहे. प्रत्येक स्वारानें एक एक पायदळ शिपाई आपल्या पाठीमागे घ्यावा. त्यानें स्वतः परमेश्वराचें नांव घेऊन आपला घोडा पाण्यांत घातला. त्याच्या सैन्यांतील स्वारांनीं त्याला पाण्यांत उतरलेलें पाहिलें. मग सारेजण त्वरेनें नदींत उतरले. पुष्कळ माणसें शत्रूच्या गोळीबाराला बळी पडली. अहमदखान खैबरी हा पाण्यांत असतांना गोळीच्या मारानें मृत्यु पावला. नंतर सगळें अफगाण आणि हिंदुस्थानचें रोहिले आणि इतर सैन्य नदीपार झाले. परतीरावरील मराठे रक्षक दल पळून गेलें.

नंतर अहमदशहानें हुकूम केला कीं प्रत्येकानें आपल्या घोड्याच्या खोगिरी वाळवाव्या आणि आज आराम करावा. उद्या लढण्याची तयारी करावी लागेल. त्याप्रमाणें सर्वांनीं विश्रांति घेतली. आणि इतर युद्ध सामग्री दुरुस्त केली.

दुसऱ्या दिवशीं ते तेथून निघून दोन कोसावर सराई संभलका येथें पोहोंचले. तेथें मराठ्यांचा तळ होता. अहमदशहानें शहा पसंद खान हा जवळ उभा होता त्याला आज्ञा केली कीं आज तुझी अघाडीवर नेमणूक आहे. आज तूं काय कामगिरी करशील हें मी पाहाणार आहे. शहापसंदखान तीनहजार स्वार घेऊन शत्रूवर तुटून पडला. त्यानें मराठ्यांच्यावर गोळ्यांच्या वर्षाव करून त्यांना पळवून लाविलें. त्यानें अनेक शत्रूंचीं डोकीं कापून अहमदशहाला नजर केलीं.

(१३९) अहमदशहानें हा आपल्याला शुभशकुन झाला असें समजून खानाची तारीफ करून त्याला वस्त्रालंकार दिले.

भाऊ आणि इतर सरदारांना ही बातमी लागताच ते कुंजपुऱ्याहून निघून पानीपतला आले. अहमदशहानें आज्ञा केली कीं मराठयांच्या छावणीभोंवती लुटालूट करावी. त्याचा परिणाम असा झाला कीं मराठयांना एकटे दुकटे हालचाल करणें मुष्किल झालें. त्यांनीं आपल्या सैन्याभोंवती खोल खंदक खणला. त्यामुळें मुसलमानांच्या छाप्यापासून त्यांचा बचाव झाला. अहमदशहानें मराठयांची छावणी पाहिली. आतां काय करावें हें त्याला सुचेना. तो बुचकळ्यांत पडला. कारण मराठयांचें सैन्य मोठें आणि शिवाय छावणींत बंदोबस्तांत राहिलेलें. त्यानें दोन तीन कोस माघार घेण्याचा बहाणा केला. म्हणजे शत्रूंना वाटेल कीं आपली लढण्याची इच्छा नाहीं. आणि आपण स्वदेशाकडे जात आहोत. ही युक्ति सफल झाली. मराठयांचें दळ छावणींतून बाहेर पडून लुटालूट करूं लागलें. सरदार जहानखान हा आपल्या तुकडीसहित जवळच रानांत दबा धरून बसला होता. तो एकाएकी मराठयांवर तुटून पडला. असें म्हणतात

कीं चार पांच हजार काफरांचीं डोकीं कापून त्यानें बादशहासमोर हजर केलीं. अहमदशहानें त्याची खूप तारीफ केली.

आणखी एके दिवशीं शुजाउद्दौला, नजीबुद्दौला वगैरे सरदारांनीं अहमदशहाला विनंति केली कीं कांहीं हजार काफर मराठे स्वार गोविंदपंताच्या नेतृत्वाखालीं आमच्या मुलुखांत घुसले आहेत. आमच्या बायकामुलांची काळजी लागली आहे. अशा परिस्थितींत आम्हाला मरणच डोळ्यासमोर दिसत आहे. हें ऐकून अहमदशहाला त्वेष आला. त्याच दिवशीं कंधारहून हाजी अताई महंमदखान आणि हाजी करीमदादखान हे आले होते. त्यांना त्यानें हुकूम केला कीं हिंदुस्थानी सरदारांची अब्रू वाचविली पाहिजे तुम्ही ताबडतोब स्वार होऊन निघा आणि गोविंदपंताचा बंदोबस्त करा. त्याच्या हातून मुसलमानांचा नाश होईल असें होऊं देऊं नका. दोघा सरदारांनीं आपली पथकें घेतलीं. हाफिज रहमतखानाचा मुलगा इनायतखान याचे पांचशे स्वार आणि सहा हेर बरोबर देण्यांत आले. ते लोक रातोरात निघाले आणि यमुना पार झाले.

(१४०) सकाळी ते गोविंदपंतांचें सैन्य गाफिलपणें होतें त्यावर तुटून पडले. आणि अनेकांना ठार मारले. उरलेले पळून गेले. गोविंदपंताला मारून त्यांनीं त्याचें डोकें कापलें. अशीच सात आठ हजार डोकीं कापून घेऊन ते परत छावणींत आले. यामुळे अहमदशहा खुश आणि इतर सरदार निश्चिंत झाले.

सारांश बरेच दिवसपर्यंत हिंदू मुसलमानांच्या फौजा आपापल्या छावण्यांतून खबरदारीनें राहिल्या. रोज बिनीच्या लोकांच्या चकमकी झडत पण प्रत्येक खेपेस दोनतीन हजार मराठे अहमदशहाच्या सैन्याला बळी पडत. कारण इस्लामच्या फौजांच्या हातून काफरांच्या लष्करांचा नाश व्हावा असा विधिसंकेत होता. म्हणूनच तर इस्लामचे शिपाई शौर्यानें काफरावर तुटून पडत. वास्तविक पाहतां त्यांचा मुलुख लांब, ते स्वतः परमुलुखांत, त्यांचें सैन्य थोडे, या उलट मराठे संख्येनें मुंगी आणि टोळ यापेक्षा जास्त. खरोखर परमेश्वराची करणी लक्षांत येत नाहीं.

एक चमत्कार घडला. असें म्हणतात कीं एके रात्री इस्लामच्या छावणींत कांहीं सैनिक आले. तेथें असलेले रोहिले शिपाई आश्चर्य करू लागले कीं हे कोठून आले. इतक्यांत त्यांपैकीं एकानें पुढे होऊन दक्षिणी भाषेंत विचारलें कीं ही कोणत्या सरदाराची पागा आहे. मुसलमानांनीं दक्षिणी शब्द ऐकिले. त्यांनीं ओळखलें कीं हे शत्रु सैनिक आहेत. त्यांनीं ताबडतोब हल्ला करून शत्रूंना ठार मारले. नंतर पाहतात तो त्यांच्यापाशीं खजिना होता. नंतर त्यांना कळले कीं शत्रू दिल्लीहून खजिना घेऊन मराठयांच्या छावणीकडे चालला होता. पण रात्रीच्या अंधारांत चुकून अहमदशहाच्या छावणींत आला. बराच खजिना हस्तगत झाला. अहमदशहानें अफगाण रोहिले इत्यादि सैनिकांत तो वाटून टाकला.

सारांश इस्लामच्या फौजेच्या भीतीनें मराठे छावणीच्या बाहेर येण्यास धजेनात. त्यांच्या छावणींत रसदेचा दुष्काळ पडला. अशाप्रकारे पांच महिने गेले. शेवटी मराठ्यांच्या छावणींत अशी परिस्थिति झाली कीं ते जनावरांची हाडे चुरा करून पीठ म्हणून वापरू लागले. जनावरें दाणावैरणीवाचून मरूं लागली, आणि उरलेलीं निकामी झालीं.

(१४१) शेवटी त्यांनीं पाहिलें कीं छावणींत उपाशी पडून आपण मरतो त्यापेक्षां युद्धांत लढून मरणें बरें, असें ठरवून तयारी करून ते छावणीच्या बाहेर पडले. इकडून इस्लामच्या सैन्यानें काफरावर हल्ला चढविला. प्रथमच शत्रूनें दूंदेखानाचा मुलगा इनायतखान आणि त्याचें सैन्य पारध्यानें सावजाला कोंडावे तसें कोंडलें. त्याचा सर्वनाश करावा असा त्यांचा हेतु होता. ही बातमी अहमदशहाला लागताच त्यानें हाजी अताईखान कंधारी यास इनायत-खानाच्या मदतीस पाठविलें. हाजी अताईखानाचें अन्नपाणी संपले होतें म्हणूनच कीं काय मृत्यूनें त्याच्या भोंवती आपले पाश टाकले. तो गोळी लागून ठार झाला. यानंतर अहमदशहानें इनायतखानाच्या मदतीसाठी तीन चार तुकड्या लागोपाठ धाडल्या. एक तुकडी पुढें होऊन गोळ्यांचा वर्षाव करी आणि मागे हटे. लगेच दुसरी तुकडी पुढे होई आणि गोळ्या चालवी. या माऱ्यानें शत्रूची छाती फाटून गेली. या माऱ्यांत शत्रूचे सरदार भाऊ आणि विश्वासराव हे ठार झाले. हत्तींना बंदुकींचा मारा असह्य झाला. रणांगणावरील हलकल्लोळानें ते घाबरून इतस्ततः धावूं लागलें. विजय परमेश्वराच्या कृपेनें मिळतो, सैन्याच्या शक्तीनें नाहीं. हत्तींच्या इतस्ततः धावण्यानें शत्रूच्या सैन्यांत एकच गोंधळ उडून गेला. शत्रूचा पराजय झाला. दुराणी सैन्य संख्येनें कमी होतें तरी पण ते दक्षिणेच्या सैन्यावर निकरानें तुटून पडले. हिंदुस्थानांतील रोहिल्यांनी काफरांना ठार करण्यांत कसूर केली नाहीं. मराठ्यांच्या सरदारांपैकीं एकजण जिवंत सुटला नाहीं. पण मल्हारराव मुसलमानांच्या छावणींत आला आणि कोणी त्याला न ओळखल्यामुळें निघून गेला. आणि महादजी शिंदे जबर जखमा खाऊन निसटला. इतके मराठे मारले गेले कीं सांगितलें तर खरें वाटणार नाहीं. एक लाख मराठे मारले गेले असा अंदाज आहे. पानीपतचे सगळे मैदान प्रेतांनीं भरून गेले होतें. अनेक लोक पकडले गेले त्यांपैकीं इब्राहीमखान गार्दी हा होता. त्याला अहमदशहापुढे आणण्यांत आले. त्यानें त्याच्या वधाची आज्ञा केली.

(१४२) शुजाउद्दौल्यानें त्याच्याबद्दल पुष्कळ रदबदली केली. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. इब्राहीमखानानें आपल्याला येऊन मिळावे म्हणून अहमदशहानें त्याला बऱ्याच वेळा निरोप पाठविला होता. पण त्यानें कबूल केलें नाहीं. अपार आणि अगणित संपत्ति विजयी सैन्याच्या हातीं सांपडली. रोहिले सरदारांना अहमदशहानें वस्त्रे अलंकार इत्यादि देऊन त्यांचा सत्कार केला. बादशहानें हाफिज रहमतखानाचा

मुलगा इनायतखान यास म्हटले कीं धन्य आहे तुझ्या मर्दुमकीची. हा मोठा विजय तुला मुबारक असो. अहमदशहा इतर सरदारांना म्हणाला कीं मी एक मातीचा पुतळा आहे. माझ्यानें हा विजय मिळविणें शक्य होतें काय ? नाहीं. ही सर्व त्या परम पवित्र परमेश्वराचीच कृपा होय. मुसल्मानांना काफरांच्या तावडींतून सोडवावे असा त्याचाच संकेत होता. त्याचें आभार मानणें हें मुसल्मानांचेंच काय, सर्वांचें कर्तव्य आहे. आतां हिंदुस्थानांतून शत्रू नाहींसा झाला आहे. तुम्ही आतां आनंदाने राहून दौलतीचें हितचिंतन करा. मी अफगाणिस्तानला परत जातो. शुजाउद्दौल्याला मी बरोबर घेऊन जातो. त्याला मी आपला फर्जंद म्हटलें आहे. रोहिले सरदारांनीं एकमुखानें विनंति केली कीं आपण शुजाउद्दौल्याला येथेंच राहू द्यावे. तो काफरांच्या कारस्थानावर, आमच्याबरोबर राहून देखरेख ठेवील. यावर अहमदशहा गप्प बसला. त्यानें दिल्लीचे तक्त शहाआलमला दिलें. त्यावेळीं शहाआलम बंगाल्यांत होता. म्हणून त्याच्या ऐवजी त्याचा मुलगा जवानबख्त यास दिल्लींत राहून कारभार पाहण्यास अहमदशहानें सांगितलें. वजिरी शुजाउद्दौल्याला आणि बक्षीगिरी नजीबुद्दौल्याला देण्यांत आली. यानंतर त्यानें ११७४ हिज्रींत कंधाराकडे प्रयाण केलें.

## आयर्विनकृत ' फर्रुखाबादेचे बंगश नवाब '

[ अहंमद बंगशचें नांव मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्यानें छत्रसालावर हल्ला केल्यामुळें बाजीराव पेशव्याला छत्रसालाच्या मदतीला जावें लागलें. महंमद बंगशचा मुलगा अहमदखान हा पानीपतवर हजर होता. आयर्विननें फर्रुखाबादेचे बंगश नवाब यांची हकीकत लिहिली असून ती एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालच्या इ. स. १८७८ व १८७९ च्या मुखपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. ही हकीकत लिहून काढतांना आयर्विननें अनेक फारसी हस्तलिखितांचा उपयोग केला आहे. पानीपत-संबंधी मजकूर, आयर्विननें थोडक्यांत दिला आहे. पण त्यांतून पानीपतसंबंधी लहान सहान कां होईना कांहीं गोष्टी आपल्याला कळून येतात. आयर्विन म्हणतो—

" अहमद शहा दुराणीनें हिंदुस्थानवर सहाव्यांदा स्वारी केली त्यावेळीं अहमदखान आणि इतर रोहिले सरदारांनीं त्याची भेट घेतली. १८ जुलै १७६० रोजीं ही भेट कोईल म्हणजे अलीगड येथें घडून आली. अहमदखानानें अहमद-शहाच्या छावणीला रसदेचा पुरवठा केला. ही रसद येत असतां मल्हारराव होळकरानें यमुना ओलांडून अहमद खानाच्या सैन्यावर हल्ला केला आणि रसद लुटून यमुना परत ओलांडली. अफगाणांच्या सैन्याची एक तुकडी त्याच्याविरुद्ध पाठविण्यांत आली. तिनें लांब लांब मजला मारून होळकराच्या सैन्यावर हल्ला केला आणि अनेकांची कत्तल करून त्याचें सैन्य पिटाळून लाविलें.

अहमदशहानें यमुना ओलांडून अनूपशहर येथें आपली छावणी कायम केली. कांहीं काळानें शुजाउद्दौल्याचें मन अहमदशहाला येऊन मिळण्याविषयीं कळविण्यांत आलें. स्थानिक इतिहासकारांच्या मते हा योग हाफिज रहमतखान आणि अहमदखान बंगश यांच्या मध्यस्थीनें जुळून आला. यानंतर थोड्याच काळांत सदाशिवराव भाऊ हा प्रचंड सैन्य घेऊन दत्ताजीच्या वधाचा सूड घेण्याच्या उद्देशानें दक्षिणेंतून आला. त्याच्या बरोबर जनकोजी, मल्हारराव होळकर, इब्राहीमखान गार्दी इत्यादि सरदार होते. २५ आक्टोबर १७६० रोजी अहमदशहा अब्दालीनें अनूप-शहरहून कूच केलें. त्यानें दिल्लीच्या उत्तरेस वीस मैलावर यमुना ओलांडली. अहमदखान बंगश (गालिबजंग) हा त्यावेळीं आपल्या पांच हजार सैन्यासहित हजर होता. मराठ्यांनी पानीपत येथें छावणी केली. अहमदशहा अब्दालीनें त्यांच्यासमोर आपला तळ ठोकला. दोन महिनेपर्यंत उभय पक्षाच्या चकमकी चालू होत्या. मध्यें एक दोनदा छोट्या लढाया झाल्या. मराठ्यांच्या छावणींत रसदेचा अगदीच तुटवडा झाला त्यामुळें त्यांना मोठी लढाई देणें भाग पडलें.

असें म्हणतात कीं मराठ्यांची डोकी कापून आणणाऱ्याला अहमदशहानें प्रत्येक डोक्यामागे एक रुपया बक्षीस देऊ केलें होतें. अब्दालीच्या छावणींत रोज दहा हजार घोडेस्वार बाहेर पडत. भोंवतालची खेडीं उध्वस्त करणें आणि शत्रूची रसद तोडणें हीं कामे त्यांना दिलीं होतीं. गवत कापणारे, मोलमजुरी करणारे किंवा मराठ्यांच्या छावणींतून बाहेर पडलेले कोणी दिसले कीं या स्वारांनीं त्यांचीं डोकीं कापून बादशहा-समोर ठेवायचीं आणि बक्षिसी घ्यायची असा प्रकार चाले. हें ऐकून अहमदखान बंगश यानें आपला चिटणीस मुशर्रफखान यास म्हटले कीं मराठ्यांना जे जिवंत पकडून आणतील त्यांना मी प्रत्येक माणसामागे दोन रुपये देईन. हे ऐकून दुराणी शिपाई माणसांना न मारतां त्यांना कैद करून आणू लागले. अहमदखान शिपायांना प्रत्येकं माणसामागे दोन रुपये देई. आणि रात्रीच्या वेळीं कैद्यांना सोडून देई. मराठे परत आपल्या छावणींत जाऊन अहमदखानाची पोटभर स्तुति करीत. शुजाउद्दौला आणि नजीबखान यांनीं सगळी हकीकत अहमदशहाला सांगितली. त्यादिवसापासून अहमदशहा अब्दाली हा अहमदखान बंगशवर फार नाराज झाला.

अब्दालीची नाराजी अधिक वाढावी म्हणून शुजाउद्दौला आणि नजीबखान यांनीं बादशहाला सांगितलें कीं अहमदखान बंगश हा मोगल साम्राज्याचा अमीरुल् उमरा आणि बक्षी म्हणवितो पण त्यानें अगदींच तुटपुंजें सैन्य आणिलें आहे. अब्दाली कांहींच बोलला नाहीं, पण वजीर शहावलीखान हा बंगश जमातीचा होता. त्यानें अहमदखानाला बोलावूं पाठविलें. तो आल्यावर वजीरानें त्याला आपल्या जवळ बसवून विचारलें "गालिब जंग, तूं हिंदुस्थानांतील प्रख्यात उमरावापैकीं आहेस.

असें असूनहि तूं अगदीं थोडें सैन्य आणिलें आहेस. याचें कारण काय " शुजाउद्दौला आणि नजीबखान यांनीं आपली चढाई केली हें अहमदखानाला या पूर्वीच जंगबाजखान बंगश याजकडून कळलें होतें. त्यानें शहावलीखानाला म्हटलें कीं मी आपल्या बख्शीला बरेंच सैन्य बरोबर देऊन फर्रुखाबादेचें रक्षण करण्याकरितां मागे ठेविलें आहे. कारण गोविंदपंत हा तीन हजार सैन्यासहित यमुना ओलांडून आला असून त्यानें त्या नदीच्या कांठावर तळ दिला आहे. येथें माझ्याबरोबर असलेले सैन्य लहान असलें तरी प्रभावी आहे. या सैन्याच्या बळावरच यापूर्वी मी सफदरजंग, सूरजमल, हिंमतसिंग आदींचा पराजय केला आहे. त्याचवेळीं मी दिल्लीवर चाल करून जाऊं शकलो असतो पण मोगल बादशहाची अदब राखावी म्हणून मी तसें केलें नाहीं. शहावलीखानानें म्हटलें कीं ही हकीकत यापूर्वी मी काबुलमधें असतांना ऐकली आहे. अहमदखान म्हणाला कीं माझें सैन्य लहान असलें तरी त्याचें पाणी युद्धाच्या दिवशीं दिसून येईल.

अहमदखानच्या सैन्याचा तळ इब्राहीमखान गार्दीच्या मोर्च्यासमोर होता. त्याच्या हाताखाली बाराहजार कवायती पायदळ होतें. एके रात्री इब्राहीमखानानें हुकुम दिला कीं अहमदखानाचा मोर्चा ( ब्याहरी ) हा लहान आहे. त्याच्यावर हल्ला करावा. रात्रीच्या शेवटच्या प्रहरी इब्राहीमखानाच्या सैन्यानें अहमदखानाच्या मोर्च्यावर छापा घालण्याचा प्रयत्न केला. अहमदखानाच्या तोफा सज्ज होत्या. त्यांच्या रक्षणार्थ त्यांच्यावर लोखंडी आवरणें ( चादरें ) घालण्यांत आलीं होतीं. दिवस थंडीचे असल्यामुळें ठिकठिकाणीं शेकोट्या पेटल्या होत्या. आणि रोहिले आणि बाजार बुणग्याचे लोक शेकत बसले होते. घोड्यांच्या टापांचा आवाज त्यांनीं ऐकिला आणि त्यांनीं मराठे आले म्हणून ओरडा आरडा केला. आणि मग त्यांनीं शेकोट्यांतून जळती लाकडें उचललीं आणि तोफांत घातलीं. तोफा धडाधड चालू लागल्या. शत्रूचे अनेक लोक मारले गेले. बाकीचे पळून गेले. अहमदखानाच्या बाजूनें कुणालाहि इजा झाली नाहीं. अहमदखानाची झोंपमोडहि झाली नाहीं. दुसऱ्या दिवशीं पहाटे अब्दाली हल्ल्याचें ठिकाण पाहण्यास गेला. अहमदखान त्याला भेटला. त्याला पाहून अब्दालीनें म्हटलें कीं तुमच्या शौर्याच्या गोष्टी ऐकत होतो पण आज प्रत्यक्ष त्याचा अनुभव आला. असें म्हणून अब्दालीनें आपल्या पागोट्यांतून जिगा ( सुवर्णालंकार ) काढला आणि अहमदखानाला भेट म्हणून दिला. या नंतर अहमदखानाचे शत्रू लाजून गप्प बसले.

लढाईच्या दिवशीं, अहमदखानाचें सैन्य लहान म्हणून. त्याच्याकडे बायकामुलांच्या रक्षणाचें काम देण्यांत आलें. अहमदखानाला या गोष्टीचा अतिशय राग आला. ही कामें खोजांचीं होत. आपण अघाडीवर लढू असें त्यानें बजाविलें. मग अब्दालीनें त्याला सैन्याच्या उजव्या फळीकडे नेमलें. याच बाजूनें मराठ्यांनीं हल्ल्याला प्रारंभ केला. या निकराच्या हल्ल्यांत इब्राहीमखान जखमी झाला.

पण मराठ्यांचा जोर भारी झाला. या कठीण परिस्थितींत अहमदखानानें आपला दारोगा मुशर्रिफखान यास अब्दालीकडे पाठवून मदतीची मागणी केली. हा निरोप अब्दालीला पोहोंचला तेव्हां शुजाउद्दौला आणि नजीबखाननें त्याला म्हटलें कीं अहमदखानाशीं लढत असलेल्या शत्रूचें बळ फार नाहीं. उलट हाफ़िज रहमत खानाचा मुलगा इनायतखान हा फार पेंचांत आहे. त्याला मदत पाठविली पाहिजे. मुशर्रफ खानानें अहमदखानाला येऊन सांगितलें कीं अब्दाली कांहीं बोलत नाहीं. मग अहमदखानानें पुन्हां तांतडीचा निरोप देऊन त्याला बादशहाकडे पाठविलें. मग अब्दालीनें दोन दळें ( डिविजन्स ) पाठविलीं. सैन्याची उजवी फळी मजबूत झाली. आणि मराठ्यांना हलु हलु मागें रेटण्यांत आलें. विश्वासराव मारला गेला, सदाशिवराव भाऊ नाहींसा झाला आणि मराठी सैन्यांत एकच गोंधळ उडाला. दुपारी दोन वाजेपर्यंत अब्दालीनें लढाई जिंकली.

## तारीखे अवध

[ अवध प्रांताचा इतिहास हा ग्रंथ नज्मुलगनी यांनी उर्दू भाषेंत चार खंडांत लिहून इ. स. १९१९ मधें प्रसिद्ध केला. या ग्रंथाच्या रचनेंत त्यानें अनेक फारसी ग्रंथांचा उपयोग करून घेतला आहे. ग्रंथाच्या दुसऱ्या खंडांत पान २६ पासून ५४ पर्यंत त्यानें पानीपतची हकीकत दिली आहे. यांतील माहिती त्यानें सेयारुल्मुताखरीन, खजाने आमिरा, काशीराज, मिराते अहमदी, या ग्रंथांतून घेतली आहे. त्यामुळें त्यांत नवीन असें कांहीं आढळत नाहीं. पण दोन गोष्टीं आपल्याला नज्मुलगनीकडून कळतात. एक म्हणजे त्यानें शुजालद्दौल्यानें सूरजमलला लिहिलेलें अस्सल पत्र छापलें आहे. ]

## शुजाउद्दौलाचें सूरजमलला पत्र

" कुंवर साहेब बिरादर मेहेरबान सलामत

आपल्या भेटीची ओढ लागली आहे. लिहिण्यांत येत आहे कीं या अवधींत आपल्या कडून आनंद वृद्धिंगत करणारे पत्र आलें नाहीं. आपलें कुशल जाणण्याची उत्कंठा आहे. आमचा आणि आपला स्नेह दिवसेंदिवस वाढत जात आहे. पण पत्रव्यवहार रूपानें तो प्रकट होत नाहीं याची आम्हाला स्नेहपूर्वक तक्रार आहे.

अहमदशहा काबुलहून निघून आपल्या सैन्यासहित कुंजपुऱ्याजवळ आला आणि रोहिले सरदार त्याची चाकरी बजावण्यास त्याच्याकडे रवाना झाले हे वकीलांच्या लिहिण्यापुसण्यावरून तुम्हाला कळलें आहे. याच सुमारास आम्हालाहि अहमदशहानें येण्यासंबंधीं पाचारण केलें. भाऊ दक्षिणेंतून प्रचंड फौज घेऊन येत आहे याची बातमी

होती. सगळ्या सरदारांनीं अहमदशहाशीं निष्ठेनें वागण्यास स्वतःला बांधून घेतले आणि भाऊविरुद्ध लढण्यास ते एक दिलानें सज्ज झालें आहेत. भाऊच्या उत्तर हिंदुस्थानांत येण्यानें गडबड उडाली आहे. ती तोडण्याचें काम सगळें सरदार एक झाल्याशिवाय घडून येणें अशक्य होय. जो कोणी यावेळीं परस्परसंघटनेपासून स्वतःला टाळील त्याचा दुर्लौकिक होईल. म्हणून आपल्याला लिहिण्यांत येत आहे कीं आपण हिंदुस्थानांतील उमदे सरदार आहात. आपण काय बेत योजिला आहे. जर आपण भाऊला मिळाला आहात तर प्रथम वेगळे निघा. कारण अधिकार आणि शक्ति यामुळें त्याला गर्व चढला असून तो कोणालाहि ओळखेनासा झाला आहे. आज उद्या त्याचा परिणाम विपरीत होईल. त्याच्यापासून दूर होणेंच श्रेयस्कर आहे. हिंदुस्थानांतील इतर सरदारांना येऊन मिळणें योग्य आहे. आपण आपल्या सेवाचाकरीच्या आश्वासनाचें विनंतिपत्र अहमदशहाला पाठवावे.

मी येथें आहे. इन्शाल्ला, आपल्या सच्च्या निष्ठेची हकीकत मी अहमदशहांना अर्ज करीन. त्यांच्याकडून आपल्या करितां कृपापत्र आणि करारनामा संपादन करीन. आपले राज्य आणि अधिकार आपल्याला वंशपरंपरा चालविण्यांत येतील. अशा प्रकारचा करारनामा आपल्याकडे पाठविण्यांत येईल. तुम्ही आपला देश सोडून अहमदशहाच्या सेवेंत आलात तरच हा करार दृढ राहील असें नाहीं आपण फक्त हेंच करावें कीं आपल्या जागीं स्वस्थ बसून भवितव्यांत काय घडून येईल हें पहात राहावें. नाहींतर कठीण जाईल. आपण अनुभवी, शहाणे आणि दूरदर्शी आहात. अधिक काय लिहिणें. ”

(५१) नज्मुलगनी म्हणतो—

मल्हारराव होळकराचा मोर्चा नजीबखानाच्या समोर होता. नजीबखानाच्या इशाऱ्यानें तो कर्नालच्या बाजूनें पळून गेला. त्या दोघांत असें ठरलें होतें कीं मराठ्यांचा जय झाला तर नजीबखानाला उपसर्ग पोहोंचू नये. आणि अफगाणांचा जय झाला तर मल्हाररावाला उपसर्ग होऊ नये. शिवप्रसादनें आपल्या फरहबख्श या ग्रंथांत आणि इतरांनींहि असेंच नमूद करून ठेविलें आहे.

[ शिवप्रसादचें म्हणणें खरें असलें पाहिजे कारण तो या युद्धांत रामपूरचा नवाब फैजुल्लाखान याच्या बरोबर हजर होता.

या ग्रंथांत वरील दोनच गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत. बाकीचा मजकूर वर सांगितल्याप्रमाणें काशिराज, इमादुस्सादत, खजाने आमिरा इत्यादि ग्रंथावरून देण्यांत आला आहे. ]

# हाफिज रहमतखान चरित्र

[ बरेलीचे विद्वान साहित्यिक सय्यद अल्ताफ अली यांनीं इ. स. १९३३ मधें उर्दू भाषेंत हाफिज रहमतखान याचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें आहे. या कामांत त्यानें बरींच फारसी साधनें हाताळलीं आहेत. रोहिल खंडांत प्रसिद्ध असलेल्या आख्यायिका अभ्यासल्या, आणि हाफिज रहमत खानाच्या वंशजांकडूनहि माहिती गोळा केली आहे. हाफिज रहमतखानाचा मुलगा मिस्तजाबखान यानें आपल्या बापाचें चरित्र गुलिस्ताने रहमत हें लिहिलें. हाफिज रहमतखानाचा एक मुलगा हाफिज महंमद यारखान याचा मुलगा सादत यारखान यानेंहि गुले रहमत या नांवानें हाफिज रहमत-खानाचें चरित्र लिहिलें आहे. हाफिज रहमतखानाचा एक पणतू, मुहब्बतखानाचा नातू आणि मूसाखान याचा मुलगा सुलेमानखान यानें तारीखे सुलेमानी या नांवानें अफगाणिस्तानचा इतिहास लिहिला आहे.

हीं आणि इतर साधनें सय्यद अल्ताफ अलीनें हाताळलीं आहेत. हाफिज रहमतखान आणि त्याचा मोठा मुलगा इनायतखान हे दोघेहि पानिपतावर लढले हें सर्वश्रुतच आहे. अल्ताफ अलीच्या ग्रंथांतील (पान ९३–१०८) पानीपत वरील मजकूर खालीं दिला आहे. ]

दिल्लीची व्यवस्था केल्यानंतर मराठे कुंजपुऱ्याकडे वळले. अहमदशहा अब्दाली तर्फे तेथें अब्दुस्समदखान आणि मोमिनखान हे कुंजपुऱ्याच्या ठाण्यावर होते. ते अहमदशहाला रसदेचा पुरवठा करीत. कुंजपुऱ्याचा जमीनदार नजाबतखान हा होता. त्याचीं मराठ्यांशीं अंतस्थ संधानें होतीं. त्यानें अब्दुस्समद खानाला मराठ्यांशीं लढण्याविषयीं प्रवृत्त केलें. आणि तो स्वतः कुंजपुऱ्याच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला. अब्दुस्समदखानापाशीं थोडी फौज होती. पण नजाबत खानाच्या चिथावणीनें त्यानें मराठ्यांवर हल्ला केला. पण मराठ्यांच्या प्रचंड फौजेपुढें त्याला माघार घ्यावी लागली. तो लढत झगडत किल्ल्याच्या दरवाजापाशीं आला. नजाबत खानानें दरवाजे बंद केले. आणि तटावरून तो तोफा सोडूं लागला. अब्दुस्समदखानाला मागें वळून फिरून मराठ्यांशीं लढावें लागलें. तो या लढाईंत शौर्यानें लढत असतां आपल्या साथीदाराबरोबर मारला गेला.

ही बातमी अहमदशहाला कळतांच तो अतिशय संतप्त झाला. त्यानें हिंदुस्थानीं सरदारांना आपापल्या फौजा बोलावून आणण्याचा हुकुम दिला. थोड्यांच काळांत साऱ्या अमीर उमरावांच्या फौजा लष्करांत दाखल झाल्या. यानंतर अहमदशहानें मराठ्यांच्या फौजेच्या दिशेनें कूच केलें. ( सादतयार खान कृत गुले रहमत ). यावेळीं अहमदशहाची अफगाण आणि हिंदुस्थानी फौज ( रोहिले आणि इतर ) मिळून एक लक्ष स्वार आणि पायदळ यांनीं युक्त होती. त्याचा तपशील असा. अहमदशहाची

अफगाण फौज तीस हजार, तितकेंच सैन्य हाफिज रहमतखान आणि त्याचे रिसालदार यांचे. नजीबखानापाशीं पंधरा हजार स्वार आणि पायदळ, शुजाउद्दौल्याचे वीस हजार सैन्य आणि अहमदखान बंगश यांचें सहा हजार सैन्य.

हें सैन्य घेऊन अहमदशहा यमुनेच्या कांठीं आला. त्यानें हाफिज रहमतखान, अहमदखान बंगश, शुजाउद्दौला आणि नजीबखान यांस नदीवर तीन पूल बांधण्याची आज्ञा केली. पूल तयार झाल्यावर सारी फौज विनायास नदी पार झाली. अहमदशहा नदी उतरून आला ही बातमी भाऊ आणि इतर मराठे यांना लागली. त्यांची फौज तीन लाख स्वार आणि पायदळ यांनीं युक्त होती. हें सैन्य कुंजपुऱ्याहून निघून पानिपतास आलें ( गुले रहमत ). तारीखे नजीबाबाद याचा कर्ता अकबर शहाखान म्हणतो कीं, मराठ्यांची फौज चार आणि पांच लाखाच्यामधें असावी. पानीपत येथें दंतकथा रूढ आहे ती अशी कीं पानिपतावर नऊ लाख मराठी भाले होते. मराठ्यांनीं पानीपत पाठीशीं घेऊन लढण्याची तयारी सुरू केली. त्याचप्रमाणें मराठ्यांच्या छावणीपासून कांहीं कोसावर अहमदशहानें आपली छावणी स्थापन केली. पहिल्या दिवसापासून उभय दळाच्या अघाडीच्या पथकाच्या चकमकी झडू लागल्या. त्यांत अहमदशहाच्या पथकांना जय मिळूं लागला. हें पाहून भाऊला वाटलें कीं असेंच चालू राहिलें तर आपला पराजय होईल. त्यापेक्षां मोठी लढाई लांबणीवर टाकून प्रथम अहमदशहाची रसद तोडावी. मराठ्यांनीं आपल्या छावणी भोवती पन्नास फूट रुंद आणि बारा फूट खोल खंदक खणला, आणि इब्राहिमखानाला त्यांच्या रक्षणावर नेमलें. नंतर चार पांच निवडक मराठे सरदार रसद तोडण्याच्या कामावर नेमण्यांत आले. मराठ्यांची छावणी पाहून अहमदशहानेंहि आपल्या छावणीभोंवतीं, जंगलांतील झाडें तोडून त्यांचा तट उभारला. अहमदशहानें रोहिले सरदारांना आज्ञा केली कीं तुम्ही मराठ्यांच्या बरोबर चकमकी चालू ठेवाव्या. त्यानें कांहीं अफगाण सरदारांना आपल्या सैन्याला रसदेचा पुरवठा करणें आणि मराठ्यांची रसद तोडणें या कामावर नेमलें. याचा परिणाम असा झाला कीं मराठ्यांच्या लष्करांत धान्य पोहोंचणें कठीण होऊन बसलें. आलासिंह जाट हा पतियाळा भागांतून धान्य पाठवीत असे. पण दुराणींनी त्या भागांत संचार करून तिकडून येणारी रसद पण बंद केली.

मराठ्यांची खात्री झाली कीं अहमदशहाच्या छावणींत रोहिलखंडांतून रसदेचा पुरवठा होत आहे. भाऊनें गोविंदपंत बुंदेले यास लिहिलें कीं तुम्ही ही रसद बंद करण्याचा प्रयत्न करा. आज्ञेप्रमाणें गोविंदपंत हा पंचवीस हजाराची फौज घेऊन यमुनेच्या कांठावर पोहोंचला. आणि त्यानें रसदेच्या सर्व वाटा रोखून धरल्या. अहमदशहाच्या छावणींत रसदेची इतकी टंचाई झाली कीं, धान्याची धारण रुपायाला एक शेरावर आली. हें झाल्यानंतर आपण रोहिलखंडावर हल्ला करावा असें गोविंदपंतानें ठरविलें. ( गुले रहमत ).

या सुमारास करीमदादखान आणि वजीर शहावलीखानाचा पुतण्या हाजी अताईखान हे अफगाणिस्तानांतून ताज्या दमाची सहा हजार फौज घेऊन अहमदशहाला मिळाले होते. त्यांना अहमदशहानें हुकुम केला कीं गोविंदपंताचें डोकें कापून हजर करावे. कांहीं हिंदुस्थानी (रोहिले) त्यांच्या मार्गदर्शनासाठीं दिमतीस देण्यांत आले. अताईखान आणि करीमदादखान हे तीन प्रहरा छावणींतून तडक निघाले. गाजीनगर छावणीपासून चाळीस कोसावर होतें. अताईखानाच्या फौजेनें प्रथम शहादरा येथें दिल्लीचा किल्लेदार शंकरराव याचा नायब होता, त्याला ठार मारले. नंतर ते पहाटे जलालाबादेस पोहोंचले. गोविंदपंताचा तळ त्याठिकाणी होता.

उभय सरदारांनीं मराठ्यांचा धुव्वा उडविला आणि गोविंदपंताचें डोकें कापून घेऊन ते अहमदशहाच्या छावणींत परत आले. चोवीस तासांत त्यांनीं ऐंशी कोसाची मजल मारली.

रसद मोकळी झाल्यावर अहमदशहानें विचार केला कीं लढाई जितकी लांबणीवर टाकावी तितकी यशाची खात्री अधिक राहील. लढाईला जसजसा विलंब लागू लागला तसतसें मराठ्यांचे हाल होऊं लागले. रसद तर बंद झालीच होती. त्यांच्या छावणींत घाण आणि दुर्गंध होऊन रोगराई होऊ लागली. भाऊनें शुजाउद्दौल्याच्या मार्फतीनें अहमदशहाबरोबर तडजोड करण्याचे अनेक प्रयत्न केले. प्रत्येक वेळेस नजीबखान आड आला. आणि तहास कबूल झाला नाहीं. तो म्हणे कीं अहमदशहा निघून गेल्यावर मराठे आम्हाला नेस्तनाबूद करतील. आतां त्यांच्याशी लढून त्यांचा पराजय करणें अगर लढतांना आपण मरून जाणें याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. (अकबरशहाखानकृत नजीबाबादचा इतिहास.)

अहमदशहानें खंदकासमोर एक तांबडा तंबू उभा केला होता. तो पहाटेची नमाज तेथेंच पडे. आणि रात्रीचें जेवणहि तेथेंच घेई. तो दिवसभर घोड्यावर बसून पाहणी करीत असे. तो रोज पन्नास साठ मैलाची चक्कर मारी.

रात्री शत्रूच्या छावणी भोंवती पांच हजार दळ सारखे घिरट्या घालीत असे. अहमदशहाहि रात्रीं लष्कराभोंवतीं फिरत असे.

हाफिज रहमतखानाचा मुलगा इनायतखान हा सोळा वर्षांचा होता. त्याला हाफिज रहमतखानानें बरेलीस ठेविले होतें. पानीपत वरील घटना त्याच्या कानीं पडूं लागल्या तसा तो बेचैन झाला. आपणहि त्या युद्धांत भाग घ्यावा या उद्देशानें त्याचे कारभारी पहाडसिंग आणि फतेखान खानसामा हे मना करीत असूनहि तो दोनशे स्वारासहित बरेलीहून निघून पानीपतला पोहोंचला. हाफिज रहमतखानानें वरवर कानउघाडणी केली पण मुलाच्या धडाडीनें त्याला आंतून आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं हाफिज रहमतनें त्याला अहमदशहाकडे नेलें. अहमदशहानें विचारलें कीं इनायतखान, तूं

आपल्या बापाला भेटण्याकरितां आला आहेस कां अफगाणांची अब्रू वांचविण्याकरितां. यावर इनायतखानानें उत्तर दिलें कीं बापाला भेटणें हा उद्देश होता तरी माझी मुख्य इच्छा अफगाणांचें मानरक्षण करणें हीच होती. (गुलिस्ताने रहमत)

अहमदशहाला हें ऐकून संतोष वाटला. त्यानें इनायतखानाला खिलेतीची वस्त्रें, तल्वार आणि घोडा हीं बहाल केलीं. आणि रोज दरबारांत हजर राहण्याचा हुकुम केला.

या सुमारास अहमदशहा पुढें होऊन लढाई करील अशी मराठ्यांना आशा राहिली नाहीं. त्याची प्रतीक्षा पाहणें त्यांनीं सोडून दिलें. त्यांनीं २९ नोव्हेंबर आणि २३ डिसेंबर रोजी वजीर शहावलीखान याच्यावर निकराचा हल्ला केला. एका हल्लयांत तर शहावलीखान मराठ्यांच्या तावडींत सांपडण्याचा प्रसंग आला होता. पण त्याच्या आणि नजीबखानाच्या शौर्यानें तो प्रसंग टळला. आणि मराठ्यांचा पराजय झाला. एके रात्री इब्राहीमखानाचा भाऊ फत्तेखान यानें हाफिज रहमतखानाच्या मोर्च्यावर छापा घातला. पण रोहिले वेळीच सावध झाले. विशेष नुकसान झालें नाहीं. रात्रभर मारामारी चालू होती. शेवटीं मराठ्यांना पराजय पावून परत जावें लागलें. मराठ्यांनीं इतकीं आक्रमणें केलीं. पण आपण होऊन लढाई न करण्याचें धोरण अहमदशहानें बदललें नाहीं.

पण तरुण रक्तांना इतका धीर कुठला.

एके दिवशीं इनायतखानानें अहमदशहा किंवा हाफिज रहमतखान यांची परवानगी न घेतां आपलें आणि नजीबखानाचें निवडक सैन्य घेऊन मराठ्यांच्या छावणीवर हल्ला केला. मराठे गाफिल होते. रोहिले खंदक पार करून आले. कित्येक मराठे मारले गेले. रोहिले तोफखान्यापर्यंत पोहोंचले आणि तेथें पोहोंचून ते आनंदानें डफ वाजवून गाणीं म्हणूं लागले. ऐन याच वेळीं चाळीस पन्नास हजार मराठे त्यांच्यावर तुटून पडले. निकराची लढाई झाली. प्रत्येक रोहिल्यानें दहा दहा माणसें मारलीं. पण मराठे बहुसंख्य होते. रोहिल्यांचा पराजय झाला. फक्त पांचशें रोहिले जखमांनीं भरलेले असे आपल्या छावणींत परत आले. अशा स्थितींतहि ते आनंदानें गात येत होते. शुजाउद्दौल्यानें त्यांना पाहून त्यांच्या धैर्याची प्रशंसा केली (सुलेमान खानकृत तारीखे अफगाणिस्तान) यानंतर थोड्या दिवसांनीं हाफिज रहमतखानाची आई वारल्याचें वृत्त आलें.

हाफिज रहमतखान स्वतः भयंकर आजारी पडला. युद्धांत तो भाग घेऊ शकला नाहीं. पण त्याच्या जागीं इनायतखान, दूंदेखान आणि फैजुल्लाखान हे लढले. (गुलस्ताने रहमत).

सदाशिवराव भाऊनें सैन्याची सगळी तयारी करून दुराणीच्या फौजेच्या दिशेनें कूच करण्याची आज्ञा केली. त्यानें इब्राहीमखान गार्दीचा तोफखाना समोर ठेविला.

त्याबरोबर जवळ जवळ सगळे पायदळ ठेविण्यांत आले. इतर सरदारांना त्यानें उजव्या, डाव्या आणि मध्य भागांत ठेविले. इब्राहीमखानानें प्रथम हाफिज रहमतखानाच्या मोर्च्यावर हल्ला केला.

शुजादद्दौला आणि नजीबखान हे मल्हारराव होळकर आणि शिंद्यांच्या समोर होते. आणि हाफिज रहमतखान आणि अहमदखान बंगश हे इब्राहीमखानाच्या समोर होते. इब्राहीमखानानें सगळ्या तोफांची सरबत्ती हाफिज रहमतखानाच्या सैन्यावर सुरू केली. हाफिज रहमतखानाच्या तर्फे इनायतखान, दूंदेखान आणि फैजुल्लाखान वगैरे रोहिले सरदार प्रतिकार करीत होते. इब्राहीमखानाच्या तोफांच्यापर्यंत पोहोंचण्याची त्यांची धडपड होती. म्हणून कित्येक लोक मृत आणि जखमी झाले तरी त्याची पर्वा न करतां रोहिले रणावर ठाण मांडून राहिले. इब्राहीमखान हा गोलंदाजींत अद्वितीय होता. तोफांचा भडिमार करून तो चाल करून जात होता. रोहिल्यांना त्यानें क्षणाचीहि उसंत दिली नाहीं. त्याच्या तोफांनीं रोहिले-खंडाचे हजारो रोहिले मृत अगर जखमी झाले. आणि अशा भयंकर स्थितींत उरलेले मागें हटूं लागले. अहमदखान बंगश मागें उभा होता. त्याला ते जाऊनं मिळाले. अहमदखानानें त्यांची निर्भत्सना केली आणि त्यांना परत फिरवून तो इनायतखान अघाडीवर लढत होता त्याला जाऊन मिळाला. याच सुमारास इनायतखानानें आपली माणसें घेऊन मराठ्यांच्यावर निकराचा हल्ला केला ( गुले रहमत ).

या माऱ्यापुढें मराठे मागे हटले. आणि रोहिल्यांनीं तोफा ताब्यांत घेतल्या आणि त्या शत्रूवर डागण्यास सुरवात केली. भाऊ आणि इतर सरदार इब्राहीमखानाच्या मदतीला धांवले. आणि ऐंशी हजार स्वारांनिशीं अफगाणांवर तुटून पडले. हा हल्ला अत्यंत निकराचा होता. अफगाणांनीं मर्दुमकी गाजविली. हजारो मराठे स्वारांना त्यांनीं घोड्यावरून खालीं पाडून मारले. तरी पण त्यांना हटावे लागले. अशा परिस्थितींतहि इनायतखान, दूंदेखान, फैजुल्लाखान, शेख कबीर, सय्यद मासूमशहा वगैरे सरदार निर्धारानें ठाण मांडून लढू लागले. या प्रसंगीं अहमदखान बंगशनें इकडून तिकडून पांगलेलीं माणसें गोळा करून इनायतखानाची मदत केली. यामुळें त्याला धीर येऊन सारेजण निकरानें लढू लागले. मैदानावर अल्लाहु अकबर आणि इनायतखान जिंदाबादच्या आरोळ्यांनीं वातावरण दणाणून गेलें. पण शत्रु बहुसंख्य त्यामुळें रोहिले मोठे पेंचांत सांपडले.

यावेळी अहमदशहा एका उंच टेकडीवर उभा राहून लढाई पाहात होता. रोहिल्यांची दुर्दशा त्याच्या दृष्टीस पडली. त्यानें हाजी अताईखानाला ताबडतोब त्यांच्या मदतीस पाठविले.

तो सहा हजार सैन्य घेऊन मराठे आणि रोहिले यांच्यामध्यें आला. त्यांनीं प्रथम बंदुकी चालविल्या. त्यामुळें शत्रु सैन्यांत खळबळ उडाली. नंतर तल्वारींनीं

त्यांनी मारामारी करण्यास सुरवात केली. या हाणामारींत हाजी अताईखान मारला गेला. त्यानंतर अहमदशहानें शहापसंदखानाबरोबर सहा हजार सैन्य देऊन पाठविलें. तोहि शौर्यानें लढत असतां मारला गेला.

याच सुमारास मल्हारराव होळकर आणि महादजी शिंदे यांनीं शुजाउद्दौला आणि नजीबखान यांच्या मोरच्यावर हल्ला केला. नजीबखानानें निर्धारानें लढून सुरवातीलाच मल्हाररावास पळवून लाविलें. आणि महादजी शिंदे बराच वेळ लढल्यानंतर रणांगणांतून पळून गेला. भाऊ आणि विश्वासराव यांनीं ही परिस्थिति पाहतांच त्या बाजूनें वीस हजार फौज हल्ला करण्यास पाठविली. या वेळी नजीबुद्दौला आणि मराठे यांत फार शर्थीची लढाई झाली. धुळीनें सूर्य दिसेनासा झाला. जमीनीवर रक्ताचे पाट वाहात होते. मोठ्या रक्तपातानंतर मराठे मागे हटले. नजीबाबादच्या पठाणांनीं दहा कोसापर्यंत त्यांचा पाठलाग केला.

( अकबर शहाखान कृत नजीबाबादचा इतिहास. )

इकडे हाजी अताईखान आणि शहापसंदखानाच्या सैन्यानें मराठ्यांचे तंबू आणि इतर सामान जाळून टाकले. भाऊ आणि इतर सरदार या बातमीनें चिंतित झाले. याच सुमारास अहमदशहानें आपल्या गुलामांच्या पल्टणीला आज्ञा केली कीं मराठे सरदार जेथें एकत्र झाले आहेत तेथें जाऊन बंदुकीच्या फैरी कराव्या आणि मग तल्वारी उपसून त्यांच्यावर हल्ला करावा. त्याप्रमाणें गुलामांच्या पल्टणीनें मराठे सरदार जमले होते त्याठिकाणीं हल्ला केला. परमेश्वरी कृपेनें आणि अहमदशहाच्या सुदैवानें जवळ जवळ सगळे सरदार बंदुकीच्या गोळ्यांनीं मारले गेले.

हाफिज रहमतखानाचा पणतू सुलेमानखान यानें तारीखे अफगाणिस्तान उर्फ नक्शे सुलेमानी आणि तारीखे सुलेमानी या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो कीं भाऊ इनायतखानाच्या हातून मारला गेला. तो म्हणतो—

"लढत लढत इनायतखान भाऊ उभा होता त्याजागीं पोहोंचला. भाऊनें त्याच्यावर भाला फेंकला इनायतखानानें तो चुकविला आणि सगळी शक्ति पणास लावून त्यानें भाऊच्या हातांतून बरछी इतक्या जोरानें ओढली कीं भाऊ घोड्यावरून खाली आला. इनायतखानानें भाऊचें डोकें कापून घेतलें.

अज़ शमूशेरे इनायतखां दरांजंग

अजल गुफ्ता सरे भाऊ तुरा शुद

"त्या युद्धांत इनायतखानाच्या तल्वारीप्रत मृत्यु म्हणाला कीं भाऊचें डोकें तुझें आहे. नंतर इनायतखानानें भाऊचें डोकें अहमदशहाला नजर केले."

एकीकडे अहमदशहाची अफगाण फौज आणि दुसरीकडे रोहिलखंडचे रोहिले यांनीं मराठ्यांचा प्रचंड संहार चालविला. प्रेताच्या असंख्य राशी लागल्या. मराठे पळत

आहेत हें पाहून अहमदशहानें हुकुम केला कीं दिल्लीपर्यंत त्यांचा पाठलाग करावा आणि मराठे सांपडतील तेथें मारावे.

हाफिज रहमतखान आजारी होता. तो पालखींत बसून आला आणि फैजुल्लाखान, इनायतखान इत्यादींना सुखरूप पाहून संतुष्ट झाला. इनायतखानाच्या अंगावर जखमा झाल्या होत्या. तरवार मुठींत घट्ट धरली होती. त्यामुळें हाताला सूज आली होती. अफगाणांनीं मराठ्यांचा दिल्लीपर्यंत पाठलाग केला. त्या तीन दिवसांत :दोन लाखापेक्षां जास्त मराठे मारले गेले. या युद्धांत एक पाव हिस्सा लोक जीव बचावून गेले असतील. दोन तीन सरदारांत मल्हाराव होळकर आणि महादजी शिंदे हे होते. जनकोजीचा शेवट असा झाला कीं युद्धांतून तो निसटला. एका चपळ घोड्यावर बसून तो चालला होता त्याचा शिरपेंच आणि उंची वस्त्रालंकार पाहून इनायतखानाचा एक रोहिला सहकारी त्याच्या मागे लागला. तीस कोस पर्यंत रोहिल्यानें जनकोजीचा पाठलाग केला. शेवटी जनकोजी पर्यंत पोहोंचून रोहिल्यानें तल्वारीच्या वारानें त्याचा घोडा जायबंदी केला. जनकोजी घोड्यावरून खाली आला. रोहिल्यानें त्याचें डोकें कापले. आणि त्याच्या अंगावरची वस्त्रें अलंकार, शिरपेच इत्यादि घेऊन तो परत आला. कर्नालच्या जवळ त्यानें शिरपेच एके ठिकाणीं शेणांत लपवून ठेविला. जनकोजीचें डोकें त्यानें इनायतखानाला आणून दिलें. इनायतखानानें म्हटलें—

"खान, जनकोचे डोकें तूं घेऊन आलास. पण शिरपेच कोण घेऊन गेला." यावर तो म्हणाला कीं शिरपेच शेणांत लपविला आहे. तुम्ही तो घ्याल आणि मला परत देणार नाहीं. इनायतखानानें म्हटलें कीं नाहीं. तू शिरपेच (कुला) घेऊन ये. मी तुला त्याचा मोबदल्यांत अश्रफ्या देतो. रोहिल्यानें शिरपेच आणून इनायतखानाला दिला. त्यानें त्याला पांचशे अश्रफ्या दिल्या. त्यानंतर इनायतखानानें जनकोजीचें डोकें अहमदशहाला नजर केलें. तेव्हां त्याची पाठ थापटून अहमदशहानें म्हटलें.

ई फतह बनामे तू निहादम मुबारक बाद. आफ़रीन बर तू व रहमते खुदा बर पिद्रे तू.

या जयाबद्दल तुझें अभिनंदन. धन्य आहे तुझी. तुझ्या बापावर परमेश्वराची कृपा राहो. (तारीखे सुलेमानी).

'जामे जहां नुमा' या ग्रंथांत नमूद आहे कीं युद्धांतून पळालेले मराठे इतके नागविले गेले होते कीं त्यांपैकीं वीस हजार माणसें भीक मागत हिंडूं लागली. सूरजमलनें त्यांना एकेक घोंगडी आणि दोन रुपये देऊन दक्षिणेकडे पाठविले. शुजाउद्दौल्यानें बारा हजार मराठ्यांना प्रत्येकीं दोन रुपये देऊन काल्पीस पाठविले.

इब्राहीमखान गार्दीच्या संबंधीं अहमदशहाला कळलें कीं तो रोहिल्यांच्या छावणींत आहे. विचारपूस करतां प्रथम हाफिज रहमतखानानें इन्कार केला. पण शपथ

घातल्यावर त्याला कबूल करावे लागलें. इब्राहीमखानाला अहमदशहाकडे पाठविण्यांत आलें. अहमदशहानें अनेक वेळां इब्राहीमखानाला आपल्याला येऊन मिळण्याविषयीं निरोप पाठविला होता. पण आपण मराठ्यांशीं निमकहरामी करणार नाहीं असें सांगून त्यानें अहमदशहाचा निरोप धुडकावून लाविला होता. त्यामुळें त्याचा वध करण्यांत आला. त्याच्या मुलाला हाफिज रहमतखानानें छावणींतून बंमुमुक्त करून गुपचुप पाठवून दिलें. ( गुले रहमत )

## मीर कवीच्या आत्मचरित्रांतील 'पानीपत'

[ उर्दू कविश्रेष्ठ मीर तकी मीर याचा जन्म १७२२ सालीं आग्रा येथें झाला. मीरचें घराणें मूळ अरबस्थानांतील. त्याचें पूर्वज गुजरातेंत अहमदाबाद येथें स्थायिक झाले. त्याचा आजा आग्र्यास गेला. मीरचा बाप हा एक नामांकित सूफी होता. मीरच्या ११ व्या वर्षीं तो मरण पावला व मीरला दिल्लीस जाणें भाग पडलें. वयाच्या ६० व्या वर्षापर्यंत मीर दिल्लीस राहिला. दिल्ली अनेकदां उध्वस्त झालेली त्यानें पाहिली. १७८२ सालीं तो लखनौच्या नवाबाच्या आश्रयास गेला. मग तो शेवटपर्यंत तेथेंच राहिला. १८१० मध्यें तो मृत्यु पावला. मीरचे आत्मचरित्र फारसी भाषेंत आहे. त्यांतील पानीपतची हकीकत पुढें दिली आहे. मीरनें मराठे दिल्लीस आले तेव्हां तें शहर सोडलें व विजय संपादून अहमदशहा दिल्लीस पोचल्यावर मीर दिल्लीस आला. ]

सूरजमल मराठ्यांना सोडून गेला त्याबद्दल मीर म्हणतो—

" भाऊच्या मनांत होतें कीं, वजीर इमादुल्मुल्कपाशीं जडजवाहिर आहे, आणि सूरजमल मोठा राजा आहे. वेळ मिळेल तर त्यांच्याकडून संपत्ति हरण करावी. राजा नागरमल (मीरचा आश्रयदाता) ला ही गोष्ट कळली होती. भाऊनें राजा नागरमलला सांगून पाठविलें कीं मी राज्य हवालीं करतों. राजानें सांगितलें कीं, मी पुष्कळ दिवसांपासून वजीराबरोबर आहे. त्याला अपयश यावें आणि मी आपलें साधून घ्यावें हें बरोबर नाहीं. तुम्ही वजीराला भरतपूरचा बंदोबस्त करण्यास सांगा, मी आणि सूरजमल त्याच्या बरोबर जातो. तेथील काम आटोपल्यावर तुमच्या मनासारखे करूं. राजा नागरमलने याप्रमाणें गोड थापा मारल्या. ( रोगने काज भला ) दक्षिणी फौज दिल्लीहून कूच करू लागली. त्यादिवशी राजा नागरमल आणि सूरजमल हे आपल्या फौजेसहित निघाले आणि दिल्लीपासून बारा कोसावर वल्लभगडाचा मजबूत किल्ला आहे तेथें येऊन बसले. वजीराचे डेरे तंबू आधींच येऊन दाखल झाले होतें. मराठयांनी त्यांची खूप समजूत घातली पण त्यांनीं त्यांचें कांहीं ऐकलें नाहीं. '

पानीपतबद्दल मीर म्हणतो, 'मराठे आपल्या गनिमी काव्यानें लढते तर त्यांना जय मिळणें शक्य होते. भोंवती तोफखाना ठेवून ते कोंडून बसले

आणि बादशाही ( अब्दाली ) फौजेनें त्यांची रसद बंद करण्याची व्यवस्था केली. कोंडमारा असह्य होऊन मराठयांची फौज लढण्याला उद्युक्त झाली...दक्षिणेचा सरदार ( भाऊ ) हिंमतीनें मैदानांत उतरला. त्यानें बादशाही फौजेचीं अनेक पथकें पिटाळून लाविली. पण यश अब्दालीच्या नशिबी लिहिले होते त्यामुळें त्यांच्या ( मराठ्यांच्या ) प्रयत्नाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पहिल्याच हल्ल्यांत विश्वासरावाला एक तीर लागला. तो राज्याचा युवराज होता. तो मारला गेला (खाको खून मे लौट गया). असें म्हणतात कीं भाऊ मोठा स्वाभिमानी होता. तो शौर्याची शर्थ करीत होता. जेव्हां त्यानें विश्वासरावाचा प्रकार आपल्या डोळ्यानें पाहिला तेव्हां तो म्हणाला कीं, दक्षिणेंत जाण्यास आतां मला तोंड राहिलें नाहीं आणि मग त्यानें जिवावर उदार होऊन अब्दालीच्या फौजेच्या मध्यावर हल्ला केला. म्हणजे त्यानें जाणून बुजून आपल्याला मृत्यूच्या दाढेंत लोटलें. मल्हारराव दोन तीन हजार सैन्यासहित तेथून पळाला. बाकीचे सर्व लष्कर गारद झाले. जे सरदार वाचले ते भिकाऱ्यासारखे भटकूं लागले. हजारो शिपायांचे घोडे आणि हत्यारे जवळपासच्या जमीनदारांच्या हातीं लागलीं. या समाजाला [ मराठयांच्या ] किती वाईट दिवस पहावा लागला हें मी कसें वर्णन करूं. हजारो उघडे नागडे, आणि रडतखडत रस्त्यावरून जात तेव्हां पाहणाऱ्यांना विलक्षण वाटे. गांवचे लोक प्रत्येकाला एक एक मूठभर चणे देत आणि त्याच्या मानानें आपण कितीतरी बरे आहोत हे पाहून परमेश्वराचे आभार मानीत. असा धडा शिकविणारा पराजय क्वचितच कुणाच्या वाटेला आला असेल. अनेकजण उपासमारीनें गेले. अनेकांनीं थंडीमुळें कांकडून जीव दिला. दिल्लींत फौज होती ती बादशाही फौजेच्या भीतीनें रातोरात पळून गेली. कोट्यावधि रुपयांची संपत्ति अब्दाली आणि त्यांच्या सरदारांच्या हाती लागली. ती त्यांनीं आपसांत वाटून घेतली. नगद रोकड आणि माल याशिवाय तोफखाना, हत्ती, बैल, घोडे, उंट हे शुजाउद्दाल्यानें आपल्याकडे घेतले. दुर्‍हाणींचे शिपाई फकीर होते ते संपन्न बनले. प्रत्येक दहबाशीला, ( दहा शिपायांचा नायक ) शंभर उंटाचें सामान हातीं लागलें. प्रत्येकाचा आनंद गगनांत मावत नव्हता. शहा अब्दालीसारखें घवघवीत यश भूतकाळांतील कोणत्याच बादशहाला लाभलें नाहीं. तो मोठ्या इतमामानें दिल्लींत दाखल झाला. ”